# ‘‘मराठवाडयाच्या सामाजिक व आर्थिक विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची भूमिका’’

**(सन २००५—०६ ते २००९—१०)**

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी करीता करण्यात आलेला

## शोध प्रबंध


संशोधक

प्रा.श्री पोळ कार्तिक वज्रपाल

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय तुळजापूर जि. उस्मानाबाद

**कायम नोंदणी क्र. ०२१११०००७७०**

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. अनिल बाबुराव सुर्यवंशी

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी, जि. सोलापूर.

अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा

सदस्य व्यवस्थापन परिषद

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर


जुलै २०१३

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **प्रा. श्री पोळ कार्तिक वज्रपाल** यांनी ''मराठवाडयाच्या सामाजिक व आर्थिक विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची भूमिका'' हा शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी करीता सादर केला आहे. हा प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या पूर्ण केला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठातील अन्य कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही. या विषयातील केलेले संशोधन कार्य मुळ आणि अस्सल असून ते पीएच. डी. या पदवीसाठी योग्य आहे.

ठिकाण :— बार्शी

दिनांक :—

मार्गदर्शक

**प्राचार्य डॉ. अनिल बाबुराव सुर्यवंशी**
बी. पी. सुलाखे कॉमर्स् कॉलेज बार्शी,
जि. सोलापूर

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, ''मराठवाडयाच्या सामाजिक व आर्थिक विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची भूमिका'' या विषयावरील प्रबंध मी स्वत: लिहिलेला असून तो टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी करीता सादर केला आहे. हा प्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठातील या स्वरूपात कोणीही सादर केलेला नाही. तसेच मी देखील तो अन्य विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण :— तुळजापूर

दिनांक :—

**संशोधक**

**प्रा. श्री पोळ कार्तिक वज्रपाल**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
तुळजापूर, जि. उस्मानाबाद
नोंदणी क्र. ०२१११०००७७०

# ऋण निर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे अंतर्गत अर्थशास्त्र विभागामध्ये ''मराठवाडयाच्या सामाजिक व आर्थिक विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची भूमिका'' या विषयावर पीएच.डी पदवीसाठी शोध प्रबंध सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. कारण माझ्यातील संशोधनवृत्ती जागृत करून पीएच.डी. या पदवीच्या विषय निवडीपासून ते अखेर पर्यंत माझे आदरणीय गुरू, एक विचारवंत, सोलापूर विद्यापीठाचे वाणिज्य विभागाचे आधिष्ठाता व बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. अनिल सुर्यवंशी हे मला मागदर्शक म्हणून लाभले हे माझे भाग्यच समजतो. त्यांच्या सखोल ज्ञानाने, कुशल मार्गदर्शनाने, बहुमुल्य वेळ व सातत्याने केलेले मार्गदर्शन आणि मला दिलेले प्रोत्साहन यामुळे मी हे संशोधन कार्य पूर्ण करू शकलो. त्यांचे आभार व्यक्त करून मी सदैव त्यांचा ऋणी राहीन.

माझे एम.फील पदवीचे मार्गदर्शक तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथील अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. टी. एल. बारबोले सर यांनी मला वेळोवेळी संशोधनासाठी मार्गदर्शन केले त्यांचाही मी सदैव ऋणी राहीन.

संशोधन विषयाची माहिती संकलीत करीत असताना मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. कुरूलकर र. पु. यांनी मला त्यांचा बहुमुल्य वेळ देऊन मला मुलाखत देवून त्याच प्रमाणे त्यांनी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाविषयी वेगवेगळया नियतकालीकेमधील लेख दिले. तसेच संशोधनासाठी बहुमुल्य मार्गदर्शन केले. त्यांचाही मी सदैव ऋणी राहीन. मराठवाडा वैधानिक विकास मंडळ औरंगाबाद येथील कार्यालयातील संशोधक सहाय्यक श्री जी. डी. चव्हाण, श्री एस. बी. कुलकर्णी, स्वीय सहाय्यक श्री सुनील जाधव, प्रशासकीय अधिकारी नि संशोधक अधिकारी श्री ग. रू. वायाळ, शिपाई श्री एस. बी घुले यांनी मला संशोधनासाठी लागणारे संशोधन साहित्य देवून मला मोलाचे सहकार्य केले, मी त्यांचाही आभारी आहे.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एस. मोहिते सर, मला संशोधनामध्ये सतत प्रेरणा देणारे व मला मदत करणारे माझे सहकारी मित्र डॉ. सतीश कदम, प्रा. प्रमोद मुळे, प्रा. पांडुरंग शिवशरण, प्रा बाबुराव शिंदे, प्रा. वाघमारे बी. एन., डॉ. दयानंद भोवाळ, डॉ. विनय चौधरी, डॉ. हाश्मबेग मिर्जा, डॉ. पंडीत गायकवाड, प्रा. सुर्यकांत कापसे, प्रा. अमोद जोशी, डॉ.

अशोक मर्डे, प्रा. महादेव देशमुख, श्री संतोष मेटकरी, या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

माझ्या शिक्षणासाठी कष्ट घेणारे व मला प्रेरणा देणारे माझे मामा श्री अरूण व्हटकर (उपसंचालक, शिक्षण विभाग लातूर), श्री त्र्यंबक व्हटकर, श्री विनायक व्हटकर, मावशी स्नेहलता नारायणकर, आजोबा कै. येडबा एकनाथ व्हटकर, आजी कै. नर्मदाबाई येडबा व्हटकर, यांच्या सर्वांच्या प्रेम, आशिर्वाद व कष्टामुळेच मी माझे शिक्षण पूर्ण करून आज शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्य पदवी प्राप्त करीत आहे. त्यांचा मी आयुष्यभर ऋणी राहीन. तसेच माझ्या आई वडीलांचा मी ऋणी आहे. माझ्या संशोधन कार्यात मला सतत बाहेर गावी जावे लागत असे किंवा संशोधनासाठी अभ्यास करीत असताना माझ्या संसाराची बाजू सांभाळणारी व मला सतत सहकार्य करणारी माझी पत्नी सौ. सुनिता व संशोधन कार्य करीत असताना ज्यांच्या कडे दुर्लक्ष होत होते ती माझी मुलगी क्षितीजा व मुलगा तन्मय (आर्यन) यांचेही सहकार्य लाभले.

तसेच हा शोध प्रबंध कमी वेळात सुबक, सुंदर, आकर्षक व चांगल्या प्रकारे संगणकिकृत करून देण्यात श्री संतोष श्रीमंत शिंदे यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांचा मी आभारी आहे.

शेवटी माझे आयुष्य उभे करण्यासाठी आणि संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी ज्या ज्ञात—अज्ञातकांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य लाभले अशा सर्वांचा मी आभारी आहे.

तुळजापूर — प्रा. श्री पोळ कार्तिक वज्रपाल

दिनांक :— / /

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे शिर्षक | पृ.क्र. |
|---|---|---|
| 1 | प्रमाण पत्र | II |
| 2 | प्रतिज्ञापत्र | III |
| 3 | ऋणनिर्देश | IV-V |
| 4 | तक्ता सूची | VI-XIV |
| 5 | आलेख सूची | XV |
| 6 | प्रकरण पहिले — प्रस्तावना | 1-42 |
| 7 | प्रकरण दुसरे — संशोधन साहित्याचे पुनरावलोकन व संशोधन आराखडा | 43-94 |
| 8 | प्रकरण तिसरे — मराठवाडा विभागातील जिल्ह्यांचे सामाजिक व आर्थिक समालोचन | 95-148 |
| 9 | प्रकरण चौथे — मराठवाडयाची अर्थव्यवस्था व मागासलेपणाची कारणे | 149-169 |
| 10 | प्रकरण पाचवे — मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना, रचना, भूमिका व कार्ये | 170-183 |
| 11 | प्रकरण सहावे — मराठवाडा वेधानिक विकास मंडळाचे आर्थिक विकासातील योगदान | 184-316 |
| 12 | प्रकरण सातवे — मराठवाडा वेधानिक विकास मंडळाचे मराठवडयाच्या सामाजिक विकासात योगदान | 317-346 |
| 13 | प्रकरण आठवे — निष्कर्श व शिफारशी | 347-368 |
| 14 | संदर्भ ग्रंथ सूची | 369-373 |
| 15 | परिशिष्ठ :— १) मुलाखत अनुसूची, २) प्रश्नावली अनुसूची, ३) मुलाखत घेतेवेळीचे छायाचित्र | 374-378 |

.

# तक्ता सूची


| तक्ता क्र. | तक्त्यांचे शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| 1·1 | सरकारी उद्योगांची प्रगती | 27 |
| 2·1 | १९६० मधील महाराष्ट्रातील विभागवार तुलना | 56 |
| 2·2 | १९७१ मधील महाराष्ट्रातील विभागीय आर्थिक स्थिती | 59 |
| 2·3 | महाराष्ट्र राज्याचा विभागवार विकास अनुशेष (रू. लाखात) | 65 |
| 2·4 | उत्तर दात्याची नमुना निवड | 88 |
| 4·1 | मराठवाडा आणि महाराष्ट्रातील दारिद्रय रेषेखालील कुटुंब (१९९७ — १९९८) | 156 |
| 4·2 | महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ — दरडोई उत्पन्न व निर्देशांक | 161 |
| 4·3 | वित्तीय सेवा संस्थांची विभागवार स्थिती | 164 |
| 4·4 | मराठवाडयाचा मानव विकास निर्देशांक | 167 |
| 6·1 | महाराष्ट्रातील प्रादेशिक पातळीवरील अनुशेष | 209 |
| 6·2 | मराठवाडयातील सिंचन क्षेत्रातील वित्तीय अनुशेष | 203 |
| 6·3 | ३ मराठवाडयातील सिंचन क्षेत्र वगळता इतर क्षेत्रातील वित्तीय अनुशेष | 214 |
| 6·4 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने जिल्हानिहाय केलेल्या विशेष निधीचे वाटप (सन २००५—०६ ते सन २००९—१०) | 217 |
| 6·5 | म. वै. वि. मंडळाने औरंगाबाद जिल्ह्यातील तालुक्यांना दिलेला विशेष निधी (सन २००५—०६ ते २००९—१०) | 219 |
| 6·6 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून औरंगाबाद तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 221 |
| 6·7 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून खुलताबाद तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 223 |
| 6·8 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून फुलंब्री तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 224 |
| 6·9 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून सिल्लोड तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 225 |
| 6·10 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून पैठण | 226 |

| | | |
|---|---|---|
| | तालुक्यासाठी | |
| 6·11 | मराठवाडा वैधा ... –०६ ते २००९–१० य ... न्नड तालुक्यासाठी | 227 |


# तक्ता सूची


| तक्ता क्र. | तक्त्यांचे शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| 6·12 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून वैजापूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 228 |
| 6·13 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून गंगापूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 229 |
| 6·14 | म. वै. वि. मंडळाने जालना जिल्ह्यातील तालुक्यांना दिलेला विशेष निधी (सन २००५–०६ ते २००९–१०) | 230 |
| 6·15 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून जालना तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 232 |
| 6·16 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून अंबड तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 233 |
| 6·17 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून भोकरदन तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 234 |
| 6·18 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून जाफ्राबाद तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 235 |
| 6·19 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून परतूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 237 |
| 6·20 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९ –१० या कालावधीत विशेष निधी मधून बदनापूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 238 |
| 6·21 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून मंठा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 239 |
| 6·22 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून घनसावंगी | 240 |

.


| | | |
|---|---|---|
| | तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | |
| 6·23 | म. वै. वि. मंडळाने बीड जिल्ह्यातील तालुक्यांना दिलेला विशेष निधी (सन २००५–०६ ते २००९–१०) | 241 |
| 6·24 | म. वै. वि. मंडळाने सन ०५–०६ ते ०९–१० या कालावधीत विशेष निधी मधून बीड तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 243 |


# तक्ता सूची


| तक्ता क्र. | तक्त्यांचे शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| 6·25 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून गेवराई तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 244 |
| 6·26 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून माजलगाव तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 245 |
| 6·27 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून अंबेजोगाई तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 246 |
| 6·28 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून केज तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 248 |
| 6·29 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून पाटोदा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 249 |
| 6·30 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून आष्टी तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 250 |
| 6·31 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून धारूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 251 |
| 6·32 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून परळी तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 252 |
| 6·33 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून वडवणी तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 253 |
| 6·34 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून शिरूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 254 |

.


| | | |
|---|---|---|
| 6·35 | म. वै. वि. मंडळाने परभणी जिल्ह्यातील तालुक्यांना दिलेला विशेष निधी (सन २००५—०६ ते २००९—१०) | 255 |
| 6·36 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून परभणी तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 257 |

# तक्ता सूची


| तक्ता क्र. | तक्त्यांचे शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| 6·37 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून जिंतूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 258 |
| 6·38 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून सेलू तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 259 |
| 6·39 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून पाथ्री तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 260 |
| 6·40 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून गंगाखेड तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 261 |
| 6·41 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून पालम तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 262 |
| 6·42 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून पूर्णा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 262 |
| 6·43 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून सोनपेठ तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 263 |
| 6·44 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून मानवत तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 264 |
| 6·45 | म. वै. वि. मंडळाने हिंगोली जिल्ह्यातील तालुक्यांना दिलेला विशेष निधी (सन २००५—०६ ते २००९—१०) | 265 |
| 6·46 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून हिंगोली तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 267 |
| 6·47 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून सेनगाव तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 268 |
| 6·48 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून कळमनुरी तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 269 |
| 6·49 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेषनिधी मधून औंढानागनाथ तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 269 |

# तक्ता सूची


| तक्ता क्र. | तक्त्यांचे शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| 6·50 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून वसमत तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 270 |
| 6·51 | म. वै. वि. मंडळाने नांदेड जिल्ह्यातील तालुक्यांना दिलेला विशेष निधी (सन २००५—०६ ते २००९—१०) | 272 |
| 6·52 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून नांदेड तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 274 |
| 6·53 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून भोकर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 275 |
| 6·54 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून कंधार तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 276 |
| 6·55 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून किनवट तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 277 |
| 6·56 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून हदगाव तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 277 |
| 6·57 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून बिलोली तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 278 |
| 6·58 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून मुखेड तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 279 |
| 6·59 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून देगलूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 280 |
| 6·60 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून लोहा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 281 |
| 6·61 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून मुदखेड तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 282 |

# तक्ता सूची


| तक्ता क्र. | तक्त्यांचे शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| 6·62 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून माहूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 283 |
| 6·63 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून माहूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 283 |
| 6·64 | म. वै. विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून हिमायतनगर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 284 |
| 6·65 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून धर्माबाद तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 285 |
| 6·66 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून अर्धापूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 286 |
| 6·67 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून नायगाव तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 287 |
| 6·68 | उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुक्यांना केलेल्या विशेष निधीचे वाटप | 288 |
| 6·69 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून उस्मानाबाद तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 290 |
| 6·70 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून कळंब तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 291 |
| 6·71 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून उमरगा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 292 |
| 6·72 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून तुळजापूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 293 |
| 6·73 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून परांडा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 294 |
| 6·74 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून भूम तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 295 |

# तक्ता सूची


| तक्ता क्र. | तक्त्यांचे शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| 6.75 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून लोहारा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 296 |
| 6.76 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून वाशी तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 297 |
| 6.77 | लातूर जिल्ह्यातील तालुक्यांना केलेल्या विशेष निधीचे वाटप | 298 |
| 6.78 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून लातूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 300 |
| 6.79 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून अहमदपूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 301 |
| 6.80 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून उदगीर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 302 |
| 6.81 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून निलंगा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 303 |
| 6.82 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून औसा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 304 |
| 6.83 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून चाकूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 305 |
| 6.84 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून रेणापूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 306 |
| 6.85 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून देवणी तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 307 |
| 6.86 | म. वै. विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून शिरूर अनंतपाळ तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | 308 |
| 6.87 | म. वै. वि. मंडळाने सन ०५—०६ ते ०९—१० या कालावधीत | 309 |

.


| | | |
|---|---|---|
| | विशेष निधी मधून जळकोट तालुक्यासाठी केलेला विकास खर्च. | |

| तक्ता क्र. | तक्त्यांचे शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| 7·1 | उत्तर दात्याची नमुना निवड | 326 |
| 7·2 | निवड लाभार्थ्याची वयोरचना | 328 |
| 7·3 | निवड लाभार्थ्याचे कुटुंबाचा आकार | 329 |
| 7·4 | निवड लाभार्थ्यांचा वैवाहिक दर्जा | 330 |
| 7·5 | निवड लाभार्थ्यांचे धर्मानुसार वर्गीकरण | 330 |
| 7·6 | निवड लाभार्थ्यांचे जातीनुसार वर्गीकरण | 331 |
| 7·7 | निवड लाभार्थ्यांचे भाषेनुसार वर्गीकरण | 332 |
| 7·8 | निवड लाभार्थ्यांचे शैक्षणिक दर्जा | 333 |
| 7·9 | निवड लाभार्थ्यांचे व्यवसाय नुसार वर्गीकरण | 333 |
| 7·10 | निवड लाभार्थ्यांना मराठवाडा वैधानिक विकास मंडळाविषयी असणारी माहिती | 335 |
| 7·11 | निवड लाभार्थ्यांना म. वै. वि. मंडळाने त्यांच्या गावात केलेल्या विकास कामाविषयी असणारी माहिती | 335 |
| 7·12 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामाविषयी निवड लाभार्थ्यांच्या कुटूंबाच्या उपयोगाविषयी माहिती | 336 |
| 7·13 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामांचा निवड गावातील लोकांच्या उपयोगाविषयी माहिती | 337 |
| 7·14 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामामुळे निवड गावातील लाभार्थ्यांच्या राहणीमीनात झालेला बदल | 337 |
| 7·15 | मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामामुळे निवड गावातील लाभार्थ्यांच्या राहणीमीनात झालेला बदल | 338 |
| 7·16 | म. वै. वि. मंडळने केलेल्या विकास कामाच्या दर्जा संबंधी माहिती | 339 |
| 7·17 | नमुना निवड लाभार्थ्याकडून म. वै. वि. मंडळाच्या विकास कामाविषयी तक्रारी | 339 |


# तक्ता सूची

.

# आलेख सूची


| आलेख क्र. | आलेखाचे शिर्षक | पृ. क्र. |
| --- | --- | --- |
| 6·1 | सत्यशोधन समितीचा अहवाल (१९८४) नुसार महाराष्ट्रातील प्रादेशिक पातळी वरील अनुशेष | 210 |
| 6·2 | निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवाल (१९९४) नुसार अनुशेष महाराष्ट्रातील प्रादेशिक पातळी वरील अनुशेष | 211 |
| 6·3 | दि. १ एप्रिल २००० रोजीचा शिल्लक अनुशेष | 212 |
| 6·4 | म. वै. वि. मंडळाने जिल्हा निहाय विशेष निधीचे वाटप सन २००५—०६ ते सन २००९—१० | 218 |
| 6·5 | म. वै. वि. मंडळाने औरंगाबाद जिल्ह्यातील तालुका निहाय विशेष निधीचे वाटप (सन २००५—०६ ते सन २००९—१०) | 220 |
| 6·6 | म. वै. वि. मंडळाने जालना जिल्ह्यातील तालुका निहाय विशेष निधीचे वाटप (सन २००५—०६ ते सन २००९—१०) | 221 |
| 6·7 | म. वै. वि. मंडळाने बीड जिल्ह्यातील तालुका निहाय विशेष निधीचे वाटप (सन २००५—०६ ते सन २००९—१०) | 242 |
| 6·8 | म. वै. वि. मंडळाने परभणी जिल्ह्यातील तालुका निहाय विशेष निधीचे वाटप (सन २००५—०६ ते सन २००९—१०) | 256 |
| 6·9 | म. वै. वि. मंडळाने हिंगोली जिल्ह्यातील तालुका निहाय विशेष निधीचे वाटप (सन २००५—०६ ते सन २००९—१०) | 266 |
| 6·10 | म. वै. वि. मंडळाने नांदेड जिल्ह्यातील तालुका निहाय विशेष निधीचे वाटप (सन २००५—०६ ते सन २००९—१०) | 273 |
| 6·11 | म. वै. वि. मंडळाने उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुका निहाय विशेष निधीचे वाटप (सन २००५—०६ ते सन २००९—१०) | 289 |
| 6·12 | म. वै. वि. मंडळाने लातूर जिल्ह्यातील तालुका निहाय विशेष निधीचे वाटप (सन २००५—०६ ते सन २००९—१०) | 299 |

प्रकरण पहिले

# प्रस्तावना

१.१ प्रस्तावना
१.२ आर्थिक विकासाची संकल्पना
१.३ आर्थिक विकासाचा अर्थ
१.४ आर्थिक विकासाची व्याख्या
१.५ आर्थिक विकासाची वैशिष्टये
१.६ आर्थिक विकासाची आधारभूत तत्वे
१.६.१ आर्थिक विकासाची आवश्यकता
१.६.२ विकासाचा देशीय आधार
१.६.३ भांडवल संचय
१.६.४ बाजार व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे
१.६.५ गुंतवणूकीची उपयुक्तता
१.६.६ सुयोग्य नेतृत्व आणि प्रशासकीय कुशलता
१.६.७ सामाजिक आणि मानसशास्त्रीय आवश्यकता
१.६.८ श्रमिकांच्या योग्यता आणि कार्यक्षमतेत वाढ
१.६.९ आधारभूत संरचनेचा विकास
१.६.१० मानवीय संसाधनाचा विकास
१.६.११ व्यावसायिक रचना
१.६.१२ विदेशी व्यापार
१.६.१३ लोकसंख्या नियंत्रण
१.६.१४ भौतिक वस्तुचे उत्पादन
१.६.१५ सार्वजनीक क्षेत्राचा विकास
१.७ आर्थिक वृध्दीचा सैध्दांतिक आधार
अ) समतोल वृध्दी विकास तत्व
ब) असमतोल वृध्दी विकास तत्व
१.८ सामाजिक विकासाची संकल्पना
१.८.१ समाजशास्त्र म्हणजे काय
१.८.२ सामाजिक विकासाचा अर्थ
१.८.३ सामाजिक विकासासाठी आवश्यक घटक
१.९ वैधानिक विकास मंडळाची संकल्पना
१.१० केंद्र सरकारच्या मालकीचे सार्वजनीक उपक्रम
१.११ महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक उपक्रम (महामंडळे)
१.११.१ राज्य सार्वजनिक उपक्रमाची विविधता
१.११.२ राज्य सार्वजनिक उपक्रमांची एकूण आर्थिक साधणे
१.११.३ राज्य सार्वजनीक उपक्रमांच्या कामगिरीचा आढावा व मार्गदर्शन
१.११.४ सार्वजनिक उपक्रमांकडून राज्य शासनास परतावा
१.११.५ महाराष्ट्रातील राज्य सार्वजनिक उपक्रमांची थोडक्यात माहिती
अ) वाणिज्यिक, ब) वाणिज्यिक नि प्रवर्तक, क) प्रवर्तक, ड) वित्तीय, इ) सार्वजनिक उपयुक्ता.
समारोप
संदर्भ

**प्रकरण पहिले**

# प्रस्तावना

**१.१ प्रस्तावना** :—

भारत हा देश १५ ऑगष्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला आणि नियोजनबध्द आर्थिक विकासासाठी पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. १ एप्रिल १९५१ पासुन राष्ट्रीय नियोजनास प्रारंभ झाला. नियोजित आर्थिक विकासाच्या मुलभूत उद्दिष्टांपैकी संतुलीत आर्थिक विकास हे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे. कारण अर्थव्यवस्थेचा सर्वांगिण विकास करण्यासाठी संतुलीत आर्थिक विकास होणे गरजेचे आहे. आजपर्यंत आपण १० पंचवार्षिक योजना पुर्ण केल्या आहेत. ११ वी पंचवार्षिक योजना पूर्णत्वास येत आहे. विकास कामावर खुप मोठया प्रमाणात शासनाने खर्च केला आहे. यातुन आर्थिक विकासाची उद्दिष्टये कमी अधिक प्रमाणात साध्य झाली. कृषी क्षेत्रात हरित क्रांती घडुन आली. उद्योग आणि सेवा क्षेत्रातही लक्षणीय विकास घडुन आला आहे. पण देशाच्या आर्थिक विकासाचा सुक्ष्म अभ्यास केला असता त्यात आपणांस काही त्रुटी आढळून येतात. भारतात खुप मोठया प्रमाणावर प्रादेशिक विषमतेची दरी निदर्शनास येते. मागासलेल्या विभागाचा सर्वांगिण विकासासाठी संतुलीत प्रादेशिक विकास होणे आवश्यक आहे. देशात प्रादेशिक असमतोल खूप मोठया प्रमाणात आहे.

महाराष्ट्र राज्य औद्योगीक व आर्थिक विकासाच्या दृष्टिने विकसित राज्य म्हणून ओळखले जाते. सन २०१०—२०११ मध्ये भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ९.३% लोकसंख्या महाराष्ट्राची होती तर देशातील एकूण औद्योगीक उत्पादनामधे २०% हिस्सा आणि स्थुल देशी उत्पादनामध्ये (G.D.P.) मध्ये १४.९% महाराष्ट्राचा हिस्सा होता. सन २०१०—२०११ मध्ये दरडोई उत्पन्न चालू किंमतीनुसार रू. ८७६८६/— होते. त्याचवेळी पंजाब राज्याचे दरडोई उत्पन्न रू. ६९७३७/— होते. महाराष्ट्र राज्य हे विकसीत राज्य असले तरी या राज्याचा समतोल विकास झालेला नाही. राज्यातील मुंबई, पुणे, ठाणे व

पश्चिम महाराष्ट्रातील कांही जिल्ह्यांचा विकास झालेला आहे. तर विदर्भ, कोकण किनारपट्टी व मराठवाडा विभागाचा अजुनही विकास झालेला नाही. या भागाच्या विकासाठी काही प्रयत्न केले जावेत. विकासाचा अनुशेष भरुन काढून संपुर्ण राज्य विकसीत होण्याच्या दृष्टिने सरकार पातळी वरून प्रयत्न केले जात आहेत. त्यामधील प्रादेशिक वैधानिक विकास मंडळ हे महत्वपुर्ण मंडळ आहे.

महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरीत महाराष्ट्र या प्रदेशासाठी तीन वैधानिक विकास मंडळाची स्थापना राज्यघटनेच्या कलम ३७१(२) प्रमाणे दि. ३० एप्रिल १९९४ रोजी करण्यात आली. त्यातील मराठवाडा वैधानिक विकास मंडळाअंतर्गत मराठवाडा विभागाच्या आर्थिक व सामाजिक विकासात मोलाची भर पडत आहे.

## १.२ आर्थिक विकासाची संकल्पना :—

सर्वसामान्यपणे जगातील देशांचे प्रामुख्याने दोन गटात वर्गिकरण करण्यात येते. एका बाजुला विकसित किंवा प्रगत देश — त्यामधे अमेरिका, इंग्लंड, जपान, जर्मनी, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इत्यादी अनेक देशांचा समावेश केला जातो. तर दुसऱ्या बाजुला अल्पविकसित किंवा विकसनशील देश त्यामधे भारत, पाकिस्तान, चीन, बांग्लादेश, इत्यादी अनेक देशांचा समावेश करण्यात येतो. विशेषत: प्रगत देशात भांडवल संचय, तांत्रिक ज्ञान, संयोजन कौशल्य, संशोधन इत्यादी अनेक घटक पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतात त्यामुळे त्याची आर्थिक प्रगती होत राहिली परंतु अल्प विकसित किंवा विकसनशील देशाच्या विकास मार्गात अनेक अडथळे निर्माण झालेले असतात. **उदा. :—** भांडवल निर्मितीचा अल्प दर, लोकसंख्या वाढ, वाढती बेकारी, वाढते दारिद्रय, वाढती आर्थिक विषमता, संयोजन कौशल्याचा अभाव, परंपरागत शेती व्यवसाय, लोकांचे अज्ञान, मागासलेला समाज, संशोधनाचा अभाव, अतिरीक्त शेतीवरील विसंबन, काळा पैसा, भ्रष्टाचार इत्यादीमुळे अशा देशांच्या विकासावर मर्यादा पडतात. सारांश प्रगत आणि अप्रगत अशा सर्वच देशांना एका समान पातळीवर विकास करणे अशक्य असते.

देशादेशातील प्रदेशामधे देखील विकासाच्या बाबतीत कमालीचा असमतोलपणा असतो. काही प्रदेशात शेती, उद्योग, व्यापार ही क्षेत्रे विकसीत झालेली असतात तर कांही प्रदेशात शेतीशिवाय अन्य क्षेत्राचे अस्तित्व असत नाही.

भारतासारख्या विकसनशील देशाचा विचार केल्यास भारताला स्वातंत्र्य मिळून जवळ जवळ ६५ वर्षे पूर्ण झाली असली तरी देखील भारताचा समान किंवा समतोल विकास झालेला नाही. नियोजनाच्या प्रक्रियेत प्रथम पंचवार्षिक योजनेत प्रामुख्याने कृषी क्षेत्राला प्रथम अग्रक्रम देण्यात आला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत उद्योग धंद्याला प्राधान्यक्रम देण्यात आला तर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत कृषी व उद्योगांचा समन्वय साधण्यात आला. असे असले तरी देखील भारताला समतोल प्रादेशिक विकासाचे उद्दिष्टय साध्य करता आलेले नाही. आज भारतातील कांही राज्यांनी **उदाहर्णार्थ** :— महाराष्ट्र, तामिळनाडु, पं. बंगाल, गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, पंजाब, हरियाणा इत्यादी राज्यांनी प्रगती साध्य करण्याचा प्रयत्न चालू ठेवला आहे. मात्र आज ही कांही राज्ये **उदाहर्णार्थ** — राजस्थान, बिहार, ओरीसा, मिझोरम, मध्यप्रदेश इत्यादी राज्ये औद्योगिक दृष्टया मागासलेली आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या विकासाच्या बाबतीत देखील असमतोल पणा आढळून येतो. विशेषतः पश्चिम महाराष्ट्र, कोकण, विदर्भ हा भाग औद्योगिक आणि आर्थिक दृष्टया पुढारलेला आहे. मात्र मराठवाडा विभाग आजही औद्योगिक आणि आर्थिकदृष्टया मागासलेला असल्याचे दिसून येते. मराठवाडयातील कांही जिल्ह्यांची (औरंगाबाद,नांदेड) औद्योगिक प्रगती झाली मात्र कांही जिल्हे (बीड,जालना,परभणी,लातुर,उस्मानाबाद,हिंगोली) आजही औद्योगिक आणि आर्थिकदृष्टया पुढारलेली नाहीत. अशा प्रकारचा एकूण विकासामधे असमतोलपणा आढळतो.

## १.३ आर्थिक विकासाचा अर्थ :—

अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांच्या 'राष्ट्राची संपत्ती' या ग्रंथापासून आर्थिक विकासाच्या शास्त्रशुध्द अभ्यासाला सुरूवात झाली आणि नंतरच्या

काळात आर्थिक विकासाच्या अभ्यासावर वेगवेगळया विचारवंताच्या विचार सरणीचा प्रभाव पडत गेला त्यामधे रिकार्डो, कार्लमार्क्स, रोस्टो, शुंपीटर, रॉबिन्स इत्यादीचा समावेश होतो. २० व्या शतकाच्या पुर्वार्धात महायुध्दे, महामंदी इत्यादी समस्यामुळे आर्थिक अध्ययन फारसे झाले नाही. पण त्या नंतर २० व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये आर्थिक विकासाचा जलद अभ्यास झाला व आर्थिक विकासाची प्रेरणा सर्व जगात जलद गतीने पसरली आहे. या आर्थिक विकासाच्या लाटेपुढे जगातील कोणताही देश अलिप्त राहिलेला नाही. जगातील सर्वच राष्ट्रांमधे विकासाची प्रबळ प्रेरणा निर्माण झाली आहे व आज जगाचे राजकारण आर्थिक विकासाच्या मुद्द्यावर केंद्रित झालेले आहे.

साधारणपणे आर्थिक विकासाचा संबंध औद्योगिकिकरणाशी जोडला जातो. लोकांचे शेतीवरील अवलंबित्व कमी करून उद्योग व सेवा क्षेत्रावरील अवलंबित्व वाढविणे म्हणजेच आर्थिक विकास असा अर्थ घेतला जातो. लोकांचे अशा क्षेत्रावर स्थित्यांतर घडून येत असताना जास्तीत जास्त साधन सामग्रीचा कार्यक्षमतेने वापर केला जातो. आणि त्यामुळे उत्पादनात वाढ होते व राष्ट्रीय निर्यातीत वाढ आणि दरडोई उत्पन्नाची पातळी वाढेल त्यामुळे बऱ्याचदा आर्थिक विकास म्हणजे औद्योगिकरण असा अर्थ घेतला जातो.

## १.४ आर्थिक विकासाची व्याख्या :—

आर्थिक विकास या संकल्पनेची एकच सर्व समावेशक अशी व्याख्या करता येत नाही कारण विकास ही प्रवाही संकल्पना आहे. बऱ्याच वेळा आर्थिक विकास व आर्थिक वृध्दी हे शब्द व्यवहारात समानार्थी वापरले जातात. समानार्थी मानणारे अर्थतज्ञ प्रा. मायर व बाल्डविन, प्रा. लेविस, प्रा. विल्यमसन, प्रा. पॉल बॅरन इ. तर आर्थिक विकास व आर्थिक वृध्दी यामधे फरक मानणारे अर्थतज्ञ प्रा. शुंपीटर, प्रा. एडिसन, प्रा. जे. के. मेहता, प्रा. उर्त्सुला हिक्स यांनी फरक मानला आहे व वास्तवात सुध्दा या दोन्ही संकल्पना मध्ये फरक आहे. तेंव्हा प्रथम आर्थिक विकासाच्या व्याख्यांचा विचार करता येईल.

**१)** Prof. Paul Baran : - “Let economic Growth ( or development ) be defined as an increase over time in per captia output of material goods.”[१]

२) Buchanan and Ellis :- Development means developing the real income potentialities of the underdeveloped areas by using investment to effect those changes and to augment those real productive resources which promise to raise real income per person."[२]

३) T.W Schultz :- "When we focus only on the growth in national product, we are taking a comprehensive view of the end. Result to the development process. If however, we exmine the process in more detail, we observe that many other changes, each of a particular character, accompany the rise in out put. We can classify the most important to these as changes in fundamental factor supplies and changes in the structure of demand for products."[३]

४) A. Maddison :- "The rising of income levels is generally called economic growth in rich countries and in the poor ones, it called economic development."[४]

५) Meier and boldwin :- "Economic Devlopment is a Proces wherby a country's real national income increase over a long period of time."[५]

६) Okun & Richardson :- "Economic Development is a Sustained regular improvement in material wellbeing which we may consider to the reflected in an increased flow of goods and services."[६]

७) Prof. Levis :- "Economic Development means increase in per capita income."[७]

८) Prof. Shumpitar :- "Development is a continuous and spontaneous change in the stationary state which forever alters and displaces the equilibrium state previously existing, while growth is a gradual and steady change in the long run which comes about by a gradual increase in the rate of saving and population."[८]

९) Miss Ursul Hicks :- "The problems of Underdeveloped countries are concerned with development of unused resources, even though their uses are well known, while those of advanced countries are realated to growth,

most of their resources being already known and developed to a considerable extent. "[९]

१०) Willamson and Buttrick :- "Economic Development or growth referes to the process where by the people of the country or region come to utilize the resources available to bring about a sustained increase in percapita production of goods and services. "[१०]

११) U.N.O :- "Economic Development concerns not only man's materials needs but alsom the improvement of the social conditions of his life. Development is there for, not only economic growth, but plus change, social cultural and institutional as well as economic."[११]

**१२) प्रा. किंडल बर्जर :—** ''तांत्रिक आणि संस्थात्मक बदलामुळे उत्पादनात वाढ घडून येणे म्हणजे आर्थिक विकास होय.''[१२]

**१३) अमर्त्य सेन :—** ''आर्थिक विकास हा फक्त आर्थिक वृध्दीवर अवलंबून नसतो. तर तो चांगल्या उंचावलेल्या जीवन पातळीवर अवलंबून असतो. त्यासाठी अर्थव्यवस्थेमध्ये रोजगाराच्या उंचावलेल्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत आणि अंधश्रध्दा व निरक्षरतेतून लोकांना मुक्त केले पाहिजे. तसेच स्वातंत्र्याचा हक्क आर्थिक विकासाशी संबंधीत आहे. हा जीवनाशी निगडीत असून जीवनातील आनंद स्वातंत्र्याशी निगडीत आहे.''[१३]

**१४) महबूब उल हक :—** ''विकासाच्या प्रक्रियेत देशातील गरिबीवर प्रत्यक्षपणे हल्ला चढवला जातो. विकासाची उद्दिष्टे ठरवताना फक्त राष्ट्रीय उत्पन्नात वाढ एवढे मर्यादित उद्दिष्ट न ठेवता कुपोषण, रोगराई, निरक्षरता, बेरोजगारी, विषमता इ. सर्व समस्या सोडविण्यासाठी विचार व कृती यामध्ये अपेक्षित असते. गरीबी नष्ट झाल्यानंतर देशाचे राष्ट्रीय उत्पन्न आपोआपच वाढत जाते.''[१४]

**१५) बेंजामीन हिगिन्स :—** ''राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न यात होणारी वाढ आर्थिक विकास होय. याचे फायदे विविध गटांना व अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांना प्राप्त होतात तसेच ही प्रक्रिया दीर्घकाळपर्यंत वाढत्या प्रमाणत चालू राहते.''[१५]

**१६) प्रो. डी. ब्राइट सिंहा :—** ''आर्थिक विकासाचा अर्थ एका देशाच्या समाजात होणाऱ्या अशा बदलांशी आहे, जिथे अल्प विकसित स्तरांतून उच्च आर्थिक स्तराला गाठण्याचा प्रयत्न केला जातो.''[१६]

**१७) प्रा. मेहता :—** ''आर्थिक वृध्दि ही संघटनात्मक बदल स्पष्ट करते विकसित देशामध्ये आर्थिक वृध्दी होते तर अविकसित देशात आर्थिक विकास घडून येत असतो.''[१७]

**१८) प्रा. लायबेन्स्टाईन :—** ''अर्थव्यवस्थेतील वस्तु व सेवा निर्मीतीचा दरडोई क्षमतेतील वाढीला आर्थिक विकास असे म्हणतात.''[१८]

आर्थिक विकासामधे देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढने अभिप्रेत आहे. या दृष्टिकोनातून कांही अर्थशास्त्रज्ञ आर्थिक विकास व राष्ट्रीय उत्पन्नाचा संबंध स्पष्ट करतात. मेयर व बाल्डविन या शास्त्रज्ञांनी एखादया राष्ट्राचा आर्थिक विकास त्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्न वाढीशी निगडीत असतो असे मत मांडले. कांही अर्थशास्त्रज्ञांनी राष्ट्रीय उत्पन्न वाढी पेक्षा दरडोई उत्पन्नातील वाढ अधिक महत्वाची असते. कारण दरडोई उत्पन्न वाढीचा संबंध नागरिकांच्या राहणीमानाशी व जीवनाच्या गुणवत्तेशी येतो. केवळ राष्ट्रीय उत्पन्न वाढले म्हणजे राहणीमानात सुधारणा होतेच असे म्हणता येत नाही. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत असताना लोकसंख्येतही त्याच प्रमाणे वाढ झाली तर राष्ट्रीय उत्पन्न वाढुनही नागरिकांचा सामान्य जीवनस्तर उंचावणार नाही हे कटू वास्तव आहे. यावरून प्रा लेविस, बेंजामन हिगीन्स, या अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकास व दरडोई उत्पन्न यांचा संबंध विचारात घेवून आर्थिक विकासाचे विवेचन केले. सर्व आर्थिक प्रयत्नांचा केंद्र बिंदू मानव आहे. आर्थिक विकासाचा संबंध मानवाशी येतो. म्हणून त्याच्या राहणीमानात सुधारणा झाली तर आर्थिक विकास म्हणणे अधिक उचित ठरेल असे मत वरील अर्थशास्त्रज्ञांनी मांडले.

**१.५ आर्थिक विकासाची वैशिष्टये :—** वरील व्याख्याच्या आधारे आर्थिक विकासाची वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतात.

### १.५.१ आर्थिक विकास ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे :—

आर्थिक विकासामुळे देशातील लोकसंख्येच्या गुणात्मक रचनेमध्ये, भांडवल निर्मिती, उत्पादन तंत्रातसुधारणा, जनतेच्या सवयी आणि मागणी मध्ये बदल होतो. आर्थिक विकास ही दीर्घकालीन संकल्पना आहे. आर्थिक विकासाच्या दीर्घ कालखंडामधे वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. उत्पादनाचे तंत्र आणि पध्दती या मध्ये देखील गुणात्मक आणि संरचनात्मक बदल आढळून येतात. म्हणूनच आर्थिक विकास ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे.

### १.५.२ आर्थिक विकासामध्ये वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते :—

देशाचा आर्थिक विकास ही गुणात्मक संकल्पना आहे. आर्थिक विकासामध्ये अनेक पायाभुत उद्योगाची स्थापना केली जाते. अशा उद्योगामध्ये मोठया प्रमाणात भांडवली गुंतवणूक करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. उत्पादन व्यवस्थेचे नियंत्रण करून सर्वच क्षेत्राचे मागणी नुसार उत्पादन केले जाते. या उत्पादनाची दुसऱ्या देशात निर्यात करून विदेशी चलन प्राप्त होते.

### १.५.३ आर्थिक विकास म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नातील निव्वळ वाढ :—

राष्ट्रीय उत्पन्न निर्माण होत असताना देशातील वास्तविक भांडवलाचा व आर्थिक साधन सामग्रीचा वापर होत असतो. त्यामुळे भांडवली वस्तुचा म्हणजेच यंत्राचा, इमारतीचा झालेला वापर एकूण राष्ट्रीय उत्पन्नातून घसारा वजा करून लक्षात घेणे आवश्यक असते. असे करून जे निव्वळ राष्ट्रिय उत्पन्न राहते त्याचा आर्थिक विकास प्रक्रीयेशी खरा संबंध असतो.

### १.५.४ आर्थिक विकास ही समग्र राष्ट्रांच्या संदर्भातील प्रक्रीया आहे:—

संपुर्ण राष्ट्राच्या उत्पन्नातील वाढ ही गोष्ट आर्थिक विकासाच्या संदर्भात अभिप्रेत असते. कांही व्यक्तीचे व्यक्तीगत उत्पन्न वाढले तर आर्थिक विकास झाला असे म्हणता येत नाही. संपुर्ण राष्ट्राचे उत्पन्न किती वाढेल. यावर आर्थिक विकास किती झाला हे अवलंबून असते.

### १.५.५ आर्थिक विषमता विकास कमी करणे :—

विकसनशील देशाच्या समोरील ज्या कांही महत्वाच्या समस्या आहेत त्यामध्ये आर्थिक विषमता ही सर्वात मोठी आणि भयावह समस्या आहे. देशात आर्थिक समानता निर्माण करण्यासाठी नियोजनाच्या माध्यमातून सर्वांना समान संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो. उत्पन्नाचे समान वितरण होईल आणि आर्थिक दृष्टया गरिब व्यक्तीसाठी विशेष योजना राबवून त्यानुसार कृती करण्याचा प्रयत्न हा आर्थिक विकासात होत असतो.

### १.५.६ सामाजिक, सांस्कृतिक, संस्थात्मक आणि आर्थिक परिवर्तन अभिप्रेत आहे :—

आर्थिक विकास म्हणजे आर्थिक समानता प्रस्थापित करणे. या संकल्पनेमध्ये सामाजिक विकास, शिक्षण आरोग्य, व्यक्तीच्या मौद्रिक उत्पनात वाढ आणि सुखी जीवन या संकल्पना महत्वाच्या मानल्या जातात. आर्थिक समानता प्रस्थापित करण्यासोबतच देशातील बेरोजगारी कमी करणे, प्रादेशिक संतुलन साधने, अर्थव्यवस्थेत आधुनिकीकरण करणे इ. बाबींना महत्व दिले जाते. भांडवल निर्मीतीची नवीन क्षेत्रात गुंतवणूक होवून पुन्हा भांडवल निर्मीतीला चालना मिळते. पर्यायाने देशाच्या आर्थिक क्षेत्रातच नव्हे तर इतर क्षेत्रात उदा. सामाजिक, सांस्कृतिक, संस्थात्मक आणि क्षेत्रात परिवर्तन होते.

### १.५.७ विकासाचे इतर उद्देश :—

विकास ही गुणात्मक संकल्पना आहे. या संकल्पनेची वैशिष्टये आणि उद्देश लक्षात घेत असतानाच विकासाचे इतरही पैलू समोर येतात. त्यांचा विचार विकासाच्या इतर उद्देश यामध्ये करता येवू शकतो. हे उद्देश पुढील प्रमाणे आहेत.

अ) देशातील बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

ब) उपभोगाचा निम्न स्तर प्राप्त करून उपभोग प्रवृत्तीत गुणात्मक वाढ करण्याकडे लक्ष देणे.

क) प्रादेशिक असंतुलन दुर करणे.

ड) अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरणाकडे लक्ष केंद्रित करणे.

प्राचार्य डॉ. ना. य. डोळे यांच्या मते ''आर्थिक विकास म्हणजे लोकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारणे ही प्रक्रिया कधी थांबत नाही कारण थोडा दर्जा बरा झाला की आणखी चांगला व्हावासा वाटतो. लोकांच्या या भौतिक इच्छा आकांक्षा असतात. गरजा कमी करा ही अध्यात्मिक प्रेरणा असते. अर्थशास्त्रसच्या क्षेत्रात अध्यात्मिक प्रेरणा ही असाव्यात हा वादाचा विषय होईल.''[१९]

थोडक्यात आर्थिक विकास ही दिर्घकालीन प्रक्रीया असून या प्रक्रीयेत देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शुध्द वाढ होते.

## १.६ आर्थिक विकासाची आधारभूत तत्वे :—

प्रा. कोरनक्रॉसच्या मते ''कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासासाठी फक्त पैशाची आवश्यकता नसून या प्रक्रियेत देशातील संपूर्ण सामाजिक व्यवहार, देशातील कायदा आणि सुव्यवस्था निर्मिती, व्यापारीक प्रगल्भता, देशातील प्रशासकीय अधिकाऱ्यांची कार्यक्षमता, वेगवगळया क्षेत्राचे परस्पर संबंध, देशातील साक्षरता आणि तांत्रिक समस्यांचे ज्ञान ईत्यादींचा समावेश या प्रक्रियेत होतो.''[२०]

### १.६.१ आर्थिक विकासाची आवश्यकता :—

आर्थिक वृध्दीचा अर्थ हा अधिक उत्पादनाशी आहे तर आर्थिक विकास या संकल्पनेमध्ये  सामाजिक विकास, शिक्षण, आरोग्य, मौद्रिक उत्पन्नात वाढ इत्यादी बाबींचा विचार होतो. उत्पादन घटकांच्या क्षमतेत दीर्घकाळ वाढ घडवून आणने आणि देशातील जनतेच्या गरजा या प्रगतीशील औद्योगिकरणाच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न आर्थिक वृध्दीमध्ये अभिप्रेत आहे. आर्थिक वृध्दीची आवश्यकता पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

### १.६.२ विकासाचा देशीय आधार :—

दीर्घकाळात होणारी वाढ म्हणजे आर्थिक विकास वाढत्या लोकसंख्येच्या मागणीनुसार गरजा पूर्ण करण्यासाठी प्रगतीशील औद्योगिकरणाच्या माध्यमातुन प्रयत्न केला जात असतो. देशाची गरज आणि देशाचा संतुलित विकास या दृष्टिने आर्थिक वृध्दी म्हणजे विकासाचा देशीय आधार होय.

### १.६.३ भांडवल संचय :—

उत्पन्न आणि उपभोग यातील अंतर वाढवून बचतीस प्रोत्साहन दिले जाते. चैनीच्या वस्तुच्या आयातीवर प्रतिबंध, विदेशी कर्जात कपात इ. च्या सहाय्याने भांडवल संचयात वाढ केली जाते.

### १.६.४ बाजार व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे :—

बाजार पेठेच्या अपूर्णतेमध्ये उत्पादन साधनाच्या गतीक्षमतेचा अभाव, बाजारपेठेबाबत लोकांचे अल्प ज्ञान व अज्ञान मालाच्या मुल्याची अस्थिरता इत्यादी. बाबींचा समावेश होतो. आर्थिक विकासासाठी वरील प्रकारच्या त्रुटी दूर करणे आवश्यक असते.

### १.६.५ गुंतवणूकीची उपयुक्तता :—

देशाच्या आर्थिक आणि स्थैर्याच्या दृष्टिकोनातून वेगवेगळया क्षेत्रात गुंतवणूक करून संतुलित आर्थिक विकास करणे आवश्यक असते.

### १.६.६ सुयोग्य नेतृत्व आणि प्रशासकीय कुशलता :—

नेतृत्व आणि त्यांचे प्रशासकीय कौशल्य हे जर वेगवेगळया घटकात समन्वय प्रस्थापीत करणारे, लोकशाही केंद्री, प्रश्न निर्माण करण्यापेक्षा प्रश्नाची उत्तरे शोधणारे, अनुयायाचे आणि कार्यकर्त्याचे महत्व जाणणारे, अधिकाऱ्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेणारे, धर्म यापेक्षा बौध्दीकतेला प्राधान्य देणारे असेल तर आर्थिक विकासाची प्रक्रिया ही वेगाने धावते.

### १.६.७ सामाजिक आणि मानसशास्त्रीय आवश्यकता :—

आर्थिक विकासासाठी समाजाची मानसिकता बदलली पाहिजे, रूढी परंपरा सोडून नविन ज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न केली तर संस्कार क्षम समाज गटाची निर्मिती होते. आर्थिक विकासामध्ये समाजकारण आणि मानसशास्त्रीय अभ्यास करणे आणि त्यानुसार निर्णय घेतले तरच आर्थिक विकासाला चालना मिळते.

### १.६.८ श्रमिकांच्या योग्यता आणि कार्यक्षमतेत वाढ :—

सुप्रसिध्द अर्थतज्ञ ॲडमस्मिथ यांनी श्रम विभाजनाचे फायदे स्पष्ट करीत असताना, १) श्रमिकांची योग्यता वाढते, २) वेळेची बचत होते, ३) संशोधनास प्रोत्साहन मिळते, ४) उत्पादनात वाढ होते, असे मत व्यक्त केले आहे.

### १.६.९ आधारभूत संरचनेचा विकास :—

उत्पादनासाठी भूमी, श्रम, भांडवल, संघटन—चातुर्य, विकसात तांत्रिक ज्ञान, दळण—वळण व वाहतुकीची साधने, वित्त व्यवस्था, शक्तीद्रव्ये इत्यादीची नितांत गरज असते. या सर्व बाबींचा समावेश संरचनेत होतो. जेथे या बाबी मुबलक प्रमाणात आढळतात आणि त्यांचा विकास झालेला असतो तेथे विकासाला गती प्राप्त होते.

### १.६.१० मानवीय संसाधनाचा विकास :—

आर्थिक विकास ही यांत्रिक प्रक्रिया नसून हा एक मानवीय उपक्रम आहे. लोकांच्या कौशल्याने, दृष्टीकोनाने, आवडी—निवडीने आणि गुणाने तो राबविला जातो. आर्थिक विकासाचे स्वरूप हे मानवीय विकासाच्या संसाधनावर मोठया प्रमाणात अवलंबून आहे.

### १.६.११ व्यावसायिक रचना :—

अर्थव्यवस्थेतील व्यावसायिक रचना आर्थिक विकासाचा महत्वाचा घटक होय. व्यावसायिक रचनेच्या अंतर्गत: व्यवसायाचे तीन भागात वर्गीकरण केले.
१) प्राथमिक क्षेत्र, २) व्दितीय क्षेत्र, ३) तृतीय क्षेत्र.

### १.६.१२ विदेशी व्यापार :—

या प्रक्रियेत देशाच्या विदेशी व्यापाराचा व्यवहारतोल अनुकूल राहण्याच्या दृष्टीकोनातुन कृती करणे आवश्यक असते. व्यवहारातील अनुकूल असणे म्हणजे देशाची निर्यात ही आयाती पेक्षा अधिक असणे होय. आर्थिक विकासाचे एक वैशिष्टय म्हणून विदेशी व्यापाराचा विचार केला जातो.

### १.६.१३ लोकसंख्या नियंत्रण :—

देशाच्या अर्थिक विकासाच्या दरापेक्षा लोकसंख्या वाढीचा दर जास्त असेल तर आर्थिक विकास होत नाही.

### १.६.१४ भौतिक वस्तुचे उत्पादन :—

प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासामध्ये भौतिक वस्तुच्या उत्पादनास महत्वाचे स्थान असते कारण देशातील नैसर्गिक संसाधनांचा पुर्णपणे उपयोग करून घेणारी एक प्रक्रिया म्हणून आर्थिक विकासाचा विचार होतो.

### १.६.१५ सार्वजनीक क्षेत्राचा विकास :—

सार्वजनीक उद्योग हे सरकारच्या अस्तित्वासाठी, देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि व्यापक जनहितासाठी चालविण्यात येतात. वेगवेगळया वित्तीय संस्था, संरक्षण विषयक सामुग्रीचे उत्पादन करणारे कारखाने, देशाचे पोष्ट आणि दळण वळण खाते, भिल्लाई स्टील प्लॉट, बाल्को, रेल्वे इत्यादी सार्वजनीक क्षेत्राची उदाहरणे म्हणून विचारात घेता येईल. देशाच्या आर्थिक विकासामध्ये सार्वजनिक क्षेत्राचा विकास महत्वाचा मानला जातो.

### १.७ आर्थिक वृध्दीचा सैध्दांतिक आधार :—

आर्थिक विकास करण्याचे प्रामुख्याने दोन मार्ग (तत्वे) सांगितले जातात. त्यामधे

अ) समतोल वृध्दी विकास तत्व

ब) असमतोल वृध्दी विकास तत्व

### अ) समतोल वृध्दी विकास तत्व :—

समतोल वृध्दी तत्वाचा पुरस्कार प्रामुख्याने रोझेन्स्टीन रोडान, रॅग्नर, नर्क्से, ऑर्थर लेविस, लाईबेन्स्टाईन इत्यादी अर्थतज्ञांनी केला या तत्वानुसार अर्थव्यस्थेतील सर्वच क्षेत्रात सारख्या प्रमाणात एकाच वेळी गुंतवणूक करण्याचा विचार मांडला. शिवाय उत्पन्न वृध्दी दर, उत्पादन वृध्दी दर आणि नैसर्गिक साधन सामुंग्रीचा दर यामध्ये समानता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. पुरवठयाच्या बाजूने आणि मागणीच्या बाजूने समतोल साधुन विभागीय समतोल साधण्याचा प्रयत्न केला जातो. थोडक्यात अर्थ व्यवस्थेतील सर्वक्षेत्रांना विकासात समान संधी देऊन त्या द्वारे समतोल विकास साधण्याचा प्रयत्न केलेला असतो.

संतुलित विकासाचे स्पष्टिकरणार्थ विविध अर्थशास्त्रज्ञांनी आपले दृष्टिकोन विषद केले आहेत. कांही प्रमुख दृष्टिकोन प्रढील प्रमाणे.

**१) रोझेन्स्टीन रोडान :—**

रोझेन्स्टीन रोडान यांनी प्रथम १९४३ मध्ये संतुलीत विकासाची संकल्पना मांडली. रोडानच्या मते देशातील विविध क्षेत्रामध्ये एकाच वेळी गुंतवणूक केली पाहिजे त्यामुळे प्रत्येक उद्योगातील उत्पादनाला इतर उद्योगातून मागणी निर्माण होवून बाजारपेठ विस्तृत होईल आणि सर्व उद्योगांची प्रगती होवू शकेल. त्याचे अधिक स्पष्टिकरण देताना रोडान यांनी पादत्राणे व्यवसायाचे उदाहरण दिले आहे. ते पुढील प्रमाणे सांगता येईल.

समजा एखद्या विकसनशिल देशामधे शंभर प्रच्छन्न बेकार श्रमिक गुंतवून पादत्राणाचे उत्पादन सुरू केले तर तयार होणाऱ्या पादत्राणाला मागणी येण्यासाठी सर्वश्रमिकांना आपले सर्व उत्पन्न पादत्राणावरच खर्च करावे लागेल. परंतु असे कधीच होणार नाही, कारण त्यांना इतरही वस्तुंचा उपभोग घेणे आवश्यक असते. तेंव्हा ते त्यांच्या उत्पन्नाचा कांही भागच पादत्राणावर खर्च करतील. त्यामुळे पादत्राणाच्या उत्पादना इतकी मागणी येणार नाही. त्यामुळे उत्पादकास उत्पादन थांबवण्याची वेळ येईल. त्यामुळे भांडवल गुंतवणूकीस प्रोत्साहन मिळणार नाही. परंतु जर 'शंभर वेगवेगळया उद्योगात प्रत्येकी' शंभर कामगार या प्रमाणे दहा हजार कामगारांना काम मिळेल. श्रमिकांचे सर्व उत्पन्न या उद्योग समुहातील वस्तुवरच खर्च होत असल्यामुळे प्रत्येक वस्तुला बाजार पेठ उपलब्ध होईल. आणि भांडवल गुंतवणूकीला प्रोत्साहन मिळेल. एका पादत्राणे उद्योगामुळे जे शक्य झाले नव्हते ते विविध उद्योगाच्या समुहातून शक्य होईल. त्यामुळे बाजारपेठ विस्तृत होवून विकासास चालना मिळते. अर्थात एकाच वेळी भांडवल गुंतवणूक करणे केवळ खाजगी क्षेत्राला अशक्य आहे. त्यामुळे शासनाने यात पुढाकार घेणे आवश्यक आहे. असे रोडान यांनी सुचविले आहे.

**२) रॅग्नर नर्क्से :—**

रोडान यांच्या प्रमाणेच नर्क्से यांनी सुध्दा संतुलित विकासाच्या तत्वावर भर दिला आहे. नर्क्से यांच्या मते, अर्धविकसित राष्ट्रे ही 'दारिद्रयाच्या दुष्ट चक्रात' अडकलेली असतात. हे दुष्टचक्र भेदण्यासाठी 'संतुलित विकास' हाच

एक मार्ग होय. नर्क्से यांच्या मते कृषी आणि उद्योग क्षेत्राच्या संतुलित विकासा द्वारे उपलब्ध अतिरिक्त श्रमशक्तीचा पुरेपूर उपयोग होवू शकतो. एकाचवेळी परस्परपुरक आर्थिक उपक्रमांचा प्रारंभ केल्यास एका क्षेत्रातील उत्पादनास दुसऱ्या क्षेत्राकडून मागणी निर्माण होईल अशा रीतीने मागणीच्या बाजूने विविध शक्तीमध्ये संतुलन साधले जाईल. केवळ एखादा उद्योग विकसनशील देशात सुरू करणे परवडणार नाही म्हणून एकाच वेळी मोठया प्रमाणावर अनेक उद्योगामध्ये गुंतवणूक झाली पाहिजे. गुंतवणूकीचे वाटप कसे करावे? कोणत्या क्षेत्राला किती प्राधान्य द्यावे? यासाठी नर्क्से यांनी रोडान यांच्या 'जोरदार धक्काच्या' सिध्दांताचा आधार घेवून असे प्रतिपादन केले की, प्रारंभी अर्थव्यवस्थेतील वृध्दींगत होणाऱ्या क्षेत्रात गुंतवणूक करावी त्यामुळे बाहय बचती शक्य होवून इतर उद्योगांना प्रेरणा मिळेल आणि कुंठीत अवस्थेतील अर्थव्यवस्थेचे विकसित अशा अर्थव्यवस्थेत परिवर्तन होवू शकेल.

**३) आर्थर लेविस :—**

लेविस यांनी देखील संतुलित विकासाच्या तत्वाचे समर्थन केले आहे. त्यांच्या मते कृषी आणि उद्योग क्षेत्राच्या विकासा बरोबरच स्थानिक बाजारपेठेसाठीचे उत्पादन आणि निर्यातीसाठीचे उत्पादन यामध्येही संतुलन साधले पाहिजे. त्यांच्या मते संतुलित विकासाचा अर्थ समान असा नाही. तर मागणीतील वृध्दीच्या भिन्न दराप्रमाणे प्रमाणशीर विकास म्हणजे संतुलित विकास होय.

**४) मेयर आणि बाल्डविन :—**

मेयर आणि बाल्डविनच्या मते संतुलित विकासामुळे बाजारपेठेचा आकार वाढतो आणि मोठयाप्रमाणावर बाहय बचती मिळण्याची शक्यता वाढते. हे दोघांनीही मान्य केले आहे. मेयर आणि बाल्डविन यांनी असे मत व्यक्त केले आहे की, विशिष्ट क्षेत्रात भांडवल गुंतवणूक केली पाहिजे जेणे करून अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राच्या प्रगतीमध्ये संतुलन साधले जाईल कारण ही विविध क्षेत्रे परस्परावलंबी असतात. तसेच ते एकमेकांस पुरक असतात.

**ब) असमतोल वृध्दी विकास तत्व :—**

असमतोल वृध्दीच्या तत्वाचा पुरस्कार अल्बर्ट, हर्षमन, सिंगर, रोस्टो, किंडल बर्जर, मार्क्स फलेमिंग, स्ट्रिटेन इ. अर्थतज्ञांनी केला. समतोल वृध्दीच्या तत्वाला एक पर्याय म्हणून असमतोल वृध्दीचे तत्व त्यांनी मांडले. त्यांच्या मते अल्पविकसित/विकसनशील देशांनी असमतोल वृध्दी तत्व स्विकारणे व्यावहारीकदृष्टया फायदयाचे ठरते. कारण अशा देशांना नेहमीच भांडवल टंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागते. अशा देशांनी उपलब्ध भांडवल अग्रक्रम क्षेत्रात गुंतविल्यास अन्य क्षेत्राचा विकास होण्यास मदत होते.

असंतुलित विकासाचे स्पष्टीकरणार्थ विविध अर्थशास्त्रज्ञांनी आपले दृष्टीकोन विशद केले. कांही प्रमुख दृष्टीकोन पुढीलप्रमाणे.

**१) प्रा. अल्बर्ट हर्षमन :—**

'संतुलित वृध्दीच्या सिध्दांताला' पर्याय म्हणून 'असंतुलित वृध्दीचा सिध्दांत' मांडण्याचे श्रेय प्रा. अल्बर्ट हर्षमन यांना दिले जाते. त्यांच्या मते ''विकास म्हणजे असंतुलनाची साखळी असून तिचे अस्तित्व कायम ठेवणे आश्यक आहे. अर्थव्यवस्थेची जर सतत प्रगती व्हायची असेल तर विकास विषयक धोरणाचे महत्वाचे कार्य अर्थव्यवस्थेत तणाव, असमानता आणि असंतुलन ठेवणे हे असावे.''[२१]

अर्धविकसित देशात साधन संपत्ती विशेषत: भांडवल मर्यादित प्रमाणात असल्यामुळे मुलभूत सामाजिक गुंतवणूक आणि प्रत्यक्ष उत्पादक गुंतवणूक अशा दोन्ही क्षेत्रातील गुंतवणूक एकाच वेळी करणे अशक्य असते. या दोन्ही पैकी एका प्रकाराला प्राधान्य देऊन विकासा करीता असंतुलन निर्माण केले जाते. आज अत्यंत प्रगत असलेल्या अमेरिकेत सुध्दा प्रारंभी विकासास प्रारंभ झाला तेंव्हा सुरूवातीला प्रमुख क्षेत्राचा विकास होवून तो पसरत गेला असे दिसते. या शिवाय जपान, मेक्सिको, ब्राझील, कोलंबीया आणि रशिया इत्यादी राष्ट्रांचा विकास सुध्दा असंतुलित तत्वाप्रमाणेच झाला असे हर्षमन यांनी दाखवून दिले आहे.

### २) डब्ल्यू. डब्ल्यू. रोस्टो :—

रोस्टोनी देखील हर्षमन यांच्या भुमिकेचे समर्थन केले आहे. रोस्टोच्या मते विशिष्ट काळामध्ये अर्थव्यवस्थेतील अग्रणी क्षेत्राचा जलद गतीने विकास झाल्यास त्या क्षेत्राच्या उत्पादनामध्ये आणि उत्पादकतेमध्ये वाढ होते. या वाढीचे अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्रावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम होवून अर्थव्यवस्थेलाच विकासाचा धक्का दिला जातो.

रोस्टोच्या मते अग्रणी क्षेत्र किंवा प्रधान क्षेत्र म्हणजे असे उद्योग की ज्यांची उत्पादकता अधिक असते. या उद्योगातून पुनर्गुंतवणुकीसाठी जास्तीत जास्त आधिक्य निर्माण होते. आणि हे आधिक्य परत उत्पादक पुनर्गुंतवणुकीच्या स्वरूपात प्रवाहित केले जाते. ज्यामुळे इतर वस्तुंच्यासाठी परिणामकारक मागणीचे आवर्तावर आवर्त निर्माण होतात आणि यातून औद्योगिकरणाची प्रक्रिया स्वयंचलित आणि संचयी स्वरूप धारण करते.

### ३) एच. डब्ल्यू. सिंगर :—

सिंगर देखील असंतुलित विकासाच्या तत्वाचे समर्थक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या मते, अर्धविकसित देशांना विस्तर बाजारपेठेचा अभाव असल्यामुळे आर्थिक विकासामध्ये अडथळे निर्माण होतात. हे अडथळे दुर करण्यासाठी संतुलित विकास हा मार्ग कांही तज्ञांनी सुचविला असला तरी या देशामध्ये साधनांची कमतरता असल्यामुळे संतुलित विकासाच्या व्युहरचनेचा अंगीकार करणे अशक्य आहे.

संतुलित विकासाच्या तत्वामध्ये असे गृहित धरले आहे की, ‘पुरवठा मागणी निर्माण करतो’, किंवा त्यासाठी पुरेसे वित्त उपलब्ध करू शकतो. परंतु प्रत्यक्षात मात्र दोन्हीही निर्माण होणे शक्य नाही. त्यामुळे बाजारपेठेचा अडथळा दुर करण्यासाठी व साधनांच्या कमतरतेचा प्रश्न सोडवण्यासाठी सरसकट गुंतवणुकीच्या कार्यक्रमाची शिफारस करणे म्हणजे काल्पनिक युक्तिवादाला बळी पडणे होय.

**४) सी. पी. किंडल बर्जर :—**

किंडल बर्जर हे संतुलित विकास तत्वाचे कट्टर विरोधक तर असंतुलित विकासाच्या तत्वाचे कडवे समर्थक मानले जातात. त्यांच्या मते संतुलित विकासाच्या तत्वामध्ये फारसे तथ्य नाही. कारण या तत्वाप्रमाणे आर्थिक विकासाच्या प्रयत्नांची सुरूवातही करताना ती सर्व क्षेत्रात करण्याची अपेक्षा अशा वेळी गृहित धरली आहे की, जेंव्हा कोणत्याच क्षेत्रात आरंभ झालेला नसतो. किंडल बर्जरच्या मते जर आपण सर्वच क्षेत्रात उत्पादनास आरंभ करण्याचा आग्रह धरला तर भांडवलाची फार मोठी तुट निर्माण होईल आणि प्रशासकीय यंत्रणेवर अनावश्यक भार पडेल. म्हणून यातून प्रगती होण्याऐवजी अनर्थच जास्त घडेल.

**५) मारकस फ्लेमिंग :—**

फ्लेमिंगच्या मते संतुलित विकासाच्या तत्वामध्ये विविध उद्योग हे परस्पर पुरक असतात असे गृहित धरले आहे. परंतु प्रत्यक्षात अर्थ व्यवस्थेत उत्पादन घटकांना मर्यादित पुरवठा असल्यामुळे त्यांच्या प्राप्तीसाठी या उद्योगामधे तीव्र स्पर्धा निर्माण होत असते.

फ्लेमिंगच्या मते असंतुलित विकासाच्या तत्वाप्रमाणे जर एकाच वेळी विविध उद्योगाचा विकास घडवून आणावयाचा असेल तर अर्थव्यवस्थेत सुलभ अटीवर पुरेसे भांडवल उपलब्ध झाले पाहिजे. शेती क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर प्रच्छन्न बेकार वर्ग उपलब्ध असला पाहिजे आणि तो उद्योग क्षेत्रामध्ये जाण्यास इच्छुक असला पाहिजे. मुलभूत आणि भांडवली वस्तु उत्पादन करणाऱ्या उद्योगामध्ये मोठया प्रमाणावर आर्थिक बचती मिळण्याची संधी असली पाहिजे. मात्र प्रत्यक्षात पुरेसे भांडवल उपलब्ध होण्याची पहिली अट सुध्दा पुर्ण होणे अर्धविकसित देशांना शक्य नसते. तेंव्हा वरील सर्वच अटी पूर्ण होत नसतील तर विविध उद्योगात केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरणार नाही. त्यामुळे अर्ध विकसित देशांचा विकास घडवून आणण्यासाठी असंतुलित विकास तत्वांचा अवलंब करावा.

## १.८ सामाजिक विकासाची संकल्पना :—

सर्वसामान्यपणे विकास ही संकल्पना आर्थिक दृष्टिकोनातून मांडली व अभ्यासली जाते, म्हणजेच आपण 'विकास' या संकल्पनेत 'आर्थिक विकास' यालाच अधिक महत्व देतो. विकासामध्ये वृध्दी, वाढ, प्रगती, परिवर्तन अशा अनेक संकल्पनांचा अंतर्भाव केला जातो. वस्तुत: या सर्व संकल्पनांचा अर्थ हा भिन्न—भिन्न आहे. परंतु सर्वसाधारणपणे त्यांना एकाच अर्थाने उपयोगात आणले जात असते.

विकासाचा आर्थिक दृष्टीकोनातून विचार करता, विकास म्हणजे देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे हा आर्थिक विकासाचा प्रमुख निर्देशक मानला आहे. परंतु या संकल्पनेबाबत अनेक विचारवंतात मतभेद दिसून येतात. समाजशास्त्र हे समाजाच्या विविध घटकांचा सर्वांगीण अभ्यास करणारे शास्त्र आहे. साहजिकच समाजाच्या विकासाचा अभ्यास समाजशास्त्रातही अलीकडे मोठया प्रमाणावर केला जात आहे. समाजशास्त्राची एक नवीन ज्ञानशाखा म्हणून विकासाचे समाजशास्त्र या शाखेचा उदय झालेला आहे.

### १.८.१ समाजशास्त्र म्हणजे काय :—

''समाजशास्त्र हे मानवी संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. तेंव्हा व्यक्ती व्यक्ती संबंधात येणाऱ्या क्रिया ह्या देखील समाजशास्त्राचा अभ्यास विषय ठरतात. समाजातील व्यक्ती व्यक्ती मधील पारस्पारीक क्रियांचा आर्थिक पैलुंचे अध्ययन, स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न आर्थिक संस्थेच्या माध्यमातून केले जाते. सर्वसामान्यपणे मानवी गरजांची तृप्ती होण्यासाठी वस्तू व सेवांचे उत्पादन केले जाते. तेंव्हा त्याला आर्थिक क्रिया असे म्हणतात.

विलबर्ट मूर यांच्या मते ''मानवी गरजाच्या पुर्तीसाठी आवश्यक परंतु मर्यादीत असणाऱ्या वस्तू व सेवांचे उत्पादन आणि वितरणाशी निगडीत असणारी कार्ये म्हणजे आर्थिक क्रिया होय.''[२२] या क्रियांशी संबंधीत असणारे सामाजिक संबंध काळाच्या ओघात संस्थीकृत झाले यातूनच आर्थिक संस्थांचा उदय झाला. आर्थिक विकासातूनच सामाजिक विकास होतो.

### १.८.२ सामाजिक विकासाचा अर्थ :—

समाजिक विकासाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी अनेक समाजशास्त्रज्ञांनी आपली मते व्यक्त केली आहेत. त्यातील कांही समाजशास्त्रज्ञांची मते खालील प्रमाणे.

डॉ. दा.धो. काचोळे यांच्या मते ''शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षितता, मुलभूत हक्कांचे स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, समता, अल्पसंख्यांकाचे हितरक्षण तसेच समाजातील व्यक्तीचा सामाजिक जीवनस्तर उंचावण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व घटकांचा समावेश होतो. प्रामुख्याने समाजातील दारिद्रय कमी करणे व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक असते. याचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. यावरूनच समाजाचा सामाजिक विकास कितपत झाला आहे याचे ज्ञान प्राप्त होते.''[२३]

डॉ. धनागरे यांच्या मते ''सामाजिक विकासामध्ये दर माणशी आहार सुधारणा झाला की नाही, साक्षरतेचा व शिक्षणाचा प्रसार वयोगटनुसार आणि स्त्री—पुरूषांमध्ये कितपत झाला आहे, कौटुंबिक आरोग्य व त्यासाठीच्या सुविधामध्ये कितपत गुणात्मक सुधारणा झाली आहे, रोजगार उपलब्ध झाला की नाही, सामान्यांच्या क्रयशक्तीत वृध्दी कितपत झाली आणि एकंदरच अन्न, वस्त्र, निवारा इ. जीवनावश्यक बाबीमध्ये तळागाळातील लोकांच्या बाबतीत लक्षणीय वाढ झाली की नाही हे पाहिले जाते.''[२४]

डॉ. दामले य. भा. यांनी पुणे येथे १९९६ मध्ये संपन्न झालेल्या मराठी समाजशास्त्र परिषद अध्यक्षीय भाषणामध्ये ''सामाजिक विकास याकरिता शिक्षण, व्यवसाय या अर्थाजृनाची सोय की ज्यामुळे व्यक्ती—व्यक्तींचे परावलंबित्व पुष्कळसे कमी होते. आधुनिक तंत्रज्ञान, नागरीकरण, सामुहिक चळवळी, लोकांच्यातील जागरूकता, कायदे कानून व राज्याच्या सहकार (नवीन कायदे करणे व ते निप:क्षपातीपणे अंमलात आणणे) यासर्व गोष्टीची आवश्यकता असते.''[२५]

### १.८.३ सामाजिक विकासासाठी आवश्यक घटक :—

व्यक्तीच्या अन्न, वस्त्र व निवारा ह्या मुलभूत गरजा असोत किंवा अर्थविषयक, कामवासना, प्रजोत्पादन व समाजविषयक गरजा पुर्ण करण्यासाठी कांही बंधने व नियम तयार केली, त्याच बरोबर सदर नियमाचे पालन काटेकोरपणे होते की नाही हे पाहण्यासाठी सामाजिक जीवनाचा उदय झाला म्हणजे व्यक्ती जीवनात आपली एखादी गरज विशिष्ट नियमानुसार व विशिष्ट पध्दतीनेच पुर्ण करते का हे सामाजिक संस्थेद्वारे पाहिले जाते. या संस्थामध्ये १) कुटूंब संख्या, २) विवाह संस्था, ३) धर्म संस्था, ४) शिक्षण संस्था, ५) राज्यसंस्था इ. सामाजिक संस्थाचा विकास झाला तर समाजाचा सर्वांगीण विकास होऊन सामाजिक विकास होतो. तो खालील प्रमाणे.

**१) कुटुंब संस्था :—** मानवी समाजाच्या सुरवातीच्या काळी समूह करून राहत असताना मानवाने 'कुटुंब' ह्या प्राथमिक समूहाची निर्मिती केली. मानवी विकासाच्या प्रत्येक टप्यात, कालखंड व कोणत्याही समाजात कुटुंबाचे अस्तित्व आढळते. कामवासनापूर्ती, प्रजोत्पादन, वंश सातत्य, संरक्षण, संघटन या सहज प्रवृत्तीवर कुटुंब संस्था आधारीत असते. मानव वंशाचा विकास व मानवी वंशाचे सातत्य टिकवून ठेवण्याचे कार्य कुटुंब संस्थेने केले आहे.

इलिट आणि मेरील यांच्या मते ''कंटुंब म्हणजे पति—पत्नि आणि त्यांची मुले या सर्वांचा मिळून झालेला जैविक व सामाजिक समुह होय.''[२६]

कुटुंबाची उभारणी लैंगिक संबंध, प्रजोत्पादन, बालसंगोपन या जैविक घटकावर झालेली आहे. कुटुंब व्यक्तीच्या सर्वागीण विकासाची जबाबदारी उचलते त्याच बरोबर एक नियंत्रित समाज व्यवस्था निर्माण करण्यास मदत करते.

**२) विवाह संस्था :—** प्राचीन काळापासून विवाह संस्था समाजामध्ये अस्तित्वात आहे. विवाहाच्या आधारावरच 'कुटुंब' ही मूलभूत संस्था उभी आहे. व्यक्तीचे शाररिक स्वास्थ्य, मन:शांती, संतानोत्पती, यांचे पालन पोषन इ. बाबीसाठी विवाह संस्था आवश्यक ठरते.

हॉबेल यांच्या मते, ‘‘विवाहित स्त्री—पुरूषांचे त्यांच्या रक्त संबंधा विषयी मुलांशी व समाजाशी असणारे संबंध नियंत्रित व परिभाषित करणारा समुचय म्हणजे विवाह संस्था होय.’’[२७]

समाजपरत्वे विवाहाकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेगवेगळा असला तरी विवाहाचे सर्वसाधारण उद्देश सर्व समाजात सारखे आहेत. लैंगिक इच्छांची पुर्ती हा विवाह संस्थेचा एक सर्वसासमान्य उद्देश असला तरी जोडीदाराचा मानसिक शांती व समाधान ही या संस्थांची महत्वाची उद्दीष्टये आहेत त्यामुळे कुटूंब व व्यक्तीचा विकास होऊन सामाजिक विकास होतो.

**३) धर्म संस्था :—** धर्म हा मानव समाजाइतकाच प्राचीन आहे. धर्म संस्था ही एक मूलभूत सामाजिक संस्था आहे. कारण ती सार्वत्रिक स्वरूपात आढळते. संपूर्ण समाज जीवनावर तिचा प्रभाव पडलेला दिसतो. धर्मामुळे व्यक्तीची आचरन पध्दती निश्चित होते. धर्मातूनच व्यक्ती जीवनात श्रध्दा आणि विधी निर्माण होतात.

किंग्जले डेव्हिस च्या मते, ‘‘धर्म हा मानवी जीवनात येवढा सार्वत्रिक शाश्वत व व्यापक आहे की धर्माचे स्वरूप लक्षात घेतल्या शिवाय समसजाच्या स्वरूपाचे यथार्थ आकलन होणार नाही.’’[२८]

मॅलीनॉवस्की यांच्या मते,‘‘धर्म हा विधी व श्रध्दा यांची व्यवस्था आहे तसेच ती एक सामाजिक घटना आहे आणि वैयक्तीक अनुभूती आहे.’’[२९]

धर्म म्हणजे मानवी जिवनातील चांगल्या वाईट घटनाचे मूल्यमापन करून व्यक्तीला आदर्श जीवन जगण्यासाठी अचूक मार्गदर्शन करणारी व्यवस्था होय. धर्मातून व्यक्तीच्या वर्तनात नियम बध्दता येते. मानवाला समाजात स्थिर राहण्यासाठी आत्मिक पाठबळ, मानसिक समाधान देण्याचे कार्य श्रध्दा व विश्वास करतात. धर्माचा आदर बाळगून व्यक्तीच्या व समाजाच्या विकासात भर पडते.

**४) अर्थ संस्था :—** मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक वस्तुची आवश्यकता असते. मानवाच्या जीवनावश्यक भौतिक गरजा भागविण्यासाठी मानवी समाजाने केलेला सामुहिक प्रयत्न म्हणजे

आर्थिक व्यवस्था होय, 'समाजशास्त्र' हे मानवी संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. तेंव्हा व्यक्ती–व्यक्ती संबंधात येणाऱ्या क्रिया ह्या देखील समाजशास्त्राचा अभ्यास विषय ठरतात.

बिल्स आणि होईजर यांच्या मते,''उपभोग्य वस्तुचे उत्पादन, वितरण आणि नियंत्रण करणाऱ्या व्यवस्थेला आर्थिक संस्था असे म्हणतात.''[३०]

आर्थिक संस्था ह्या समाज व्यवस्थेचा महत्वपूर्ण भाग आहे. प्रगत समाज असो किंवा प्राचीन समाज आर्थिक घटकांचा मानवी जीवनावर प्रभाव पडलेला आढळतो. आर्थिक व्यवहार हे व्यवसाय, उद्योग, सहकार्य, संघटन, परस्पर संबंध, विश्वास आणि निती नियमावर आधारलेले असतात तेंव्हा प्रत्येकाने आर्थिक व्यवहार नैतिक जबाबदारीने पार पाडले तर अर्थ व्यवस्था मजबूत होवून सामाजिक विकास होईल.

**५) शिक्षण :—** शिक्षण म्हणजे व्यक्तीमध्ये असलेल्या सुप्त गुणांचा आणि सामर्थ्याचा विकास करून व्यक्ती व समाज विकासाला गती व दिशा देणे होय. इंग्रजी Education याचा अर्थ मानवी मन, शरीर व आत्मा यातील चांगल्या गोष्टी बाहेर काढून विकास साधणे म्हणजे शिक्षण होय. जीनव जगताना लागणारी कार्यक्षमता, ज्ञान, कला, संपादन करणे म्हणजे शिक्षण होय. शिक्षणांचा नेमका अर्थ स्पष्ट करण्यासाठी अनेक विचारवंतांनी व्याख्या केल्या आहेत त्या पुढील प्रमाणे.

१)रूसो :— ''शिक्षण हे जीवनाच्या तयारीसाठी नसून प्रत्यक्ष जीवनच आहे.''[३१]

२) लॉक :— ''मनाचा शरीराचा विकास म्हणजे शिक्षण होय.''[३२]

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर :— ''शिक्षण हे सामाजिक क्रांतीचे हत्यार आहे. शिक्षणामुळे मनुष्य निर्भय, स्वावलंबी आणि स्वाभिमानी बनतो.''[३३]

शिक्षणामुळे व्यक्तीला एखादा उद्योगधंदा, व्यवसाय, नौकरी करण्यास सक्षम बनविते. जेंव्हा समाजातील जास्तीत जास्त लोकांना उदर निर्वाहाचे साधन मिळते तेंव्हा, समाजाची म्हणजेच राष्ट्राची उत्पादन क्षमता वाढते, शिक्षणामुळे व्यक्तीला वेगवेगळया उद्योगधंद्याचे ज्ञान मिळते. या ज्ञानातून व्यक्ती आपली

मूलभूत गरजा पूर्ण करतो. देशाला स्वावलंबी आणि संपन्न बनविण्याचे काम पूर्ण होते. एकंदरीत शिक्षण संस्था मानवाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीला आधार देत असतात.

**६) राज्यसंस्था :—** प्राचीन काळापासून राज्यसंस्थेचे अस्तित्व समाजात आढळून येते. समाजातील मानवी व सामाजिक साधन—संपत्तीचा वापर कसा करावयाचा, समाजाची उद्दिष्टये कोणती असावीत, विकासाची दिशा गती कशी असावी हे ठरविण्याचे काम राज्यसंस्थेचे असते. ही राजकीय यंत्रणा समाज व्यवस्थेच्या निर्णय व कार्याची अंमलबजावणी करण्यासाठी सज्ज असते.

ॲरिस्टॉटलच्या मते,''राज्य म्हणजे अनेक कुटुंबे आणि खेडी मिळून झालेले संपूर्ण आणि स्वयंपूर्ण जीवन म्हणजे सुखी आणि प्रतिष्ठीत जीवन हे ध्येय असलेला संघ म्हणजे राज्य होय.''[३४]

विल्सनच्या मते,''राज्य म्हणजे निश्चित भूप्रदेशात कायद्याद्वारे सत्ता चालविण्यासाठी संघटित झालेला समाज होय.''[३५]

वरील व्याख्येवरून असे सपष्ट होते की भौगोलिक क्षेत्रातील घटकांना नियमित व नियंत्रित करणारी एक प्रभावी यंत्रणा म्हणून राज्यसंस्था अस्तित्वात येते.

राज्यसंस्था समाजांच्या विकासाची ध्येय धोरणे आखून त्यांच्या अंमलबजावणी साठी प्रयत्न करीत असते. यासाठी निरनिराळया कार्यक्षेत्राची निर्मिती व विकास केली जाते. यात शेती, शिक्षण, उद्योग, व्यपार अशा निरनिराळया क्षेत्राचा समावेश केलेला आढळतो. निरनिराळया क्षेत्रात योग्य समन्वय साधून राज्याचा विकास साधला जातो.

वरील प्रमाणे सामाजिक संस्था सामाजिक विकासामध्ये महत्वपूर्ण कार्य करतात. या संस्थांचा विकास झाला तरच सामाजिक विकास होईल.

## १.९ वैधानिक विकास मंडळाची संकल्पना :—

राज्याच्या विकासामधील विभागीय अनुशेष दूर करण्याबाबत सातत्याने मागणी होत असे. राज्याच्या विधीमंडळाने एकमताने मंजुर केलेल्या ठरावानुसार भारतीय संविधानातील अनुच्छेद ३७१(२) अनुसार राष्ट्रपतींनी महाराष्ट्र राज्याच्या

राज्यपालांना वैधानीक विकास मंडळे स्थापन करण्यासाठी प्राधीकृत केले आहे. त्यानुसार जुन १९९४ मध्ये विदर्भ मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानीक विकास मंडळाची स्थापना करण्यात आली. भारतीय संविधानाच्या ३७१(२) नुसार महाराष्ट्राचे राज्यपाल हे संपूर्ण राज्याच्या योजनेसाठी आवश्यक असलेल्या निधीची गरज लक्षात घेतल्यावर तिन्ही मंडळाच्या क्षेत्रात योजनेच्या नियत व्ययाचे समान वाटप करतात. राज्य योजनेच्या नियत व्ययातून, राज्यपालांनी निर्देशित केल्यानुसार विविध विकास क्षेत्रांना व योजनांना त्यांच्या गरजेनुसार नियत व्यय उपलब्ध करून देणे हे राज्य शासनावर बंधनकारक राहिल. संपूर्ण राज्यातील नियोजन प्रक्रियेत ही एक नवीन बाब आहे. ही व्यवस्था वार्षिक योजना सन १९९५ — ९६ पासून अंमलात आहे.

**१.१० केंद्र सरकारच्या मालकीचे सार्वजनीक उपक्रम :—**

सरकारी उद्योगांनाच ''सरकारच्या मालकीचे व सरकारी व्यवस्थापनाखाली असणारे उद्योग म्हणजे सरकारी उद्योग होय.'' सरकारी उद्योगधंदे सरकारने स्वत: चालू केलेले असतात. उद्योगाची मालकी, नियमन, व्यवस्थापन व इतर सर्व व्यवहार सरकारच्या ताब्यात असतात. म्हणून पर्यायाने हे उद्योग धंदे जनतेच्या मालकीचे असतात. लोक कल्याणाच्या उद्येशाने सरकार उपक्रम सुरू करते.

पाणी, वीज, रेल्वे, तार, टपाल, टेलिफोन, गॅस पुरवठा संबंधित उद्योग सरकारने सुरू केले आहेत. तसेच लोखंड व पोलाद, अभियांत्रिकी उद्योग, खत, रसायन, इलेक्ट्रॉनिक्स यासारखे महत्वाचे उद्योग सुध्दा सरकारने सुरू केले आहेत. या उद्योगात प्रचंड भांडवल गुंतवणूक करावी लागते. असे उद्योग सुरू करण्याबाबत खाजगी क्षेत्राकडून योग्य प्रतिसाद न लाभल्यास सार्वजनिक क्षेत्रात सरकारला हे उद्योग सुरू करावे लागतात. या शिवाय संरक्षण व युध्द सामग्री विषयक उद्योग धंदे खाजगी क्षेत्राकडे सोपविणे धोक्याचे असते. म्हणून सरकारी क्षेत्रात असे उद्योग धंदे चालविले जातात. सरकारी उपक्रम नफ्याच्या प्रेरणेने चालविले जात नाहीत. नफ्यापेक्षा लोकांचे कल्याण अधिक महत्वाचे मानले जाते. आर्थिक न्याय प्रस्थापित करणे, देशातील औद्योगिकीकरणाला

चालना देणे, आर्थिक विकासाला गती देणे, समतोल आर्थिक विकास साधणे इत्यादी उद्देशाने सार्वजनिक उपक्रम चालविले जातात.

पुढील कोष्टकात सरकारी मालकीच्या उद्योगधंदयाची माहिती दर्शविली आहे.

**तक्ता क्र.१.१**

**सरकारी उद्योगांची प्रगती**

| अ.क्र. | वर्ष | उद्योगांची संख्या | एकूण गुंतवणूक ( कोटी रू.) |
|---|---|---|---|
| १ | १९५१ | ५ | २९ |
| २ | १९६१ | ४७ | ९५० |
| ३ | १९९० | २४४ | ९९३३० |
| ४ | २००१ | २४२ | २७४१९८ |
| ५ | २००३ | २४० | ३३३४७५ |

**आधार :—** 1) Hand book of statistics on Indian Economy, 2003-04.
2) Public Enterprise Survy, Government of India, 2003-04 .

वरील तक्ता क्र. १.१ वरून असे दिसून येते की, भारतात १९९१ पासून सरकारी उद्योगाची संख्या वाढत गेल्याचे दिसते. १९५१ ते १९९१ या काळात सरकारी उद्योगाची संखा ५ वरून २४४ एवढी वाढली. २००१ आणि २००३ या वर्षापर्यंत या उद्योगांच्या संख्येत काहीशी घट झाली आहे. सरकारने नवीन आर्थिक धोरण स्वीकारून सार्वजनिक उद्योगातील गुंतवणूक मोकळी करण्यास सुरूवात केली आहे. यामुळे या उद्योगांची संख्या घटत आहे. सरकारी उद्योगातील एकूण गुंतवणूकीचे प्रमाण मात्र खूप प्रचंड असल्याचे दिसून येते.

## १.११ महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक उपक्रम (महामंडळे) :—

सार्वजनिक उपक्रमांचे राष्ट्रीय अर्थवयवस्थेच्या प्रमुख क्षेत्रामध्ये महत्वाचे स्थान आहे. या सार्वजनिक उपक्रमांमध्ये आतापर्यंत फार मोठी गुंतवणूक करण्यात आलेली आहे. व आर्थिक विकास गतिमान करण्याकरीता यापुढेही कांही प्रकारच्या उपक्रमात भविष्यात मोठयाप्रमाणावर गुंतवणूक करावी लागणार आहे. राज्य स्तरावरील सार्वजनिक उपक्रमांच्या बाबतीत देखील अशीच परिस्थिती आहे. तथापि, अर्थसाधन विषयक अडचणी लक्षात घेता राज्य शासनाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात मोठया प्रमाणावर गुंतवणुकीच्या तरतुदी

करणे कठीण होणार असल्यामुळे राज्यातील सर्व उपक्रमांनी कार्यक्षमतेने काम करणे आवश्यक असुन गुंतवणुकीची पातळी गाठण्याकरीता अतिरिक्त साधन संपत्तीची व निर्मिती करण्यावर भर देणे महत्वाचे ठरेल.

### १.११.१ राज्य सार्वजनिक उपक्रमाची विविधता :—

राज्यातील सार्वजनिक उपक्रमामध्ये, कंपनी अधिनियम, सोसायटी रजिस्ट्रेशन अधिनियम, सहकारी संस्था अधिनियम अथवा केंद्र/राज्य शासनाचे विषेश अधिनियम इ. खाली निर्माण केलेल्या उपक्रमाचा समावेश झालेला आहे. सन १९९४—९५ मध्ये एकूण ६० महामंडळे होती. ती सन २०११—१२ मध्ये राज्यात एकूण ६५ महामंडळे कार्यरत होती. या उपक्रमाची विविधता त्या उपक्रमांची उद्दीष्टये आणि कार्य यामुळे दिसून येते. या शिवाय सदरहू उपक्रमांची आर्थिक मजबुती, नफा मिळविण्याची क्षमता, कर्मचारी वर्ग रचना, कामाचे क्षेत्र या बाबतीतही त्यांच्या मध्ये विविधता आहे. सार्वजनिक उपक्रमाचे स्थूलमानाने ५ विभागामध्ये वर्गिकरण केले आहे. त्यामध्ये १) वाणिज्यिक, २) वाणिज्यिक—नि—प्रवर्तक, ३) प्रवर्तक, ४) वित्तीय, ५) सार्वजनिक उपयुक्तता. अशा प्रकारे वर्गिकरण केले आहे.

### १.११.२ राज्य सार्वजनिक उपक्रमांची एकूण आर्थिक साधने :—

सन १९९६ — ९७ मध्ये राज्य सार्वजनिक उपक्रमांची एकूण आर्थिक साधने १९२६१ कोटी रूपयांची होती. त्यामध्ये राज्य शासन भाग भांडवल ५५१४ कोटी रू. राज्य शासनाकडून मिळालेले कर्ज ४५९४ कोटी रू. इतर कर्जामध्ये दीर्घ मुदतीचे कर्ज ९०७३ कोटी रू. तर अल्प मुदती ८० कोटी रू. अशी आर्थिक साधने होती.

### १.११.३ राज्य सार्वजनिक उपक्रमांच्या कामगिरीचा आढावा , मार्गदर्शन :—

हे सार्वजनिक उपक्रम ज्या परिस्थीतीत कार्य करतात त्यातही स्पष्ट सुसंगत आणि साध्य करता येण्याजोगी उद्दिष्टये ठरविणे शक्य आहे. शिवाय त्या उपक्रमासाठी शासनाने ठरवून दिलेली उद्दिष्टये साध्य होण्याच्या दृष्टिने शासनाचे त्यांच्या कराभारावर परिणामकारक नियंत्रण राहील याची सुरूवात या राज्यात आक्टोबर १९८६ मध्ये राज्य सार्वजनिक उपक्रम केंद्राची स्थापना

करण्यात आली आणि मे १९८७ मध्ये या केंद्रास मार्गदर्शन करण्याकरिता केंद्र शासनाच्या नियोजन आयोगाचे भुतपूर्व सदस्य (उद्योग व मुलभूत सोयी) श्री. व्ही. जी. राजाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली. सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाखाली राज्य सार्वजनिक उपक्रम केंद्र राज्य शासनास सर्व सार्वजनीक उपक्रमांबाबत तसेच प्रत्येक सार्वजनिक उपक्रमांच्या कार्यात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टिने सर्वसाधारण स्वरूपाच्या शिफारशी सादर करते.

### १.११.४ सार्वजनिक उपक्रमांकडून राज्य शासनास परतावा :—

दहाव्या वित्त आयोगाने आपल्या अहवालात सार्वजनिक उपक्रमांनी राज्याच्या साधन संपत्तीत भर घालण्याच्या आवश्यकतेचा पुन:रूच्चार केला असून वाणिज्यीक उपक्रमांनी किमान ७.५% वाणिज्यिक नि— प्रवर्तक उपक्रमांनी किमान ५% व वित्तीय उपक्रमांनी किमान २.५% असा लाभांश दिला असला पाहिजे असे म्हटले आहे.

### १.११.५ महाराष्ट्रातील राज्य सार्वजनिक उपक्रमांची थोडक्यात माहिती :—

सार्वजनिक उपक्रमाचे स्थूल मानाने ५ विभागामध्ये खालील प्रमाणे वर्गिकरण केले आहे.

अ) वाणिज्यिक, ब) वाणिज्यिक नि प्रवर्तक, क) प्रवर्तक, ड) वित्तीय, इ) सार्वजनिक उपयुक्ता.

**अ) वाणिज्यिक :—**

**१) महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित :—**

राज्यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाचा संतुलित विकास होण्यास चालना देण्याच्या उद्देशाने १९७८ मध्ये महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळाची (मेल्ट्रॉन) स्थापना करण्यात आली.

**२) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित :—**

महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित हे १९७३ साली स्थापन करण्यात आले. राज्यातील खनिज संपत्तीचे योग्यरित्या संरक्षण करण्यासाठी

निरनिराळया खाणींच्या पध्दतशीर विकासाना चालना देणे, हे या महामंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**३) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित :—**

राज्यातील उद्योगांच्या विकासासाठी सहाय्य करण्याच्या उद्देशाने १९६२ मध्ये महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित याची स्थापना करण्यात आली. सन २०१० — २०११ मध्ये महामंडळाने १११.५१ कोटी रूपायांचा माल खरेदी केला तर महामंडळाला ३५५.३१ कोटी रूपायांचे पणन सहाय्य मिळाले.

**४) महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित :—**

महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ ही महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीची कंपनी असून तिची स्थापना दिनांक ६ सप्टेंबर १९६६ रोजी पुढील प्रमुख उद्दिष्ठांसाठी करण्यात आली. (अ) महाराष्ट्रातील आजारी गिरण्यांचे व्यवस्थापन व पुनर्वसन. (ब) महाराष्ट्रातील औद्योगिकदृष्टया मागासलेल्या विभागात नवीन गिरण्या उभारणे.

**५) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ :—**

महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित हे सांविधिक मंडळ १९५७ या वर्षी स्थापन करण्यात आले. शास्त्रीय पध्दतीने साठवणी करण्याकरता वखारींची सोय उपलब्ध करून देणे, हे महामंडळाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. महामंडळ राज्यात  कृषी उत्पादने, रासायनिक खते, कृषी विषयक उपकरणे आणि इतर अधिसूचित वस्तू यांचा साठा करण्याकरता वखारींचे संपादन करते, तसेच वखारी बांधते. केंद्रीय वखार महामंडळातर्फे महामंडळाच्या भागभांडवलाकरिता अनुरूप अंशदान देण्यात येते.

**६) मॅफ्को मर्यादित :—**

शेतकऱ्यांसाठी खरेदी—विक्रीच्या सायी उपलब्ध करून देणे आणि ग्राहकांना चांगल्या दर्जाची उत्पादने वाजवी दराने उपलब्ध करून देणे या प्राथमिक उद्दिष्टांसाठी १९७० मध्ये मॅफ्कोची स्थापना करण्यात आली. मॅफ्कोच्या कार्यामध्ये, शीतगृहाच्या सुविधा, मांस, फळे व भाजीपाला यावर प्रक्रिया करणे आणि खरेदी—विक्री करणे या गोष्टांचा समावेश होतो.

**७) महाराष्ट्र राज्य बियाने महामंडळ मर्यादित :—**

महाराष्ट्र राज्य बियाने महामंडळाची स्थापना २६ एप्रिल १९७६ रोजी करण्यात आली असून हे महामंडळ कंपनी अधीनियम, १९५६ खाली नोंदणी—कृत करण्यात आले आहे. या महामंडळाच्या भाग—भांडवलात महाराष्ट्र शासन, राष्ट्रीय बियाणे महामंडळ, कृषि विद्यापिठे आणि बियाणे उत्पादकांचा सहभाग आहे. महामंडळाच्या मुख्यक्षेत्रामध्ये चांगल्या प्रतीच्या बियाणेचे उत्पादन करून त्याचे वितरण वाजवी भावात शेतकऱ्यांना करणे असे आहे.

**८) महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित :—**

नवीन शहरे, वसाहती आणि नागरी क्षेत्रे यांचा योजनाबध्द विकास करण्याचे काम हाती घेण्यासाठी महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादीत या महामंडळाची १९७० मध्ये स्थापना करण्यात आली. महामंडळ नवीन शहर वसाहतींसाठी सामाजिक व प्रत्यक्ष पायाभूत सोयीसुविधांची तरतूद करण्याचेही काम करते.

**९) महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित :—**

राज्यातील चित्रपट निर्मिती त्याच प्रमाणे रंगभूमी आणि प्रयोगनिष्ठ कला प्रकार यांना सहाय्य देण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून १९७७ मध्ये महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ स्थापन करण्यात आले.

**१०) हाफकिन बायो—फार्मास्युटिकल महामंडळ मर्यादित :—**

औषधीय जीव व उत्पादनांचा व्यापारी तत्वावर विकास करणे तसेच लस आणि इतर आरोग्य विषयक उत्पादन केंद्र व राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य कार्यक्रमाकरिता उत्पादीत करण्यासाठी १९७४ मध्ये हाफकिन बायो—फार्मास्युटिकल महामंडळाची स्थापना करण्यात आली.

**११) महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित :—**

विकासाची कामे मोठया प्रमाणावर राबविण्यासाठी कंपनीची स्थापना भारतीय कंपनी अधिनियम १९५६ अंतर्गत दिनांक १६ फेब्रुवारी १९७४ रोजी करण्यात आली.

**१२) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित :—**

महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ याची अंमलबजावणी केल्यामुळे अधिक ठरलेल्या जमिनी लागवडीखाली आणण्याचे काम हाती घेण्यासाठी १९६३ मध्ये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत हे महामंडळ स्थापन करण्यात आले. हे महामंडळ त्यांच्या नियंत्रणाखाली असलेली जमीन लागवडीखाली आणण्याचे काम करते.

**१३) महाराष्ट्र पेट्रोकेमिकल महामंडळ मर्यादित :—**

पेट्रोकेमिकल प्रकल्प व महाराष्ट्र गॅस क्रॅकर संकुलातून उपलब्ध होणारी दुय्यम उत्पादने वापरणारे त्याच्या संबंधातील उद्योग यांच्या उभारणीसाठी सहाय्य करण्याकरिता सन १९८१ मध्ये महाराष्ट्र पेट्रोकेमिकल महामंडळ मर्यादित ची स्थापना करण्यात आली.

**१४) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित :—**

शेतकऱ्यांना कृषी भरणा साहित्याचे वितरण आणि इतर कृषी विषयक सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने भारत सरकारणे १७ कृषी उद्योग महामंडळाची स्थापना केली. भारत सरकारने जारी केलेल्या राष्ट्रिय मार्गदर्शक तत्वानुसार महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित जे ''कृषी उद्योग'' या नावाने सर्वश्रृत आहे. या महामंडळाची स्थापना १५ डिसेंबर १९६५ रोजी कंपनी कायद्याखाली करण्यात आली.

**१५) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित :—**

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापना दि. २६ एप्रिल १९७६ रोजी करण्यात आली असून हे महामंडळ कंपनी अधीनियम १९५६ खाली नोंदणीकृत करण्यात आले आहे. या महामंडळाच्या भागभांडवलात महाराष्ट्र शासन, राष्ट्रीय बियाणे महामंडळ, कृषी विद्यापीठे आणि बियाणे उत्पादकाचा सहभाग आहे. महामंडळाच्या मुख्य क्षेत्रामध्ये चांगल्या प्रतीच्या बियाणेचे उत्पादन करून त्याचे वितरण वाजवी भावात शेतकऱ्यांना करणे असे आहे.

**१६) महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ :—**

महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे प्रमुख कार्य म्हणजे राज्यातील खादी आणि ग्रामोद्योग उपक्रमाचे संघटन, विकास व विस्तार करणे हे आहे.

**१७) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ :—**

औद्योगकि प्रदूषण ही पर्यावरणाच्या दृष्टिने एक प्रमुख चिंताजनक बाब आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे प्रदूषणासंबंधी कायद्याची अंमलबजावणी करणारे प्रमुख संस्था आहे. मार्च २०११ अखेरीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अखत्यारीतील एकूण ७५०८० कारखान्यापैकी वायु प्रदूषण करणारे १७%, जल प्रदूषण करणारे १८% आणि धोकादायक टाकाऊ पदार्थ निर्माण करणार ७% कारखाने होते.

**ब) वाणिज्यिक नि प्रवर्तक :—**

**१) कोकण विकास महामंडळ मर्यादित :—**

कोकण प्रदेशाच्या आर्थिक (विशेषत: औद्योगिक) विकासाना चालना देण्याकरिता १९७० मध्ये कोकण विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. हे महामंडळ औद्योगिक क्षेत्रामध्ये स्वत: कार्य करित असते. त्याच प्रमाणे, नवीन औद्योगिक घटकांमध्ये सममूल्य भांडवलही गुंतविते.

**२) विदर्भ विकास महामंडळ मर्यादित :—**

विदर्भ विकासाचा आर्थिक विकास करण्याच्या दृष्टिने संभाव्य साधनसंपत्ती अजमावण्यासाठी १९७० साली विदर्भ विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. त्यानुसार, महामंडळ लघुउद्योगांची स्थापना करण्यासाठी स्थानिक उद्योगांनी पुढे यावे म्हणून वेगवेगळी कामे हाती घेतली आहेत आणि लघुउद्योगांच्या स्थापनेसाठी सहाय्य केले आहे.

**३) मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित :—**

राज्यात स्वत: प्रकल्प उभारून, उद्योजकांना आर्थिक सहाय्य देऊन आणि औद्योगिक व इतर प्रकल्पांमध्ये सममूल्य भांडवल गुंतवणुकीद्वारे मराठवाडा

विभागाच्या आर्थिक (मूलत: औद्योगिक) विकासाला चालना देण्याकरिता मराठवाडा विकास महामंडळाची स्थापना १९६७ साली करण्यात आली.

**४) पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित :—**

पश्चिम महाराष्ट्राच्या आर्थिक (मूलत: औद्योगिक) विकासाला चालना देण्याकरिता १९७० मध्ये पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. महामंडळाने स्वत:चे प्रकल्प उभारले आहेत आणि इतर औद्योगिक घटकांमध्ये  मर्यादीत सममूल्य भांडवलही गुंतविले आहे.

**५) महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ मर्यादित :—**

राज्यामध्ये चर्मोद्योगाचा विकास करण्याकाीता १९७४ मध्ये महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली.

**६) महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित :—**

मेंढया व शेळया यांचे पशुधनाचा विकास करण्यासाठी आणि मेंढपाळ जमातीची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादीत या महामंडळाची १९७८ मध्ये स्थापना करण्यात आली.

**७) महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय शेळी विकास महामंडळ मर्यादित :—**

राज्यातील सागरी त्याचप्रमाणे गोडयापाण्यातील मासेमारीच्या साधनसंपत्तीचे संवर्धन, तिचा विकास करणे आणि शास्त्रीय पध्दतीने तिचे समुपयोजन करणे यासाठी १९७३ मध्ये महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय शेळी विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली.

**८) महाराष्ट्र राज्य हातमाग विकास महामंडळ मर्यादित :—**

सहकारी कक्षेत न येणाऱ्या हातमाग विणकरांना खात्रीने काम पुरविण्यासाठी १९७२ मध्ये महाराष्ट्र राज्य हातमाग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. भारत सरकारच्या इन्टेन्सिव्ह हातमाग विकास प्रकल्प (१९७६.१९७७) योजनेमुळे महामंडळाच्या कायामध्ये लक्षणीय वाढ झाली.

**९) महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित :—**

यंत्रमाग उद्योगाच्या वाढीस उत्तेजन देण्यासाठी आणि विणकरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी १९७२ मध्ये महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाची स्थापना

करण्यात आली. हे महामंडळ सुताची खरेदी व त्याचा पुरवठा करते, असंस्कारीत कापडाची विक्री करते आणि यंत्रमाग संस्थासाठी आवश्यक ती आर्थिक व्यवस्था करते.

**१०) कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित :—**

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाची स्थापना १९८५ मध्ये करण्यात आली. कोल्हापूर हे मराठी चित्रपटांचे केंद्र आहे, तेथे आधुनिक यंत्रसामुग्रीची व सहाय्यकारी सुविधांची तरतूद करून मराठी चित्रपट उद्योगाला प्रोत्साहन देणे हा महामंडळाचा उद्देश आहे. चित्रपट निर्मितीच्या कथेपासून ते चित्रपट प्रदर्शनापर्यंतच्या सर्व गरजा या महामंडळाकडून उपलब्ध होतील.

**११) महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ मर्यादित :—**

राज्यामध्ये पर्यटनाच्या विकासास चालना देण्यासाठी १९७५ मध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. महामंडळाकडे वाणिज्यिक व प्रचलनात्मक कामे सोपविण्यात आलेली असून नियामक स्वरूपाची कामे पर्यटन संचालनालयाकडून पाहिली जातात. सन २०११—२०१२ या वर्षासाठी शासनाने पर्यटन क्षेत्राकरीता रू. ५१०.५०कोटी रू. इतका नियतव्यय ठेवलेला आहे.

**१२) महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादित :—**

गरजू निराश्रित महिलांना योग्य तो मोबदला व स्वयंरोजगार मिळवून देण्याच्या कामी मदत करण्याकरिता १९७५ साली महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादीत (माविम) स्थापन करण्यात आले. महिला संघटनांच्या कार्याचे समन्वय करणारी व त्यांना सहाय्य करणारी शिखर संघटना म्हणून माविमने काम करणे अपेक्षित आहे.

**क) प्रवर्तक उपक्रम :—**

**१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित :—**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे सांविधिक मंडळ, राज्यातील उद्योगधंद्यांयाना चालना देणे आणि त्यांची त्वरित सुविहित प्रकारे स्थापना करणे, ते वाढविणे आणि त्यांचा विकास करणे यासाठी सहाय्य करण्याच्या उद्देशाने

१९६२ मध्ये स्थापन करण्यात आले. सन २०११ मध्ये महामंडळाची घटक संख्या ३५६९१, गुंतवणूक ७३९३१ कोटी रूपये , रोजगार ९.०१ लाख एवढी होती.

**२) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित :—**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाखाली १९७२ साली महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादीत या महामंडळाची स्थापना मूलत: पुढील कार्यक्रम राबविण्यासाठी करण्यात आली होती :—

**(अ)** आदिवासी क्षेत्रामध्ये अन्नधान्य आणि दैनंदिन वापराच्या इतर वस्तू यांचा पुरवठा करण्यासाठी प्राथमिक केंद्रे चालविणे.

**(ब)** आदिवासी मुलांसाठी निवासी आश्रमशाळा चालविणे.

**३) लोकशाहिर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित :—**

मातंग समाजातील व्यक्तींच्या विकासाला चालना देण्यासाठी जुलै १९८५ मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादीत या महामंडळाची स्थापना करण्यात आली. सध्या या महामंडळाचे भाग भांडवल ७५ कोटी रूपये आहे. हे महामंडळ ( N S F D C ) ची राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून काम करते.

**४) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित :—**

सर्वसाधारणपणे मागासवर्गियांचा आणि विशेष करून अनुसूचित जाती व नवबौध्द यांचा विकास करण्याच्या दृष्टिने १९७८ मध्ये महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर मातंग जमातीच्या आणि विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या व्यक्तींचा विकास करण्यासाठी दोन स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्यात आली.

**५) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित :—**

महाराष्ट्रातील विमुक्त जातींमधील व भटक्या जमातींमधील गरजू व्यक्तींना सहाय्य देण्यासाठी १९७४ साली या महामंडळाची स्थापना करण्यात आली.

**६) महाराष्ट्र भुविकास महामंडळ मर्यादित :—**

वित्तीय संस्थांकडून निधी उभारून शासनाच्या भूविकास कार्यक्रमास गती देण्याच्या उद्देशाने १९७३ मध्ये महाराष्ट्र भूविकास महामंडळ स्थापन करण्यात आले. प्रत्यक्ष भूविकासाचे काम हे राज्य शासनामार्फत (लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण) करून घेण्यात येते आणि या प्रयोजनासाठी संबंधित अधिकारी हे महामंडळाचे अधिकारी म्हणून समजले जातात.

**७) महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित :—**

विविध संस्थांकडून निधी मिळवून, महाराष्ट्र शासनाच्या तुरूंग विभागामधील कर्मचा—यांकरिता निवासी जागेची सोय करण्यासाठी इमारती बांधण्याकरिता १९७४ मध्ये महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आली.

**८) संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार महामंडळ मर्यादित :—**

चर्मकार समाजाच्या विकासासाठी संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार महामंडळ मर्यादित या महामंडळाची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय अनुसुचित जाती व वित्त विकास महामंडळाच्या विविध योजना राबविण्यासाठी सदर महामंडळास राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून प्राधिकृत केले आहे. महामंडळाचे भागभांडवल रूपये ५० कोटी आहे.

**९) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित :—**

राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादितची स्थापना करण्यात आली. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ५० कोटी रूपये आहे. हे महामंडळ राष्ट्रीय मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाची (NBCFDC) राज्यातील वाहिनीकृत यंत्रणा म्हणूनही कार्य करते.

**१०) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित :—**

आदिवासींच्या कल्याणासाठी राज्य शासनाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादितची स्थापना केली आहे. या महामंडळाचे रूपये १००

कोटी इतके अधिकृत भाग भांडवल असून त्यात राज्यशासनाचा हिस्सा ५१ आणि केंद्र शासनाचा ४९ इतका हिस्सा आहे. महामंडळामार्फत राष्ट्रीय आदिवासी वित्त विकास महांडळाच्या विविध योजना राबविल्या जातात.

**११) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित :—**

राज्य शासनामार्फत अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी या महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. सदर महामंडळ अल्पसंख्याांकांना स्वयंरोजगार, शिक्षण इत्यादीसाठी कर्ज पुरविण्याचे काम करते.

**१२) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित :—**

अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्यात महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादितची स्थापना करण्यात आली. हे महामंडळ राष्ट्रीय अपंग वित्त व विकास महामंडळाची राज्यासाठी वाहिणीकृत यंत्रणा म्हणूनही कार्य करते. या महामंडळामार्फत महिला समृध्दी, सूक्ष्म पतपुरवठा, मुदत कर्ज, कृषि संजिवनी इ. योजना राबविल्या जातात.

**ड) वित्तीय :—**

**१) महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ :—**

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ हे एक सांविधीक महामंडळ असून राज्यातील तसेच गोवा, दीव व दमन येथील लहान आणि मध्यम औद्योगिक घटकांच्या दीर्घ मुदतीच्या निधीच्या संबंधातील गरजा भागविण्यासाठी १९६२ मध्ये या महामंडळाची स्थापना करण्यात आली.

**२) औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळ :—**

आजारी उद्योग हा आर्थिक वाढीमधील एक प्रमुख अडथळा असून त्यामुळे भांडवली मालमत्ता, उत्पादकता व रोजगार यांच्यावर विपरीत परिणाम होतो. आजारी उद्योग संस्था (विषेश तरतूद), अधिनियम १९८५ अंतर्गत उद्योगाच्या पुनर्वसनासाठी केंद्रशासनाने औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळ (बी.आय.एफ.आर.) स्थापन केले आहे.

**इ) सार्वजनिक उपयुक्तता :—**

**१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ :—**

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ हे एक सांविधिक मंडळ असून वीजनिर्मिती, पारेषण आणि वितरण या कार्यासाठी १९६० मध्ये या मंडळाची स्थापना करण्यात आली.

**२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण :—**

राज्यातील पाणिपुरवठा व जलनिस्सारण सेवांचा विकास व त्यांचे नियमन करण्यासाठी १९९७ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पूर्वीचे महाराष्ट्र पाणिपुरवठा व जलनिस्सारण मंडळ याची स्थापना करण्यात आली. मंडळ ५३ केंद्रांची व्यवस्था पाहते व चालवते. मंडळ स्थानिक संस्थांकरिता पाणिपुरवठा व जलनिस्सारण योजनाही राबविते.

**३) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण :—**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची स्थापना (म्हाडा) १९७७ मध्ये झाली, म्हाडा ही एक शिखर संस्था असून तिच्या अखत्याराखाली काम करणारी सात प्रादेशिक मंडळे, दोन विशेष कामाकरीता निर्माण करण्यात आलेली मंडळे, प्रकल्प यांच्या कामात समन्वय घडवून आणणे व त्यांच्या कामावर नियंत्रण ठेवण्याचे काम ही संस्था करते.

**४) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ :—**

राज्यातील प्रवासी जनतेला समन्वित, मितव्ययी व कार्यक्षम मार्ग परिवहन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी १९६१ मध्ये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ हे वैधानिक महामंडळ आहे.

**५) महाराष्ट्र राज्य कृष्णा खोरे विकास महामंडळ :—**

महाराष्ट्र राज्य कृष्णा खोरे विकास महामंडळाची स्थापना २५ जानेवारी १९९६ रोजी कृष्णा पाणी तंटा न्यायाधिकरणाच्या निवाडयाव्दारे महाराष्ट्र राज्याला वाटप करण्यात आलेले कृष्णा नदिचे ५९४ टिएमसी पाणी सन २००० मे पर्यन्त उपयोगात आणावयाचे आहे. यासाठी महामंडळाने कृष्णा नदितील खोऱ्यातील पाटबंधारे प्रकल्पांना लाभ क्षेत्र विकासाला आणि जलविद्युत

उर्जा निर्मितीच्या योजनांना, पूरनियंत्रणासह संलग्न कामांना चालना देण्यासाठी आणि ती कार्यान्वीत करण्यासाठी कार्यवाही करावयाची आहे.

**समारोप :—**

खरे पाहता कोणतेही राष्ट्र जेंव्हा शासनाची किंवा योजनाकारांची इच्छा असो अथवा नसो अशा स्थितीत आर्थिक विकासाकडे वाटचाल करतो तेंव्हा त्या राष्ट्रातील विकासामध्ये असंतुलन टाळता येत नाही. अर्थव्यवस्थेमध्ये ताठरता, अविभाज्यता तसेच कमी लवचिकतेमुळे मागणी व पुरवठयाला मिळणारा अल्प प्रतिसाद इत्यादी वैशिष्टयामुळे जरी सुरूवातीस विविध क्षेत्रामध्ये गुंतवणूक केली तरी असमतोल निर्माण होतो. त्यामुळे असंतुलन किती प्रमाणात असावे अर्थात असंतुलनाचे पर्याप्त प्रमाण किती याचा विचार करणे एवढेच शक्य आहे. विविध क्षेत्रातील समन्वय आणि परस्पर पुरकता यावर भर देण्यासाठी संतुलित विकास तत्वाचे महत्व निश्चित आहे. संतुलित विकासाचे तत्व हे राष्ट्राच्या आर्थिक स्वयंपूर्णतेवर अवलंबून आहे.

दि. १ मे १९६० रोजी महाराष्ट्राची निर्मीती झाली. महाराष्ट्र हे भारतीय संघराज्यातील प्रमुख घटकराज्य आहे. महाराष्ट्राचे प्रमुख पाच प्रादेशिक विभाग पाडले गेले आहेत. या पाच प्रादेशिक विभागाचा आर्थिक विकासाचा अभ्यास केला असता त्यामध्ये प्रचंड प्रमाणात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासात असमतोलपणा आढळून येतो. हा असमतोलपणा समाप्त करण्यासाठी महाराष्ट्राचा व पर्यायाने भारत देशाचा समतोल विकास करण्यासाठी भारताच्या राष्ट्रपतींनी निर्गमीत केलेल्या महाराष्ट्रराज्य आदेश, १९९४ मधील तरतुदी अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्यांचे आदेश क्रमांक/जीएस/जी/९४/डीबी/४३२ दिनांक ३० एप्रिल १९९४ अन्वये राज्यामध्ये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या विभागांसाठी तीन स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची स्थापना केली. तसेच राज्यातील प्रत्येक वैधानिक विकास मंडळाचे कार्यक्षेत्र ठरवून दिले. या आदेशाला या नंतर ''वैधानिक विकास मंडळ'' आदेश असे संबोधण्यात आले.

# संदर्भ


१) Jhingan M.L. ,( 1981 ),The Economics of Development & Planning, (Page No. 5 ) Vikas Publishing House Pvt. Ltd., New Delhi.

२) ------------------------------ do ---------------------------------------------

३) Meier Gevald M. & Baldwin Robert E., ( 1970 ),Economics Development – Theory, History,Policy, (Page No. 2 ),Asia Publishing House, Bombay.

४) Karnati Lingaiah/ T. Satyanarayana (1990), Indian Economi ( P.no.5 ),Sterling Publishers Private Ltd., New Delhi-6

५) पत्की/साबळे, (१९९१), विकासाचे अर्थशास्त्र, (पान क्र. १) पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर.

६) डॉ. कदम विश्वास, (ऑगस्ट २०१०), आर्थिक विकास व नियोजन, (पान क्र.१०) कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

७) उपरोक्त

८) डॉ. पुरोहित वसुधा, (२०१०),आर्थिक विकास व नियोजन आणि सांख्यिकीय पध्दती, (पान क्र.३—४),विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

९) उपरोक्त पृ. क्र. ४

१०) डॉ. कायंदे — पाटील गंगाधर वि., (जून २००१),भारतीय आणि जागतीक आर्थिक विकास, (पान क्र.१—३), चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.

११) उपरोक्त पृ. क्र. १—५

१२) डॉ. झामरे जी. एन. , (जुलै २०१०),भारतीय आर्थव्यवस्था विकास व पर्यावर्णात्मक अर्थशास्त्र, (पान क्र. ४८०), पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर.

१३) डॉ. पुरोहित वसुधा, (२०१०),आर्थिक विकास व नियोजन आणि सांख्यिकीय पध्दती, (पान क्र.२—३), विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

१४) उपरोक्त पृ. क्र. ३

१५) डॉ. इंगळे बी. डी. (२०१०),विकास व पर्यावर्णीय अर्थशास्त्र,(पान क्र. १२), अरूणा प्रकाशन, लातूर.

१६) डॉ. प्रा. सौ. फडणविस मृणालिनी, (जुलै १९९८), विकासाचे अर्थशास्त्र व सिध्दांत, (पान क्र.२),विद्या प्रकाशन, नागपूर.

१७) डॉ. जाधवर आर. डी./डॉ. गिते टी. जी./आघाव आर. जी./डॉ. खुरूद बी. एस. (जुलै२००६),भारतीय आणि जागतीक आर्थिक विकास, (पान क्र.११) अथर्व प्रकाशन, पुणे.

१८) प्रा. रायखेलकर/डॉ. दामजी, (जून २०११),औद्योगिक अर्थशास्त्र, (पान क्र.३), विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

१९) डॉ. डोळे ना. य. (१९९७), उदारीकरण :— नवे आर्थिक धोरण (पृ. क्र. १५२), विद्या प्रकाशन नागपूर.

२०) डॉ. कायंदे — पाटील गंगाधर वि., (जून २००१ ),भारतीय आणि जागतीक आाार्थिक विकास, (पान क्र.१—२१),चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.

२१) पत्की/साबळे, (१९९१),विकासाचे अर्थशास्त्र, (पान क्र. १),पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर.

२२) प्रा. वाखरडे सोनाली, (३ जानेवारी २०११), मूलभूत सामाजिक संस्था

(पान क्र. १९९—२००), अरूणा प्रकाशन लातूर.
२३) डॉ. काचोळे दा. धो., (१० सप्टेंबर २००२), समाजशास्त्र:— संकल्पनात्मक ओळख, (पान क्र. ३४३), कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
२४) डॉ. धनागरे द.ना., (२१ डिसेंबर २००५), संकल्पनाचे विश्व आणि सामाजिक वास्तव, (पान क्र. ५८), प्रतिमा प्रकाशन पुणे ५.
२५) प्राचार्य कुंभार नागोराव/डॉ. आनंद अनभूले (१९९९), महाराष्ट्रातील समाजशास्त्रे चिंतन, (पान क्र. १०१), न्यु स्नेहा ऑफसेट लातूर.
२६) डॉ. माने माणिक, (जुलै २००४), सुबोध समाजशास्त्र, (पान क्र. १०४), विद्या प्रकाशन नागपूर.
२७) डॉ. भोईटे/डॉ. बोबडे (जुलै १९९६), सामाजिक संस्था, (पान क्र. ३२), विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.
२८) प्रा. वाखरडे सोनाली, (३ जानेवारी २०११), मूलभूत सामाजिक संस्था (पान क्र. १६५), अरूणा प्रकाशन लातूर.
२९) प्रा. सौ. शिंदे लिला/डॉ. शिंदे पंडित, (जुन २००३), समाजशास्त्राची रूपरेषा, (पान क्र. १३८), श्री विद्या प्रकाशन, पुणे ३०.
३०) प्रा. वाखरडे सोनाली, (३ जानेवारी २०११), मूलभूत सामाजिक संस्था (पान क्र. २०२), अरूणा प्रकाशन लातूर.
३१) उपरोक्त (पान क्र. २२५).
३२) डॉ. मनवर डी. एस. (२००३), समाजशास्त्र परिचय, (पान क्र. २९१), अरूणा प्रकाशन लातूर.
३३) प्रा. वाखरडे सोनाली, (३ जानेवारी २०११), मूलभूत सामाजिक संस्था, (पान क्र. २२६), अरूणा प्रकाशन लातूर.
३४) उपरोक्त (पान क्र. २४५).
३५) उपरोक्त (पान क्र. २४६).
३६) डॉ. पाटील जे. एफ. (डिसेंबर २००७),वृध्दी व विकासाचे अर्थशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर.
३७) डॉ. देशपांडे श्री. आ. (१९८७), भारतीय नियोजन आणि आर्थिक विकास (पान क्र. ३५—४७), विद्या प्रकाशन नागपूर.
३८) राज्य सार्वजनिक उपक्रमाचे कार्य (१९९६—९७),महाराष्ट्र शासन,राज्य सार्वजनिक उपक्रम केंद्र, वित्त विभाग (१९९८)
३९) भारताचे नियंत्रक महालेखापरीक्षक यांचा अहवाल,( दिनांक ३१ मार्च १९९५ रोजी संपणाऱ्या वर्षाचा ), क्र. २ (वाणिज्यिक), महाराष्ट्र शासन
४०) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०११—१२),अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग,महाराष्ट्र शासन, मुंबई.
४१) Hand book of statistics on Indian Economy, 2003-04.
४२) Public Enterprise Survy, Government of India, 2003-04 .
४३) वर्तमान पत्र — दै. सकाळ २१ जून २०१२
४४) वेबसाईट्स — १ www.spardhamantra.com
२ www.mahades.maharashtra.gov.in

प्रकरण दुसरे

# संशोधन साहित्याचे पुनरावलोकन व संशोधन आराखडा


२.१ प्रास्ताविक
२.२ संशोधनाचा अर्थ
२.२.१ संशोधनाच्या व्याख्या
२.२.२ संशोधन पध्दतीचे प्रकार
२.२.३ संशोधन कार्याचे उद्देश
२.३ साहित्याचे सर्वेक्षण
२.४ प्रादेशिक असमतोलाचे स्वरूप
२.५ प्रादेशिक विषमतेबाबत केंद्र व महाराष्ट्र सरकारची धोरणे
२.६ प्रादेशिक विषमतेबाबत महाराष्ट्र सरकारची धोरणे
२.६.१ नागपूर करारातील प्रमुख मुद्दे
२.६.२ महाराष्ट्राची तिसरी पंचवार्षिक योजना
२.६.३ अशोक मित्रा यांचा अभ्यास गट (१९६४)
२.६.४ पांडे अभ्यास गटाचा अहवाल (१९६८)
२.६.५ गोखले अर्थशास्त्र संस्था, पूणे या संस्थेचा अभ्यास (१९७५)
२.६.६ श्री नरोत्तम शहा यांचा अभ्यास
२.६.७ दांडेकर समितीचा अहवाल
२.६.८ सिताप्रभू व पी. सी. सरकार (१९९२)
२.६.९ राज्यनियोजन मंडळाचा अभ्यास गट (१९९३)
२.६.१० निर्देशांक व अनुशेष समितीचा अहवाल (१९९७)
२.६.११ प्रा. राधाकृष्ण
२.६.१२ सुर्यनारायन एम.एच. (२००९)
२.६.१३ डॉ. विजय केळकर समिती
२.७ संशोधन साहित्याचे पुनवरालोकन
१ कै. यशवंतराव चव्हाण
२ डॉ. र. पु. कुरूलकर
३ श्री भुजंगराव कुलकर्णी
४ डॉ. व्ही. बी. भिसे
५ प्रा. डॉ. टी. एल. बारबोले
६ श्री व्यंकटेश हंबीरे
७ प्रा डॉ. जयसिंग एस देशमुख
८ डॉ. कुरूलकर
९ श्री स. मा. गर्गे
१० डॉ. कुरूलकर
११ राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर
१२ राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर

१३ मुख्यमंत्री, विलासराव देशमुख
१४ मुख्यमंत्री, विलासराव देशमुख
१५ म. वै. विकास मंडळाचे अध्यक्ष मधुकरराव चव्हाण
१६ डॉ. र. पु. कुरूलकर
१७ संपादकीय दै. लोकमत
१८ श्री प्रताप आसबे
१९ माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण
२० श्रीपाद कुलकर्णी
२१ दैनिक लोकमत बातमी
२२ माजी खासदार डॉ. व्यंकटेश काब्दे

२.८ संशोधन आराखडा
२.८.१ प्रास्ताविक
२.८.२ संशोधन समस्या
२.८.३ संशोधनाची उद्दिष्टे
२.८.४ संशोधनाच्या मर्यादा
२.८.५ संशोधनाचे महत्व
२.८.६ संशोधन साहित्याचा आढावा
२.८.७ सैध्दांतिक पार्श्वभूमि
२.८.८ गृहितके
२.८.९ संशोधन पध्दती
२.८.१० तथ्य संकलन व विश्लेषण
१ प्राथमिक तथ्य संकलन
२ द्वितीय तथ्य संकलन
३ विश्लेषणाची तंत्रे व साधने
२.८.११ प्रकरण योजना
१ प्रकरण पहिले — प्रस्तावना
२ प्रकरण दुसरे — संशोधन साहित्याचे पुनरावलोकन व संशोधन आराखडा
३ प्रकरण तिसरे — मराठवाडा विभागातील जिल्ह्यांचे सामाजिक व आर्थिक समालोचन
४ प्रकरण चौथे — मराठवाडयाची अर्थव्यवस्था व मागासलेपणाची कारणे
५ प्रकरण पाचवे — मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना, रचना, भूमिका, व कार्ये
६ प्रकरण सहावे — मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या आर्थिक विकासातील योगदान
७ प्रकरण सातवे — मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे मराठवाडयाच्या सामाजिक विकासातील योगदान
८ प्रकरण आठवे — निष्कर्ष व शिफारशी
समारोप
संदर्भ

# प्रकरण दुसरे

# संशोधन साहित्याचे पुनरावलोकन व संशोधन आराखडा

## २.१ प्रास्ताविक :—

कोणत्याही देशाच्या, राज्याच्या आणि प्रदेशाच्या विकासामध्ये त्या त्या देशाच्या त्या राज्याच्या, त्या प्रदेशाच्या अर्थ व्यवस्थेचा सिंहाचा वाटा असतो. जर तेथील अर्थव्यवस्था ही प्रगत असेल तर त्या देशाचा, राज्याचा, प्रदेशाचा विकास झपाटयाने होतो. या विरूध्द परिस्थिती असेल तर अर्थव्यवस्था मागासलेली राहते. त्यामुळे विकसामध्ये अडथळा येवून विकास थांबतो.

मराठवाडा हा महाराष्ट्र राज्यातील एक प्रदेश आहे. मराठवाडयाच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करताना ही गाष्टि लक्ष्यात घ्यावी लागते की भारत जरी दि. १५ ऑगस्ट १९४७ साली स्वतंत्र झाला असला तरी मराठवाडा स्वतंत्र होण्यासाठी १७ सप्टेंबर १९४८ साल उजडावे लागले. कारण १९४८ पर्यंत मराठवाडयावर निजामाचे राज्य होते. मराठवाडयाच्या विकासाविषयी निजामाचा दृष्टीकोन अनुकूल नव्हता. त्यांनी मराठवाडयाच्या विकासाविषयी प्रयत्न देखील केले नाहित. याचाच परिणाम म्हणजे मराठवाडयाची अर्थव्यवस्था ही मागासलेलीच राहिली. मात्र १९४८ नंतर भारत सरकारने येथील अर्थव्यवस्था विकसित करण्यासाठी प्रयत्न केले.

महाराष्ट्रातील पाच प्रादेशिक विभागापैकी मराठवाडा विभाग औद्योगिक व आर्थिकदृष्टया मागासलेला विभाग म्हणून ओळखला जातो. या विभागातील मागासलेपणा दुर करून त्या विभागाचा विकासातील अनुशेष भरून काढण्यासाठी दि. ३० एप्रिल १९९४ रोजी 'मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची' स्थापना करण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाची कार्यपध्दती व प्रस्तुत संशोधनाशी संबंधीत असलेले शोध निबंध, लेख, प्रबंध, संदर्भ ग्रंथ तसेच प्रादेशिक विषमतेबाबत केंद्र व महाराष्ट्र सरकारची धोरणे, नागपूर करारातील प्रमुख मुद्दे, महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समिती व इतर समित्याचे गठण इ. बाबतीत संदर्भ साहित्याचा आढावा घ्यावयाचा आहे.

## २.२ संशोधनाचा अर्थ :—

संशोधनाला इंग्रजी भाषेमध्ये 'Research' म्हटले जाते. हा इंग्रजी प्रतिशब्द योग्यच आहे. Research म्हणजे पुनः पुनः शोध घेणे होय. संशोधन म्हणजे मानवी ज्ञान मिळविण्यासाठी केले जाणारे पध्दतशीर प्रयत्न होय. संशोधनातील प्रयत्न पध्दतशीर व व्यवस्थित असतात. विशिष्ठ विषयाच्या बाबतीत शास्त्रीय आणि विशेष काळजीपूर्वक शोध घ्यावे लागतात. संशोधन ही एक प्रक्रिया आहे.

### २.२.१ संशोधनाच्या व्याख्या :—

१) जॉन डब्लू वेस्ट :— ''खऱ्या अर्थाने संशोधन म्हणजे वैज्ञानिक पध्दती प्रत्यक्षात कार्यान्वीत करण्याची अधिक नियमबध्द व आकारबध्द सुव्यवस्थित व सखोल अशी प्रक्रिया होय.''[१]

२) मोझर सी. ए. :— ''सामाजिक घटना व सामाजिक समस्यांच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने केलेले क्रमबध्द प्रयत्न होय.''[२]

३) स्लेसिजर व स्टीफेन्सन :— ''संशोधन म्हणजे एखादी गोष्ट चतुराईने सिध्द करण्यासाठी, सर्वसाधारणपणे ती वाढविणे, दुरूस्ती किंवा तपासणी करून जे ज्ञान मिळते ते ज्ञान सिध्दांताच्या बांधणीसाठी आहे की एखाद्या तत्वाची जोपासना आहे.''[३]

४) पियर्सन :— ''तथ्य म्हणजे शास्त्र नव्हे तर तथ्यांना हाताळण्याची पध्दत म्हणजे शास्त्रीय पध्दत आहे. ही पध्दत व्यक्ती निरपेक्ष असते.''[४]

५) क्लिफर्ड वुडी :— ''संशोधनात समस्येची व्याख्या दिलेली असते. त्यात गृहितके असतात आणि उपाय योजनाही असते.''[५]

वरील व्याख्यांवरून असे म्हणता येईल की, संशोधन म्हणजे ज्ञान मिळविणे. सत्य शोधून काढणे यासाठी मानसाची धडपड चालू असते परंतु तर्कशास्त्राच्या तुलनानुसार हे ज्ञान मिळविले पाहिजे. कारण संशोधनाची बैठक ही अधिक तार्किक व वस्तुनिष्ठ असली पाहिजे. अभ्यासासंबंधी शोधलेले पुरावे त्यातील क्रम, त्यांचा संबंध , कार्यकारणभाव इ. लक्षात घेऊन अत्यंत तर्कशुध्द व वस्तुनिष्ठ पध्दतीने ज्या पध्दतीच्या सहाय्याने निष्कर्ष काढले जातात त्या

पध्दतीला वैज्ञानिक अभ्यास पध्दती म्हणतात. वरील व्याख्या लक्षात घेता संशोधन पध्दती ही व्यवस्थितपणे हाती घेतलेली कामगीरी असते. संशोधन म्हणजे ज्ञानाचा शोध आहे.

### २.२.२ संशोधन पध्दतीचे प्रकार :—

**१) ऐतिहासिक पध्दत :—**

''सामाजिक संशोधनाची प्रक्रिया इतिहासाचा आधार घेतल्याशिवाय पूर्ण होत नाही. संशोधनात या पध्दतीचा उपयोग करताना ऐतिहासिक माहिती व साधनांचा जो उपयोग करून घेतला जातो तो फक्त गत काळातील घटना प्रसंगाचे सध्याच्या सामाजिक जिवनावर कोणते परिणाम घडून आले आहेत नि या परिस्थितीत कोणत्या प्रकारची उपाय योजना केली तर सुधारणा होईल या सारख्या बाबींची माहिती करून घेण्यासाठी केला जातो. तथ्ये संकलन करण्याचे हे एक साधन आहे. ही पध्दत द्वितीयक सामुग्रीचे एक साधन असून त्याचा पूर्ण आधार विविध प्रकारची कागदपत्रे नि संशोधनात्मक पुस्तके असतात.''[६]

**२) तुलनात्मक पध्दत :—**

सामाजिक जीवनात या पध्दतीचा उपयोग खूपच प्राचीन काळापासून केला जात आहे. सामाजिक संशोधनात तथ्ये शोधून काढण्यासाठी ज्या विविध प्रकारच्या पध्दतीचा वापर केला जातो तसाच तुलनात्मक पध्दतीचा सुध्दा उपयोग करून घेतला जातो. तुलनात्मक पध्दतीचा आधार तुलना हाच आहे. कोणत्याही एक वा दोन किंवा त्यापेक्षा अधिक घटना प्रसंगाच्या संबंधीत असणाऱ्या तथ्याची तुलना या पध्दतीने केली जाते. तुलनात्मक पध्दती म्हणजे फक्त कोणत्याही बाबीची तुलना करणे नव्हे तर त्यात स्पष्टीकरणांचा अंतर्भाव झालेला असतो. दोन तथ्याची तुलना करणे शक्य नि सोपे असले तरी ही तुलना करताना स्पष्टीकरणाला तुलनात्मक पध्दतीत अधिक महत्व दिले जाते.

**३) सर्वेक्षण पध्दत :—**

तथ्य संकलन करण्यासाठी जसा निरीक्षण, ऐतिहासिक आणि तुलनात्मक पध्दतीचा उपयोग केला जातो तसाच सर्वेक्षण पध्दतीचा सुध्दा उपयोग करून घेतला जातो. सर्वेक्षण पध्दत ही सुध्दा सामाजिक तत्वे शोधून काढण्यासाठी

उपयुक्त आहे. व्यक्तीगत पातळीवरून एकटा संशोधक सुध्दा समाज विषयी माहिती मिळवू शकतो. परंतु त्यासाठी अभ्यास विषय मर्यादित असावा लागतो. एखाद्या प्रश्नासंबंधीची चिकीत्सक पाहणी करणे व त्यासंबंधी सर्व प्रकारची माहिती घेणे म्हणजे सर्वेक्षण पध्दत होय.

मार्क अब्राम यांच्या मते ''समुदायाचे संघटन व क्रिया याबाबत ज्या प्रक्रियेत परिणामात्मक तथ्याची आकडेवारी सामाजिक दृष्टिने संकलन केले जाते, त्या प्रक्रियेला सामाजिक सर्वेक्षण म्हणतात.''[७]

प्रस्तुत संशोधन वर्तमान कालीन समस्येशी निगडीत असल्याने आधार सामुग्री किंवा माहिती संकलनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

### २.२.३ संशोधन कार्याचे उद्देश :—

''संशोधन कार्याचे उद्देश पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) एखाद्या गोष्टी व घटनेबाबत ज्ञान होणे, त्याबाबत नवीन दृष्टी प्राप्त करणे.

२) एखाद्या घटनेबाबत, गटाबाबत, स्थितीबाबत, अथवा व्यक्तीबाबतची वैशिष्टये निश्चितपणे व्यक्त करणे.

३) त्या घटनेचा अन्य बाबीशी कोणता संबंध आहे हे अभ्यासणे.

४) विविध चलामध्ये जो सर्वसाधारणपणे संबंध गृहीत धरला जातो त्याची तपासणी करणे.

५) संशोधनाचे प्रेरणा घटक पुढील प्रमाणे आहेत :—

अ) क्रीयाशील कार्य करून बौध्दीक आनंद मिळविणे.

ब) समस्या निर्मुलनासाठी उपाय सुचविण्यात मदत करणे.

क) समाजोपयोगी काम करून समाजाची सेवा करणे.

ड) पदवी प्राप्त करून ज्ञानात वाढ करणे.''[८]

प्रस्तुत संशोधनाच्या प्रेरणा याच प्रकारच्या आहेत. तसेच वरील संशोधनाच्या उद्देशांपैकी पहिल्या दोन व पाच क्रमांकाच्या उद्देशांना धरून प्रस्तुत अभ्यास केलेला आहे.

## २.३ साहित्याचे सर्वेक्षण :—

महाराष्ट्रराज्याची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्रातील सर्व प्रदेशाचा समतोल विकास झालेला नव्हता. त्यातध्ये मराठवाडा व विदर्भ विभाग खूपच मागासलेला ओता. या विभागाचा अनुशेष भरून काढण्यासाठी दि. ३० एपिल १९९४ रोजी भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७१(२) नुसार मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना झाली. या मंडळा विषयी जास्त लिखाण उपलब्ध नव्हते. विषयाच्या संदर्भातील हे साहित्य सर्वेक्षण, नावाजलेले वर्तमानपत्रे, नियत कालिके, अप्रकाशित प्रबंध, संदर्भ ग्रंथ, चर्चासत्रे, सरकारचे अभ्यास गट, विविध साहित्याचे अहवाल या लेखन साहित्यावर आधारीत आहे.

## २.४ प्रादेशिक असमतोलाचे स्वरूप :—

‘‘प्रादेशिक असमतोल म्हणजे निरनिराळया प्रदेशातील आर्थिक विकासाचा असमतोल होय. ज्या प्रमाणे समाजात व्यक्तिगत उत्पन्नात तफावत असते. व त्यामुळे श्रीमंत व गरीब असे दोन गट निर्माण होतात व परिणामी समाजात आर्थिक विषमता निर्माण होते. त्याच प्रमाणे काही प्रदेश आर्थिक दृष्टया खूप प्रगती करतात व इतर प्रदेश मागास राहतात. व याचा परिणाम म्हणजेच प्रादेशिक असमतोल होय. ज्या प्रदेशात नैसर्गिक साधन संपत्तीचा अभाव व भांडवलशाहीची कमतरता ही प्रादेशिक असमतोल निर्माण होण्याची मूलभूत कारणे होत. कुठल्याही देशातील प्रादेशिक असमतोल योग्य आर्थिक धोरणे आखून कमी करता येतो, पण तो पुर्णपणे दूर करता येत नाही.’’[९]

यशवंतराव चव्हाण यांच्या मते ‘‘विकास विषयक योजना तयार होत असताना अविकसित विभागाचा व प्रदेशाचा अगोदर विचार करण्यात आला पाहिजे तरच देशाचा समतोल विकास होऊ शकतो.’’[१०]

धनंजय रामचंद्र गाडगीळ यांच्या मते ‘‘ विशिष्ठ प्रदेशातील उत्पादन घटकांची उत्पादन क्षमता वाढविण्यास प्रोत्साहन देणे. ज्यांच्या जवळ उत्पादनांची साधने नाहीत किंवा उत्पादनाचे कौशल्य नाही अशासाठी खास योजना व्यापक प्रादेशिक योजनेत समाविष्ठ करणे.’’[११]

१) प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवरही अस्तित्वात आहे. **उदा.—** विकसीत देश अमेरिका, जपान, इंग्लंड, फ्रान्स इ. व अविकसीत देश व विकसनशील देश भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांग्लादेश इ. यांच्या दरडोई उत्पन्नात व राहणीमानात फार मोठा फरक आढळतो. सायमन कुझनेट या अर्थशास्त्रज्ञाने आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रादेशिक असमतोल का निर्माण होतो याचा अभ्यास केला आहे.

२) देशाअंतर्गत प्रादेशिक असमतोल सुध्दा जगातील प्रत्येक देशात आढळतो. अमेरिका, इटली, स्पेन, रशिया, इंग्लंड या देशांत सुध्दा राज्या राज्यात प्रादेशिक असमतोल असून त्या संदर्भातील अनेक अभ्यास प्रसिध्द झाले आहेत. जे.जी. विल्यमस्न यांनी अमेरिकेतील ४८ राज्यात प्रादेशिक असमतोल किती प्रमाणात आहे हे दरडोई उत्पन्नाच्या सहाय्याने स्पष्ट केले आहे. भारतात सुध्दा राज्या राज्यात फार मोठा प्रादेशिक असमतोल असल्याचे अनेक सरकारी अहवाल व अर्थतज्ञांच्या अभ्यासावरून स्पष्ट होते.उदा. — भारतात मागील ५० वर्षांच्या स्वातंत्र्योत्तर काळात, पंजाब, महाराष्ट्र, गुजरात, हरियाणा, तामिळनाडू या राज्यांनी आर्थिक विकासात आघाडी मारली असून बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान या राज्यांचा आर्थिक विकास तुलनेने खालावत आहे. देशपातळीवर आज प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न गंभीर बनला असून मागास राज्यातील जनतेत असंतोष वाढत आहे. या नैराश्यातूनच सध्या उत्तराखंड, झारखंड या राज्याची निर्मिती झाली तर गोरखालॅंड, बोडोलॅंड, तेलंगणा, विदर्भ अशा स्वतंत्र राज्याची मागणी केली जात आहे.

३) प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न फक्त देशपातळीवरच नसून तो राज्यांतर्गत सुध्दा आहे. प्रत्येक राज्याचा कांही भाग फारच विकसित तर कांही प्रदेश फारच अविकसित असल्याचे दिसते. उदा. — उत्तर प्रदेशाचा पूर्वभाग, आंध्रप्रदेशातील तेलंगणा व रायल सीमा भाग तर आपल्या महाराष्ट्रातील मराठवाडा व विदर्भ हे भाग तुलनेने खूप मागास आहेत.

वरील चर्चेवरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे, प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य पातळीवर अस्तित्वात असून हा असमतोल कमी करण्याचे उपाय सर्वच पातळीवर सुरू आहेत.

## २.५ प्रादेशिक विषमतेबाबत केंद्र व महाराष्ट्र सरकारची धोरणे :—

दुसऱ्या महायुध्दानंतर विशेषत: १९६० नंतर जवळ जवळ सर्वच राष्ट्रे आपापल्या मागास विभागांचा विशेष समस्यांकडे लक्ष घालू लागली. १९६५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेने (U .N. .O) प्रादेशिक विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आणि त्यातुन प्रादेशिक विकासाच्या प्रक्रीयेस संस्थात्मक बळ देवून तिची गती वाढविण्याचे प्रयत्न चालू ठेवले. त्यामागे असे गृहित होते की, प्रदेशिक विकासाचा सिध्दांत व अंमलबजावणी या दोन्ही पैलूवर आंतरराष्ट्रीय सहकार्यास आणि अनुभवाच्या देवघेवीस भरपूर वाव आहे.

युनोच्या या कार्यक्रमाच्या संशोधन विभागाने ( United Nations Research Institute for Social Deveplopment Geneva ) अनेक राष्ट्राच्या प्रादेशिक विकासातील अनुभवावर आधारीत असे दहा ग्रंथ (Mouton Regional Planning Series) यांनी प्रसिध्द केले आहेत. भारताच्या प्रादेशिक विकासावरही या संशोधन संस्थेच्या सहकार्याने गेल्या दशकात अनेक परिसंवाद झाले आहेत.

1) Rural Devlopment ,Capitalist and Socialist Paths,by United Nations centre for regional development,five Volumes,concept publishing company, New Delhi,1981 to 1985.

2) Regional Development planning in India a New stragegy,by R.P. Mishra, K.V. Sundram, Vikas publishing House, Delhi.1974

या सारखे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. ज्या अनुशंगाने स्वातंत्र्योत्तर गेल्या पन्नास वर्षातील केंद्रिय धोरणाचे विवेचन भारतीय राज्य घटना, राष्ट्रीय पातळीवरील पंचवार्षिक योजना व औद्योगिक धोरणासंबंधी प्रकाशित वाडम्याच्या आधारावरच करता येईल. घटनेच्या कलम (१४) मध्ये कायदेशीर समानता व समान संरक्षणाची हमी आहे. राज्य घटनेतील या तरतुदी प्रादेशिक विषमतेशी सुध्दा संबंधित आहेत असे समजले जाते परंतु सन १९७८ साली

घटनेच्या ४४ व्या घटना दुरूस्तीने कलम ३८ मध्ये जी दुरूस्ती केली आहे तिच्यामुळे या बाबत संदेह राहिला नाही. कारण कलम ३८(२) मध्ये आता व्यक्ती व्यक्तीतील विषमताच नव्हे तर देशाच्या विविध विभागातून राहणाऱ्या जनसमुदायामध्ये असलेली प्रतिष्ठा, सोयी, सवलती आणि संधीची विषमता देखील नाहीशी करण्यासाठी आणि उत्पन्नातील विषमता कमीत कमी करण्यासाठी तसेच प्रादेशिक असमतोल कमी करण्याचे व मागास विभागांचा मागासपणा दुर करण्याचे केंद्र व राज्य सरकारवर घटनात्मक बंधन आहे. तसे पाहिले तर मागास विभागाचा विकास आणि प्रादेशिक असमतोल कमी करण्याचे उद्यीष्ट राष्ट्रीय नियोजनात अगदी पहिल्या पंचवार्षिक योजनेपासुन सातव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत सातत्याने कायम राहिले आहे. कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष असे त्याचे उल्लेख व विवेचन आहे.

राष्ट्रीय नियोजनाच्या पहिल्या आठरा वर्षात म्हणजे १९५१ ते १९६९ या काळात मागास विभागाच्या विकासाबाबतची जाहिर धोरणे केवळ भाषिक अलंकार आणि सिध्दांताच्या घोषणेपुरतीच राहिली. त्याची अंमलबजावणी झालीच नाही. असे अनेक संशोधकांचे मत आहे.

लोकसभेच्या १९७४—७५ च्या अंदाज समितीने आपल्या ६९ व्या अहवालात खेद व्यक्त करून म्हटले आहे की, स्वातंत्र्योत्तर २७ वर्षानंतर आणि ४ पंचवार्षिक योजनानंतरही देशातील विस्तीर्ण प्रदेश मागासलेलेच राहून गेले आणि तेथील जनता विकासाच्या प्रयत्नांच्या फायद्यापासून सतत वंचित राहिली. आपल्या अहवालात अंदाज समितीने पुढे म्हटले आहे की, नियोजनाच्या तंत्रात सुधारणा केली पाहिजे की, मागास विभागाचा विकास हे नियोजनाचे उद्‌दिष्ट साध्य होईल.

त्यानंतर राष्ट्रिय विकास परिषदेच्या (National Development Council) बैठकीत विविध कार्यक्रमांवर आधारलेले केंद्र सरकारचे अनुदान — सुत्र बदलून त्या ऐवजी गाडगीळ सुत्र म्हणून प्रसिध्द असलेली अनुदानाची नवी पध्दती स्विकारली गेली. डॉ. धनंजय गाडगीळ तेंव्हा नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष होते. नव्या सुत्राप्रमाणे केंद्रीय अनुदान निधी ७० टक्के लोकसंख्येच्या प्रमाणात तर

३० टक्के राज्यांच्या गरजांप्रमाणे देण्याचे ठरले. राष्ट्रिय विकास परिषदेच्या त्याच बैठकीत देशातील औद्योगिक दृष्टया मागास असलेले विभाग निश्चित करण्यासाठी एक अभ्यास गट ''श्री पांडे समिती'' आणि तशा निश्चित केलेल्या मागास विभागासाठी कोणत्या सवलती व आर्थिक विलोभाने (Incenctives) द्यावी ते सुचविण्यासाठी दुसरा अभ्यास गट नेमण्यात आला. तो अभ्यास गट श्री. वांच्छू यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला.

त्या दोन्ही गटांच्या अहवालावर व शिफारशीवर १९६९ च्या राष्ट्रीय विकास परिषदेत विचार झाला आणि देशातील २४७ जिल्हे औद्यागिक दृष्टया मागास म्हणून निश्चित करण्यात आले. त्यात महाराष्ट्रातील १३ तर मराठवाडयातील ५ आताचे ८ जिल्हे म्हणजे मराठवाडयातील सर्व जिल्हे औद्योगिक दृष्टया मागास म्हणून निश्चित करण्यात आले.

वांच्छू समितीच्या शिफारशी प्रमाणे मागास जिल्हयांना गुंतवणूकीवर उत्पन्न कर, कराच्या सवलती, व्याजाच्या दरात सवलती वगैरे प्रलोभणे दिली गेली. त्याशिवाय महाराष्ट्रातील तीन जिल्हे भांडवली अनुदानावर जाहीर झाले. त्यात रत्नागिरी, औरंगाबाद आणि चंद्रपूर भांडवली अनुदानावर जाहीर झाले. प्रारंभी अनुदान १०% व सन १९७३ पासुन १५% त्यानंतर सन १९८३ नंतर सर्वच मराठवाडयातील जिल्हयांना १०% अनुदान देण्याचे धोरण केंद्रिय सरकारने आखले. त्याचाच परिणाम म्हणून मराठवाडयात औरंगाबादचे औद्योगिकीकरण होत गेले.

मागास विभागाच्या विकासासाठी व प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी त्या त्या विभागातील कृषी विकासाकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे हा विचार पहिल्यांदा चौथ्या योजनेतच मांडण्यात आला. त्या अनुशंगानेच चौथ्या योजनेत अवर्षण प्रवण प्रदेशासाठी (Draughtprone Area Programme DPAP) आदिवासी विकासासाठी (Trible Developmant Area Programme) व पर्वतीय प्रदेशासाठी (Hill Area Development programme HADP) हे कार्यक्रम हाती घेतले. त्या काळात बॅकांचे सन १९६९ मध्ये राष्ट्रियीकरण होवून लीड बॅक योजना कार्यान्वीत झाली.

भारताच्या राज्यघटनेतील कलम ३७१(२) हे घटनेच्या (१९) व्या खंडात आहे. त्या खंडाचे शिर्षक 'विशेष तरतुदी' असे आहे. कलम ३७१ चे शिर्षक 'महारष्ट्र व गुजरात राज्यासाठी विशेष तरतुद' असे आहे. पण गेल्या २७ वर्षात राष्ट्रपतीने एकही आदेश काढला नाही. विभागीय विकास मंडळ बनविण्यासाठी राज्यपालास सांगितले नाही की, तांत्रिक व व्यावसायीक शिक्षणाची किंवा नोकऱ्यातून भरतीसाठी पुरेशी संधी विभागा विभागामधून आहेत की कसे याची तपासणी कुठे झाली नाही. श्री मेहतांच्या आमरण उपोषणाच्या पार्श्वभुमीवर गुजरात सरकारने कच्छ विभागासाठी ३७१(२) कलमा प्रमाणे विभागीय विकास मंडळ स्थापनेची तरतुद डिसेंबर १९८० मध्ये केली होती. पण त्याबाबत नंतरच्या काळात गुजरात सरकारचे मत काहिंसे बदलले आहे. हे दि. २४ मार्च १९८३ रोजी गृहखात्याच्या राज्य मत्र्यांनी दिलेल्या उत्तरावरून दिसते.

अशा परिस्थितीत कलम ३७१(२) खाली कायम होणाऱ्या विकास मंडळाच्या संघटनेचा व कार्यक्षेत्राचा विचार कांहिसा अनुमानावर व कांहिसा अशाच परीस्थितीत तेलंगणा विभागासाठी आंध्रप्रदेशात तर एकत्र पंजाब मध्ये पंजाबी व हिंदी या भाषिक विभागासाठी ज्या वेगळया विभागीय समित्या नेमल्या होत्या त्यांचा उल्लेख प्रादेशिक असमतोलावरील केंद्र सरकारच्या धोरणात करता येईल.

## २.६ प्रादेशिक विषमतेबाबत महाराष्ट्र सरकारची धोरणे :—

एका अर्थाने महाराष्ट्र सरकारची मागास विभागाच्या विकासाबाबत किंवा प्रादेशिक विषमतेबाबत धोरणे कशी असावीत हे महाराष्ट्र राज्य निर्माण होण्याच्या सात वर्षे अगोदर म्हणजे सन १९५३ मध्येच ठरले होते. संयुक्त महाराष्ट्रासाठी चळवळ सुरू झाली तेंव्हा मराठी भाषा बोलणारे लोक मुंबई, मध्यप्रदेश व हैद्राबाद अशा तीन राज्यात विखुरलेले होते. मराठी भाषिकांना विकास विषयक न्याय मिळत नव्हता. ती राज्ये सोडून संयुक्त महाराष्ट्रात एकत्र येतील. त्यांचा विकास विषयक न्याय वाटा नाकारला जावू नये अशी सर्वांची भावना झाली.

त्यातून नव्या महाराष्ट्र राज्याची प्रादेशिक विकासविषयक धोरणे कशी असतील ते सांगणारा एक करार २८ सप्टेंबर १९५३ रोजी श्री फैजल अली यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या करारात सामाजिक व राजकीय क्षेत्रातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरीत महाराष्ट्रातील व्यक्ती हजर होत्या. या करारावर मा. शंकरराव चव्हाण, मा. भाऊसाहेब हिरे, मा. गोपाळराव खेडकर, मा. पी. के. देशमुख, मा. शेषेराव वानखेडे, मा. देविदास चव्हाण आणि इतर व्यक्तींचा समावेश होता. या तिन्ही विभागातील जनतेच्या मान्यवर प्रतिनिधींनी आपापसात औपचारीक वाटाघाटी केल्या त्यास **''नागपूर करार''** असे संबोधले गेले.

भारतीय राज्यघटनेतील कलम ३७१(२) हे १९ व्या खंडात आहे. या खंडाचे शिर्षक 'विशेष तरतुद' असे आहे. तसेच विकास निधीची विभागवार वाटणी करण्याची आणि राज्याच्या नोकऱ्यातून भरती करण्याची आणि नागपूर करारातील लोकसंख्येवर आधारीत अशा प्रमाणे अथवा धोरणे बहुमताच्या जोराने बदलली जावू नयेत किंवा राजकीय परीवर्तनाच्या घालमेलीत त्यांची उलथापालथ होत जावू नये. हाच त्या नागपूर कराराचा मूळ गाभा आहे. आणि त्यावर आधारलेले कलम ३७१(२) चे ही तेच मुख्य उद्दिष्ट आहे.

### २.६.१ नागपूर करारातील प्रमुख मुद्दे :—

१) सर्व प्रकारच्या विकासयोजनांच्या आखणीसाठी व प्रशासकीय कार्यवाहिसाठी विदर्भ, मराठवाडा व उर्वरीत महाराष्ट्र हे तीन विभाग आजच्या स्वरूपात कायम राहतील.

२) एक शासन म्हणून महाराष्ट्रराज्य या तीन विभागांकरीता खर्चासाठी नीधीची तरतुद करताना विभागवार लोकसंख्येच्या प्रमाणात ती केली जाईल. तसेच मागास विभागाकडे विशेष लक्ष द्यावे, त्या संबंधीचा अहवाल राज्य विधी मंडळाला सादर करावा.

३) या तीन विभागात :—

अ) मंत्रीमडळाची रचना करताना,

ब) तात्रिंक उच्च किंवा तंत्र प्रशिक्षणाच्या सोयी असलेल्या शिक्षण संस्था,

क) शासकीय सेवेत तसेच शासन नियंत्रित संस्थात सर्व पातळीवर लोकसंख्येच्या प्रमाणात जागा दिल्या जातील.

४) मध्यप्रदेशाची राजधानी असलेल्या नागपूरला यानंतरही विदर्भाच्या लोकांना मिळणारे विविध लाभ पुढेही मिळतील व राज्य विधिमंडळाचे किमान एक अधिवेशन नागपूरला होईल.

५) उच्च न्यायालयाचे एक खंडपीठ कायम स्वरूपी नागपूरला असेल शासकीय न्याय सेवेत व वकीली व्यवसायात व्यक्तींना योग्य प्रकारे व योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व दिले जाईल.

## २.६.२ महाराष्ट्राची तिसरी पंचवार्षिक योजना :—

या योजनेच्या मसुद्यात, महाराष्ट्र राज्याच्या मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या विभागांची, ८ आर्थिक निकष वापरून तुलना केली आहे. त्यात मराठवाडा व विदर्भाचा अनुशेष कमी करण्यासाठी या विभागावर जादा गुंतवणूक करण्याची त्यात शिफारस आहे. या अहवालातील मुख्य आकडेवारी सन १९६० सालची असून ती पुढील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.२.१**

**१९६० मधील महाराष्ट्रातील विभागवार तुलना**

| निकर्ष | मुंबई | पुणे | नागपूर | औरंगाबाद |
|---|---|---|---|---|
| १) दर एकरी कृषि उत्पादन (१९५५ ते ५८ ची सरासरी) | १३० | १११ | १०४ | ७४ |
| २)सिंचनाचे प्रमाण | ४.६ | ९.९ | ५.१ | ३.२ |
| ३) दर १०० चौ. मैलामागे रेल्वेची लांबी मैल | २.६ | २.७ | २.७ | २.२ |
| ४) दर १०० चौ. मैलामागे रस्त्यांची लांबी मैल | ३२.९ | २९.२ | ११.३ | ७.४ |
| ५) दरडोई विजेचा वापर (किवॅ तास) | ३९१ | ११० | १४२ | ३ |
| ६) दर १००० लोकसंख्ये मागे कारखान्यातील कामगारांची संख्या | ७.३ | ८.९ | ७.७ | २.३ |
| ७) दर १००० लोकसंख्ये मागे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या | ११९ | १२४ | ८२ | ५४ |
| ८) दर १००० लोकसंख्येमागे माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या | १२ | १५ | २१ | १२ |

**आधार :—** महाराष्ट्राची तिसरी पंचवार्षिक योजना आराखडा.

वरील तक्ता क्र. २.१ वरून हे स्पष्ट होते, की कृषिउत्पादन, सिंचनाचे प्रमाण, कारखानदारीचे प्रमाण, रस्त्यांची लांबी व शिक्षण या सर्वच क्षेत्रात मराठवाडा व विदर्भ मागे आहेत. वीज वापरात तर मराठवाडा फारच मागे आहे.

## २.६.३ अशोक मिस्त्रा यांचा अभ्यास गट (१९६४) :—

श्री अशोक मिस्त्रा यांनी सन १९६४ साली ''भारतातील प्रादेशिक विकासाचे स्तर'' हा अहवाल प्रसिध्द केला. भारतातील सर्व जिल्ह्यांचे वर्गीकरण चार स्तरात करण्यासाठी त्यांनी ३५ सामाजिक आर्थिक निकषांचा वापर केला. त्यांनी महाराष्ट्रातील २६ जिल्ह्यांचे पुढील चार स्तरात वर्गीकरण केले आहे.

**अ) उच्च स्तर (किंवा ४ था स्तर) :—** १) बृहन्मुंबई, २) ठाणे, ३) नाशिक, ४) धुळे, ५) जळगाव, ६) अहमदनगर, ७) सोलापूर, ८) पुणे, ९) अकोला, १०) अमरावती, ११) नागपूर.

**ब) तिसरा विकास स्तर :—** १२) सातारा, १३) सांगली, १४) औरंगाबाद, १५) नांदेड, १६) बुलढाणा, १७) यवतमाळ, १८) वर्धा.

**क) दुसरा विकास स्तर :—** १९) कुलाबा, (रायगड),२०) कोल्हापूर, २१) परभणी, २२) बीड, २३) उस्मानाबाद, २४ भंडारा, २५) चंद्रपूर.

पहिला विकास स्तर किंवा सर्वात खालचा स्तर २६) रत्नागिरी.

हे स्तर तपासल्यास, उच्चस्तरातील जिल्ह्यांत मराठवाडयाचा एकही जिल्हा नाही हे दिसेल. बहुसंख्य जिल्हे पश्चिम महाराष्ट्रातील आहेत. (८ जिल्हे) बाकी तीन जिल्हे विदर्भाचे आहेत. तिसऱ्या स्तरात मराठवाडयाचे औरंगाबाद व नांदेड हे दोन जिल्हे असून विदर्भाचे तिन व पश्चिम महाराष्ट्राचे दोन जिल्हे आहेत. दुसऱ्या स्तरात मराठवाडयाचे परभणी, बीड, उस्मानाबाद हे जिल्हे असून, पश्चिम महाराष्ट्राचे दोन व विदर्भाचे जिल्हे येतात. पहिल्या स्तरात फक्त रत्नागिरी जिल्ह्याचा समावेश असून, अशोक मिस्त्रा यांच्या अहवालाप्रमाणे, हा जिल्हा सर्वात मागास जिल्हा म्हणावा लागेल.

## २.६.४ पांडे अभ्यास गटाचा अहवाल (१९६८) :—

केंद्रिय नियोजन मंडळाने, श्री पांडे यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील औद्योगिकदृष्टया मागास जिल्ह्यांचा अभ्यास करण्यासाठी एक कमेटी नेमली

होती. औद्योगिक क्षेत्रातील प्रमुख निकष वापरून या कमिटीने महाराष्ट्रातील १३ जिल्हे औद्योगिक दृष्टीने मागास आहेत हे नमूद केले. हे जिल्हे पुढील प्रमाणे आहेत. मराठवाडयातील सर्व ५ जिल्हे, विदर्भातील ४ जिल्हे (बुलढाणा, यवतमाळ, भंडारा व चंद्रपूर); कोकणातील दोन जिल्हे (रत्ननगिरी व रायगड), व पश्चिम महाराष्ट्रातील दोल जिल्हे (धुळे व जळगाव).

पांडे कमिटीचा हा अहवाल व शिफारशी केंद्र सरकारने मान्य करून त्या आधारे महाराष्ट्रातील १३ औद्योगिक दृष्टया मागास जिल्ह्यांना केंद्रीय अनुदाने व प्रोत्साहने देण्यास सुरूवात केली.

### २.६.५ गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे या संस्थेचा अभ्यास (१९७५) :—

सन १९७५ साली पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेने ''प्रादेशिक नियोजन मराठवाडा विभागाचा अभ्यास'' हा अहवाल प्रसिध्द केला. यामध्ये मराठवाडयातील कृषीची सद्यस्थिती, उद्योगक्षेत्राची पिछेहाट, रोजगाराची स्थिती यावर आकडेवारीसह विश्लेषन केले आहे. तसेच मराठवाडयातील कृषी उद्योग व इतर क्षेत्रात कशाप्रकारे नियोजन करून मराठवाडयाचा विकास साधता येईल याचे एक प्रतिमानही दिले आहे. दुर्दैवाने या अभ्यासाने सुचविलेल्या अनेक चांगल्या योजनांची शासनाकडून फारशी अंमलबजावणी होऊ शकली नाही.

## तक्ता क्र.२.२

## १९७१ मधील महाराष्ट्रातील विभागीय आर्थिक स्थिती

| अ. क्र. | निकष | मुंबई शहर | पुणे | मराठवाडा | विदर्भ | मुंबई विभाग शहर वगळून |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | द्वितीयक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे शेकडा प्रमाण (१९७१)... | ३८.८ | २०.८ | ५.६ | १७.२ | १७.६ |
| २ | कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचे शेकडा प्रमाण (१९६९)... | ६६.२ | १३.६ | ०.८ | ५.८ | १३.६ |
| ३ | द्वितीयक क्षेत्रातील उत्पादनाचे योगदान % | ६१.४ | १८.९ | ०.३ | ३.४ | १५.७ |
| ४ | कारखान्यातील मूल्यवृध्दीचे शेकडा प्रमाण (१९६९)... | ६६.४ | १३.४ | ०.१ | २.८ | १७.३ |
| ५ | विजेच्या वापराचे शेकडा प्रमाण | ६९.०० | ६.३ | १.३ | ९.१ | १३.५ |
| ६ | बँकांनी केलेल्या पतपुरवठयाचे शेकडा प्रमाण | ८७.३ | ८.३ | ०.६ | २.१ | १.९ |
| ७ | दर १०० चौ. कि. मागे रस्त्यांची लांबी (१९७०—७१) | — | १९.० | ४.८ | ७.६ | २०.६ |
| ८ | दर लक्ष लोकसंख्येमागे मालवाहू ट्रक्सची संख्या (१९७१) | ४०२ | १३० | ३२ | ४५ | ६९ |
| ९ | स्थूल लागवडीखालील क्षेत्राशी सिंचन क्षेत्राचे प्रमाण % | — | १०.९ | ३.६ | ५.६ | ४.१ |

**संदर्भ :—** Regional planning A case study of Maharashtra Region Gokhale Institute of politics of Economics, 1975, Pune. P. 18.

सन १९७१ मध्ये महाराष्ट्रातील निरनिराळया विभागांची स्थिती कशी होती या संबंधीची आकडेवारी या अभ्यासात दिली आहे. त्यापैकी काही प्रमुख निकष पुढे दिले आहेत. तक्ता क्र. १०.२ वरून, अनेक निकषांत मराठवाडा व विदर्भ विभाग मागास आहेत हे स्पष्ट दिसते. उदा. कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचे शेकडा प्रमाण मराठवाडयात केवळ ०.८ व विदर्भात ५.८ आहे तर पुणे व मुंबई विभागात ते १३.६ आहे. विजेचा वापर, रस्ते, सिंचनााचे प्रमाण, मूल्यवृध्दी या सर्वच निकषावर मराठवाडा खूपच मागे असल्याचे दिसते. या आकडेवारीवरून महाराष्ट्रराज्याचे सन १९७१ सालातील प्रादेशिक असमतोलाचे चित्र स्पष्ट होते यात शंका नाही.

### २.६.६ श्री नरोत्तम शहा यांचा अभ्यास :—

श्री नरोत्तम शहा यसांनी सन १९८१ साली, ''महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे आर्थिक विकासाचे स्तर'' ( Levels of Economics Development in Districts of Maharashtra 1981)'' हा अभ्यास प्रसिध्द केला. कै. श्री नरोत्तम शहा हे ''दांडेकर समितीचे''

(१९८४) तर सदस्य होतेच, शिवाय ते ''राज्य नियोजन मंडळाचेही'' सदस्य होते. श्री. शहा यांनी आपल्या अभ्यासात उत्पादक क्षेत्र व पायाभूत सोयी भारतातील अनेक निकषांचा वापर करून प्रत्येक जिल्ह्यासाठी एक ''संयुक्त निर्देशांक'' तयार केला. त्यांनी आपला निर्देशांक भारतीय पातळीवर १०० गृहीत धरून, तर महाराष्ट्राची सरासरी १६३ गृहीत धरून, राज्यातील २६ जिल्ह्यांचे विकास स्तर निश्चित केले. प्रत्येक जिल्ह्याचे ''संयुक्त निर्देशांक'' पुढील प्रमाणे होते.

१) एकूण भारत = १०० निर्देशांक गृहीत धरून (कंसात संयुक्त निर्देशांक आहेत.) १०० निर्देशांकापेक्षा जास्त जिल्हे.

i) बृहन्मुंबई (११३८); ii) पुणे (२११); iii) ठाणे (१८८); iv) अहमदनगर (१३२); v) नागपूर (११०); vi)कोल्हापूर (१०६); vii) रायगड (कुलाबा) (१०१); viii )जळगाव (१००);

**१०० निर्देशांकापेक्षा कमी जिल्हे :—**

i) सातारा (९३); ii) सोलापूर (९३); iii) सांगली (९३); iv) अमरावती (९३); v) औरंगाबाद (९०); vi) नाशिक (९०); vii) वर्धा (८४); viii) धुळे (७२); ix) बुलढाणा (७२); x) भंडारा (७२); xi) उस्मानाबाद (६५); xii) अकोला (६५); xiii) नांदेड (६३); xiv) यवतमाळ (६२); xv) बीड (६२); xvi) परभणी (६२); xvii) चंद्रपूर (५९); xviii) रत्नागिरी (४७);

( i ) वरील आकडेवारीवरून असे दिसते की, भारतीय विकास पातळीशी तुलना केल्यास, महाराष्ट्रातील २६ जिल्ह्यांपैकी ८ जिल्ह्यांचा संयुक्त निर्देशांक १०० किंवा त्यापेक्षा जास्त असल्यामुळे, त्यांना ''विकसित'' म्हणता येईल. परंतु बाकीच्या १८ जिल्ह्यांचा संयुक्त निर्देशांक १०० पेक्षा कमी आहे. त्यामुळे या जिल्ह्यांना ''कमी विकसित'' ( Less Developed ) म्हणता येईल.

( ii ) विशेष म्हणजे, विकसित जिल्ह्यांत, नागपूर वगळता इतर ७ जिल्हे पश्चिम महाराष्ट्राचे आहेत. याउलट अविकसित जिल्ह्यांत, मराठवाडयाचे सर्व जिल्हे, विदर्भाचे ७ जिल्हे व पश्चिम महाराष्ट्राचे ६ जिल्हे आहेत.

(iii) महाराष्ट्राचा १६३ चा सरासरी निर्देशांक गृहीत धरल्यास, २६ पैकी फक्त तीनच जिल्हे (मुंबई, पुणे, व ठाणे) विकसित व बाकीचे २३ अविकसित गणले जातील.

**विकासातील तफावत :—**

कमाल विकसित जिल्हा (मुंबई) व किमान विकसित जिल्हा (रत्नागिरी) यांच्यातील निर्देशांकाची तफावत ११३८/४७ = २४.२ पट आहे.

मुंबई वगळून जर आपण पुण्याशी तुलना केली तर ही तफावत २११/४७ = ४.५ पट येते. या उदाहरणावरूनही आपणास महाराष्ट्रातील जिल्ह्या — जिल्ह्यातील विकासाचा असमतोल लक्षात येतो.

## २.६.७ दांडेकर समितीचा अहवाल :—

''महाराष्ट्रातील विभागीय असमतोल, सत्यशोधन समितीचा अहवाल'' एप्रिल १९८४ साली प्रसिध्द झाला. या समितीच्या अध्यक्ष पदी सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ प्रा. वि. म. दांडेकर यांची नियुक्ती करण्यात आली. त्यामुळेच हा अहवाल ''दांडेकर समितीचा अहवाल'' म्हणून जनतेला प्रचिलीत आहे. महाराष्ट्रातील विदर्भ, कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील आर्थिक विकासात फार मोठी तफावत आहे अशी सामान्य जनतेची भावना झाल्यामुळे व त्याचप्रमाणे, विधान सभेतही अनेक नेत्यांनी ही भावना व्यक्त केल्यामुळे, महाराष्ट्र शासनाने दि. ३ ऑगस्ट १९८३ रोजी वरील सत्यशोधन समितीची स्थापना केली.

**अ) समितीची कार्यकक्षा (Term of Reference) :**

या समितीला पुढील विषयाची कार्यकक्षा देण्यात आली.

१) विभागीय विकासाचा असमतोल काढण्यासाठी निर्देशांक निश्चित करणे.

२) अ) वरील निर्देशांकाच्या साह्याने व महाराष्ट्र राज्याचा सरासरी विकास लक्षात घेऊन सन १९६० ते अद्यावत आकडेवारी ज्या वर्षापर्यंत मिळेल, त्या कालखंडात, जिल्ह्या—जिल्ह्यातील असमतोल काढणे.

ब) सन १९६० ते ज्या वर्षीची अद्यावत आकडेवारी मिळेल त्या कालखंडात जिल्हा निहाय खर्च कसा झाला व विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी कशी झाली याविषयी माहिती घेणे.

क) राज्य व केंद्र सरकारे व त्यांच्या अखत्यारीतील संस्थांनी दिलेल्या साहाय्याचा आढावा घेणे.

३) वरील निर्देशित निर्देशांकाच्या संदर्भात शासन कितपत अंमलबजावणी करू शकते व ठरविणे.

४) सद्य स्थितीतील विभागीय असमतोल दूर करण्यासाठी शासनास उपाय योजना सुचविणे आणि असा असमतोल पुन: निर्माण होऊ नये म्हणून दीर्घकालीन उपाय सुचविणे.

वरील विषयापैकी ४ था विषय अतिशय महत्वाचा आहे हे सहज लक्षात येईल.

**ब) आर्थिक क्षेत्रे व निर्देशांकांची निवड :—**

दांडेकर समितीने विकासाचा अनुशेष काढण्यासाठी ९ प्रमुख अशा आर्थिक क्षेत्रांची निकड केली. ही क्षेत्रे पुढील प्रमाणे होती.

१) रस्ते, २) सिंचन, ३) ग्रामीण विद्युतीकरण, ४) सर्वसाधारण शिक्षण, ५) तांत्रिक शिक्षण, ६) सार्वजनिक आरोग्य, ७) पिण्याचे पाणी पुरवठा, ८) भूविकास व मृदसंधारण, आणि पशुसंवर्धन. प्रत्येक क्षेत्रात उपक्षेत्रांचीही निवड करण्यात आली. उदा. : रस्ते या क्षेत्रात, राष्ट्रीय महामार्ग, राज्यमहामार्ग, जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते असे उपविभाग पाडण्यात आले. ९ क्षेत्रांची अशा उपविभागांची एकूण संख्या ३० आहे.

प्रत्येक क्षेत्रात व उप क्षेत्रात निर्देशांकांची निवड करण्यासाठी प्रामुख्याने लोकसंख्या व ''भौगोलिक क्षेत्र'' हे दोन प्रमुख घटक निवडण्यात आले व त्या आधारे निर्देशांकची निवड करण्यात आली. उदा. : शिक्षण क्षेत्रात, तुलना करण्यासाठी ''दर लक्ष लोकसंख्येमागे प्राथमिक शाळांची संख्या'' हा निर्देशांक घेण्यात आला. किंवा रस्ते क्षेत्रात, ''दर १०० चौ.कि.मी.'' क्षेत्रफळांत रस्त्यांची लांबी'' हा निर्देशांक उपयुक्त ठरला. अशाप्रकारे प्रत्येक क्षेत्रात व उपक्षेत्रासाठी निर्देशांकांची निवड समितीने केली.

**क) अनुशेष काढण्याची पध्दत :—**

i) दांडेकर समितीने वरील ९ क्षेत्रांचा जिल्हावर अनुशेष काढण्यासाठी जिल्हा हा घटक (Unit) धरला आहे. याला फक्त सिंचन क्षेत्र मात्र अपवाद केले व सिंचनाचा अनुशेष काढण्यासाठी ''तालुका'' हा घटक धरण्यात आला. यासाठी फक्त दुष्काळग्रस्त तालुकेच निवडण्यात आले. ii) अनुशेष काढताना प्रत्येक क्षेत्रात राज्याची सरासरी काढून नंतर प्रत्येक जिल्ह्याची त्या क्षेत्राची सरासरी काढण्यात आली. जे जिल्हे राज्य सरासरीपेक्षा कमी असतील अशा जिल्ह्यांनाच अनुशेष देण्यात आला. राज्य सरासरीच्या वर असणाऱ्या जिल्ह्यांना अनुशेषातून वगळण्यात आले. **उदा.:—** सन १९८२ साली राज्याची सिंचनाची सरासरी २२.५५% होती. (Standard Rabi Equivalent) त्यावेळी उस्मानाबाद जिल्ह्याचे प्रमाण १०.२९% म्हणजे, राज्य सरासरीच्या खाली होते. साहजिकच उस्मानाबाद जिल्ह्याला राज्य सरासरीपर्यंत आणावे लागेल. किंवा (२२.५५—१०.२९) = ११.२६% जादा जमीन उस्मानाबाद जिल्ह्यात पाण्याखाली आणावी लागेल. उस्मानाबाद जिल्ह्याचे नक्त लागवडीखालील क्षेत्रफळ १११५ हजार हेक्टर असून त्याचा २२.५५% क्षेत्र म्हणजे २५१.४३ हजार हेक्टर सिंचनासाठी यावयास हवे. परंतु प्रत्यक्षात उस्मानाबाद जिल्ह्याचे सिंचन क्षेत्र फक्त ११४.७८ हजार हेक्टर (१०.२९%) आहे. या दोहोतील फरक (२५१.४३—११४.७८) = १३६.५५ हजार हेक्टर येतो. हाच (१३६.६५ हजार हेक्टर) उस्मानाबाद जिल्ह्याचा सिंचन क्षेत्राचा अनुशेष होय. एवढी अधिक जमीन सिंचनाखाली आल्यास, उस्मानाबाद जिल्ह्याची सिंचन क्षेत्राची सरासरी राज्य सरकारी म्हणजे २२.५५% होते.

याच पध्दतीने समितीने इतर आर्थिक क्षेत्राचा अनुशेष काढला आहे. जे जिल्हे २२.५५% पेक्षा वर असतील (उदा. परभणी ३४.३९%) कोल्हापूर (६०.८२%) वगैरे जिल्ह्यांना अनुशेष मिळाला नाही.

iii) अनुशेष काढताना प्रथम तो वास्तव रूपात (Physical terms) काढण्यात आला. उदा. हेक्टर मध्ये सिंचन क्षेत्र, रस्त्यांची लांबी कि.मी., मध्ये तर शिक्षकांची संख्या, ग्रामीण रूग्णालयांची संख्या, वगैरे.

iv) या वास्तवरूपी अनुशेषाचे पैशांच्या रूपात चालू किंमतीला (१९८२) रूपांतर करण्यात आले. उदा. उस्मानाबाद जिल्ह्याचा सिंचनाचा वास्तवरूपी अनुशेष १३६.५५ हजार हेक्टर आहे. १ हेक्टर जमीन पाण्याखाली आणण्यासाठी १० हजार रूपये खर्च येतो, म्हणून १३६.५५ हजार हेक्टर पाण्याखाली आणण्यासाठी १२६.५५ X १० = १३६.५५ कोटी रूपये खर्च येईल. हाच उस्मानाबाद जिल्ह्याचा सिंचनाचा पैशाच्या रूपातील अनुशेष ( Financial Backlog ) होय.

iv) अनुशेष काढताना समितीने फक्त शासकीय खर्च व शासन सहाय्य असलेल्या कार्यक्रम/प्रकल्पांचाच समावेश केला. खजगी क्षेत्राला त्यातून पूर्णपणे वगळण्यात आले. उदा. खाजगी विहिरींचे सिंचन, पूर्ण खाजगी शाळा, खाजगी दवाखाने, खाजगी उद्योग विश्लेषणातून पूर्णपणे वगळले. याचा अर्थ राज्याची व जिल्ह्यांची सरासरी काढताना फक्त शासन व शासन सहाय्यित संस्था व प्रकल्पांचा समावेश करण्यात आला.

**ड) विभागवार अनुशेष :—**

आता आपण विभागवार अनुशेष कसा व किती निघाला हे पाहू. प्रथम ९ क्षेत्रांचा प्रत्येक जिल्ह्याच्या अनुशेषाची बेरीज करण्यात आली. उदा. उस्मानाबाद जिल्ह्याचा ९ क्षेत्रांचा एकूण अनुशेष २०४८५.५७ लक्ष रूपये (किंवा साधारण २०५ कोटी रूपये) काढण्यात आला.

विभागीय अनुशेष काढण्यासाठी त्या विभागातील जिल्ह्यांच्या अनुशेषाची बेरीज करण्यात आली. उदा. मराठवाडयातील ५ जिल्ह्यांचा (आताचे ७ जिल्हे) अनुशेष पुढील प्रमाणे होता. औरंबाबाद (१३२८८.८०) लक्ष रू.,+ परभणी (१७४८३.५०) लक्ष रू.,+ बीड (१५८०८.९१)लक्ष रू.,+ नांदेड (८०१८.९६) लक्ष रू.,उस्मानाबाद (२०४८५.५७) लक्ष रू. एकूण मराठवाडा (७५०८५.७४) लक्ष रू.

महाराष्ट्रातील सर्व विभागांचा अनुशेष पुढील तक्त्यात दाखविला आहे.

**तक्ता क्र.२.३**

**महाराष्ट्र राज्याचा विभागवार विकास अनुशेष (रूपये लाखात)**

| अ. क्र. | विभाग | अनुशेष | एकूण % शी प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बृहनमुंबई | ९७०.५५ | ०.३० |
| २ | कोकण ( मुंबई वगळून ) | २९५६१.९१ | ९.२८ |
| ३ | पश्चिम महाराष्ट्र | ८८४०५.१० | २७.७४ |
| ४ | मराठवाडा | ७५०८५.७४ | २३.५६ |
| ५ | विदर्भ | १२४६५४.५१ | ३९.१२ |
| | महाराष्ट्र | ३१८६७७.८१ | १००.०० |

**आधार :—** दांडेकर समितीचा अहवाल पृष्ठ क्र.४५१.

वरील तक्ता क्र. २.३ प्रमाणे सर्वाधीक विकासाचा अनुशेष १२४६.५४ कोटी रूपये (किंवा ३९.१२%), विदर्भ विभागाचा आहे, तर दुसरा क्रमांक (२७.७४%), पश्चिम महाराष्ट्राचा आहे. तिसरा क्रमांक मराठवाडा (२३.५६%), चौथा क्रमांक (९.२८%), कोकण विभागाचा तर मुंबई शहराचा अनुशेष सर्वात कमी म्हणजे ०.३ (९.७० कोटी रू.) आहे.

**इ) दांडेकर समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी**

सुरूवातीलाच हे स्पष्ट केले पाहिजे की दांडेकर समितीचा अहवाल अजूनही महाराष्ट्र शासनाने अधिकृतपणे स्वीकारलेला नाही. तरीसुध्दा दांडेकर समितीने काढलेल्या विभागावर/जिल्हावार अनुशेष काढण्यासाठी शासन दरवर्षी काही रक्कम 'अनुशेष खर्च' म्हणून वेगळा खर्च करतो. समितीने काढलेला एकूण ३२०० कोटी रूपयांचा अनुशेष ७ व्या योजना काळात पूर्ण करावा असे सुचविले होते. परंतु पैशाच्या अभावी शासन ८ व्या योजनेच्या शेवटीसुध्दा वरील अनुशेष पूर्ण करू शकले नाही. आता ९ व्या पंचवार्षिक योजनेत (१९९७—२००२) राहिलेला अनुशेष दूर होईल असे प्रतिपादन केले जाते.

दांडेकर समितीने काढलेला अनुशेष फार मोठा म्हणजे साधारण ३२०० कोटी रूपये असल्यामुळे तो ५ वर्षात पूर्ण करणे शासनास शक्य नव्हते. दुसरे कारण म्हणजे, दरवर्षी अनुशेष काढण्यासाठी दिली जाणारी रक्कम फारच अल्प होती. उदा.सन १९८५—८६मध्ये २२०कोटी, १९८६—८७मध्ये २५०कोटी रू.,

१९८७—८८मध्ये३००कोटीरू.,१९८८—८९मध्ये ४००कोटी रू. १९८९—९०मध्ये ५०० कोटी रू., १९९०—९१मध्ये ४५०कोटी, सन १९९१—९२मध्ये ४८५कोटी रू. तर १९९२—९३मध्ये ४९८कोटी असे एकूण ३०८३ कोटी रूपये, शासनाने मंजूर केले. परंतु या ८ वर्षाच्या काळात भाव—वाढ झाल्यामुळे वास्तवरूपी अनुशेष मात्र ५०% भरून निघाला. त्यामुळे शासनाला बाकी राहिलेल्या कामाचे चालू किमतीला पुर्नमूल्यांकन करावे लागले. हे मुल्यांकन दि. १ एप्रिल १९९३ रोजी करण्यात येऊन बाकी राहिलेल्या कामांचे मुल्य पैशांच्या रूपात ३२६१ कोटी रूपये झाले आता हा पुर्नमूल्यांकित अनुशेष कमी करण्याचे कार्य शासनातर्फे चालू आहे.

### २.६.८ सिताप्रभू व पी. सी. सरकार (१९९२) :—

अलिकडेच श्रीमती सीताप्रभू व पी. सी. सरकार यांनी ''महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे विकास स्तर'' हा लेख प्रसिध्द केला. (इकॉनॉमिक ॲण्ड पोलिटिकल विकली, मुंबई, ५ सप्टेंबर १९९२) लेखकद्वयांनी महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे विकासस्तर निश्चित करण्यासाठी एकूण २० निकषांचा वापर केला. यात कृषी, उद्योग, पायाभूत सोयी, सामाजिक सुविधा इ. प्रमुख क्षेत्रांचा समावेश करण्यात आला. विकासाचे स्तर ठरविण्यासाठी पुढील तीन सांख्यिकीय पध्दतींचा वापर करण्यात आला. i) क्रमवारी पध्दती (Ranking Method), ii) निर्देशांक पध्दती (Index Method), iii) प्रमुख गुण विश्लेशन पध्दती (Principle component Analysis).

या तीन पध्दतीच्या सहाय्याने वरील लेखकांनी महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे विकासस्तर पुढील प्रमाणे निश्चित केले आहेत. त्यांनी वापरलेली आकडेवारी सन १९८५—८६ या वर्षाची आहे.

**१) उच्च विकास स्तराचे जिल्हे :—** (११ जिल्हे मुंबई वगळून), i) ठाणे, ii) नाशिक, iii) जळगाव, iv) अहमदनगर, v) पुणे, vi) सातारा, vii) सांगली, viii) कोल्हापूर, ix) औरंगाबाद, x) अमरावती, व xi) नागपूर.

**२) मध्यम विकास स्तराचे जिल्हे :—** (३) जिल्हे. i) रायगड, ii) सोलापूर, व

iii) वर्धा.

**३) अविकसित स्तराचे जिल्हे :—** (१५) जिल्हे. i) रत्नागिरी, ii) सिंधुदुर्ग, iii) धुळे, iv) जालना, v) बीड, vi) उस्मानाबाद, vii) लातूर, viii) परभणी, ix) नांदेड, x) बुलढाणा, xi) अकोला, xii) यवतमाळ, xiii) भंडारा, xiv) चंद्रपूर, व xv) गडचिरोली.

वरील अभ्यासावरून निष्कर्ष काढता येतील. उच्च विकास स्तरात प. महाराष्ट्राचे ८ जिल्हे तर मराठवाडयाचा फक्त १ व विदर्भाचे २ जिल्हे आहेत. दुसरे अविकसित जिल्ह्यात, मराठवाडयाचे ६ जिल्हे, विदर्भाचे ६ तर, प. महाराष्ट्राचे फक्त ३ जिल्हे आहेत. वरील प्रमाणे लेखकांनी अशा विभागीय असमतोलाबद्दल चिंता व्यक्त केली असून असमतोल दूर करण्याचे उपाय त्वरीत योजावेत असे म्हटले आहे.

**२.६.९ राज्यनियोजन मंडळाचा अभ्यास गट (१९९३) :—**

डिसेंबर १९९१ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या नियोजन मंडळाने, ''महाराष्ट्रातील मागास भागांचा विकास'' या संदर्भात श्री भुजंगराव कुलकर्णी, सदस्य राज्य नियोजन मंडळ, यांच्या अध्यक्षतेखाली एका अभ्यास गटाची नियुक्ती केली. या अभ्यास गटाचा अहवाल जून १९९३ मध्ये शासनास सादर करण्यात आला. दांडेकर समितीने महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे ''प्रगत'' आणि ''मागास किंवा अविकसित'' असे वर्गीकरण करण्याचे टाळले, पण तेच काम या अभ्यास गटाने केले हे विशेष म्हणावे लागेल. त्यामुळे या अहवालातील शिफारशी मागास जिल्ह्यांच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत.

या अभ्यास गटाने मागास जिल्ह्यांचे स्तर ठरविण्यासाठी १२ प्रमुख निकषांचा वापर केला आहे, त्यापैकी ५ निकष आर्थिक क्षेत्रातील; ५ निकष सामाजिक क्षेत्रातील तर बाकीचे दोन निकष पायाभूत सोयीसंबंधी आहेत. विकासाचा स्तर ठरविण्यासाठी अभ्यास गटाने तीन पध्दतींचा वापर केला आहे. i) क्रमवारी पध्दती, ii) निर्देशांक पध्दती, iii) प्रमुख गुणांक पध्दती.

अभ्यास गटाने वरील पध्दतीने महाराष्ट्रातील १७ जिल्हे मागास आहेत असे म्हटले आहे. विभागवार हे १७ जिल्हे पुढील प्रमाणे आहेत.

i) कोकण : १)रत्नागिरी (२०१),२) सिंधुदुर्ग (१६८)

ii) पश्चिम महाराष्ट्र : १) धुळे (२३२)

iii) मराठवाडा : १) जालना (२६०), २) परभणी (२१२), ३) बीड (२१९), ४) उस्मानाबाद (१९३), ५) लातूर (२४१), ६) नांदेड (२०५).

iv) विदर्भ :— १) बुलढाणा (२४१), २) अकोला (२१४), ३) अमरावती (२१४), ४) भंडारा (१९३), ५) गडचिरोली (२७४), ६) वर्धा (१८२), ७) चंद्रपूर (१९१), ८) यवतमाळ (२६१).

कंसातील आकडे प्रत्येक जिल्ह्याचे निर्देशांक असून जेवढा निर्देशांक मोठा तेवढा तो जिल्हा मागास समजावा. उदा. गडचिरोली जिल्ह्याचा निर्देशांक सर्वाधीक म्हणजे २७४ आहे, याचा अर्थ वरील १७ मागास जिल्ह्यात गडचिरोली सर्वात मागास जिल्हा आहे. याउलट सर्वात कमी निर्देशांक वर्धा जिल्ह्याचा १८२ आहे. निर्देशांकामुळे आपणास प्रत्येक जिल्ह्याचा तुलनात्मक विकास कसा झाला हे कळते.

या अभ्यास गटाच्या निष्कर्षाप्रमाणे, १७ मागास जिल्ह्यांपैकी, कोकणातील २, पश्चिम महाराष्ट्रातील १, मराठवाडयातील ६ व विदर्भातील ८ जिल्हे येतात. या अभ्यास गटाने या १७ जिल्ह्यांची विकासाची बलस्थाने कोणती व कमजोर बलस्थाने कोणती यांचा अभ्यास करून जिल्हावर विश्लेषण केले आहे. अविकसित जिल्ह्यांना अधिक वित्तीय सहाय्य मिळण्यासाठी या समितीने अनेक मौल्यवान शिफारशी केल्या आहेत. शासनाने या शिफारशींवर विचार करून निदान काही प्रमुख शिफारशींवर अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

### २.६.१० निर्देशांक व अनुशेष समितीचा अहवाल (१९९७) :—

दांडेकर समितीचा अहवाल सन १९८४ साली प्रसिध्द झाला. या समितीच्या शिफारशींचा मुख्य उद्देश महाराष्ट्रातील विभागीय असमतोल दूर करणे हा तर होताच, याशिवाय अशा प्रकारचा असमतोल पुन: निर्माण होऊ नये असे धोरण सरकारने आखावे हा सुध्दा होता. सन १९८४ ते १९९४ या दहा वर्षाच्या काळात, राज्य सरकारने, दांडेकर समितीने काढलेला विभागीय असमतोल कमी करण्यासाठी, दर वर्षी आपल्या अंदाज पत्रकात व वार्षिक

नियोजनात काही रकमेची तरतूद करण्यास सुरूवात केली. अजूनही हा अनुशेष पूर्णपणे भरून निघालेला नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. या प्रकारच्या धोरणामुळे, किती अनुशेष भरून निघाला ? विभागीय असमतोल किती कमी झाला ? किंवा अधिक वाढला ?  हे महत्वाचे प्रश्न उद्‌भवतात. मराठवाडा, विदर्भ व कोकणा सारख्या मागास जनतेला हा प्रश्न महत्वाचा वाटणे साहजिक आहे. त्यामुळे अनेक तज्ञांनी व राजकीय पुढाऱ्यांनी दांडेकर समिती प्रमाणेच आणखी एका समितीची स्थापना करून, दांडेकर समितीच्या शिफारशीचा काय परिणाम झाला हे शोधण्याची मागणी केली. महाराष्ट्राच्या राज्यपालांनी सन १९९४ मध्ये या कामासाठी ‘‘निर्देशांक व अनुशेष समितीची’’ स्थापना केली. या समितीचे अध्यक्ष पद तीन वैधानिक विकास मंडळाच्या अध्यक्षांकडे असून, या मंडळांवर तीनही मंडळांचे प्रत्येकी दोन तज्ञ सदस्य, विभागातील आमदार व दोन मंडळाबाहेरील तज्ञ सदस्य आहेत. या समितीने आपला अहवाल जुलै १९९७ मध्ये राज्यपालांना सादर केला आहे.

### २.६.११ प्रा. राधाकृष्ण :—

‘‘जुलै २००७ मध्ये भारत सरकारने देशातील कर्जबाजारी शेतकऱ्यांचा अभ्यास करण्यासाठी प्रा. राधाकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीच्या अहवालानुसार देशातील १०० जिल्हे कृषि क्षेत्रात मागासलेले आढळून आले. त्यापैकी ११ जिल्हे महाराष्ट्रात असून ज्यामध्ये विदर्भात सर्वाधीक शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या घटना घडल्या आणि मराठवाडयातील उस्मानाबाद आणि नांदेड हे दोन जिल्हे आहेत.’’[१२]

### २.६.१२ सुर्यनारायन एम.एच. (२००९):—

‘‘श्री सुर्यनारायन एम.एच. यांनी सन २००९ मध्ये सादर केलेल्या संशोधन पत्रिकेत असे दिसून आले की, महाराष्ट्रातील चार नागरी जिल्हे यात मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक यांचा राज्याच्या एकूण उत्पन्नातील अर्धा वाटा आहे, तर उरलेला अर्धा वाटा इतर ३१ जिल्ह्यांचा आहे. जवळजवळ ग्रामीण लोकसंख्येच्या निम्मी लोकसंख्या अंतर्गत भागात येते. त्यामुळे सर्व व्यापक प्रयत्न करण्यामध्ये अडचणी निर्माण होतात.’’[१३]

### २.६.१३ डॉ. विजय केळकर समिती :—

"महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दि. २७.५.२००० तसेच दि. १९.३.२०१० च्या निर्देशामध्ये अनुशेष आणि खर्चाचे समान वितरणाच्या नव्या दृष्टीने विचार करून साधन संपत्तीचे समन्यायतेने नियत वाटप होइल याची खात्री करून देणारे पर्यायी मार्ग शोधणे अत्यावश्यक आहे, म्हणून तीनही प्रदेशातील विविध क्षेत्रातील विद्यमान स्थिती लक्षात घेऊन त्यांच्या समस्या लक्षात घेण्यासाठी आणि सर्व संबंधीतांची मते विचारात घेऊन संतुलित प्रादेशिक विकासाच्या मुद्यावर लक्ष देण्यासाठी आणि खर्चाच्या समान न्याय वाटपासाठी समुचित नियत वाटपांची तत्वे सुचित करण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार राज्य मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार महाराट्र शासनाने डॉ. विजय केळकर, १३ व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली केळकर समितीची नियुक्ती केली."[१४]

या उच्चस्तरीय समितीने त्यांचा अहवाल एक वर्षात मा. राज्यपाल महोदयांना सादर करावयाचा होता परंतुया समितीने आपला अहवाल सादर केलेला नाही.

## २.७ संशोधन साहित्याचे पुनवरालोकन :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना, त्याचे कार्य, समस्या व उपाय या विषयी निरनिराळया वर्तमान पत्रातील बातम्या, मासिके, संशोधन लेख यांचा समावेश संशोधन साहित्याच्या पुनरावलोकन मध्ये केला आहे ते खालील प्रमाणे केला आहे.

### १) कै. यशवंतराव चव्हाण :—

द्वैभाषिक मुंबई राज्याची विभागणी करून महाराष्ट्र व गुजरात ही दोन नवीन राज्ये १९६० मध्ये निर्माण करण्यासाठी घटना दुरूस्तीचे विधेयक विधी मंडळापुढे सादर करताना त्या वेळेचे मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी विदर्भ व मराठवाडा या विभागांना कांही निश्चित आश्वासने देणारे खालील निवेदन सभागृहात केले.

''आपले वैद्य हित संबंध जपले जणार नाहीत अशी भीती विदर्भाच्या लोकांनी बाळगण्याचे कोणतेही कारण नाही, असे मी त्यांना आश्वासन देऊ इच्छितो. किंबहुना त्यांच्या हितसंबंधाचे आग्रहपूर्वक रक्षण केले जाईल आणि त्यांची जपणूक हे भावी महाराष्ट्र शासन आपले एक पवित्र कर्तव्य मानील असे अभिवाचन मी विदर्भातील लोकांना देतो. 'नागपूर करार' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या करारातील शर्तीचे पूर्णतया पालन केले जाईल. इतकेच नाही तर शक्य असेल तेथे राहूनही अधिक झुकते माप त्यांच्या पदरात टाकले जाईल.''

''नागपूर करार केवळ विदर्भापूरताच नसून मराठवाडयालाही त्यातील मुख्य तरतूदी लागू आहेत. याची सभागृहाला कदाचीत जणीव नसेल, नागपूर करारातील ज्या तरतूदी मराठवाडयाला उद्देशून आहेत त्या सर्व शर्तीचे देखील पूर्णतया पालन केले जाईल, असे निवेदन मी करू इश्चितो. राज्याच्या विषयी आत्ताच मी वाचून दाखविलेले धोरण विषेयक निवेदन सभागृहाच्या कामकाजाचा एक भाग म्हणून मी औपचारीकरीत्या सादर करीत आहे. महाराष्ट्रातील दुष्काळी विभाग व कोकणचे जिल्हे यांचा नियोजनबध्द विकास होण्याची गरज आहे. या गोष्टीवरही भर देण्यासाठी मी या संधीचा लाभ घेतला आहे.''

या संदर्भातील घटनेतील ३७१ व्या कलमा कडे सभागृहाचे लक्ष मी वेधू इछितो. मुंबई व इतर कांही राज्यांसाठी या कलमामध्ये विशेष तरतूद केलेली आहे. प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र, विकास मंडळे, विकास योजनेसाठी समप्रमाणात निधीची तरतूद, धंदेवाईक व उच्चतांत्रिक शिक्षणासाठी समप्रमाणात पर्याप्त व्यवस्था, राज्याशासनाच्या अखत्यारीतील सेवामध्ये नोकऱ्यांच्या पर्याप्त संधी याची तरतूद या कलमान्वये केलेली आहे. या कलमाद्वारे दिलेले संरक्षण नव्या महाराष्ट्र राज्यातही चालू राहील.''[१५]

**२) डॉ. र. पु. कुरूलकर :—**

''लोकशाही विधीमंडळाद्वारे मागास भागाचा विकास होऊ शकेल असा आपला विश्वास होता. परंतु मागील ३० वर्षाचा अनुभव ध्यानात घेता या विश्वासास तडा गेला असून त्यातूनच कलम ३७१(२) तहत विभागीय विकास

मंडळे स्थापन करण्याची मागणी आज पुढे आली आहे. या विभागीय विकास मंडळाचे स्वरूप कसे असावे या संबंधी अतिशय समर्पक विवेचन दांडेकर समितीचे एक सदस्य श्री भुजंगराव कुलकर्णी यांनी दांडेकर अहवालास जोडलेल्या भिन्न मत पत्रिकेत केले आहे. कलम ३७१(२) खाली राष्ट्रपती ही स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करण्याची विशेष जबाबदारी राज्यपालावर सोपवतील, विशेष जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या संदर्भात राज्यपाल मंत्रीमंडळाच्या सल्याने बांधला जाणार नाही. तर तो स्वत:च्या विवेकानुसार निर्णय घेईल. कलम ३७१(२) मध्ये कल्पिलेली विकास मंडळे ही सामान्य प्रकारची नियोजन व कार्यकारी प्राधीकरणे नसून i) विकास निधीचे समन्यायी वाटप, ii) तांत्रिक शिक्षण व व्यवसायीक प्रशिक्षण यासाठी पर्याप्त संधी उपलब्ध करून देणारी समन्यायी व्यवस्था, iii) राज्यशासनाच्या नियंत्रणाखालील सेवामध्ये नोकऱ्यांची पर्याप्त प्रमाणात संधी या तीन प्रमुख मुद्दयांच्या संदर्भात राज्यपालांवर असलेलया विशेष जबाबदाऱ्या पार पाडण्यात त्यांना साहाय्य करणारी यंत्रणा. अशी या विकास मंडळाची संकल्पना आहे. त्यामुळे शासनाने आपल्या प्रस्तावाचा पुनर्विचार करून, घटनेच्या कलम ३७१(२) कलमाने अभिप्रेत असलेल्या विभागीय विकास मंडळाची स्थापना करावी असे आग्रहाने सुचवावेसे वाटते.''[१६]

**३) श्री भुजंगराव कुलकर्णी :—**

''समन्यायी (Equitable) हा शब्द भारतीय संविधानाच्या कलम ३७१(२) (ब) मध्ये विकास खर्चासाठी करावयाच्या निधीच्या विभागणी (Allocation of funds) साठी आला आहे. या शब्द योजनेवरील विस्तृत भाष्य व त्याबाबत अनुशेष समिती व वैधानिक विकास मंडळांनी केलेल्या शिफारशीचे विवेचन झालेले आहे. नागपूर कराराप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात विभागणी होईल असे मानता येईल पण अनुशेषाच्या रकमांची विभागणी अनुशेषांच्या प्रमाणात म्हणजे जेथे गरज जास्त तिथे त्यामानाने जास्तीची वाटणी असे सूत्र अनुशेष समितीने व मराठवाडा व विदर्भाच्या वैधानिक विकास मंडळांने मांडले आहे. एखदी माता आपल्या मुलांना जसे वागवते त्याला समन्यायी म्हणता येईल. ज्या निधीची

समन्यायी विभागणी करायची त्यातून काही बाबी नियम करून वगळल्या आहेत. उदा. — कृष्णेच्या पाण्याच्या निवाडयामुळे हाती घ्यावे लागणारे प्रकल्प बँकेच्या किंवा परराष्ट्रीय मदतीने हाती घेतलेले प्रकल्प वगैरे नियमामधून असे केले. अपवाद न्याचाचे नाहीत असे मा. राज्यपालांना वैधानिक विकास मंडळानेही कळविले आहे.''[१७]

**४) डॉ. व्ही. बी. भिसे :—**

''शासनातर्फे अनुशेष कमी करण्यासाठी असे प्रभावी प्रयत्नाचा अभाव दिसत आहे. कारण १९९५—९६ मध्ये वार्षिक योजनेतील नियतव्यय ६९९५.८४ कोटी रूपयापैकी अनुशेष निर्मूलनासाठी फक्त ७०० कोटी रू. (एकूण नियतव्ययाशी १०.०१% तर २००१—०२ मध्ये वार्षिक योजनेतील नियतव्यय ११७२०.५० कोटी रूपयापैकी अनुशेष निर्मूलनासाठी १७२० कोटी रू. (एकूण नियतव्ययाशी १४.६८% खर्च प्रादेशिक अनुशेष कमी करण्यासाठी सरकारने केला. हा खर्च अत्यंत कमी होता. त्यामुळेच अनुशेषामध्ये उत्तरोत्तर वृध्दी होत आहे.

वरील विश्लेषनावरून असे दिसते की महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यामध्ये शासनाला व वैधानिक विकास मंडळाला प्रचंड अपयश आले आहे. प्रादेशिक विकास मंडळाला निधी वाटपात समन्वयाचा व एकसूत्रिपणाचा अभाव दिसून येत आहे. वैधानिक विकास मंडळाच्या स्थापनेच्या मुख्य उद्दैशाला बगल देऊन प्रादेशिक असमतोल कमी करण्याऐवजी वाढवण्यावर भर दिला जात आहे की काय असा संभ्रम निर्माण होतो. अनुशेष निर्मूलनाबाबत शासन व वैधानिक विकास मंडळ यांनी आपल्या कार्यप्रणालीत बदल करण्याची आजच्या काळाची गरज बनली आहे.''[१८]

**५) प्रा. डॉ. टी. एल. बारबोले :—**

''सरकारने मागासलेल्या प्रदेशाच्या समतोल विकासासाठी फक्त योजना, मंडळे स्थापन करून कार्यक्रम राबवून त्या त्या प्रदेशाचा भागाचा विकास होणार नाही. त्यासाठी त्या त्या प्रदेशासाठी/भागासाठी परिपूर्ण नियोजनाची आवश्यकता आहे. फक्त परिपूर्ण नियोजन आखून उपयोग होणार नाही तर

त्याची कार्यक्षम आणि प्रभावी अंमलबजावणी करण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. परिपूर्ण नियोजनाचा आढावा घेणे, उत्पादनाची लक्षे गाठणे, लोकप्रतीनिधीवर विकास कामाची जबाबदारी टाकणे, सार्वजनिक कार्यात भ्रष्टाचाराला आणि भ्रष्ट व्यक्तीला थारा न देणे इ. वर भर दिल्यास समतोल विकासाचे उद्दिष्ट साध्य करता येईल.''[१९]

**६) श्री व्यंकटेश हंबीरे :—**

''३७१(२) कलमान्वये घटनेने मागास भागाच्या विकासासाठी असे मंडळ केंद्र सरकारला स्थापन करण्याचा अधिकार दिलेला आहे. गोविंद भाईची न्याय मागणी व त्यासाठी त्यांचे अविरत प्रयत्न याला नरसिंहराव हे पंतप्रधान असताना मान्यता दिली गेली पण त्यांनी त्यांचे सहकारी म्हणून गोविंद भाईंना न्याय देताना पक्षाच्या दबावामुळे पश्चिम महाराष्ट्रालाही वैधानिक विकास मंडळ दिले. त्यातून मराठवाडयाचा अनुशेष कमी झाला नाही उलट वाढत चालला आहे. पैशात अनुशेष काढायचा अपूरा पैसा द्यायचा त्यातून योजना व प्रकल्प पूर्ण झालेच नाहीत. ३५ वर्षापासून सिंचनाचे प्रकल्प निधी अभावी अपूर्ण आहेत. पाटबंधारे खात्याचा मराठवाडा व विदर्भाचा अनुशेष भरून काढण्याचे आदेश राज्यपालांनी राज्य सरकारला दिले आहेत. पण त्याचे पालन सरकारने केले नाही. मराठवाडा व विदर्भावर अन्याय करताना घटनेची पायमल्ली करणे हे कायदेशीर गुन्हा आहे पण त्याचे कसलेही सोयर सुतक सरकारला नाही.''[२०]

**७) प्रा डॉ. जयसिंग एस देशमुख :—**

''प्रादेशिक विभागाच्या विकासात स्थानिक लोकांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. वैधानिक विकास मंडळांनी पुढाकार घेवून लोकसंपर्क वाढवावा. विकास खर्चासाठी वेगवेगळया विभागांना निधी कसा वाटावा याबाबत वैधानिक विकास मंडळे राज्यपालांना शिफारस करू शकतात. तेंव्हा मंडळाने केवळ अनुशेषापुरता विचार न करता त्यापलीकडे जाऊन एकूण विकास खर्चाबाबत शिफारशी कराव्यात अशी अपेक्षा आहे.

वैधानिक विकास मंडळाच्या निधीचे योग्य नियोजन व प्रभावीपणे अंमलबजावणी झाल्यास मागासलेल्या भागाचा विकास होऊन, विकासाचा

अनुशेष पूर्ण होऊन एकूण समतोल विकास साधला जाईल व सर्वांगिण समतोल विकासातध्ये वैधानिक विकास मंडळाची भूमिका महत्वपूर्ण ठरेल.''[२१]

**८) डॉ. कुरूलकर :—**

''मराठवाडा आणि विदर्भ विकास मंडळांनी समान धोरण राबविण्याची शिफारस केलेली आहे. यामध्ये रस्ता, पाणी पुरवठा, शिक्षण याचे समान धोरण आखण्याचे ठरविले आहे. त्यासाठी योग्य निधी पुरवून निर्धारित कालावधीत त्याचा वापर करावा असे सुचविले आहे. या मंडळाने असेही राज्यालांना विनंती केली आहे की, अनुशेष आणि बिगर अनुशेष मधील अंतर कमी करावे.''[२२]

**९) श्री स. मा. गर्गे :—**

''वैधानिक विकास मंडळाची निर्मिती जनतेच्या मागणीतुन आणि आंदोलनातून झालेली आहे. दोन दशकापासून जास्त काळ ३७१(२) कलमान्वये विकास मंडळ कायम केले जावे अशी मागणी केली जात होती. शेवटी ९ मार्च १९९४ रोजी राष्ट्रपतींनी अध्यादेश काढून वैधानिक विकास मंडळे कायम करण्याची जबाबदारी महाराष्ट्राच्या राज्यपालांवर सोपविली. राज्यपालांनी ३० एप्रिल १९९४ रोजी आदेश काढून अशा तीन वैधानिक विकास मंडळाची घोषणा केली, मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र यांच्यासाठी ही मंडळे कायम झाली. तीन तज्ञ,एक आमदाराचा प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थांचा एक प्रतिनिधी, एक विभागीय आयुक्त व एक उपायुक्ताच्या दर्जाचा सदस्य, मंत्री अशी मंडळाची रचना आहे.''[२३] असे व्यक्त केले आहे.

**१०) डॉ. कुरूलकर :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची रचना आणि कार्यप्रणाली विषयी काही त्रुटी दिल्या आहेत त्या खालील प्रमाणे आहेत.

''१) या मंडळाचे अध्यक्ष सामान्यपणे आमदार किंवा सत्ताधारी पक्षाशी संबंधीत राजकीय व्यक्ती असतात त्यामुळे राजकीय निवड ठरते. गोविंदभाई श्रॉफ यांच्या मतानुसार या मंडळावर एखादी दूरदृष्टी असणारी व्यक्ती किंवा सेवा निवृत्त उच्चन्यायालयाचे न्यायाधिश यांची निवड करावी असे मत मांडले.

२) हे मंडळ एकाकीपणे काम करीत असल्याने लोकांच्या संपर्कात नसते. त्यामुळे मंडळाच्या उद्दिष्टांविषयी व कामाविषयी लोकांना काही माहिती नसते.

३) महाराष्ट्राच्या इतर भागातूनही अशी मंडळे स्थापन करण्याची मागणी होते. कारण याचे फायदे त्यांनाही मिळाले पाहिजेत अशी त्यांची भावना आहे. यामध्ये कोकण आणि उत्तर महाराष्ट्र यांचा समावेश आहे.''[२४]

**११) राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर :—**

दैनिक 'देवगिरी' तरूण भारत २८/२/२००२ रोजी ''मराठवाडा विभागाचा अनुशेष येत्या पाच वर्षात भरून काढणार — राज्यपाल'' या शिर्षकाखाली राज्यपालांनी आश्वासन दिले. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या सदस्यांबरोबर झालेल्या बैठकीच्या वेळी आश्वासन दिले. मराठवाडा विभागाचा अनुशेष भरून काढण्यासाठी निश्चित असा कालबध्द कार्यक्रम असावा अशी प्रमुख मागणी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष मा. आ. मधुकरराव चव्हाण यांनी राज्यपालांकडे केली. या मागणी बाबत गांभीर्याने विचार करून येत्या चार ते पाच वर्षामध्ये मराठवाडयाचा अनुशेष भरून काढला जाईल असे आश्वासन राज्यपालांनी दिले. मराठवाडा वैधानिक विकास मंडळासाठी आगामी अर्थसंकल्पात २५ टक्के तरतुद करण्यात यावी या मागणीवरही सहानुभूती पूर्वक विचार करण्याची ग्वाही राज्यपालांनी दिली.''[२५]

**१२) राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर :—**

''दैनिक सामना दि. ३/४/२००२.रोजी प्रादेशिक असमतोल योजनाचा निधी खर्च करू नका — असा खणखणीत अध्यादेश राज्यपाल डॉ. पी. सी. अलेक्झांडर यांनी काढला. पश्चिम महाराष्ट्रातच मोठया प्रमाणात काम होत असल्यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण होत असल्याची खंत राज्यपालांकाडे विविध स्तरातून व्यक्त झाली होती. तिची गंभीर दखल घेवून राज्यपालांनी अध्यादेश जारी केला.''[२६]

**१३) मुख्यमंत्री, विलासराव देशमुख :—**

''दै. लोकमत ९/४/२००२ रोजी मराठवाडयातील अनुशेष निर्मुलनाचा तसेच सिंचनाचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येईल असे आश्वासन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी दिले. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष आ. मधुकरराव चव्हाण, सदस्य आमदार विनायकराव जाधव, डॉ. रत्नाकर महाजन, डॉ. शिवराज नाकाडे, उपमख्यमंत्री छगन भुजबळ, उद्योगमंत्री पतंगराव कदम, उर्जाराज्यमंत्री राजेंद्र दर्डा या बैठकीस उपस्थित होते. यावेळी मराठवाडयाच्या सर्वांगीन प्रगतीसाठी जास्तित जास्त निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी अपेक्षा मुख्यमंत्र्याकडे व्यक्त करण्यात आली.''[२७]

**१४) मुख्यमंत्री, विलासराव देशमुख :—**

दै. सांजवार्ता मध्ये दि. ९/४/२००२ रोजी **कृष्णा खोरे प्रकल्पाला गती देणार** या शिर्षकाखाली मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले.

''वैधानिक विकास मंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी कृष्णा खोऱ्यातील मराठवाडयासाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे नियोजन करण्याला प्राधान्य देण्याचे आणि प्रकल्प आवरायचे काम तातडीने हाती घेण्याचे आदेश दिले.

वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष मधुकरराव चव्हाण, उपमुख्यमंत्री छगन भुजबळ आणि स्वतः मुख्यमंत्रयानी वेगवेगळया ४०—४२ मुद्दयांवर चर्चा केली. त्यात सॉफटवेअर टेक्नॉलॉजी पार्कला गती देणे, तसेच औरंगाबादला आय. आय. टी. स्थापन करणे या बाबतीत चर्चा केली. या बैठकीला विविध खात्याचे मंत्री उपस्थित होते. औरंगाबाद येथील घाटी रूग्णालयाला सुपर स्पेशालीटीचा दर्जा देण्याचा विचार झाला. पाटबंधारे व सिंचन विभागातील अनुशेषाबाबत चार वर्षाचा कालबध्द कार्यक्रम त्वरित तयार करून आठ दिवसात अहवाल सादर करावा असे आदेश दिले.''[२८]

**१५) म. वै. विकास मंडळाचे अध्यक्ष मधुकरराव चव्हाण :—**

दै. सकाळ १९/८/२००२ रोजी **रस्ते,विज,शिक्षणासाठी निधी वाटपाचे सुत्र हवे — आ. मधुकरराव चव्हाण यांची राज्यपालांना विनंती.** या

शिर्षकाखाली ''सिंचनाप्रमाणे रस्ते विकास शिक्षण, पाणी पुरवठा, कृषी पंपाचे विद्युतिकरण या क्षेत्रासाठी निधी वितरणाचे सूत्र निश्‍चित करावे. अशी विनंती मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार मधुकरराव चव्हाण यांनी राज्यपालांना केली आहे.

निधी वाटपाचे सुत्र निश्‍चित केल्यास मागास भागातील अनुशेष दुर होण्यास गती मिळेल.

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या २००१—०२ या वर्षातील कामाचा अहवाल त्यांनी राज्यपालांना नुकताच सादर केला. यावेळी त्यांनी वरील विनंती केली.

या पार्श्‍वभुमीवर मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सिंचनक्षेत्रासाठी निधी वाटपाचे सुत्र सुचविले. त्यानुसार ग्रामिण लोकसंख्या आणि लागवडीखालील एकूण क्षेत्र या दोन घटकाच्या आधारावर प्रत्येकी २५ टक्के निधीचे वाटप करावे. ५० टक्के निधी अनुशेषांतर्गत मागासलेपणाच्या आधारावर देण्यात यावा. राज्यपालांनी हे सुत्र मान्य केले.

रस्ते विकास, सामान्य शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, आरोग्यसेवा, पाणी पुरवठा, भूविकास, मृद व जलसंधारण, पशुवैद्यकीय सेवा तसेच कृषि पंपाचे विद्युतीकरण या क्षेत्रांसाठी सुत्र निश्‍चित करून निधी वितरित करावा. अशी विनंती आमदार मधुकरराव चव्हाण यांनी केली.''[२९]

**१६) डॉ. र. पु. कुरूलकर :—**

दै. सकाळ दि. ८/१/२००३ मध्ये **वित्त आयोगाच्या निधी वाटपाचे निकष बदला** या शिर्षकाखाली डॉ. र. पु. कुरूलकर यांनी विनंती केली. ''केंद्र सरकारकडुन वित्त आयोगामार्फत देण्यात येणाऱ्या निधीच्या वाटपाचे निकष बदलण्यात यावे. अशा मागणीचे निवेदन वैधानिक विकास मंडळाचे सदस्य डॉ. र. पु. कुरूलकर यांनी बाराव्या वित्त आयोगाचे सदस्य डॉ. जी. सी. श्रीवास्तव यांना दिले.

सध्या दरडोई उत्पन्नाच्या ६२.५ टक्के, लोकसंख्येच्या १० टक्के, भौगोलीक क्षेत्र, पायाभूत सुविधांचा निर्देशांक व वित्तीय भाग यांच्या प्रत्येकी

साडेसात टक्के व कराच्या पाच टक्के प्रमाणत निधी देण्यात येतो. लोकसंख्या व दरडोई उत्पन्न यांच्या प्रत्येकी ३० टक्के प्रमाणात निधी द्यावा. त्याच बरोबर भौगोलीक क्षेत्र, पायाभूत सुविधांचा निर्देशांक, कर, वित्तीय शिस्त यांच्या प्रत्येकी पाच टक्के प्रमाणात निधीचे वितरण करण्यात यावे. त्याशिवाय दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या व मानवी विकास निर्देशांकातील फरक यांच्या प्रत्येकी १० टक्के प्रमाणात निधी देण्यात यावा. असे मंडळाने सुचविले आहे.

दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या व मानवी विकास निर्देशांकातील फरक हे दोन नवे निकष यापुढे विचारात घेण्याची सुचना मंडळाने केली आहे.''[३०]

**१७) संपादकीय दै. लोकमत :—**

संपादकीय दै. लोकमत दि.३१/३/२००५ रोजी संपादकीय मध्ये **'पैशाचे सोंग कसे आणणार ?'** या शिर्षकाखाली मा. संपादकांनी आपले विचार मांडले ते खालील प्रमाणे.

''वैधानिक विकास मंडळाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर ४५ वर्षात महाराष्ट्राचा समतोल विकास होवू शकला नाही. यशवंतराव चव्हाण म्हणाले होते की, 'हे राज्य एका विभागाचे होणार नाही, तसेच एका जातीचे असणार नाही.' चव्हाण साहेबांचे शब्द आज नावालाच खरे ठरले आहेत. अशी भावना महाराष्ट्रातील अन्य विभागाची आणि मराठेत्तर जातीची म्हणजे ओ. बी. सी. ची भावना बनली आहे. महाराष्ट्राचा समग्र विकास झाला नाही, जो विकास प्रामुख्याने झाला त्या पश्चिम महाराष्ट्र पुढे गेला अशी सर्रास भावना निर्माण झाली आहे. राज्यकर्त्यांनी पश्चिम महाराष्ट्राला झुकते माप दिले. एकूण विभागाच्या असमतोलात विदर्भ— मराठवाडयाला दुय्यम वागणुक मिळाली. जेंव्हा या अनुशेषाचा फार मोठा राजकीय स्फोट होण्याची भीती वाटत हाती तेंव्हा वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना दांडेकर आयोग नेमला गेला. दांडेकर आयोगाने राज्याच्या तीन चार विभागाचा अनुशेष काढला. हा अनुशेष भरून काढायचा म्हटला तर त्याला **संविधानिक अधिष्ठान** लाभेल म्हणून वैधानिक मंडळाची मागणी पुढे आली.

'वैधानिक मंडळाने अनुशेष दुर होणार नाही, प्रादेशिक भावना वाढीला लागेल'. असा इशारा त्या वेळेचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी दिला होता. परंतु राजकीय सोयीकरीता वैधानिक मंडळे निर्माण झाली. कांही जागांची सोय झाली. कांही व्यक्तींची सोय झाली पण अनुशेष वाढत गेला. आता तर परस्थिती अशी आहे की, शासनाच्या तिजोरीतील हा जो अनुशेष (बॅकलॉग) विभागवार राहिला आहे. तो भरून काढणे या सरकारला शक्य होणार नाही. आजच सरकारच्या डोक्यावर १ लाख कोटी रूपयांचे कर्ज आहे. त्याचे व्याज भरता भरता सरकारला नाकी नऊ येतात. याच साठी अनुशेषाची रक्कम सरकारला वर्ग करणे शक्यच होणार नाही. राज्याचा सध्याचा अनुशेष ९,३७७ कोटी रूपयांचा आहे. त्यातला ५,१६८ कोटी रूपयाचा अनुशेष फक्त पाटबंधाऱ्याचा आहे. एवढी मोठी रक्कम कशी उपलब्ध करून देणार? मग घटनात्मक तरतुद असली तरी पैशाचे सोंग आणणार कोठून? त्यामुळे अनुशेष वाढत जाणार आणि विधान मंडळात फुकट चर्चा होत राहणार.''[३१]

**१८) श्री प्रताप आसबे :—**

श्री प्रताप आसबे हे दै. महाराष्ट्र टाइम्सचे पत्रकार असून त्यांनी दि. १५/०४/२००२ रोजी दै. महाराष्ट्र टाईम्स मध्ये **'चक्रव्युहात अडकले राज्यपाल'** हा महाराष्ट्र देशी या सदरात आपला लेख लिहला होता. त्यामध्ये त्यांनी वैधानिक विकास मंडळा विषयी आपले मत मांडले. त्यांच्या मते ''राज्याच्या सर्व विभागाचा समतोल विकास करण्याची जबाबदारी वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातुन राज्यपालांवर टाकण्यात आली आहे. लोकनियुक्त सरकार आणि विधी मंडळ यांचे अधिकार कमी करून घटनेत दुरूस्ती करून ही जबाबदारी राज्यपाल या एका व्यक्तीकडे दिले जातात तेंव्हा अनवधानाने का होईना पण चुका होतात. अभ्यासकांनी ठरविल्याप्रमाणे हा अनुशेष दुर करण्याचे प्रयत्न चालू झाले. तरीही तो वाढत चालल्याच्या तक्रारी लक्षात घेऊन राज्यपाल डॉ. पी. सी. अलेक्झांडर यांनी स्वतःच्या अधिकारात अनुशेष आणि निकष ठरविण्यासाठी एक पुनर्रचित समिती नेमली. या समितीवर विदर्भातील मधुकर किमतकर, औरंगाबादचे सनदी अधिकारी भुजंगराव कुलकर्णी, विदर्भातील

आणखी एक अधिकारी शेणोलीकर यांच्या नेमणूका राज्यपालांनी केल्या. या समितीवर राज्यपालांनी पश्चिम महाराष्ट्रातील अथवा उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळावरील एकही सदस्य नेमला नाही. हे मुद्दाम घडले की अनवधानाने झाले हे राज्यपालांनाच ठाऊक.''[३२]

**१९) माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण :—**

दैनिक लोकसत्ता मध्ये दि. ९/११/२०११ रोजी ''वैधानिक विकास मंडळे अबाधीत ठेवा'' माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण या शिर्षकाखाली आपले मत व्यक्त केले.

''दांडेकर समितीने निश्चित केलेला अनुशेष अद्याप दूर झालेला नाही. या पार्श्वभूमीवर केळकर समितीने मराठवाडयाच्या मागासलेपणाचा स्वतंत्र निर्देशांक काढून आधीच्या काळात झालेला अन्याय दूर केला पाहीजे. मराठवाडयाचा भौतिक अनुशेष दूर करतानाच केळकर समितीने मागास भागाच्या निधी वाटपा संदर्भात सूत्र निश्चित केले पाहीजे व वैधानिक विकास मंडळाची कार्यकक्षा व व्याप्ती वाढवा अशी सूचना अशोकराव चव्हाण यांनी नांदेड येथील बैठकीत केली.''[३३]

**२०) श्रीपाद कुलकर्णी :—**

दै. सकाळ मध्ये दि. २०/०९/२०११ रोजी भाष्य सदरात ''समतोल विकासासाठी वैधानिक विकास मंडळे महत्वाची'' — श्रीपाद कुलकर्णी या शिर्षकाखाली श्री श्रीपाद कुलकर्णी यांनी मत व्यक्त केले ते खालील प्रमाणे.

''वैधानिक विकास मंडळामुळे रस्ते व सिंचनाची कामे मार्गी लागण्यास सुरूवात झाली. आता शिक्षण आणि आरोग्य या विषयांकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. चांगल्या दर्जाचे उच्च व तंत्रशिक्षण आणि चांगल्या दर्जाच्या आरोग्य सेवा ही अविकसित भागाची गरज आहे. त्यावर नव्याने स्थापन होणाऱ्या मंडळांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

वैधानिक विकास मंडळे निधीच्या समन्यायी वाटपासाठी शिफारस, पाठपुरावा करतात. अविकसित भागांच्या विकासासाठी मंडळाच्या शिफारशीच्या आधारे राज्यपाल सरकारला निर्देश देतात. भविष्यातही मंडळाची ही भूमिका

अपेक्षित आहे. वैधानिक विकास मंडळामुळे संबंधित प्रदेशाच्या विकासाच्या वाटचालीचे चित्र समोर आले आहे. सरकारने राज्यातील समतोल विकासाचा अभ्यास करण्यासाठी केळकर समितीची स्थापना केली आहे. या समितीच्या निष्कर्षातून राज्यात आतापर्यंत करण्यात आलेल्या विकासाचे सुस्पष्ट चित्र समोर येणार आहे. वैधानिक विकास मंडळांनी केवळ निधी न मागता आलेल्या निधीमुळे सर्वसामान्यांचे जीवनमान कसे उंचावेल यावरही लक्ष ठेवले पाहिजे.''[३४]

**२१) दैनिक लोकमत बातमी :—**

दैनिक लोकमत मध्ये दि. २६/१२/२०११ रोजी '' मराठवाडा वैधानिक विकास मंडळासाठी मुहूर्त सापडेना'' या शिर्षकाखाली पान क्र.९ मध्ये बातमी आली ती पुढील प्रमाणे.

''वैधानिक विकास मंडळाची मुदत राष्ट्रपतींच्या संमतीने वाढवून ती शासनाने आता दि. ३० एप्रिल २०१५ पर्यंत नेली आहे. यापूर्वी राज्यपालांनी महाराष्ट्र शासनाला दि. १९ मार्च २०१० रोजी पत्र देऊन राज्यातील मागास भागाचा विकास करण्याविषयी कान टोचले होते. मराठवाडयातील अनुशेषाचा नियमित आढावा घेऊन दर तीन महिन्याला अहवाल देण्याची सक्त सुचना राज्यपालांनी राज्याच्या मुख्य सचिवांना केलेली होती.

दरम्यान विदर्भाची कमिटी जाहीर झाली. सदस्यही नेमण्यात आले, कामास प्रारंभही झाला पण मराठवाडा विकास बोर्डासाठी मात्र मुहूर्त सापडेना.''[३५]

**२२) सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. छगनराव भुजबळ :—**

दि. २४ एप्रिल २०१२ रोजी दै. टाईम्स ऑफ इंडिया मध्ये ''उत्तर महाराष्ट्रासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची आवश्यकता'' या शिर्षकाखाली ना. छगनराव भुजबळ यांनी आपले मत व्यक्त केले.

''नाशिक, अहमदनगर, जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्हे उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळात येतात. या जिल्ह्यासाठी अत्यंत कमी म्हणजे ५% निधी या जिल्ह्यासाठी खर्च केला जातो. हा निधी अपुरा आहे तरी या

विभागाचा समतोल विकास होण्यासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची आवश्यकता आहे असे महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. छगनराव भुजबळ यांनी आपले मत व्यक्त केले.

महाराष्ट्रराज्य परिवहन मंत्री व जळगाव जिल्ह्याचे पालक मंत्री मा. गुलाबराव देवकर यांच्या मते जळगाव जिल्ह्यात सिंचनाचा मोठा अनुशेष आहे, पाच मोठया सिंचन प्रकल्पापैकी तीन सिंचन प्रकल्प सध्या पुर्ण झाले आहेत. १७ मध्यम सिंचन प्रकल्पापैकी ९ पूर्ण झाले आहेत. ८ प्रकल्प पूर्णत्वाच्या वाटयाला आहेत. सरकार खूपच कमी निधी देते त्यामुळे जास्त वेळ लागून प्रकल्पाचा खर्च वाढतो. त्यामुळे उत्तर महाराष्ट्राला स्वतंत्र निधी मिळण्यासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची आवश्यकता आहे. अशी मागणी डॉ. विजय केळकर समितीला केली आहे.''[३६]

**२३) माजी खासदार डॉ. व्यंकटेश काब्दे :—**

''मराठवाडा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी दि. १८ आक्टोंबर २०१२ रोजी नांदेड येथील लोकमत आयोजित चर्चेत आपले मत व्यक्त केले. ते म्हणाले, ''पश्चिम महाराष्ट्रात सिंचन वाढले, मात्र मराठवाडा, विदर्भात तशी स्थिती नाही. प. महाराष्ट्र ४६%, पुणे विभागात ५४%, तर मराठवाडा व विदर्भात २० ते २२% सिंचन आहे. डॉ. केळकर समितीने आणखी कांही तज्ञांच्या समित्या नेमून मागास भागाचे नियोजन करण्यापेक्षा 'सर्वप्रथम अनुशेष काढावा' त्याचा अहवाल मे २०१२ पर्यंत सादर होणे अपेक्षित होते, मात्र त्याला मे २०१३ पर्यंतची मुदत वाढ मिळाली आहे.''[३७]

## २.८ संशोधन आराखडा :—

संशोधन प्रकल्पाचे शिर्षक :—

''मराठवाडयाच्या सामाजिक व आर्थिक विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची भूमिका''

### २.८.१ प्रास्ताविक :—

महाराष्ट्र राज्य हे विकसीत राज्य असले तरी या राज्याचा समतोल विकास झालेला नाही. राज्यातील कांही भाग अविकसीत व मागासलेला आहे. या भागाच्या विकासासाठी कांही प्रयत्न केले जावेत, विकासाचा अनुशेष भरून काढून संपूर्ण राज्य विकसीत होण्याच्या दृष्टीने सरकार पातळीवरून प्रयत्न केले जात आहेत. त्यामधील प्रादेशिक वैधानिक विकास मंडळ हे महत्वपूर्ण मंडळ आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा,विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र या प्रदेशासाठी तीन वैधानिक विकास मंडळाची स्थापना राज्य घटनेच्या कलम ३७१(२) प्रमाणे दि. ३० एप्रिल १९९४ रोजी करण्यात आली. त्यातील मराठवाडा वैधानिक विकास मंडळाअंतर्गत मराठवाडयाच्या विकासात मोलाची भर पडत आहे.

### २.८.२ संशोधन समस्या :—

मराठवाडा विभागामध्ये आठ जिल्हे आहेत. औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदड, लातूर व उस्मानाबाद हे आठ जिल्हे आहेत. मराठवाडयाचा विकास व्हावा, विकासातील अनुशेष भरून निघावा, महाराष्ट्रातील प्रगत विभागाबरोबर मराठवाडा विभाग विकासाच्या बाबतीत यावा, महाराष्ट्राचा समतोल विकास व्हावा यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना केली. या मंडळामार्फत मराठवाडयाच्या विकासात कोणती भूमिका आहे, मराठवाडयाच्या विकासासाठी किती खर्च केला, तो निधी जिल्ह्यातील वेगवेगळया तालुक्यांना व तालुक्यातील वेगवेगळया गावांना किती निधी मिळाला, या निधीचा उपयोग कोणत्या कामासाठी केला, त्यामुळे मंडळाचे उद्दिष्ट साध्य झाला का ? ते पडताळणी करण्यासाठी विषयाची निवड केली.

### २.८.३ संशोधनाची उद्दिष्टे :—

१) महाराष्ट्रातील वैधानिक विकास मंडळाच्या कार्याचा धावता आढावा घेणे.

२) मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडा विभागाच्या आर्थिक विकासासाठी केलेल्या कार्याचे मुल्यमापन करणे.

३) मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडा विभागाच्या सामाजिक विकासासाठी केलेल्या कार्याचे मुल्यमापन करणे.

४) मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या कार्याचा चिकीत्सक अभ्यास करणे.

५) मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने कलेल्या कामाचे मराठवाडा विभागाच्या विकास कार्यातील त्रुटी, उणिवा शोधून त्यावर उपाय व शिफारशी सुचविणे.

## २.८.४ संशोधनाच्या मर्यादा :—

### अ) भौगोलिक मर्यादा :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाअंतर्गत मराठवाडा विभागातील संपूर्ण आठ जिल्हे औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यात झालेल्या विकास कामाचा आढावा घेतला आहे.

### ब) काल मर्यादा :—

प्रस्तुत संशोधनाचा कालावधी २००५—०६ ते २००९—१० असा पाच वर्षाचा आहे.

### क) संशोधन पध्दत व मर्यादा :—

हे संशोधन प्राथमिक व दुय्यम सामुग्रीवर आधारित आहे.

## २.८.५ संशोधनाचे महत्व :—

महाराष्ट्र राज्यात मुंबई, कोकण किनारपट्टी, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा असे पाच प्रादेशिक विभाग पाडले आहेत. या पाच प्रादेशिक विभागाच्या आर्थिक विकासाचा अभ्यास केला असता मुंबई, पुणे, ठाणे व पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांचा जास्त विकास झालेला दिसून येतो. तर विदर्भ, मराठवाडा व कोकण किनारपट्टी या विभागाचा विकास खूप कमी झालेला आहे. त्यामध्ये प्रचंड प्रमाणात आर्थिक असमतोल आढळून येतो. या विभागातील मागासलेपणा दूर करून त्याविभागाचा अनुशेष भरून काढण्यासाठी दि. ३० एप्रिल १९९४ रोजी राज्यघटनेच्या कलम ३७४(२) नुसार महाराष्ट्रातील

मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्र या प्रदेशासाठी तीन वैधानिक विकास मंडळाची स्थापना केली.

वरील तीन वैधानिक विकास मंडळापैकी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडा विभागाच्या विकासात महत्वाचे कार्य केले. विकास मंडळाने केलेल्या विकास निधीमुळे सिंचन सोयी, पिण्याचे पाणी, गावे, खेडी, वाडया, वस्त्या येथे रस्त्याच्या सोयी, सामाजिक सभागृह, सांस्कृकित सभागृह इ. साठी भरीव कार्य केले. त्यामुळे मराठवाडयाचा विकास होत आहे. या विकास कामाची कार्यक्षमता पडताळण्याच्या हेतुने प्रस्तुत संशोधन हाती घेतले आहे. त्यादृष्टीने त्याचे महत्व आहे.

### २.८.६ संशोधन साहित्याचा आढावा :—

मराठवाडयाच्या विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची भूमिका या विषयाला अनुरूप असे इतर संदर्भ शोधने, नियतकालिके, लेख, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे वार्षिक अहवाल तसेच प्रादेशिक विषमतेबाबत केंद्र व महाराष्ट्र सरकारची धोरणे, नागपूर करारातील प्रमुख मुद्दे, महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समिती व इतर समित्याचे गठन इ. चा विषयानुरूप आढावा घेतला आहे.

### २.८.७ सैध्दांतिक पार्श्वभूमि :—

मराठवाडयाच्या सामाजिक, आर्थिक विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची भूमिका या विषयावर कोणत्याही व्यक्तीने किंवा संस्थेने संशोधन केलेले नाही. परंतु मी स्वतः यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे सन २००७ ते २००९ मध्ये **उस्मानाबाद जिल्ह्याच्या विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची भूमिका** या विषयावर एम. फिल. केले आहे. त्यातील कांही निष्कर्ष पुढील प्रमाणे.

१) महाराष्ट्र राज्याच्या वार्षिक योजनेतून तीनही वैधानिक विकास मंडळासाठी १०० कोटी रू. विशेष राखीव निधी आहे. त्यात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या वाटयाला अल्पशा २८ कोटी रू. निधी येतो. त्यामुळे मंडळ विकास कार्यक्रम पार पाडण्यासाठी असमर्थ ठरत आहे.

२) निधी वाटपात विषमता :—

सन २००१—०२ ते २००५—०६ या पाच वर्षाच्या कालावधीत मराठवाडयातील एकूण निधी १५१६०.६४ लाख रूपये पैकी औरंगाबाद जिल्ह्याला ३२७८.६७ लाख रू. (२१.६२टक्के) निधी दिला तर हिंगोली सारख्या मागास जिल्ह्याला सर्वात कमी निधी म्हणजे ६४९.५४ लाख रू. (४.२८टक्के) निधी दिला. यावरून निधी वाटपात फारच विषमता दिसते.

३) उस्मानाबाद जिल्ह्याला सन २००१—०२ ते २००५—०६ या पाच वर्षाच्या कालावधीत विकास मंडळाकडून १६९३.९२ लाख रू. निधी दिला. या निधी पैकी सर्वात जास्त सार्वजनिक बांधकाम विभागाला १३५४.१४ लाख रू. (८१.१५टक्के) निधी दिला तर याउलट नियोजन विभागाला सर्वात कमी ०.४५ लाख रू. (०.०२टक्के) निधी दिला.

## २.८.८ गृहितके :—

१) मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या आर्थिक विकासात मोलाची भर पडली आहे.

२) मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या सामाजिक, शैक्षणिक, पायाभूत संरचनेच्या विकासात भर पडली आहे.

३) विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या रोजगारात संधीत वाढ झाली आहे.

४) विकास मंडळामुळे मराठवाडयातील लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा झालेली आहे.

५) विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या विकासातील अनुशेष कमी झाला.

## २.८.९ संशोधन पध्दती :—

**१) संशोधन क्षेत्राची निवड :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाअंतर्गत मराठवाडा विभागातील संपूर्ण आठ जिल्हे औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर व उस्मानाबाद हे सर्व जिल्हे प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र आहे.

**२) तालुका/गावांची निवड :—**

प्रस्तुत संशोधनामध्ये मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यातील सर्व

तालुक्यात व गावपातळीवर जी विकास कामे झालेली आहेत त्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

**३) उत्तर दात्यांची नमुना निवड :—**

**अ) मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष यांची मुलाखत.**

**ब) लाभधारक प्रतिक्रीया प्रश्नावली/अनुसुची.**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाद्वारे विशेष निधी मधून जी विकास कामे केली आहेत त्याचा प्रत्यक्ष लाभ ज्या लोकांना मिळालेला आहे यासाठी मराठवाडयातील प्रत्येक जिल्ह्यातील एका गावाचा यादृच्छिक नमुना निवड (Random Sample Method), पध्दतीने निवड करून त्या गावातील लोकांना प्रश्नावली अनुसुची द्वारे तथ्य संकलन केले आहे. मराठवाडयातील आठ जिल्ह्यामधील प्रत्येक जिल्ह्यातील ज्या गावामध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने विशेष निधी मधून विकास कामे केली आहेत अशा एका गावातील एकुण लाभार्थ्यापैकी २% नमुना निवड पध्दतीने एकुण ५९८ प्रत्यक्ष लाभार्थ्याची प्रश्नावली अनुसुचीद्वारे मते जाणून घेतली आहेत.

तक्ता क्र. २.४

उत्तर दात्याची नमुना निवड

| अ. क्र. | जिह्याचे नाव | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | म.वै.मं.ने केलेल्या कामाचे स्वरूप | नमुना नि. गा. एकुण लाभार्थी संख्या | २% प्रमाणे निवड लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | पैठण | पाचोड | रस्त्याचे काम | ६५२८ | १३० |
| २ | जालना | जाफ्राबाद | बोरगाव बु. | ग्राम पंचायत कार्यालयाचे बांधकाम | १७४१ | ३५ |
| ३ | बीड | गेवराई | गोविंदवाडी | सिमेंट बंधारा बांधकाम | १६६५ | ३३ |
| ४ | परभणी | गंगाखेड | राणी सावरगाव | सांस्कृतिक सभागृह बांधकाम | ६७०७ | १३४ |
| ५ | हिंगोली | हिंगोली | वैजापूर | प्राथमिक शाळेस संरक्षण भिंतीचे बांधकाम | ८६५ | १७ |
| ६ | नांदेड | नायगाव | खडगाव | सार्वजनिक रस्त्यावर पथदिवे बसविले | १६२१ | ३३ |
| ७ | उस्मानाबाद | तुळजापूर | काक्रंबा | समाजिक सभागृह बांधकाम | ४३५९ | ८७ |
| ८ | लातूर | औसा | उजनी | सार्वजनिक रस्त्यावर पथदिवे बसविले | ६४३४ | १२९ |
| | एकुण | | | | २९९२० | ५९८ |

**आधार :—** सर्व्हेक्षण माहिती.

वरील तक्ता क्र. २.४ प्रमाणे ५९८ लाभार्थी लोकांकडून प्रश्नावली अनुसुचीद्वारे मते जाणून घेवून तथ्य संकलन केले आहे.

**२.८.१० तथ्य संकलन व विश्लेषण :—**

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक आणि द्वितीय अशा दोन्ही स्त्रोतांचा वापर केला आहे.

**१ प्राथमिक तथ्य संकलन:—** प्राथमिक तथ्य संकलनाची तंत्रे खालील प्रमाणे वापरली आहेत.

**अ) मुलाखत :—** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष यांची मुलाखत.

**ब) प्रश्नावली/अनुसुची :—**

**२) द्वितीय तथ्य संकलन:—** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे वार्षिक अहवाल, मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्याचे सांख्यिकी अहवाल, विकास मंडळाअंतर्गत विविध विभागांना निधी दिला जातो. त्या विभागाचे अहवाल, महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील अहवाल, संदर्भ ग्रंथ, चर्चा सत्र, संशोधन प्रबंध, तज्ज्ञांची मते, वर्तमान पत्रे,मासिके, पुस्तके इ. चा उपयोग केला आहे.

**३) विश्लेषणाची तंत्रे व साधने :—** संकलित माहितीचे वर्गीकरण, सारणीकरण करून सरासरी, टक्केवारी, निर्देशांक या तंत्राचा व साधनाचा वापर करून विश्लेषण केले आहे.

**२.८.११ प्रकरण योजना :—**

प्रस्तुत संशोधनाची विभागणी खालील प्रमाणे आठ प्रकरणात करण्यात आलेली आहे.

**१) प्रकरण पहिले — प्रस्तावना :—**

सदरहू प्रकरणामध्ये आर्थिक विकासाची संकल्पना, आर्थिक विकासाची व्याख्या, आर्थिक विकासाची वैशिष्टये, आर्थिक विकासाची आधारभूत तत्वे, आर्थिक वृध्दिचा सैध्दांतिक आधार, वैधानिक विकासाची संकल्पना, केंद्र सरकारच्या मालकीचे सार्वजनिक उपक्रम, महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक उपक्रम इत्यादिंचा थोडक्यात समावेश केला आहे.

**२) प्रकरण दुसरे — संशोधन साहित्याचे पुनरावलोकन व संशोधन आराखडाः—**

प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळा विषयी वेगवेगळे वर्तमान पत्रे, शोध निबंध, नियतकालिके मध्ये राज्यपाल, मुख्यमंत्री, वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष व तज्ञ व्यक्तींनी आपली मते बातम्यांच्या व लेख स्वरूपात मांडलेली आहेत. त्यांची मते व प्रादेशिक विषमतेबाबत केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारची धोरणे, नागपूर करारातील प्रमुख मुद्दे, महाराष्ट्रातील प्रादेशिक व असमतोलावरील सत्यशोधन समिती, निर्देशांक व अनुशेष समिती व इतर समित्याचे गठण इ. बाबतीत संशोधन साहित्याचा व दुसऱ्या भागात संशोधन आराखडयाचा विचार करण्यात आला आहे.

**३) प्रकरण तिसरे — मराठवाडा विभागातील जिल्ह्यांचे सामाजिक व आर्थिक समालोचन :—**

प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यांची भौगोलीक परिस्थिती, शेती संबंधीत माहिती, औद्योगिक स्थिती, रस्ते, परिवहन, सहकार, शैक्षणिक, वैद्यकीय यात्रा व पर्यटन स्थळे, पाणी पुरवठा इ. ची सर्वसामान्य माहिती थोडक्यात दिलेली आहे.

**४) प्रकरण चौथे — मराठवाडयाची अर्थव्यवस्था व मागासलेपणाची कारणे :—**

प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठवाडयाची अर्थव्यवस्था, यामध्ये मराठवाडयाचे क्षेत्रफळ व पावसाचे प्रमाण, लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्टये, वनाखालील क्षेत्र, रोजगाराचे प्रमाण, औद्योगिक स्थिती, सिंचन स्थिती, आधारभूत संरचना इत्यादिचा तर मराठवाडयाचे मागासलेपणाची कारणे. या बाबीचा समावेश केला आहे.

**५) प्रकरण पाचवे — मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना, रचना, भूमिका, व कार्ये :—**

प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या निर्मितीची आवश्यकता, स्थापना, रचना, भूमिका, व कार्ये, मंडळाच्या निधीचे वाटप, मंडळाच्या सर्वसाधारण बैठका, विषय समित्या, नियोजन मंडळाच्या बैठकामध्ये वैधानिक विकास मंडळाचा सहभाग इ. या बाबीचा समावेश केला आहे.

**६) प्रकरण सहावे — मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या आर्थिक विकासातील योगदान :—**

प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडयाच्या विकासाविषयी सिंचन विषयक कामे, आरोग्य सेवा, शैक्षणिक सुविधा, उद्योग व उर्जा विकास, रस्ते विकास, प्रशासन व्यवस्था, वाहतुक व दळण—वळण, पर्यटन इ. विभागाचा विकास विषयी शासनाकडे केलेल्या शिफारशी व मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला शासनाकडून मिळणाऱ्या विशेष निधीचे जिल्हा निहाय व तालुका निहाय वाटप व त्या निधीतून केलेली विकास कामे याचे सविस्तर विवेचन केले आहे.

**७) प्रकरण सातवे — मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे मराठवाडयाच्या सामाजिक विकासातील योगदान :—**

प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष यांची मुलाखत व मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या विशेष निधीमधून मराठवाडयातील आठ जिल्ह्यातील प्रत्येक जिल्ह्यातील एका गावातील एकूण लाभार्थ्यापैकी २% नमुना लाभार्थी, असे आठ जिल्ह्यातील ५९८ लाभार्थ्यांची प्रश्नावली अनुसुचीद्वारे मते जाणून घेवून त्याचे विश्लेषण केले आहे.

**८) प्रकरण आठवे — निष्कर्ष व शिफारशी :—**

प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठवाडा विभागाच्या सामाजिक व आर्थिक विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची असलेली भूमिका याचा सखोल अभ्यास करून त्याच्या कार्याचे विस्तृत विश्लेषण केल्यानंतर यातून समोर आलेले निष्कर्ष आणि त्या अनुषंगाने सुचविलेल्या शिफारशी याचा समावेश प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात आला आहे.

**समारोप :—**

मराठवाडा विभागाचा अनुशेष भरून निघावा व मराठवाडा विभागाचा समतोल विकास व्हावा यासाठी राज्यपाल, मुख्यमंत्री, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष व तज्ञ व्यक्ती तसेच सत्यशोधन समिती व अनुशेष समिती यांच्या माध्यमातुन प्रयत्न केले जात आहे.

सदर प्रकरणामध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडयाच्या विकासाविषयी सिंचन सोयी, कृषी विषयक कामे, आरोग्य सेवा, शैक्षणिक सुविधा, उद्योग व उर्जा विकास, रस्ते विकास, प्रशासन व्यवस्था, वाहतुक व दळण—वळण, सहकार विभाग, समाज कल्याण, मराठवाडयातील पर्यटन स्थळांचा विकास इत्यादि विभागाचा विकास विषयी शासनाकडे केलेल्या शिफारशी व विनंती तसेच मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला शासनाकडून मिळणाऱ्या वार्षिक विशेष निधीचे जिल्हा निहाय व तालुका निहाय वाटप व त्या निधीतून केलेली विकास कामे याचे सविस्तर अभ्यास केला आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या आतापर्यंतच्या कार्यात कांही त्रुटी असल्या तरी मंडळाचे कार्य उल्लेखनीय असे आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या विकास विषयक कार्यात किंवा प्रयत्नात राज्य सरकारच्या विविध खात्याकडून भविष्य काळात विधायक प्रतिसाद मिळत राहिल अशी अपेक्षा आहे.

# संदर्भ


१) जॉन डब्लू वेस्ट (१९६३),रिसर्च इन एज्युकेशन (पृ.क्र.४),प्रेन्टीस हॉल ऑफ इंडिया.

२) प्रा. घाटोळे रा. ना. (२००३),समाजशास्त्रीय संशोधन,तत्वे व पध्दती, (पृ.क्र.५), श्री मंगेश प्रकाशन नागपूर.

३) Borse M.H. (2004),Research Methdology (page.No.2),Shree Niwas Publications, Jaipur.

४) भांडारकर पु ल. (१९८७), समाजिक संशोधन पध्दती, (पृ.क्र.२),महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर.

५) डॉ. पाटील वा. मा. (२०१०), संशोधन पध्दती, (पृ.क्र.२८५),प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.

६) काचोळे दा धो. (जुलै २००५), समाजशास्त्रीय संशोधन पध्दती, (पृ.क्र. १४७),कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

७) उपरोक्त पृ.क्र. २०२

८) कोठारी सी. आर. (१९८९), रिसर्च मेथोडॉलॉजी, (पृ.क्र. २), विलेय ईस्टर्न लिमिटेड,न्यू दिल्ली.

९) डॉ. राखीकर यशवंत/प्रा. गोडबोले वि. ज./प्रा. जॉन्सन बोर्जेस (२००८), डायमंड अर्थकोश, (पृ.क्र. ६३६),डायमंड पब्लिकेशन,पूणे.

१०) डॉ. इंगळे बी. डी. (फेब्रुवारी २०११), आर्थिक विचारांचा इतिहास, (पृ.क्र. १७९), अरूणा प्रकाशन लातूर.

११) प्रा. रायखेलकर/दामजी (जून २०११), आर्थिक विचारांचा इतिहास, (पृ.क्र. ३१७),विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

१२) Dr.Radhakrishna R.(2007),Report of the Expert Group on Agriculture Indebtendness,Ministry of Finance,New Delhi.

१३) Suryanarayana M.H. (2009),Intra-State Economics Disparities; Karnataka & Maharashtra,Economic & Political Weekly, June-27,Mumbai.

१४) शासन निर्णय क्र. अनुशेष २००९/पृ.क्र. ४०५/का.१४१६ दि. ३१ मे २०११,नियोजन विभाग महाराष्ट्र शासन.

१५) कुलकर्णी भुजंगराव (फेब्रुवारी २००७) मी, मराठवाडा आणि महाराष्ट्र,प्रतिमा प्रकाशन, पुणे—३०.

१६) डॉ. कुरूलकर र. पु.(फेब्रुवारी २००३),मराठवाडयाचा आर्थिक विकास, शोध निबंध,'अर्थमोळी' (पृ.क्र. १११),विमल प्रकाशन नांदेड.

१७) कुलकर्णी भुजंगराव, (२४ जुलै २०१०),मराठवाडयाचा विकासाचा विचार सर्वांनी गांभीर्याने करा—संशोधन लेख, सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र, (पृ.क्र. २३२), ज्ञानेश प्रकाशन, औरंगाबाद,

१८) दिशा विकासाची,(पृ.क्र. १९), रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद,'दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र दि. २१ व २२ जानेवारी २००६,विषय—''असमतोल आणि आर्थिक विकास व प्रादेशिक वैधानिक विकास मंडळाची भूमिका''.

१९) उपरोक्त पृ.क्र. २४.

२०) उपरोक्त पृ.क्र. ३७.

२१) उपरोक्त पृ.क्र. ४५.

२२) उपरोक्त पृ.क्र. १५.
२३) गर्गे स. मा., (१४ जुलै १९९५), मराठवाडयाचा विकास दिशा आणि गती, मंदार ट्रेडर्स, पुणे — ११.
२४) Dr. Kurulkar,Research paper - The Problem of Regional Disparities in Maharashtra State and the role of the Regional Development Boards, Journal of Indian School of Political Economy. ( Jan.- Dec. 2009 )
२५) 'देवगिरी' दै. तरूण भारत दि. २८/०२/२००२
२६) दै. सामना दि. ०३/०४/२००२.
२७) दै. लोकमत दि. ०९/०४/२००२.
२८) दै. सांजवार्ता दि. ०९/०४/२००२.
२९) दै. सकाळ दि. १९/०८/२००२.
३०) दै. सकाळ दि. ०८/०१/२००३.
३१) दै. लोकमत दि. ३१/०३/२००५.
३२) दै. महाराष्ट्र दि. १५/०४/२००२.
३३) दै. लोकसत्ता दि. ०९/११/२०११.
३४) दै. सकाळ दि. २०/०९/२०११.
३५) दै. लोकमत दि. २६/१२/२०११.
३६) दै. टाईम्स ऑफ इंडिया दि. २४/०४/२०१२
३७) दै. लोकमत दि. १९/१०/२०१२.
३८) डॉ. कुरूलकर र. पु.(१९९७),महाराष्ट्राची अर्थव्यवस्था,(पृ.क्र. १५५—१५६),विद्या प्रकाशन नागपूर.
३९) Regional planning A case study of Marathawada region (Page no.18), Gokhale in institute of Politics of Economics,1975,Pune.
४०) "Report of the Fact Fidding committee on Regional Imbalance in Maharashtra state." Planning Department, Government of Maharashtra Mumbai,April 1984.
४१) Report of the Indicators & Backlog committee on Relatives Levels of Develpoment, Backlog & Removel of Regional Imbalance,(1997)
४२) Kurulkar R.P., Regional Disparitias in Maharashtra – Problams & solutions (1960-2000),Guna-Gaurav Nyas publications No-24 Think –Line,Nashik.

प्रकरण तिसरे

# मराठवाडा विभागातील जिल्ह्यांचे सामाजिक व आर्थिक समालोचन

३.१ प्रस्तावना

३.१.१ प्रशासकीय विभाग

३.१.२ लोकसंख्या

३.१.३ कृषी

३.१.४ जलसिंचन

३.१.५ पशुधन

३.१.६ वाहतूक व दळणवळण

३.१.७ सहकार

३.१.८ आरोग्य

३.१.९ शिक्षण

३.१.१० रोजगाार निर्मिती

३.१.११ कर्मचारी गणना

३.२ औरंगाबाद जिल्हा

३.३ जालना जिल्हा

३.४ परभणी जिल्हा

३.५ हिंगोली जिल्हा

३.६ बीड जिल्हा

३.७ नांदेड जिल्हा

३.८ लातूर जिल्हा

३.९ उस्मानाबाद जिल्हा

समारोप

संदर्भ

प्रकरण तिसरे

# मराठवाडा विभागातील जिल्ह्यांचे सामाजिक व आर्थिक समालोचन

## ३.१ प्रस्तावना :—

भारत हा देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला आणि त्यावेळेस भारतामध्ये असलेल्या ५६५ छोटया—मोठया संस्थानापैकी ५६२ संस्थानांनी स्वातंन्त्र्योत्तर भारतीय संघ राज्यात विलीन होण्यास मान्यता दिली. ज्या संस्थानांनी भारतीय संघ राज्यात विलीन होण्यास नकार दिला त्यामध्ये काश्मीर, जुनागढ व हैद्राबाद हे तीन संस्थाने होती.

हैद्राबाद संस्थानावर निजामाचे राज्य होते. हैद्राबाद संस्थानामध्ये त्यावेळच्या मराठवाडयाचे पाच जिल्हे, कर्नाटकचे तीन जिल्हे आणि आंध्र प्रदेशातील तेलंगणाचे नऊ जिल्हे असे एकूण सतरा जिल्ह्यांचा समावेश होता. भारतामध्ये सामील होण्यास नकार देणाऱ्या निजाम सरकार विरुध्द त्यावेळचे भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद संस्थानामध्ये भारतीय सैनिक घुसविले. या कारवाईला 'पोलिस ॲक्शन' म्हणतात. दि. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजाम संस्थानने शरणागती पत्करुन हैद्राबाद संस्थान भारतामध्ये विलीन झाले.

मराठवाडयाचे त्यावेळचे पाच जिल्हे दि. १नोव्हेंबर १९५६ रोजी भारताच्या 'हैद्राबाद स्टेट' मधून 'बॉम्बे स्टेट' मध्ये विलीन करण्यात आले. दि. १ मे १९६० मध्ये 'बॉम्बे स्टेट' चे विभाजन गुजरात आणि महाराष्ट्र अशा दोन वेगवेगळया राज्यामध्ये करण्यात आले आणि तेंव्हापासून मराठवाडा महाराष्ट्राचा अविभाज्य घटक म्हणून बनून राहिला आहे.

मराठवाडयातील या पाच जिल्ह्यांचा विस्तार होऊन आठ जिल्हे तयार झाले. त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन दि. १ मे १९८२ रोजी जालना हा जिल्हा वेगळा घोषित करण्यात आला. त्यानंतर उस्मानाबाद जिल्ह्याचे

विभाजन होऊन दि. १५ ऑगस्ट १९८२ रोजी लातूर हा वेगळा जिल्हा घोषित करण्यात आला आणि नंतर परभणी जिल्ह्याचे विभाजन करुन दि. १ मे १९९९ रोजी हिंगोली हा वेगळा जिल्हा घोषित करण्यात आला.

### ३.१.१ प्रशासकीय विभाग :—

मराठवाडा विभागात औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, लातूर, उस्मानाबाद असे एकूण आठ जिल्हे आहेत. औरंगाबाद हे मराठवाडा विभागाचे मुख्यालयाचे ठिकाण आहे. मराठवाडा विभागाचे एकूण भौगोलिक क्षेत्र ६५११२ चौ.कि.मी. आहे. या विभागात बीड जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र सर्वाधिक १०६९२ चौ.कि.मी. आहे. तर सर्वात कमी ४८२७ चौ.कि.मी. क्षेत्र हिंगोली या जिल्ह्याचे आहे. या विभागामध्ये एकूण २ महानगरपालिका असून ८ जिल्हापरिषदा, ७४ पंचायत समित्या, ५१ नगर पालिका, १ कटक मंडळ व ६६४७ ग्रामपंचायती कार्यरत आहेत.

### ३.१.२ लोकसंख्या :—

जनगणना २०११ प्रमाणे मराठवाडा विभागाची एकूण लोकसंख्या १.८७ कोटी आहे. त्यापैकी पुरुष ९७.२४ लाख व स्त्रिया ९०.०२ लाख आहेत. विभागातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत औरंगाबाद जिल्ह्याची लोकसंख्या ३६.९५ लाख असून ती सर्वाधिक आहे. विभागाची एकूण साक्षरता (२०११) प्रमाणे ७६.३८% आहे. त्यापैकी पुरुष ८६.२८% व स्त्रिया ६५.८४% साक्षर आहेत.
विभागामधे इतर जिल्ह्याच्या तुलनेत औरंगाबाद जिल्ह्याची साक्षरता सर्वात जास्त ८०.४०% आहे तर सर्वात कमी साक्षरतेचे प्रमाण बीड या जिल्ह्यात ७३.५८% आहे.

### ३.१.३ कृषी :—

वर्ष २०१०—११ मध्ये मराठवाडा विभागात एकूण पिकाखालील क्षेत्र ६०९१ हजार हेक्टर होते. त्यापैकी अन्नधान्य पिकाखालील क्षेत्र ३६३४ हजार हेक्टर आहे.

### ३.१.४ जलसिंचन :—

सन २००१—०२ मध्ये जलसिंचनाखालील क्षेत्र ७६७ हजार हेक्टर असून परभणी जिल्ह्याचे क्षेत्र २०८ हजार हेक्टर हे विभागात सर्वात जास्त आहे. तर सर्वात कमी सिंचन क्षेत्र २९ हजार हेक्टर हे हिंगोली जिल्ह्यात आहे. या विभागात सन २००९—२०१० मधे एकूण १५ मोठे प्रकल्प व ७७ मध्यम प्रकल्प आहेत.

### ३.१.५ पशुधन :—

सन २००७ च्या पशुगणना प्रमाणे या विभागात एकूण पशुधन ७३.५७ लाख आहे. त्यापैकी सर्वाधिक पशुधन बीड जिल्ह्यात १३.५९ लाख आहे.

### ३.१.६ वाहतूक व दळणवळण :—

सन २०१०—११ मध्ये विभागामध्ये एकूण रस्त्याची लांबी ५६४३४ कि. मी. आहे. त्यापैकी सर्वात जास्त लांबी नांदेड जिल्ह्यामध्ये १०६२६ कि.मी. होती तर सर्वात कमी रस्त्याची लांबी हिंगोली जिल्ह्यामध्ये ४०५४ कि. मी. होती तसेच विभागामध्ये रेल्वे मार्गाची एकूण लांबी १०११ कि.मी. असून त्यापैकी सर्वात जास्त लांबी २५९ कि.मी. परभणी जिल्ह्यामध्ये आहे.

### ३.१.७ सहकार :—

सन २०१०—११ मध्ये विभागामध्ये एकूण प्राथमिक कृषी पतसंस्था ४९४० आहेत. त्यातील सभासद २८.११ लाख आहेत.

### ३.१.८ आरोग्य :—

सन २०१०—११ मध्ये विभागामध्ये एकूण १३९ दवाखाने, १३६ रुग्णालये, ३६३ प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्यामध्ये डॉक्टर संख्या १४०८ एवढी आहे.

### ३.१.९ शिक्षण :—

सन २०१०—११ मध्ये विभागामध्ये एकूण प्राथमिक शाळा १५१७१ असून त्यातील विद्यार्थी संख्या २४.५६ लाख एवढी आहे. तसेच शिक्षक संख्या ८००१२ एवढी आहे. त्याच प्रमाणे माध्यमीक शाळांची एकूण संख्या

४६९५ एवढी असून त्यातील विद्यार्थी संख्या १८.०५ लाख व शिक्षक संख्या ५६८८६ एवढी आहे.

### ३.१.१० रोजगाार निर्मिती :—

सन २०१०—११ मध्ये मराठवाडा विभागामध्ये सेवायोजन केंद्रात एकूण नोंदणी पटावर नाव नोंदविलेल्या अर्जदारांची एकूण संख्या ५.२८ लाख एवढी आहे.

### ३.१.११ कर्मचारी गणना :—

सन २००८ मराठवाडा विभागामध्ये एकूण राज्य शासकीय कर्मचा—यांची संख्या ९०५०३ एवढी आहे. तसेच जि. प. कर्मचारी संख्या ९७७१४ एवढी व नगर परिषद कर्मचारी संख्या ९४१८ एवढी आहे. महानगरपालिका कर्मचारी संख्या ५४३३ एवढी आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये मराठवाडयातील ८ जिल्ह्यांचे संक्षिप्त रुपाने सामाजिक व आर्थिक समालोचन करत आहे.

## ३.२. औरंगाबाद जिल्हा :—

### ३.२.१ इतिहास :—

औरंगाबादचे जुने नाव खडकी हे होते. १६०४ मध्ये मलिक अंबरने या शहराची स्थापना केली. याला १६२६ साली फतेहपूर असे नाव देण्यात आले होते. १६५३ साली औरंगजेबाने यावर कब्जा मिळवला. तेंव्हापासून या शहराला औरंगाबाद या नावाने ओळखले जाते. हे क्षेत्र इतिहासात सातवाहन व कातकाडा, चालुक्य, राष्ट्रकुल, यादव, निजाम इ. राजवटीच्या सत्तेत अंतर्भूत होते. मध्ययुगात येथे यादव घराण्याची सत्ता होती. ही जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी होय. तसेच या जिल्ह्यास चक्रधर स्वामी, बहिणाबाई, एकनााथ, मुक्तेश्वर अशा व्यक्तींची शिकवण लाभली. मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास या जिल्ह्याला जोडलेला आहे.

### ३.२.२ भौगोलिक परिस्थिती :—

**१) स्थान :—** हा जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागात असून उत्तरेस जळगाव जिल्हा, पुर्वेस जालना जिल्हा आणि दक्षिणेस बीड व अहमदनगर तर पश्चिमेस अहमदनगर, नाशिक या जिल्ह्यांच्या सीमा जोडलेलया आहेत.

**२) औरंगाबाद जिल्ह्याचे क्षेत्रफळ :—** १०,१०६ चौ. कि. मी. आहे. तालुके :— १) औरंगाबाद, २) खुल्ताबाद, ३) सोयगाव, ५) सिल्लोड, ६) पैठण, ७) गंगापूर, ८) वैजापूर, ९) फुलंब्री. असे एकूण नऊ तालुके आहेत.

वरील पैकी फुलंब्री हा नवीन तालुका, तालुका पुनर्रचनेच्या मार्गाने २६ जुन १९९९ पासून अस्तित्वात आला आहे.

**३) प्राकृतिक रचना :—** जिल्ह्यातील अगदी उत्तरेकडील अजिंठा पर्वत पायथ्याचा अरुंद पट्टा, अजिंठा—सातमाळा डोंगरांचा व डोंगराळ व पठारी प्रदेश आणि गोदावरी खोऱ्याचा सखल मैदानी प्रदेश अशी औरंगाबाद जिल्ह्याची सर्वसाधारण रचना आहे.

**४) मृदा :—** जिल्ह्यातील बहुतांश मृदा बेसाल्ट या अग्निजन्य खडकापासून तयार झाली असून ती काळसर रंगाची आहे. ही मृदा कसदार असून ती रेगूर

या नावाने ओळखली जाते. जिल्ह्यातील मृदेचा पोत व प्रत वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळी आहे. जिल्ह्याच्या उत्तर—पश्चिम भागातील मृदा हलक्या प्रतीची असून गोदावरी व तिच्या उपनद्यांच्या काठावरील मृदा खोल व सुपीक आहे.

५) **हवामान :—** नैऋत्य मोसमी वाऱ्यांपासून पडणाऱ्या पावसाचा कालावधी वगळता जिल्ह्यातील सर्वसाधारणपणे हवामान उष्ण व कोरडे आहे. जिल्ह्यात जूनच्या मध्यापासून सप्टेंबरच्या मध्यापर्यंत नैऋत्य मौसमी वाऱ्यांपासून पाऊस पडतो. या काळात हवेत काहीशी आर्द्रता व गारवा असतो. उन्हाळा कडक असतो. जिल्ह्यात पाऊस कमी प्रमाणात व अनियीमत स्वरुपात पडतो. या पावसाचे वितरणही असमान आहे.

६) **नद्या :—** गोदावरी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी असून पुर्णा, तापी, गल्हाटी, शिवना, खाम, दूधना, वाघूर, गिरजा या नद्या आहेत.

७) **धरणे :—** जायकवाडी हा राज्यातील सर्वात मोठा बहुउद्देशिय प्रकल्प औरंगाबाद जिल्ह्यात असून ते गोदावरी नदीवर पैठण जवळ बांधले आहे. या प्रकल्पाशिवाय शिवना नदीवर कन्नड तालुक्यात गडदगड येथे धरण बांधण्यात आले आहे. वैजापूर तालुक्यात बोर व ढेकू या नाल्यावर बंधारे असून कोल्ही येथे एक धरण बांधण्यात आले आहे. औरंगाबाद जवळ खाम नदीवर एक बंधारा असून सिल्लोड तालुक्यात खेळणा नदीवर धरण बांधण्यात आले आहे.

### ३.२.३ प्रशासकीय विभाग :—

औरंगाबाद जिल्ह्यामध्ये ९ तालुके असून, शहरांची संख्या ९ आहे. गावांची संख्या १३४४ आहे. पंचायत समित्या ९ असून ग्रामपंचायतीची संख्या ८५८ आहे. महानगर पालिका संख्या १ तर नगर पालिका संख्या ६ आहे.

### ३.२.४ लोकसंख्या व घनता :—

सन २०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३६.९५ लाख एवढी होती त्या पैकी ६२.४८% ग्रामीण तर ३७.५२% नागरी लोकसंख्या आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी पुरुषांची संख्या १९.२८ लाख व स्त्रियांची संख्या १७.३७ लाख आहे. त्याच प्रमाणे जिल्ह्यामध्ये दर हजार पंरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९१७ एवढे आहे. महाराष्ट्रातील हेच प्रमाण

९२५ एवढे आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येच्या घनतेचा विचार केल्यास प्रतिचौरस किलोमिटर मागे ३६५ एवढी घनता आहे. ती महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येच्या घनता एवढी आहे.

**१) अनुसूचित जाती व जमातीची संख्या :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी १३% होती. तर एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जमातीची लोकसंख्येची टक्केवारी ३.५०% एवढी होती.

**२) कामगार संख्या :—** सन २००१ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद जिल्ह्यातील कामगारांची (मुख्यतः व सिमांतीक) श्रमीक संख्या १३.२८ लाख असून या कामगारांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ४५.८४% एवढे आहे. एकूण मुख्यतः कामगारांपैकी शेतकरी ३७.४६%, शेतमजूर २४.६३%, घरगुती उद्योग, वस्तु निर्माण प्रक्रिया, सेवा व दुरूस्त्या इ. मध्ये १.६% व इतर काम करणारे ११.१२% व सिमांतिक काम करणारे १२.८२% श्रमिक आहेत.

**३) साक्षरता :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद जिल्ह्यातील साक्षरतेची टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या ८०.४०% असून या पुरूष ८९.३१% तर स्त्रियांचे प्रमाण ७०.८१% आहे. महाराष्ट्र राज्याचे एकूण साक्षरतेचे प्रमाण ८२.९१% आहे. म्हणजेच औरंगाबाद जिल्ह्याची साक्षरतेची टक्केवारी राज्य स्तरापेक्षा थोडी कमी आहे.

## ३.२.५ शेती :—

औरंगाबाद जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १००८ हजार हेक्टर आहे. त्यापैकी जंगलव्याप्त क्षेत्र ८१ हजार हेक्टर म्हणजेच ८.०४% एवढे आहे. पिकाखालील निव्वळ क्षेत्र ७५९ हजार हेक्टर आहे. यामध्ये २०० हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे. एकूण सिंचन क्षेत्राचे पिकाखाली एकूण क्षेत्राशी प्रमाण २६.४०% आहे. जिल्ह्यामध्ये पर्जन्यमान फारच कमी आहे.

**१) पीक रचना :—** जिल्ह्यामध्ये खरीप व रब्बी अशी दोन्ही पिके घेतली जातात. दोन्ही हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांमध्ये सर्वात जास्त क्षेत्र अन्नधान्याचे असून, सन २०१०—११ मध्ये अन्नधान्याच्या पिकाखाली ४८४

हजार हेक्टर क्षेत्र होते. त्यानंतर कापूस पिकाखाली ३४३ हजर हेक्टर, ऊस पिकाखाली १७ हजार हेक्टर तर तेल बिया पिकाखाली १८ हजार हेक्टर क्षेत्र होते.

**२) पीक उत्पादन :—** औरंगाबाद जिल्ह्यामध्ये सन २००८—०९ मध्ये तृणधान्याचे ८५८ हजार मे. टन उत्पादन झाले. कडधान्ये ९१ हजार मे. टन, कापूस ६८५ हजार मे. टन, ऊस ४९८ हजार मे. टन मर तेलबियाचे ७ हजार मे. टन उत्पादन झाले.

**३) पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय सेवा व दुग्ध व्यवसाय :—** शेतीबरोबरच दुग्ध व्यवसाय सुध्दा जिल्ह्यातील महत्वाचा व्यवसाय असून, शासनाने दिलेल्या प्रोत्साहनामुळे जिल्हयातील दुग्ध उत्पादनात वाढ होत आहे. सन २००७ मध्ये औरंगाबाद जिल्ह्यात १० लाख ९७ हजार एकूण पशुधन होते. या पशुधनाची संख्या विचारात घेता शासनाने ६ सर्व चिकित्सालये, ११७ दवाखाने यांची सोय केली होती.

### ३.२.६ सहकार संस्था व सभासद :—

औरंगाबाद जिल्ह्यामध्ये मार्च २०११ मध्ये एकूण सहकारी संस्थांची संख्या ७९६८ एवढी होती. व सभासद संख्या १२ लाख ७९ हजार इतकी होती. या सहकारी संस्थांमध्ये प्राथमिक, कृषी, पतसंस्था संख्या ७०२, सभासद संख्या ४ लाख ३९ हजार होती. त्यांनी २२३.८२ कोटी कर्जपुरवठा केला. बिगर शेती पतसंस्था ७०३, सहकारी पणन संस्था १६, सहकारी दुग्ध संस्था ११३१, सामाजिक सेवा संस्था ३३८९, उत्पादक संस्था २०४३ इ. सहकारी संस्था होत्या.

### ३.२.७ विद्युतीकरण व विद्युत पुरवठा :—

औरंगाबाद जिल्ह्यामध्ये मार्च २०११ अखेर या वर्षात एकूण विजेचा वापर ८८६१.८० लाख कि. वॅट तास होता. त्यामध्ये घरगुती वापर १४५७.४० लाख कि. वॅट तास, कृषि साठी २८०४.५० लाख कि. वॅट तास तर औद्योगिककरणासाठी ४५९९.९० लाख कि. वॅट तास वापर झाला.

### ३.२.८ औद्योगिक स्थिती :—

औरंगाबाद जिल्ह्यात चिखलठाणा (ता. औरंगाबाद), वाळुज (ता. गंगापूर), चितेगाव (ता.पैठण) व पैठण येथे औद्योगिक वसाहती आहेत. खुल्ताबाद आणि सोयगाव येथे लघु औद्योगिक क्षेत्र आहेत. कागजीपुरा येथील हातमाग उद्योग, विडी उद्योग, पैठणी, हिमरू व रेशमी कापडासारखे व नक्षीकाम उद्योग, गुऱ्हाळ, तेलघाणा चालवणे, विटा तयार करणे, कातडी कमावणे या सारखे छोटे उद्योग आहेत.

जिनिंग व प्रेसिंग कारखाने, कापड गिरणी, तेल गिरण्या, साखर कारखाने आहेत. याशिवाय स्कूटर, यंत्रे, रासायनिक पदार्थ, औषधे, सुटकेस, प्लास्टिकच्या वस्तू, दूरदर्शन संच तयार करण्याचे कारखाने इ. मोठे उद्योगही आहेत.

सन २००८—०९ मध्ये जिल्हयात नोंदणीकृत कारखान्यांची संख्या ८७४ होती. कामगार संख्या ५४६६७ एवढी होती. साखर कारखाने ८ तर सूत गिरण्यांची संख्या १ एवढी होती.

### ३.२.९ वाहतूक व दळणवळण :—

जिल्ह्यात एकही राष्ट्रीय महामार्ग नाही. मनमाड—काचीगुडा हा रूंदमापी लोहमार्ग औरंगाबाद मार्गे पुढे जातो. औरंगाबादहून अहमदनगर, जालना, जळगाव, चाळीसगाव, येवला असे चहुदिशांना राज्य रस्ते जातात. औरंगाबाद जवळ चिखलठाणा येथे विमानतळ आहे.

जिल्ह्यात १०२ कि.मी. लांबीचा रेल्वे मार्ग आहे. एकूण रस्ते लांबी ९८२५ कि.मी. आहे. पोष्ट कार्यालयाची संख्या ३३६ आहे.

### ३.२.१० कामगार व रोजगार :—

सन २००८—०९ या वर्षात जिल्ह्यात शासकीय कर्मचारी संख्या २२१८४ होती. जिल्हा परिषद कर्मचारी संख्या १२२०० होती. नगर परिषद कर्मचारी संख्या ७८३ होती तर महानगर कर्मचारी संख्या ३५४५ एवढी होती.

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात रोजगार हमी योजना व्दारे १६.३४ लाख लोकांना रोजगार मिळाला, तर सेवायोजन केंद्रात १ लाख २२ हजार लोकांनी नाव नोंदणी केली होती.

### ३.२.११ बँका :—

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात एकूण बँकांची संख्या ३४५ एवढी होती. त्यामध्ये १३५ सहकारी बँक शाखा होत्या. या सर्व बँकातील ठेवी ११५१ कोटी रू. एवढी होती.

### ३.२.१२ शैक्षणिक सुविधा — प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन :—

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या ३१६२ होती. विद्यार्थी संख्या ४.४० लाख एवढी होती. शिक्षक संख्या १६३२५ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या २७ एवढी होती.

माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांची संख्या ८७५ होती. विद्यार्थी संख्या २.९० लाख तर शिक्षक संख्या १०३२९ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या २८ एवढी होती.

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या २२१ एवढी होती. विद्यार्थी संख्या ९४ हजार होती. अभियांत्रिकी महाविद्यालये १५ एवढी होती.

### ३.२.१३ वैद्यकिय सेवा :—

सन २०१०—११ मध्ये औरंगाबाद जिल्ह्यात सार्वजनिक रूग्णालयांची संख्या ५० एवढी होती. दवाखाने १९, प्राथमिक आरोग्य केंद्र संख्या ६५ एवढी होती.

### ३.२.१४ यात्रा व पर्यटन स्थळे :—

जिल्ह्यामधे औरंगाबाद, दौलताबाद, खुल्ताबाद, म्हैसमाळ, वेरूळ, पैठण, आपेगाव, कन्नड, इ. ठिकाणे यात्रा व पर्यटनांसाठी प्रसिध्द आहेत.

## ३.३ जालना जिल्हा :—

### ३.३.१ इतिहास :—

या जिल्हयाची निर्मिती ही औरंगाबाद व परभणी जिल्ह्याची पुनर्रचना करण्यात येवून दि. १ मे १९८१ रोजी महाराष्ट्र दिनाचा मुहूर्त साधून 'जालना' या नव्या जिल्हयाची निर्मिती केली गेली. हे शहर कुंडलिका नदिच्या काठावर वसलेले आहे. या जिल्ह्याचा इतिहास म्हणजे मराठवाडयाचा इतिहास होय. या शहराविषयीचे कांही संदर्भ ऐन—ए—अकबरी मध्ये सापडतात. अकबर आणि औरंगजेब यांनी या शहराला भेट दिल्याचा उल्लेख आढळतो.

### ३.३.२ भौगोलिक परिस्थिती :—

**१) स्थान :—** जालना जिल्ह्यास सर्वसाधारणत: राज्यातील मध्यवर्ती म्हणावे असे स्थान लाभले आहे. जालना जिल्ह्याच्या उत्तरेस जळगाव जिल्हा असून ईशान्येस व काहिशा पूर्वेस बुलढाणा जिल्हा आहे. परभणी जिल्हा जालना जिल्ह्याच्या पूर्वेस पसरलेला असून दक्षिणेस बीड जिल्हा आहे. राज्याच्या एकूण भू—क्षेत्राच्या २.५ टक्के भू—क्षेत्र या जिल्हयाच्या वाटेस आले आहे.

जिल्ह्याचे जालना व परतूर असे दोन प्रशासकिय उपविभाग उपजिल्हे आहेत. जालना जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७७१८ चौ.कि.मी. आहे.

**२) तालुके :—** १) जालना, २) अंबड, ३) भोकरदन, ४) जाफराबाद, ५) परतूर, ६) बदनापूर, ७) मंठा, ८) घनसावंगी. असे एकूण आठ तालुके आहेत.

पूर्वी जिल्ह्यात जालना, अंबड, भोकरदन, जाफराबाद, परतूर, हे पाचच तालूके होते. परंतु तालुक्याची पुनर्रचना करण्यात येवून १५ ऑगस्ट १९९२ रोजी बदनापूर, मंठा, घनसावंगी हे तीन नवीन तालुके निर्माण करण्यात आले आहेत.

**३) प्राकृतिक रचना :—** दख्खनच्या पठारावर वसलेल्या या जिल्ह्याचा बहुतेक भाग मैदानी स्वरूपाचा आहे. जिल्ह्याच्या उत्तरेकडील व वायव्येकडील भागात अजिंठयाचे डोंगर पसरलेले आहेत. कांही टेकडयांचा अपवाद वगळता उर्वरित पठार सखल व मैदानी स्वरूपाचे आहे. अजिंठयाच्या डोंगराळ भागात या

पठाराची उंची समुद्रसपाटी पासून ६०० ते ९०० मीटर इतकी असून मध्य भाग समुद्रसपाटी पासून १५० ते ३०० मीटर उंचीवर आहे. गोदावरी व दुधना नदीच्या खो—यात या पठाराची समुद्रसपाटी पासूनची उंची ३०० ते ६०० मीटर इतकी आहे.

**४) मृदा :—** रेगूर या नावाने ओळखली जाणारी काळी कसदार मृदा जिल्ह्यातील बहुतेक भागात आढळते. ही मृदा कापसासाठी अतिशय उपयुक्त आहे. उत्तरेकडील भोकरदन व जाफराबाद या तालुक्यातील तसेच जालन्याच्या उत्तर भागातील मृदा हलक्या प्रतीची आहे. अंबड, मंठा व परतुर या तालुक्यामधील नदीकाठची मृदा अधिक जाडीची व अधिक उपजाऊ आहे.

**५) हवामान :—** जिल्ह्याचे हवामान उष्ण व कोरडे आहे. येथे उन्हाळयात ४१ अंश से. इतके तापमान असते. जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी असून सरासरी ७० से.मी. इतका पाऊस होतो. गोदावरी ही जिल्ह्यातील मुख्य नदी आहे.

**६) नद्या :—** गोदावरी, पुर्णा, गल्हाटी, दूधना, कुंडलीका, खेळणा, कल्याण, जिवरेखी, जुई, धामणा, गिरजा या नद्या आहेत.

**७) धरणे :—** जिल्ह्यात मोठा प्रकल्प नाही तथापि जायकवाडी प्रकल्पाचा लाभ जिल्ह्यास होतो. जाफराबाद तालुक्यातील जिवरेखा, अंबड तालुक्यातील गल्हाटी, भोकरदन तालुक्यातील जुई व धामणा, जालना तालुक्यातील दुधना, कल्याण, पीर कल्याण व कल्याण गिरजा ही जिल्ह्यातील नाव घेण्याजोगी धरणे होत.

### ३.३.३ प्रशासकीय विभाग :—

जालना जिल्ह्यामध्ये ८ तालुके असून, शहरांची संख्या ४ आहे. गावांची संख्या ९७१ आहे. पंचायत समित्या ८ असून ग्रामपंचायतीची संख्या ७८१ आहे. नगर पालिका संख्या ४ आहे.

### ३.३.४ लोकसंख्या व घनता :—

सन २०११ च्या जनगणनेनुसार जालना जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १९.५८ लाख एवढी होती. त्या पैकी ८०.९६% ग्रामीण तर १९.११% नागरी

लोकसंख्या आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी पुरुषांची संख्या १०.१५ लाख व स्त्रियांची संख्या ९.४३ लाख आहे. त्याच प्रमाणे जिल्ह्यामध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९२९ एवढे आहे. महाराष्ट्रातील हेच प्रमाण ९२५ एवढे आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येच्या घनतेचा विचार केल्यास प्रतिचौरस किलोमिटर मागे २५५ एवढी घनता आहे. ती महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येच्या घनतेपेक्षा कमी आहे.

**१) अनुसूचित जाती व जमातीची संख्या :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार जालना जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी ११.२२% होती. तर एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जमातीची लोकसंख्येची टक्केवारी २.०% एवढी होती.

**२) कामगार संख्या :—** सन २००१ च्या जनगणनेनुसार जालना जिल्ह्यातील कामगारांची (मुख्यत: व सिमांतीक) श्रमिक संख्या ७.१७ लाख असून या कामगारांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ४४.४७% एवढे आहे. एकूण मुख्यत: कामगारांपैकी शेतकरी ४७.७१%, शेतमजूर २९.२४%, घरगुती उद्योग, वस्तु निर्माण प्रक्रिया, सेवा व दुरूस्त्या इ. मध्ये १.६३% व इतर काम करणारे २१. ४०% व सिमांतिक काम करणारे १४.६४% श्रमिक आहेत.

**३) साक्षरता :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार जालना जिल्ह्यातील साक्षरतेची टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या ७३.६१% असून यात पुरूष ८५.२५% तर स्त्रियांचे प्रमाण ६१.२८% आहे. महाराष्ट्र राज्याचे एकूण साक्षरतेचे प्रमाण ८२. ९१% आहे. म्हणजेच जालना जिल्ह्याची साक्षरतेची टक्केवारी राज्य स्तरापेक्षा थोडी कमी आहे.

## ३.३.५ शेती :—

जालना जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ७७३ हजार हेक्टर आहे. त्यापैकी जंगलव्याप्त क्षेत्र ७ हजार हेक्टर म्हणजेच ०.९१% एवढे आहे. पिकाखालिल निव्वळ क्षेत्र ६११ हजार हेक्टर आहे. यामधे ९२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचना खाली आहे. एकूण सिंचन क्षेत्राचे पिकाखालील एकूण क्षेत्राशी प्रमाण १२.५५% आहे. जिल्ह्यामध्ये पर्जन्यमान फारच कमी आहे.

**१) पीक रचना :—** जिल्ह्यामध्ये खरीप व रब्बी अशी दोन्ही पिके घेतली जातात. दोन्ही हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांमध्ये सर्वात जास्त क्षेत्र कापूस या पिकाचे असून सन २०१०—११ मध्ये कापूस पिकाखाली २८९ हजार हेक्टर क्षेत्र होते. त्यानंतर अन्नधान्य पिकाखाली २४९ हजार हेक्टर क्षेत्र, ऊस पिकाखाली १८ हजार हेक्टर तर तेल बिया पिकाखाली ५५ हजार हेक्टर क्षेत्र होते.

**२) पीक उत्पादन :—** जालना जिल्ह्यामध्ये सन २००८—०९ मध्ये तृणधान्याचे २४४ हजार मे. टन उत्पादन झाले. कडधान्ये १२८ हजार मे. टन, कापूस ४१५ हजार मे. टन, ऊस १६२१ हजार मे. टन तर तेलबियाचे ६५ हजार मे. टन उत्पादन झाले.

**३) पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय सेवा व दुग्ध व्यवसाय :—** शेतीबरोबरच दुग्ध व्यवसाय सुध्दा जिल्ह्यातील महत्वाचा व्यवसाय असून, शासनाने दिलेल्या प्रोत्साहनामुळे जिल्ह्यातील दुग्ध उत्पादनात वाढ होत आहे. सन २००७ मध्ये जालना जिल्हयात ७.७८ लाख एकूण पशुधन होते. या पशुधनाची संख्या विचारात घेता शासनाने १ सर्व चिकित्सालये, ९३ दवाखाने यांची सोय केली होती.

### ३.३.६ सहकार संस्था व सभासद :—

जालना जिल्ह्यामध्ये मार्च २०११ मध्ये एकूण सहकारी संस्थांची संख्या २९९३ एवढी होती. व सभासद संख्या ६ लाख ५१ हजार इतकी होती. या सहकारी संस्थांमध्ये प्राथमिक, कृषी सहकारी, पतसंस्था संख्या ५६४, सभासद संख्या ३ लाख ८४ हजार होती. त्यांनी १०५.९७ कोटी कर्जपुरवठा केला. बिगर शेती पतसंस्था १७९, सहकारी पणन संस्था ९, सहकारी दुग्ध संस्था ४५५, सामाजिक सेवा संस्था १२६१, उत्पादक संस्था ९७० इ. सहकारी संस्था होत्या.

### ३.३.७ विद्युतीकरण व विद्युत पुरवठा :—

जालना जिल्ह्यामध्ये मार्च २०११ अखेर या वर्षात एकूण विजेचा वापर १९१९ लाख कि. वॅट तास होता. त्यामधे घरगुती वापर ८८९.८० लाख कि.

वॅट तास, कृषी साठी ७६४.२० लाख कि. वॅट तास तर औद्योगिककरणासाठी २६५.०० लाख कि. वॅट तास वापर झाला.

## ३.३.८ औद्योगिक स्थिती :—

जालना जिल्हा औद्यागिक दृष्टया मागास असल्याने उद्योगधंद्याच्या विकासासाठी प्रयत्न केले जात आहेत. जालाना जिल्हयाचे ८५% क्षेत्र कृषी लागवडी खाली आहे. जालना जिल्ह्यातील महिको बियाणे हे हायब्रिड बियाण्याचे उत्पादक आहेत. जिल्ह्यामध्ये स्टील उद्योगही मोठया प्रमाणावर आहे. जालना आणि आष्टीमध्ये हातमाग आणि यंत्रमागाचा उपयोग मोठया प्रमाणात आहे. जालन्यात बिडी व्यवसाय आणि खाद्य तेल गिरण्या मोठया प्रमाणावर चालतात. जालना येथे एम. आय. डी. सी. उद्योगामुळे औद्योगिक केंद्र विकसित झाले आहे.

सन २००८—०९ मध्ये जिल्ह्यात नोंदणीकृत कारखान्यांची संख्या २७६ होती. कामगार संख्या ६६३५ एवढी होती. साखर कारखाने ६ तर सूत गिरण्यांची संख्या ४ एवढी होती.

## ३.३.९ वाहतूक व दळणवळण :—

जिल्ह्यात एकही राष्ट्रीय महामार्ग नाही. मनमाड—काचीगुडा हा लोहमार्ग जिल्ह्याच्या मध्यातून जातो. हा मार्ग जालन्या पर्यंत रूंदमापी असून पुढे मीटर मापी आहे. जालन्याहून औरंगाबाद, खामगाव, हिंगोली व बीड कडे राज्य रस्ते जातात. जिल्ह्यात ८८ कि. मी. लांबीचा रेल्वे मार्ग आहे. एकूण रस्ते लांबी ४४०६ कि.मी. आहे. पोष्ट कार्यालयाची संख्या २०७ आहे.

## ३.३.१० कामगार व रोजगार :—

सन २००८—०९ या वर्षात जिल्ह्यात शासकीय कर्मचारी संख्या ८१७४ होती. जिल्हा परिषद कर्मचारी संख्या १०३७५ होती. नगर परिषद कर्मचारी संख्या ८८९ होती. सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात रोजगार हमी योजना व्दारे ३.२२ लाख लोकांना रोजगार मिळाला, तर सेवायोजन केंद्रात ३२७५२ हजार लोकांनी नाव नोंदणी केली होती.

### ३.३.११ बँका :—

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात एकूण बँकांची संख्या १४५एवढी होती. त्यामध्ये ७१सहकारी बँक शाखा होत्या. या सर्व बँकातील ठेवी १८७५ कोटी रू. एवढी होती.

### ३.३.१२ शैक्षणिक सुविधा — प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन :—

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या १६६३ होती. विद्यार्थी संख्या २.३४ लाख एवढी होती. शिक्षक संख्या ६९५८ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या ३४ एवढी होती.

माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांची संख्या २५७ होती. विद्यार्थी संख्या १.९८ लाख तर शिक्षक संख्या ४३६८ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या ४९ एवढी होती.

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या ३० एवढी होती. विद्यार्थी संख्या ३७ हजार होती. अभियांत्रिकी महाविद्यालये १ एवढी होती.

### ३.३.१३ वैद्यकिय सेवा :—

सन २०१०—११ मध्ये जालना जिल्ह्यात सार्वजनिक रूग्णालयांची संख्या १२ एवढी होती. दवाखाने १२, प्राथमिक आरोग्य केंद्र संख्या ४० एवढी होती. दर लाख लोकसंख्येमागे खाटांची संख्या ४९ एवढी होती.

### ३.२.१४ यात्रा व पर्यटन स्थळे :—

जिल्ह्यामधे जालना, अंबड, जाम, भोकरदन, जाफराबाद, बदनापूर, टाके डोणगाव, मंठा, राजुर, परतूर, ही जिल्ह्यातील प्रमुख स्थळे आहेत.

## ३.४ परभणी जिल्हा :—

### ३.४.१ इतिहास :—

परभणी जिल्ह्यामध्ये प्रभावती देवीचे ऐतिहासीक मंदिर असून या मंदिरावरून शहराचे नाव 'परभणी' असे ठेवले गेले. संत जनाबाई यांचा जन्म या जिल्ह्यातील गंगाखेड येथे झाला. या जिल्ह्याचे मुख्यालय परभणी शहर असून, मराठवाडयातील अनेक जिल्हयांप्रमाणे हा ही जिल्हा निजाम राजवटीचा भाग होता. या जिल्ह्याचे दि. १ मे १९९९ साली विभाजन करून यातून हिंगोली या नवीन जिल्ह्याची स्थापना झाली.

### ३.४.२ भौगोलिक परिस्थिती :—

**१) स्थान :—** मराठवाडा विभागातील दख्खनच्या पठारावरील गोदावरीच्या खोऱ्यातील जिल्हा. हा जिल्हा राज्याच्या अग्नेय भागात वसला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस हिंगोली हा नवनिर्मित जिल्हा आहे. पूर्वेस नांदेड जिल्हा आहे. दक्षिणेस लातूर व बीड जिल्हा आहे. पश्चिमेस बीड व जालना हे जिल्हे आहेत. राज्याच्या एकूण भू भागापैकी जवळजवळ २.११ टक्के भू—भाग या जिल्ह्याच्या वाटेस आला आहे. प्रशासकिय सोयीसाठी जिल्ह्याचे दोन उपविभाग पाडले असून ते परभणी व सेलू असे आहेत. परभणी जिल्ह्याचे क्षेत्रफळ ६५१७ चौ. कि. मी. आहे.

**२) तालुके :—** १) परभणी, २) जिंतूर, ३) सेलू, ४) पाथ्री, ५) गंगाखेड, ६) पालम, ७) पूर्णा, ८) सोनपेठ, ९) मानवत असे एकूण नऊ तालुके आहेत.

दि. १ मे १९९९ साली परभणी जिल्ह्याचे विभाजन करून हिंगोली या नवीन जिल्ह्याची निर्मिती करण्यात आल्यानंतर परभणी जिल्ह्यात १) परभणी, २) जिंतूर, ३) सेलू, ४) पाथ्री, ५) गंगाखेड, ६) पालम, ७) पूर्णा, हे सातच तालुके उरले हाते. परंतु २६ जुन १९९९ रोजी जिल्ह्यातील तालुक्यांची पुनर्रचना करण्यात येऊन 'सोनपेठ' व 'मानवत' या दोन नव्या तालुक्याची निर्मिती करण्यात आल्याने परभणी जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या नऊ झाली.

**३) प्राकृतिक रचना :—** जिल्ह्याचा दक्षिण भाग मैदानी स्वरूपाचा असून दक्षिण सिमेवर बालाघाटचे डोंगर आहे. हा जिल्हा समुद्रसपाटी पासून सरासरी ४५८ मीटर उंचीवर आहे..

**४) मृदा :—** या जिल्ह्यातील मृदा काळी कसदार असून ती रेगूर या मृदा प्रकारातील आहे. गोदावरी खोऱ्यातील मृदा अधिक खोल व सुपिक आहे. या मृदेत लोह व कल्शिअमचे प्रमाण अधिक असून नायट्रोजन व सेंद्रिय द्रव्यांचे प्रमाण कमी आहे. डोंगराळ प्रदेशात या मृदेचा थर पातळ आहे.

**५) हवामान :—** जिल्ह्याचे हवामान उष्ण व कोरडे असून पावसाळयात उष्ण व दमट तर डिसेंबर ते फेब्रुवारी या काळात हवामान थंड व कोरडे असते. येथे उन्हाळयातील कमाल तापमान कधी कधी ४५ अंश से. च्या वर जाते. तर हिवाळयातील किमान तापमान कधी कधी १० अंश से. च्या खाली येते. जिल्हयातील सरासरी पर्जन्य ८३ से. मी. इतके आहे.

**६) नद्या :—** गोदावरी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी असून पूर्णा, मासळी, दूधना, कापरा, पैनगंगा, इ. नद्या आहेत.

**७) धरणे :—** जिल्ह्यात सर्वत्र विहीरी असून जिंतूर तालुक्यात कापरा नदीवर तर गंगाखेड तालुक्यात मासळी नदीवर धरणे आहेत. याच बरोबर बंधारे, तलावाव्दारेही जिल्ह्यात पाणी पुरवठा केला जातो. आणि गोदावरी नदीवरील एकमात्र बेट असलेले जांभुळबेट याच जिल्ह्यात आहे.

### ३.४.३ प्रशासकीय विभाग :—

परभणी जिल्ह्यामध्ये ९ तालुके असून, शहरांची संख्या ८ आहे. गावांची संख्या ८४१ आहे. पंचायत समित्या ९ असून ग्रामपंचायतीची संख्या ७०४ आहे. नगर पालिका संख्या ८ एवढी आहे.

### ३.४.४ लोकसंख्या व घनता :—

सन २०११ च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १८.३५ लाख एवढी होती. त्या पैकी ६८.२६% ग्रामीण तर ३१.७४% नागरी लोकसंख्या आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी पुरुषांची संख्या ९.४६

लाख व स्त्रियांची संख्या ८.८९ लाख आहे. त्याच प्रमाणे जिल्ह्यामध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९४० एवढे आहे. महाराष्ट्रातील हेच प्रमाण ९२५ एवढे आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येच्या घनतेचा विचार केल्यास प्रतिचौरस किलोमिटर मागे २९५ एवढी घनता आहे. ती महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येच्या घनते पेक्षा कमी आहे.

**१) अनुसूचित जाती व जमातीची संख्या :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी १०% होती. तर एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जमातीची लोकसंख्येची टक्केवारी २.३०% एवढी होती.

**२) कामगार संख्या :—** सन २००१ च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्यातील कामगारांची (मुख्यत: व सिमांतीक) श्रमिक संख्या ६.४५ लाख असून या कामगारांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ४२.२१% एवढे आहे. एकूण मुख्यत: कामगारांपैकी शेतकरी ३८.८३%, शेतमजूर ३५.३५%, घरगुती उद्योग, वस्तु निर्माण प्रक्रिया, सेवा व दुरूस्त्या इ. मध्ये १.२५% व इतर काम करणारे २५. १७% व सिमांतिक काम करणारे १३.१७% श्रमिक आहेत.

**३) साक्षरता :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्यातील साक्षरतेची टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या ७५.२२% असून यात पुरूष ८५.६६% तर स्त्रियांचे प्रमाण ६४.२७% आहे. महाराष्ट्र राज्याचे एकूण साक्षरतेचे प्रमाण ८२. ९१% आहे. म्हणजेच परभणी जिल्ह्याची साक्षरतेची टक्केवारी राज्य स्तरापेक्षा थोडी कमी आहे.

**३.४.५ शेती :—**

परभणी जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ६३१ हजार हेक्टर आहे. त्यापैकी जंगलव्याप्त क्षेत्र २८ हजार हेक्टर म्हणजेच ४.४४% एवढे आहे. पिकाखालिल निव्वळ क्षेत्र ८०७ हजार हेक्टर आहे. यामध्ये ७८ हजार हेक्टर क्षेत्र सिंचना खाली आहे. एकूण सिंचन क्षेत्राचे पिकाखालील एकूण क्षेत्राशी प्रमाण ९.७६% आहे. जिल्ह्यामध्ये पर्जन्यमान फारच कमी आहे.

**१) पीक रचना :—** जिल्ह्यामध्ये खरीप व रब्बी अशी दोन्ही पिके घेतली जातात. दोन्ही हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांमध्ये सर्वात जास्त क्षेत्र अन्नधान्य या पिकाचे असून सन २०१०—११ मध्ये अन्नधान्य पिकाखाली ५०७ हजार हेक्टर क्षेत्र होते. त्यानंतर कापूस पिकाखाली २०२ हजार हेक्टर क्षेत्र, ऊस पिकाखाली १७ हजार हेक्टर तर तेल बिया पिकाखाली १२२ हजार हेक्टर क्षेत्र होते.

**२) पिक उत्पादन :—** परभणी जिल्ह्यामध्ये सन २००८—०९ मध्ये तृणधान्यांचे २८६ हजार मे. टन उत्पादन झाले. कडधान्ये १३३ हजार मे. टन, कापूस ३७० हजार मे. टन, ऊस १३१० हजार मे. टन तर तेलबियाचे १४७ हजार मे. टन उत्पादन झाले.

**३) पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय सेवा व दुग्ध व्यवसाय :—** शेतीबरोबरच दुग्ध व्यवसाय सुध्दा जिल्ह्यातील महत्वाचा व्यवसाय असून, शासनाने दिलेल्या प्रोत्साहनामुळे जिल्ह्यातील दुग्ध उत्पादनात वाढ होत आहे. सन २००७ मध्ये परभणी जिल्ह्यात ८.११ लाख एकूण पशुधन होते. या पशुधनाची संख्या विचारात घेता शासनाने ५ सर्व चिकित्सालये, ३० दवाखाने यांची सोय केली होती.

### ३.४.६ सहकार संस्था व सभासद :—

परभणी जिल्ह्यामध्ये मार्च २०११ मध्ये एकूण सहकारी संस्थांची संख्या २४१० एवढी होती. व सभासद संख्या ४ लाख १२ हजार इतकी होती. या सहकारी संस्थांमध्ये प्राथमिक, कृषी सहकारी, पतसंस्था संख्या ४५५, सभासद संख्या २ लाख २७ हजार होती. त्यांनी ३०.२६ कोटी कर्जपुरवठा केला. बिगर शेती पतसंस्था २०५, सहकारी पणन संस्था १९, सहकारी दुग्ध संस्था २७३, सामाजिक सेवा संस्था १०३७, उत्पादक संस्था ६९५ इ. सहकारी संस्था होत्या.

### ३.४.७ विद्युतीकरण व विद्युत पुरवठा :—

परभणी जिल्ह्यामध्ये मार्च २०११ अखेर या वर्षात एकूण विजेचा वापर ३०८.२१ लाख कि. वॅट तास होता. त्यामध्ये घरगुती वापर १०५.३९ लाख

कि. वॅट तास, कृषी साठी १८६.९५ लाख कि. वॅट तास तर औद्योगिकीकरणासाठी १५.८७ लाख कि. वॅट तास वापर झाला.

**३.४.८ औद्योगिक स्थिती :—**

जिल्ह्यात परभणी, ताडकळस व सेलू येथे जिनिंग व प्रेसिंग कारखाने तर परभणी व सेलू मध्ये सुतगिरण्या व डाळीचे कारखाने आहेत. परभणी व गंगाखेड येथे तेलाच्या गिरण्या आहेत.

जिंतूर तालुक्यात रासायनिक खतांचा कारखाना तर देवनांद्रा व लोहगाव येथे साखर कारखाने आहेत. कापरा व मासळी येथे मत्स्य व्यवसाय चालतो. याच बरोबर हातमाग व यंत्रमागावर कापड विनण्याचा, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, कातडी कमाविणे इ. लघु उद्योगही चालतात.

सन २००८—०९ मध्ये जिल्हयात नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या ७२ होती. कामगार संख्या १७९० एवढी होती. साखर कारखाने ४ तर सूत गिरण्यांची संख्या २ एवढी होती.

**३.४.९ वाहतूक व दळणवळण :—**

जिल्ह्यात एकही राष्ट्रीय महामार्ग नाही. जालन्याहून येणारा मार्ग वसमत कडे गेला आहे. देवगाव, सेलू, पाथरी, मानवत, परभणी ही या मार्गावरील प्रमुख ठिकाणे होत. जिल्ह्यातून नांदेड कडे जाणा—या परळी, गंगाखेड, नांदेड या मार्गावर पालम व पुर्णा ही ठिकाणे आहेत. मनमाड — काचीगुडा हा लोहमार्ग जिल्ह्याच्या मध्यातून जातो. परभणी लोहमार्ग गंगाखेड मार्गे जिल्ह्यातून जातो. जिल्ह्यात २५९ कि. मी. लांबीचा रेल्वे मार्ग आहे. एकूण रस्ते लांबी ६२१२ कि.मी. आहे. पोष्ट कार्यालयाची संख्या १९४ आहे.

**३.४.१० कामगार व रोजगार :—**

सन २००८—०९ या वर्षात जिल्ह्यात शासकीय कर्मचारी संख्या ७४९३ होती. जिल्हा परिषद कर्मचारी संख्या ९२८४ होती. नगर परिषद कर्मचारी संख्या १९९८ होती.

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात रोजगार हमी योजना व्दारे २.८७ लाख लोकांना रोजगार मिळाला, तर सेवायोजन केंद्रात ५२३८२ हजार लोकांनी नाव नोंदणी केली होती.

**३.४.११ बँका :—**

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात एकूण बँकांची संख्या २०३ एवढी होती. त्यामध्ये १०५ सहकारी बँक शाखा होत्या. या सर्व बँकातील ठेवी २१०७.२ कोटी रू. एवढी होती.

**३.४.१२ शैक्षणिक सुविधा — प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन :—**

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या १३५९ होती. विद्यार्थी संख्या २.७८ लाख एवढी होती. शिक्षक संख्या ९३७२ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या ३० एवढी होती.

माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांची संख्या ७५९ होती. विद्यार्थी संख्या १.७४ लाख तर शिक्षक संख्या १०३८३ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या १७ एवढी होती.

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थानची संख्या ७९ एवढी होती. विद्यार्थी संख्या १२ हजार होती. अभियांत्रिकी महाविद्यालये १ एवढी होती.

**३.४.१३ वैद्यकिय सेवा :—**

सन २०१०—११ मध्ये परभणी जिल्ह्यात सार्वजनिक रूग्णालयांची संख्या १० एवढी होती. दवाखाने १५, प्राथमिक आरोग्य केंद्र संख्या ३१ एवढी होती. दर लाख लोकसंख्येमागे खाटांची संख्या १८ एवढी होती.

**३.४.१४ यात्रा व पर्यटन स्थळे :—**

जिल्ह्यामधे परभणी, मानवत, सेलू, पूर्णा, गंगाखेड, चारगणा ता. जिंतूर, पोखर्णी ता. परभणी, जांभुळबेट ता. पालम, जिंतूर इ. प्रमुख स्थळे आहेत.

## ३.५ हिंगोली जिल्हा :—

### ३.५.१ इतिहास :—

संत नामदेवांचा जन्म हिंगोली जिल्ह्यातील नरसी—बामणी या गावी झाला. नामदेवांचे गुरू विसोबा खेचर यांची समाधीही याच जिल्ह्यात औंढा—नागनाथ येथे आहे. नामदेवांचे अभंग प्रसिध्द असून शीख धर्मग्रंथ गुरूग्रंथसाहिब मध्ये सुध्दा त्यांच्या अभंगांचा समावेश आहे. दि. १ मे १९९९ रोजी परभणी जिल्ह्याची विभागणी करून स्वतंत्र हिंगोली जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. हा मराठवाडयातील आठवा जिल्हा आहे.

### ३.५.२ भौगालिक परिस्थिती :—

**१) स्थान :—** महाराष्ट्र राज्याच्या अग्नेय भागात हा जिल्हा वसला आहे. हिंगोली जिल्ह्याच्या उत्तरेस वाशिम जिल्हा असून बुलढाणा जिल्हा वायव्येस पसरलेला आहे. दक्षिणेस नांदेड व परभणी हे जिल्हे आहेत. पूर्वेस यवतमाळ व नांदेड हे जिल्हे असून पशि्चमेस जालनाव परभणी हे जिल्हे आहेत. राज्याच्या एकूण भू भागापैकी जवळजवळ १.४७ टक्के भू—भाग या जिल्ह्याच्या वाटेस आला आहे. हिंगोली जिल्ह्याचे क्षेत्रफळ ४५२६ चौ. कि. मी. आहे.

**२) तालुके :—** १) हिंगोली, २) सेनगाव, ३) कळमनुरी, ४) औंढा—नागनाथ, ५) वसमत असे एकूण पाच तालुके आहेत.

**३) प्राकृतिक रचना :—** हिंगोली जिल्ह्याचा बराचसा भाग डोंगराळ आहे. या जिल्ह्याच्या उत्तर भागात अजिंठयाचे डोंगर पसरलेले आहेत. या डोंगर रांगांना “हिंगोली टेकडया” या स्थानिक नावाने ओळखले जाते. हिंगोली टेकडयांच्या या डोंगराळ भागात १) हिंगोली, २) सेनगाव, ३) कळमनुरी, ४) औंढा—नागनाथ, या तालुक्यांच्या पूर्व भागाचा समावेश होतो. पैनगंगेने आपला प्रवास या जल्ह्याच्या उत्तर सिमावर्ती भागातून केला आहे. हिंगोली जल्ह्याचा दक्षिण भाग मैदानी प्रदेशाचा असून पूर्णा, आसना व कयाधू नद्यांच्या व खोऱ्यांचा कांही प्रदेश समाविष्ट होतो.

**४) मृदा :—** हिंगोली जिल्ह्याचा बराचसा भाग डोंगराळ असल्याने या प्रदेशात मृदेचा थर पातळ आहे. मृदा हलकी व मध्यम प्रतीची आहे. फक्त जिल्ह्याच्या पूर्व व दक्षिण भागातील नद्यांच्या खोऱ्यात मृदा काळी व कसदार आहे.

**३.५.२.५ हवामान :—** हिंगोली जिल्ह्याचे हवामान उष्ण व कोरडे असून मे महिन्यातील तापमान दिवसा ४० अंश से. पेक्षा जास्त असते. मात्र पावसाळयात उष्ण व दमट असते. पावसाचे प्रमाण पश्चिमेकडून पूर्वेकडे वाढत जाते. तसेच उत्तरेकडील डोंगराळ भागातही जास्त पाऊस पडतो.

**६) नद्या :—** कयाधू ही जिल्ह्यातील प्रमुख नदी असून पैनगंगा, पूर्णा, आसना, इ. नद्या आहेत.

**३.५.२.७ धरणे :—** जिल्ह्यात विहीरींचा संख्या जास्त आहे. सोनगाव तालुक्यात पूर्णा नदीवर येलदरी धरण आहे. याचनदीवर औंढा—नागनाथ तालुक्यात सिध्देश्वर धरण आहे. शिवाय पैनगंगा नदीवर इसापूर धरण आहे. कळमनुरी तालुक्यात कूपनलिकांची संख्या जास्त आहे.

### ३.५.३ प्रशासकीय विभाग :—

हिंगोली जिल्ह्यामध्ये ५ तालुके असून, शहरांची संख्या ३ आहे. गावांची संख्या ७०६ आहे. पंचायत समित्या ५ असून ग्रामपंचायतीची संख्या ५६५ आहे. नगर पालिका संख्या ३ एवढी आहे.

### ३.५.४ लोकसंख्या व घनता :—

सन २०११ च्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ११.७८ लाख एवढी होती. त्या पैकी ८४.४०% ग्रामीण तर १५.६०% नागरी लोकसंख्या आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी पुरुषांची संख्या ६.०९ लाख व स्त्रियांची संख्या ५.६९ लाख आहे. त्याच प्रमाणे जिल्ह्यामध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९३५ एवढे आहे. महाराष्ट्रातील हेच प्रमाण ९२५ एवढे आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येच्या घनतेचा विचार केल्यास प्रतिचौरस किलोमिटर मागे २४४ एवढी घनता आहे. ती महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येच्या घनते पेक्षा कमी आहे.

**१) अनुसूचित जाती व जमातीची संख्या :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी १०.२०% होती. तर एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जमातीची लोकसंख्येची टक्केवारी ८.८०% एवढी होती.

**२) कामगार संख्या :—** सन २००१ च्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्यातील कामगारांची (मुख्यत: व सिमांतीक) श्रमिक संख्या ४.६० लाख असून या कामगारांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ४६.६०% एवढे आहे. एकूण मुख्यत: कामगारांपैकी शेतकरी ४६.९७%, शेतमजूर ३५.५९%, घरगुती उद्योग, वस्तु निर्माण प्रक्रिया, सेवा व दुरूस्त्या इ. मध्ये १.४५% व इतर काम करणारे १५.४९% व सिमांतिक काम करणारे १०.२१% श्रमिक आहेत.

**३) साक्षरता :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्यातील साक्षरतेची टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या ७६.०४% असून यात पुरूष ८६.७३% तर स्त्रियांचे प्रमाण ६४.७३% आहे. महाराष्ट्र राज्याचे एकूण साक्षरतेचे प्रमाण ८२.९१% आहे. म्हणजेच हिंगोली जिल्ह्याची साक्षरतेची टक्केवारी राज्य स्तरापेक्षा थोडी कमी आहे.

### ३.५.५ शेती :—

हिंगोली जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ४८० हजार हेक्टर आहे. त्यापैकी जंगलव्याप्त क्षेत्र २९ हजार हेक्टर म्हणजेच ६.०६% एवढे आहे. पिकाखालील निव्वळ क्षेत्र ३८३ हजार हेक्टर आहे. यामध्ये ५७ हजार हेक्टर क्षेत्र सिंचना खाली आहे. एकूण सिंचन क्षेत्राचे पिकाखालील एकूण क्षेत्राशी प्रमाण १९.००% आहे. जिल्ह्यामध्ये पर्जन्यमान फारच कमी आहे.

**१) पीक रचना :—** जिल्ह्यामध्ये खरीप व रब्बी अशी दोन्ही पिके घेतली जातात. दोन्ही हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांमध्ये सर्वात जास्त क्षेत्र अन्नधान्य या पिकाचे असून सन २०१०—११ मध्ये अन्नधान्य पिकाखाली २१६ हजार हेक्टर क्षेत्र होते. त्यानंतर कापूस पिकाखाली ९० हजार हेक्टर क्षेत्र, ऊस पिकाखाली ६ हजार हेक्टर तर तेल बिया पिकाखाली ३० हजार हेक्टर क्षेत्र होते.

**२) पीक उत्पादन :—** हिंगोली जिल्ह्यामध्ये सन २००८ — ०९ मध्ये त`णधान्यांचे ९३ हजार मे. टन उत्पादन झाले. कडधान्ये ४३ हजार मे. टन, कापूस १८५ हजार मे. टन, ऊस ३०३ हजार मे. टन तर तेलबियाचे ९२ हजार मे. टन उत्पादन झाले.

**३) पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय सेवा व दुग्ध व्यवसाय :—** शेतीबरोबरच दुग्ध व्यवसाय सुध्दा जिल्ह्यातील महत्वाचा व्यवसाय असून शासनाने दिलेल्या प्रोत्साहनामुळे जिल्ह्यातील दुग्ध उत्पादनात वाढ होत आहे. सन २००७ मध्ये हिंगोली जिल्ह्यात ५.२९ लाख एकूण पशुधन होते. या पशुधनाची संख्या विचारात घेता शासनाने ५ सर्व चिकित्सालये, १८ दवाखाने यांची सोय केली होती.

### ३.५.६ सहकार संस्था व सभासद :—

हिंगोली जिल्ह्यामध्ये मार्च २०११ मध्ये एकूण सहकारी संस्थांची संख्या १०७२ एवढी होती. व सभासद संख्या १ लाख ९० हजार इतकी होती. या सहकारी संस्थांमध्ये प्राथमिक, कृषी सहकारी, पतसंस्था संख्या ४३०, सभासद संख्या १ लाख ९३ हजार होती. त्यांनी ३४.३६ कोटी कर्जपुरवठा केला. बिगर शेती पतसंस्था ७६, सहकारी पणन संस्था ५, सहकारी दुग्ध संस्था ८१, सामाजिक सेवा संस्था ३७१, उत्पादक संस्था १९० इ. सहकारी संस्था होत्या.

### ३.५.७ विद्युतीकरण व विद्युत पुरवठा :—

हिंगोली जिल्ह्यामध्ये मार्च २०११ अखेर या वर्षात एकूण विजेचा वापर २४.६८ लाख कि. वॅट तास होता. त्यामध्ये घरगुती वापर ४.५७ लाख कि. वॅट तास, कृषि साठी ११.३० लाख कि. वॅट तास तर औद्योगिकीकरणासाठी ८.८१ लाख कि. वॅट तास वापर झाला.

### ३.५.८ औद्योगिक स्थिती :—

मेढयांपासून लोकर मिळवून लोकरी पासून घोंगडया विणण्याचा उद्योग हिंगोली येथे चालतो. कळमनूरी तालुक्यातील डोंगरकडा येथेही हातमागावर कापड विणले जाते. वसमत तालुक्यात रेशीम किडे जोपासण्याचा उद्योग चालतो. कातडी कमावणे व त्यापासून वस्तु तयार करण्याचा व्यवसाय हिंगोली

येथे चालतो. हिंगोली, वसमत, कळमनुरी, सेनगाव व औंढा—नागनाथ या ठिकाणी जिनिंग व प्रेसिंग कारखाने आहेत. हिंगोली येथे पाईपचा कारखाना आणि वसमत येथे प्लायवूडचा कारखाना आहे.

सन २००८—०९ मध्ये जिल्हयात नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या ८१ होती. कामगार संख्या २६५९ एवढी होती. साखर कारखाने ३ तर सूत गिरण्यांची संख्या १ एवढी होती.

### ३.५.९ वाहतूक व दळणवळण :—

जिल्ह्यात एकही राष्ट्रीय महामार्ग नाही. अकोला—नांदेड व जिंतूर—नांदेड हा महत्वाचा रस्ता या जिल्ह्यातून जातो. तसेच परभणी—यवतमाळ हा रस्ता देखील या जिल्ह्यातून गेला आहे. जिल्ह्याच्या मध्यवर्ती भागातून पूर्णा—अकोला हा एकमेव लोहमार्ग गेला आहे. जिल्हयात १०८ कि. मी. लांबीचा रेल्वे मार्ग आहे. एकूण रस्ते लांबी ४०५४ कि.मी. आहे. पोष्ट कार्यालयाची संख्या ११४ आहे.

### ३.५.१० कामगार व रोजगार :—

सन २००८—०९ या वर्षात जिल्ह्यात शासकीय कर्मचारी संख्या ५६८३ होती. जिल्हा परिषद कर्मचारी संख्या ६६६१ होती. नगर परिषद कर्मचारी संख्या ३९७ होती.

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात रोजगार हमी योजना व्दारे १७.०२ लाख लोकांना रोजगार मिळाला, तर सेवायोजन केंद्रात २६७४५ हजार लोकांनी नाव नोंदणी केली होती.

### ३.५.११ बँका :—

सन २०१० — ११ मध्ये जिल्ह्यात एकूण बँकांची संख्या ८५ एवढी होती. त्यामध्ये ४६ सहकारी बँक शाखा होत्या. या सर्व बँकातील ठेवी १०८४ कोटी रू. एवढी होती.

### ३.५.१२ शैक्षणिक सुविधा — प्राथमिक,माध्यमिक,महाविद्यालयीन :—

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या १०८१ होती. विद्यार्थी संख्या १.९७ लाख एवढी होती. शिक्षक संख्या ५६१६ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या ३५ एवढी होती.

माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांची संख्या २३८ होती. विद्यार्थी संख्या ०.९१ लाख तर शिक्षक संख्या २५६२ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या ३५ एवढी होती.

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थानची संख्या ३५ एवढी होती. विद्यार्थी संख्या ५ हजार होती. अभियांत्रिकी महाविद्यालये २ एवढी होती.

### ३.५.१३ वैद्यकिय सेवा :—

सन २०१०—११ मध्ये हिंगोली जिल्ह्यात सार्वजनिक रूग्णालयांची संख्या ५ एवढी होती. दवाखाने ९, प्राथमिक आरोग्य केंद्र संख्या २४ एवढी होती. दर लाख लोकसंख्येमागे खाटांची संख्या ३९ एवढी होती.

### ३.५.१४ यात्रा व पर्यटन स्थळे :—

जिल्ह्यामधे हिंगोली, वसमत, औंढा—नागनाथ, येलदरी, नरसी, सिध्देश्वर, शिरड शहापूर, कळमनूरी, डोंगरकटा, भाटेगाव, इ. प्रमुख स्थळे आहेत.

## ३.६ बीड जिल्हा :—

### ३.६.१ इतिहास :—

बीड जिल्ह्याच्या इतिहासाकडे रामायणातील जटायूने रावणाशी केलेल्या युध्दाचे क्षेत्र म्हणून पाहिले जाते. पण जिल्ह्याचा उपलब्ध इतिहास चौथ्या शतकापासूनच आहे. सामवाहन, चालुक्य, कलचुरी, वाकाटक, कदंब या घराण्याची राजवट या क्षेत्रात होती. विक्रमादित्य चालुक्याची बहिण चंपावती हिच्या नावावरून 'चंपावती नगर' असे नाव देण्यात आले होते.

मोहम्मद तुघलकच्या काळापासून हे क्षेत्र बीड या नावाने ओळखले जाऊ लागले आहे. राक्षसभुवन आणि खर्डा येथे मराठा आणि निजामाचे युध्द झाले मराठयांच्या सत्ता ऱ्हासानंतर १९४८ पर्यंत हे शहर निजामाच्या राजवटीत राहिले. हैद्राबाद संस्थानाच्या भारतात समावेशाबरोबर तो भारताचा भाग बनला. दि. १ मे १९६० रोजी बीड जिल्हा संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात आला.

### ३.६.२ भौगालिक परिस्थिती :—

**१) स्थान :—** महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागातील जिल्हा. पश्चिमेस व काहीसा नैऋत्येस अहमदनगर जिल्हा, दक्षिणेस उस्मानाबाद जिल्हा, पूर्वेस व काहीसा अग्नेयेस लातूर जिल्हा, पूर्वेस परंतू काहीसा इशान्येस परभणी जिल्हा, उत्तरेस जालना व औरंगाबाद हे जिल्हे या जिल्ह्यास लाभले आहेत.

राज्याच्या एकूण भौगौलीक क्षेत्राच्या जवळजवळ ३.५% क्षेत्र या जिल्ह्याने व्यापले आहे. बीड जिल्ह्याचे क्षेत्रफळ १०६९३ चौ. कि. मी. आहे.

**२) तालुके :—** १) बीड, २) गेवराई, ३) माजलगाव, ४) आंबेजोगाई, ५) केज, ६) पाटोदा, ७) आष्टी, ८) धारूर, ९) परळी, १०) वडवणी, ११) शिरूर—कासार असे एकूण अकरा तालुके आहेत.

वरील पैकी 'वडवणी' व 'शिरूर—कासार' हे दोन नवीन तालुके तालुका पुनर्रचनेच्या मार्गाने दि. २६ जून १९९९ पासून अस्तित्वात आले आहेत.

**३) प्राकृतिक रचना :—** उत्तरेकडील 'गंगाथडी' म्हणून ओळखला जाणारा गोदावरी खोऱ्याचा सखल मैदानी प्रदेश, जिल्ह्याच्या मध्यभागी येणारा

बालाघाटचा पठारी प्रदेश, त्याला लागून असलेला दक्षिणेकडील मांजरा नदी खोऱ्याचा (मांजरथडी) चिंचोळा प्रदेश जिल्ह्याच्या पश्चिमेकडील सीना व तिच्या उपनद्यांच्या खोऱ्याचा प्रदेश अशी जिल्ह्याची सर्वसाधारण स्वाभाविक रचना आहे.

**४) मृदा :—** गोदावरी खोरे प्रदेशात गडद करडया व काळया रंगाची अतिशय सुपीक अशी मृदा आढळते. जिल्ह्याच्या पश्चिम भागातील जमीन काहीशी क्षारयुक्त आहे. माजलगाव तालुक्याच्या दक्षिणेकडील व केज तालुक्याच्या उत्तरेकडील जमीन निकृष्ट प्रतीची आहे.आंबेजोगाई तालुक्यातील जमीन काळी कसदार आहे.

**५) हवामान :—** बीड जिल्ह्याचे हवामान उष्ण व कोरडे आहे. बालाघाटाच्या डोंगर भागात हवामान थंड असते. पूर्व भागात पाऊस जास्त पडतो. तर आष्टी, पाटोदा, गेवराई, शिरूर—कासार या तालुक्यात कमी पाऊस पडतो. जिल्ह्यात पावसाचे सरासरी प्रमाण ६५ से. मी. इतके आहे.

**६) नद्या :—** गोदावरी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी असून सिंदफना, बिंदूसरा, तलवार, कांबळी, सरी, मेहरी, वाण, मांजरा, इ. नद्या आहेत.

**७) धरणे :—** माजलगाव येथे सिंदफना नदीवर आणि केज तालुक्यात मांजरा नदीवर मोठी धरणे आहेत. आष्टी तालुक्यात मेहकरी, कडा, कांबळी, सरी, तलवार ही धरणे आहेत. पाटोदा तालुक्यात महासांगवी व शिरूर—कासार तालुक्यात हिंगेवाडी व सिंदफना येथे धरणे आहेत.परळी तालुक्यात बोधगाव, बोरणा तर बीड तालुक्यात बिंदुसरा धरण आहे.

### ३.६.३ प्रशासकीय विभाग :—

बीड जिल्ह्यामध्ये ११ तालुके असून, शहरांची संख्या ६ आहे. गावांची संख्या १३५४ आहे. पंचायत समित्या ११ असून ग्रामपंचायतीची संख्या १०१९ आहे. नगर पालिका संख्या ६ एवढी आहे.

### ३.६.४ लोकसंख्या व घनता :—

सन २०११ च्या जनगणनेनुसार बीड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २५. ८५ लाख एवढी होती. त्या पैकी ८२.०९ % ग्रामीण तर १७.९१ % नागरी

लोकसंख्या आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी पुरुषांची संख्या १३.५२ लाख व स्त्रियांची संख्या १२.३३ लाख आहे. त्याच प्रमाणे जिल्ह्यामध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९१२ एवढे आहे. महाराष्ट्रातील हेच प्रमाण ९२५ एवढे आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येच्या घनतेचा विचार केल्यास प्रतिचौरस किलोमिटर मागे २४२ एवढी घनता आहे. ती महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येच्या घनते पेक्षा कमी आहे.

**१) अनुसूचित जाती व जमातीची संख्या :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार बीड जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी १३% होती. तर एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जमातीची लोकसंख्येची टक्केवारी १.१२% एवढी होती.

**२) कामगार संख्या :—** सन २००१ च्या जनगणनेनुसार बीड जिल्ह्यातील कामगारांची (मुख्यतः व सिमांतीक) श्रमिक संख्या ९.५८ लाख असून या कामगारांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ४४.३३% एवढे आहे. एकूण मुख्यतः कामगारांपैकी शेतकरी ५१.०२%, शेतमजूर २५.६३%, घरगुती उद्योग, वस्तु निर्माण प्रक्रिया, सेवा व दुरूस्त्या इ. मध्ये १.४४% व इतर काम करणारे २१.१८% व सिमांतिक काम करणारे १३.२५% श्रमिक आहेत.

**३) साक्षरता :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार बीड जिल्ह्यातील साक्षरतेची टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या ७३.५३% असून यात पुरूष ८३.९९% तर स्त्रियांचे प्रमाण ६२.२९% आहे. महाराष्ट्र राज्याचे एकूण साक्षरतेचे प्रमाण ८२. ९१% आहे. म्हणजेच बीड जिल्ह्याची साक्षरतेची टक्केवारी राज्य स्तरापेक्षा थोडी कमी आहे.

### ३.६.५ शेती :—

बीड जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ९६२ हजार हेक्टर आहे. त्यापैकी जंगलव्याप्त क्षेत्र २३ हजार हेक्टर म्हणजेच २.३९% एवढे आहे. पिकाखालील निव्वळ क्षेत्र ७४३ हजार हेक्टर आहे. यामध्ये ३१ हजार हेक्टर क्षेत्र सिंचना खाली आहे. एकूण सिंचन क्षेत्राचे पिकाखालील एकूण क्षेत्राशी प्रमाण २४.२८% आहे. जिल्ह्यामध्ये पर्जन्यमान फारच कमी आहे.

**१) पीक रचना :—** जिल्ह्यामध्ये खरीप व रब्बी अशी दोन्ही पीके घेतली जातात. दोन्ही हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांमध्ये सर्वात जास्त क्षेत्र अन्नधान्य या पिकाचे  असून सन २०१०—११ मध्ये अन्नधान्य पिकाखाली ६४० हजार हेक्टर क्षेत्र होते. त्यानंतर कापूस पिकाखाली १०८ हजार हेक्टर क्षेत्र, ऊस पिकाखाली ३६ हजार हेक्टर तर तेल बिया पिकाखाली ९० हजार हेक्टर क्षेत्र होते.

**२) पीक उत्पादन :—** बीड जिल्ह्यामध्ये सन २००८—०९ मध्ये तृणधान्यांचे ४०५ हजार मे. टन उत्पादन झाले. कडधान्ये ७३ हजार मे. टन, कापूस ८९५ हजार मे. टन, ऊस ४०६५ हजार मे. टन तर तेलबियाचे ५० हजार मे. टन उत्पादन झाले.

**३) पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय सेवा व दुग्ध व्यवसाय :—** शेतीबरोबरच दुग्ध व्यवसाय सुध्दा जिल्ह्यातील महत्वाचा व्यवसाय असून शासनाने दिलेल्या प्रोत्साहनामुळे जिल्ह्यातील दुग्ध उत्पादनात वाढ होत आहे. सन २००७ मध्ये बीड जिल्ह्यात १३.५९ लाख एकूण पशुधन होते. या पशुधनाची संख्या विचारात घेता शासनाने ६ सर्व चिकीत्सालये, ५३ दवाखाने यांची सोय केली होती.

### ३.६.६ सहकार संस्था व सभासद :—

बीड जिल्ह्यामध्ये मार्च २०११ मध्ये एकूण सहकारी संस्थांची संख्या ५०५३ एवढी होती. व सभासद संख्या ९ लाख ५८ हजार इतकी होती. या सहकारी संस्थांमध्ये प्राथमिक, कृषी सहकारी, पतसंस्था संख्या ७५३, सभासद संख्या ५ लाख २२ हजार होती. त्यांनी ७७.४४ कोटी रू. कर्जपुरवठा केला. बिगर शेती पतसंस्था ५२३, सहकारी पणन संस्था १३४, सहकारी दुग्ध संस्था २०१६, सामाजिक सेवा संस्था १००५, उत्पादक संस्था २८६२ इ. सहकारी संस्था होत्या.

### ३.६.७ विद्युतीकरण व विद्युत पुरवठा :—

बीड जिल्ह्यामध्ये मार्च २०११ अखेर या वर्षात एकूण विजेचा वापर ६९०५.४५ लाख कि. वॅट तास होता. त्यामध्ये घरगुती वापर १०५२.१० लाख

कि. वॅट तास, कृषी साठी ५५९५.४५ लाख कि. वॅट तास तर औद्योगिकीकरणासाठी २५४.९० लाख कि. वॅट तास वापर झाला.

### ३.६.८ औद्योगिक स्थिती :—

औद्योगिक दृष्टया हा जिल्हा अविकसीत जिल्हा समजला जातो. परळी आणि बीड तालुक्यात सूत गिरण्या आहेत. परळी औष्णिक विज केंद्र आहे. परळी, बीड, आंबेजोगाई तालुक्यात तेल गिरण्या आहेत. वडवणी आणि बीड तालुक्यात हातमाग केंद्र आहेत. परळी येथे बल्ब कारखाना, बीड येथे रासयनिक पदार्थ, प्लास्टिक वस्तू तयार करण्याचे कारखाने आहेत. बीड येथे एम. आय. डी. सी. च्या औद्योगिक वसाहती आहेत.

सन २००८—०९ मध्ये जिल्हयात नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या ८७ होती. कामगार संख्या ४७४५ एवढी होती. साखर कारखाने ८ तर सूत गिरण्यांची संख्या ६ एवढी होती.

### ३.६.९ वाहतूक व दळणवळण :—

जिल्ह्यात एकही राष्ट्रीय महामार्ग नाही. बीडहून जालना, अहमदनगर, उसमानाबाद, परभणी असे चहू—दिशांना रस्ते जातात. बीड—औरंगाबाद, बीड—परभणी, बीड—उस्मानाबाद हे जिल्ह्यातील प्रमुख रस्ते आहेत.

परळी—वैजनाथहून विकाराबाद कडे जाणारा रूंदमापी मार्ग व परभणी कडे जाणारा मीटर मापी मार्ग असे छोटे लोहमार्ग जिल्ह्याच्या पूर्व कोपऱ्यातून जातात. परळी—वैजनाथ हे जिल्ह्यातील एकमेव रेल्वे जंक्शन होय. जिल्ह्यात ४८ कि. मी. लांबीचा रेल्वे मार्ग आहे. एकूण रस्ते लांबी ९५४५ कि.मी. आहे. पोष्ट कार्यालयाची संख्या ३३० आहे.

### ३.६.१० कामगार व रोजगार :—

सन २००८—०९ या वर्षात जिल्ह्यात शासकीय कर्मचारी संख्या १२२६४ होती. जिल्हा परिषद कर्मचारी संख्या १६१८९ होती. नगर परिषद कर्मचारी संख्या १५२५ होती. सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात रोजगार हमी योजना व्दारे ७.६८ लाख लोकांना रोजगार मिळाला, तर सेवायोजन केंद्रात ७९८३० हजार लोकांनी नाव नोंदणी केली होती.

### ३.६.११ बँका :—

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात एकूण बँकांची संख्या १९१ एवढी होती. त्यामध्ये ७५ सहकारी बँक शाखा होत्या. या सर्व बँकातील ठेवी १०१६ कोटी रू. एवढी होती.

### ३.६.१२ शैक्षणिक सुविधा — प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन :—

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या २१५३ होती. विद्यार्थी संख्या ३.१४ लाख एवढी होती. शिक्षक संख्या ९७१४ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या ३२ एवढी होती.

माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांची संख्या ७१४ होती. विद्यार्थी संख्या २.५६ लाख तर शिक्षक संख्या ८६०४ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या ३० एवढी होती.

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थानची संख्या ३८ एवढी होती. विद्यार्थी संख्या १४ हजार होती. अभियांत्रिकी महाविद्यालयांची संख्या ३ एवढी होती.

### ३.६.१३ वैद्यकिय सेवा :—

सन २०१०—११ मध्ये बीड जिल्ह्यात सार्वजनिक रूग्णालयांची संख्या १५ एवढी होती. दवाखाने १५, प्राथमिक आरोग्य केंद्र संख्या ५० एवढी होती. दर लाख लोकसंख्येमागे खाटांची संख्या ६३ एवढी होती.

### ३.६.१४ यात्रा व पर्यटन स्थळे :—

जिल्ह्यामधे बीड, आंबेजोगाई, परळी, मांजरसुंभा, राक्षसभुवन, आष्टी, सौताडा, धारूर, अंमळनेर, धर्मपुरी, चिंचोली, इ. प्रमुख स्थळे आहेत.

## ३.७ नांदेड जिल्हा

### ३.७.१ इतिहास :—

नांदेडचे मूळ नाव 'नवदंडी' होते. या क्षेत्रावर नंद घराण्याची सत्ता होती म्हणून पूर्वी नांदेडला 'नंदीग्राम' म्हटले जायचे. त्याचा अपभ्रंश म्हणून 'नांदेड' म्हटले जात असावे. या क्षेत्रावर आंध्रभृत्या, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, खिलजी, बहामणी आणि मुघल या राजवटींनी राज्य केले.

या शहरात इ.स. १७०८ साली शिखांचे दहावे गुरू गुरूगोविंदसिंग यांची हत्या केली गेली. म्हणून या ठिकाणी गुरूगोविंदसिंगांची समाधी आहे. भारतीय स्वातंन्त्र्यानंतर १८ सप्टेंबर १९४८ साली निजाम शरण आला. तेंव्हा नांदेड जिल्हा स्वतंत्र झाला. १९५६ साली व्दिभाषिक मुंबई राज्याचा भाग बनला. त्यानंतर दि. १ मे १९६० साली त्याचा संयुक्त महाराष्ट्रात समावेश झाला.

### ३.७.२ भौगोलिक परिस्थिती :—

**१) स्थान :—** महाराष्ट्रात अग्नेय दिशेस हा जिल्हा असून नांदेडच्या पश्चिमेला लातूर आणि परभणी, उत्तरेस यवतमाळ आणि हिंगोली जिल्हे आहेत. दक्षिणेस कर्नाटक आणि पूर्वेस आंध्रप्रदेश राज्याच्या सीमा जोडलेल्या आहेत. या जिल्ह्याने राज्याच्या एकूण भौगौलीक क्षेत्राच्या जवळजवळ ३.४२ टक्के क्षेत्र व्यापले आहे. नांदेड जिल्ह्याचे क्षेत्रफळ १०५०२ चौ. कि. मी. आहे.

**२) तालुके :—** १) नांदेड, २) भोकर, ३) कंधार, ४) किनवट, ५) हदगाव, ६) बिलोली, ७) मुखेड, ८) देगलूर, ९) लौहा, १०) मुदखेड, ११) माहूर, १२) उमरी, १३) हिमायतनगर, १४) धर्माबाद, १५) अर्धापूर, १६) नायगाव (खैरगाव) असे एकूण सोळा तालुके आहेत.

वरील पैकी तालुका पुनर्रचनेच्या मार्गाने १) मुदखेड, २) माहूर, ३) उमरी, ४) हिमायतनगर, ५) धर्माबाद हे पाच तालुके २६ जून १९९९ पासून तर 'अर्धापूर' व 'नायगाव (खैरगाव)' हे दोन तालुके दि. ३० डिसेंबर १९९९ पासून अस्तित्वात आले आहेत.

**३) प्राकृतिक रचना :—** उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश, गोदावरी नदी खोऱ्याचा प्रदेश, बालाघाट डोंगर रांगांचा प्रदेश असे जिल्ह्याचे तीन स्वाभाविक विभाग पडतात.

**४) मृदा :—** सर्वसाधारण पणे जिल्ह्यातील मृदा काळी व कसदार आहे. येथील मृदेत कॅल्शियम, मॅग्नेशियम व नायट्रेटचे प्रमाण तुलनात्मक दृष्टया अधिक आढळते. भोकर, हदगाव व किनवट या डोंगराळ तालुक्यातील मृदा हलक्या प्रतीची व पातळ थराची आहे.

**५) हवामान :—** येथील हवामान उष्ण व कोरडे आहे. मात्र भोकर, हदगाव व किनवट या तालुक्यात तुलनेने जास्त पाऊस पडतो. तर सर्वात कमी पाऊस कंधार तालुक्यात पडतो. जिल्ह्यात पर्जन्य सरासरी १०० से. मी. पेक्षा अधिक असते.

**६) नद्या :—** गोदावरी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी असून पैनगंगा, मांजरा, आसना, सीता, सरस्वती, मन्याड, लेंडी, इ. नद्या आहेत.

**७) धरणे :—** मन्याड नदीवर कंधार तालुक्यात वारवंत, मुखेड तालुक्यात कुंद्राळा येथे धरण आहे. लेंडी नदीवर पेठवळण आणि महालिंगी येथे मध्यम प्रकल्प आहेत. नांदेड शहराजवळील असरजन येथील गोदावरी नदीवरील 'विष्णुपूरी' प्रकल्प आशियातील सर्वात मोठा प्रकल्प असून त्याचे आता 'शंकरराव चव्हाण विष्णुपूरी प्रकल्प' असे नामांतर केले आहे.

### ३.७.३ प्रशासकीय विभाग :—

नांदेड जिल्ह्यामध्ये १६ तालुके असून, शहरांची संख्या १३ आहे. गावांची संख्या १६१० आहे. पंचायत समित्या १६ असून ग्रामपंचायतीची संख्या १३१० आहे. नगर पालिका संख्या १२ आहे व महानगर पालिका संख्या १ एवढी आहे.

### ३.७.४ लोकसंख्या व घनता :—

सन २०११ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३३.५६ लाख एवढी होती. त्या पैकी ७६.०४% ग्रामीण तर २३.९६% नागरी लोकसंख्या आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी पुरुषांची संख्या १७.३२

लाख व स्त्रियांची संख्या १६.२३ लाख आहे. त्याच प्रमाणे जिल्ह्यामध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९३७ एवढे आहे. महाराष्ट्रातील हेच प्रमाण ९२५ एवढे आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येच्या घनतेचा विचार केल्यास प्रतिचौरस किलोमिटर मागे ३१९ एवढी घनता आहे. ती महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येच्या घनते पेक्षा कमी आहे.

**१) अनुसूचित जाती व जमातीची संख्या :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी १७.३२% होती. तर एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जमातीची लोकसंख्येची टक्केवारी ८.१२% एवढी होती.

**२) कामगार संख्या :—** सन २००१ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्यातील कामगारांची (मुख्यत: व सिमांतीक) श्रमिक संख्या १०.४३ लाख असून या कामगारांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ३६.२६% एवढे आहे. एकूण मुख्यत: कामगारांपैकी शेतकरी ३६.७८%, शेतमजूर ४१.३१%, घरगुती उद्योग, वस्तु निर्माण प्रक्रिया, सेवा व दुरूस्त्या इ. मध्ये १.२९% व इतर काम करणारे २०. ४९% व सिमांतिक काम करणारे ११.१२% श्रमिक आहेत.

**३) साक्षरता :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्यातील साक्षरतेची टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या ७६.९४% असून यात पुरूष ८६.६२% तर स्त्रियांचे प्रमाण ६६.६८% आहे. महाराष्ट्र राज्याचे एकूण साक्षरतेचे प्रमाण ८२. ९१%आहे. म्हणजेच नांदेड जिल्ह्याची साक्षरतेची टक्केवारी राज्य स्तरापेक्षा थोडी कमी आहे.

### ३.७.५) शेती :—

नांदेड जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १०३३ हजार हेक्टर आहे. त्यापैकी जंगलव्याप्त क्षेत्र ९२ हजार हेक्टर म्हणजेच ८.९१% एवढे आहे. पिकाखालील निव्वळ क्षेत्र ७१९ हजार हेक्टर आहे. यामध्ये ८० हजार हेक्टर क्षेत्र सिंचना खाली आहे. एकूण सिंचन क्षेत्राचे पिकाखालील एकूण क्षेत्राशी प्रमाण ९.०९% आहे. जिल्ह्यामध्ये पर्जन्यमान फारच कमी आहे.

**१) पीक रचना :—** जिल्ह्यामध्ये खरीप व रब्बी अशी दोन्ही पिके घेतली जातात. दोन्ही हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांमध्ये सर्वात जास्त क्षेत्र अन्नधान्य या पीकाचे  असून सन २०१०—११ मध्ये अन्नधान्य पिकाखाली ४४७ हजार हेक्टर क्षेत्र होते. त्यानंतर कापूस पिकाखाली २४६ हजार हेक्टर क्षेत्र, ऊस पिकाखाली १७ हजार हेक्टर तर तेल बिया पिकाखाली ६५ हजार हेक्टर क्षेत्र होते.

**२) पीक उत्पादन :—** नांदेड जिल्ह्यामध्ये सन २००८—०९ मध्ये त`णधान्यांचे १६० हजार मे. टन उत्पादन झाले. कडधान्ये ८४ हजार मे. टन, कापूस १९१ हजार मे. टन, ऊस १११४ हजार मे. टन तर तेलबियाचे १४६ हजार मे. टन उत्पादन झाले.

**३) पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय सेवा व दुग्ध व्यवसाय :—** शेतीबरोबरच दुग्ध व्यवसाय सुध्दा जिल्ह्यातील महत्वाचा व्यवसाय असून, शासनाने दिलेल्या प्रोत्साहनामुळे जिल्ह्यातील दुग्ध उत्पादनात वाढ होत आहे. सन २००७ मध्ये नांदेड जिल्ह्यात १३.५५ लाख एकूण पशुधन होते. या पशुधनाची संख्या विचारात घेता शासनाने ६ सर्व चिकित्सालये, ७३ दवाखाने यांची सोय केली होती.

### ३.७.६ सहकार संस्था व सभासद :—

नांदेड जिल्ह्यामध्ये मार्च २०११ मध्ये एकूण सहकारी संस्थांची संख्या ३९७४ एवढी होती. व सभासद संख्या ९ लाख ६७ हजार इतकी होती. या सहकारी संस्थांमध्ये प्राथमिक, कृषी सहकारी, पतसंस्था संख्या ९८४, सभासद संख्या ३ लाख ९४ हजार होती. त्यांनी ३०७.३४ कोटी कर्जपुरवठा केला. बिगर शेती पतसंस्था २५०, सहकारी पणन संस्था ६२, सहकारी दुग्ध संस्था १००, सामाजिक सेवा संस्था २८३५, उत्पादक संस्था ९२६ इ. सहकारी संस्था होत्या.

**३.७.७ विद्युतीकरण व विद्युत पुरवठा :—** नांदेड जिल्ह्यामध्ये मार्च २०११ अखेर या वर्षात एकूण विजेचा वापर ४०५९.७० लाख कि. वॅट तास होता. त्यामध्ये घरगुती वापर १९२८.३० लाख कि. वॅट तास, कृषी साठी १८१२.७०

लाख कि. वॅट तास तर औद्योगिकीकरणासाठी ३१८.७० लाख कि. वॅट तास वापर झाला.

### ३.७.८ औद्योगिक स्थिती :—

नांदेड, कुंडलवाडी, धर्माबाद, मुखेड, कंधार आणि देगलूरयेथे हातमाग उद्योग आहेत तसेच खादी टेरीकॉट उद्योगही आहेत, किनवट, नांदेड, कंधार, धर्माबाद येथे कातडी कमावण्याचे कारखाने आहेत. नांदेड, देगलूर, कंधार, धर्माबाद येथे तेल गिरण्या आहेत. मुखेड, नांदेड, उमरी, देगलूर कंधार, तामसा येथे जिनिंग व प्रेसिंग मील आहेत. नांदेड येथे सूत गिरणी आणि टेक्सटाईल मील आहेत. नांदेड, देगलूर, कंधार, हदगाव, भोकर, मुखेड येथे एम. आय. डी. सी. च्या औद्योगिक वसाहती आहेत.

सन २००८—०९ मध्ये जिल्हयात नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या २०३ होती. कामगार संख्या २१८० एवढी होती. साखर कारखाने ७ तर सूत गिरण्यांची संख्या ४ एवढी होती.

### ३.७.९ वाहतूक व दळणवळण :—

मनमाड—काचीगुडा लोहमार्ग जिल्ह्यातून जातो. नांदेड, मुदखेड, उमरी व धर्माबाद ही या मार्गावरील जिल्ह्यातील स्थानके होत. पूर्णा—आदिलाबाद हा लोहमार्ग मुदखेडहून किनवट मार्गे आदिलाबादकडे जातो. रस्ते मार्गाचा विचार करता उमरखेड—अहमदपूर, नांदेड—हैद्राबाद, देगलूर—किनवट हे जिल्ह्यातून जाणारे रस्ते मार्ग होत. नांदेड येथे विमानतळ आहे.

जिल्ह्यात २०८ कि. मी. लांबीचा रेल्वे मार्ग आहे. एकूण रस्ते लांबी १०६२६ कि. मी. आहे. पोष्ट कार्यालयाची संख्या ४६८ आहे.

### ३.७.१० कामगार व रोजगार :—

सन २००८—०९ या वर्षात जिल्ह्यात शासकीय कर्मचारी संख्या १६६७५ होती. जिल्हा परिषद कर्मचारी संख्या १८२४६ होती. नगर परिषद कर्मचारी संख्या ९०८ होती. महानगर पालिका कर्मचारी संख्या १८८८ होती.

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात रोजगार हमी योजना व्दारे ३५.८४ लाख लोकांना रोजगार मिळाला, तर सेवायोजन केंद्रात ७४७३७ हजार लोकांनी नाव नोंदणी केली होती.

**७.११ बँका :—**

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात एकूण बँकांची संख्या १३९ एवढी होती. त्यामध्ये ७९ सहकारी बँक शाखा होत्या. या सर्व बँकातील ठेवी ३८२० कोटी रू. एवढी होती.

**३.७.१२ शैक्षणिक सुविधा — प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन :—**

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या २४६५ होती. विद्यार्थी संख्या ४.२१ लाख एवढी होती. शिक्षक संख्या ११३२७ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या ३७ एवढी होती.

माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांची संख्या ६८४ होती. विद्यार्थी संख्या २.१३ लाख तर शिक्षक संख्या ६६१९ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या ३२ एवढी होती.

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थानची संख्या १३१ एवढी होती. विद्यार्थी संख्या २९ हजार होती. अभियांत्रिकी महाविद्यालये ० एवढी होती.

**३.७.१३ वैद्यकिय सेवा :—**

सन २०१०—११ मध्ये नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक रूग्णालयांची संख्या २० एवढी होती. दवाखाने ४६, प्राथमिक आरोग्य केंद्र संख्या ८० एवढी होती. दर लाख लोकसंख्येमागे खाटांची संख्या ७७ एवढी होती.

**३.७.१४ यात्रा व पर्यटन स्थळे :—**

नांदेड, किनवट, माहूर, कंधार, अर्धापूर, हदगाव, मुदखेड ही नांदेड जिल्ह्यातील प्रमुख स्थळे  पर्यटन स्थळे आहेत.

## ३.८ लातूर जिल्हा :—

### ३.८.१ इतिहास :—

लातूर शहराचे इतिहासात 'रत्नापूर महात्म्य' मध्ये विश्लेषन केले आहे. आठव्या शतकात या शहरास 'लत्तलूर' असे म्हटले जात असे. त्याचा अपभ्रंश 'लातूर' असा झाला असे म्हटले जात असावे. पेशव्यांच्या काळात लातूरचे नाणे चलनात होते. शिवाजी महाराजांनी औरंगाबाद ते निलंगा हा प्रवास लातूर मार्गे १६७० केला असा संदर्भ आहे. सातवाहन, आठव्या शतकात चालुक्यांची राजवट होती. राष्ट्रकुंटाचे मुख्य स्थान लातूर होते. आदिलशाही, निजामशाही, औरंगजेब इ. ची राजवट लातूर येथे होती. लातूर हैद्राबाद संस्थानाचा भाग होता. १९४८ साली मुंबई प्रांतात समावेश, १९५६ साली व्दिभाषिक मुंबई राज्याचा भाग बनला त्यानंतर दि. १ मे १९६० साली संयुक्त महाराष्ट्राचा भाग बनला. तेंव्हा लातूर हा उस्मानाबाद जिल्ह्याचा भाग होता. दि. १६ ऑगस्ट १९८२ साली स्वतंत्र लातूर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली

### ३.८.२ भौगोलिक परिस्थिती :—

**१) स्थान :—** लातूर जिल्हा अग्नेय महाराष्ट्रात वसला आहे. जिल्ह्याच्या पश्चिमेस व दक्षिणेस उस्मानाबाद जिल्हा असून वायव्येस बीड जिल्हा पसरला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस परभणी जिल्हा असून जिल्ह्याच्या उत्तरेस व पूर्वेस नांदेड जिल्हा आहे. जिल्ह्याच्या पूर्वेस व काहिंशा अग्नेयेस कर्नाटक राज्यातील बीदर जिल्हा आहे

या जिल्ह्याने राज्याच्या एकूण भौगौलीक क्षेत्राच्या जवळजवळ २.३३ टक्के क्षेत्र व्यापले आहे. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७१५७ चौ. कि. मी. आहे.

**२) तालुके :—** १) लातूर, २) अहमदपूर, ३) उदगीर, ४) निलंगा, ५) औसा, ६) चाकूर, ७) रेनापूर, ८) देवणी, ९) शिरूर—अनंतपाळ, १०) जळकोट असे एकूण दहा तालुके आहेत.

वरील पैकी तालुका पुनर्रचनेच्या मार्गाने १) देवणी, २) शिरूर—अनंतपाळ, ३) जळकोट हे तीन तालुके २६ जून १९९९ पासून अस्तित्वात आले आहेत.

**३) प्राकृतिक रचना :—** प्राकृतिक रचनेनुसार जिल्ह्याचा बहुतेक भाग बालाघाट पठाराचा आहे. यात लातूर, औसा, निलंगा व चाकूर तालुक्याचा दक्षिण भाग, उदगिर तालुक्याचा पश्चिम व दक्षिण भाग येतो. अन्य भागात हा नद्यांचा सपाट मैदानी भाग येतो. (अहमदपूर, रेनापूर, उदगीर, शिरूर—अनंतपाळ, देवणी व जळकोट इ.)

**४) मृदा :—** जिल्ह्याच्या काही भागातील मृदा हलक्या व मध्यम हलक्या प्रतीची असून तिची ओलावा धरून ठेवण्याची क्षमता कमी आहे. अशी मृदा अहमदपूर व उदगीर या तालूक्यात तसेच लातूर तालूक्यातील कांही भागात आढळते. औसा व लातूर तालूक्यातीलकांही भागात नदी खोऱ्यामध्ये गाळाने सुपीक बनलेली कन्हार मृदा आढळते. डोंगर पायथ्याच्या व डोंगर उताराच्या भागात हलक्या प्रतीची रेताड मृदा आहे.

**५) हवामान :—** हा भाग डोंगराळ व पठारी असल्यामुळे उन्हाळयात सौम्य व कोरडे तर पावसाळयात दमट, हिवाळयात थंड व कोरडे हवामान असते. अहमदपूर व उदगीर तालुक्यात पावसाचे प्रमाण अधिक आहे. जिल्ह्यातील सरासरी पर्जन्य ७५ ते ८० से. मी. पाऊस पडतो.

**६) नद्या :—** मांजरा जिल्ह्यातील प्रमुख नदी असून तावरजा, तेरणा, मन्याड, तिस, धरणी, लेंडी इ. नद्या आहेत.

**७) धरणे :—** लातूर तालुक्यात तावरजा, अहमदपूर तालुक्यात धरणी, मन्याड नदीवर व जळकोट तालुक्यात तिस नदीवर धरणे आहेत. या शिवाय व्हटी, मसलगा, साकाळ, देवर्जन ही धरणे आहेत.

### ३.८.३ प्रशासकीय विभाग :—

लातूर जिल्ह्यामध्ये १० तालुके असून, शहरांची संख्या ५ आहे. गावांची संख्या ९४५ आहे. पंचायत समित्या १० असून ग्रामपंचायतीची संख्या ७८७ आहे. नगर पालिका संख्या ५ एवढी आहे.

### ३.८.४ लोकसंख्या व घनता :—

सन २०११ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २४.५५ लाख एवढी होती. त्या पैकी ७६.४४% ग्रामीण तर २३.५६% नागरी लोकसंख्या आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी पुरुषांची संख्या १२.७६ लाख व स्त्रियांची संख्या ११.७९ लाख आहे. त्याच प्रमाणे जिल्ह्यामध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९२४ एवढे आहे. महाराष्ट्रातील हेच प्रमाण ९२५ एवढे आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येच्या घनतेचा विचार केल्यास प्रतिचौरस किलोमीटर मागे ३४३ एवढी घनता आहे. ती महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येच्या घनते पेक्षा कमी आहे.

**१) अनुसूचित जाती व जमातीची संख्या :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी १९.४३% होती. तर एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जमातीची लोकसंख्येची टक्केवारी २.३१% एवढी होती.

**२) कामगार संख्या :—** सन २००१ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्यातील कामगारांची (मुख्यत: व सिमांतीक) श्रमिक संख्या ९.६९ लाख असून या कामगारांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ४६.५८% एवढे आहे. एकूण मुख्यत: कामगारांपैकी शेतकरी ३१.१५%, शेतमजूर २८.७७%, घरगुती उद्योग, वस्तु निर्माण प्रक्रिया, सेवा व दुरूस्त्या इ. मध्ये १६.५२% व इतर काम करणारे २३.४२% व सिमांतिक काम करणारे १३.२०% श्रमिक आहेत.

**३) साक्षरता :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्यातील साक्षरतेची टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या ७९.०३% असून यात पुरूष ८७.४२% तर स्त्रियांचे प्रमाण ७०.०२% आहे. महाराष्ट्र राज्याचे एकूण साक्षरतेचे प्रमाण ८२.९१% आहे. म्हणजेच नांदेड जिल्ह्याची साक्षरतेची टक्केवारी राज्य स्तरापेक्षा थोडी कमी आहे.

### ३.८.५ शेती :—

लातूर जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ७१६ हजार हेक्टर आहे. त्यापैकी जंगलव्याप्त क्षेत्र ४ हजार हेक्टर म्हणजेच ०.५६% एवढे आहे. पिकाखालील

निव्वळ क्षेत्र ७२६ हजार हेक्टर आहे. यामध्ये १२४ हजार हेक्टर क्षेत्र सिंचना खाली आहे. एकूण सिंचन क्षेत्राचे पिकाखालील एकूण क्षेत्राशी प्रमाण ९.८८% आहे. जिल्ह्यामध्ये पर्जन्यमान फारच कमी आहे.

**१) पीक रचना :—** जिल्ह्यामध्ये खरीप व रब्बी अशी दोन्ही पीके घेतली जातात. दोन्ही हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांमध्ये सर्वात जास्त क्षेत्र अन्नधान्य या पीकाचे  असून सन २०१०—११ मध्ये अन्नधान्य पिकाखाली ४५९ हजार हेक्टर क्षेत्र होते. त्यानंतर कापूस पिकाखाली ५ हजार हेक्टर क्षेत्र, ऊस पिकाखाली ४० हजार हेक्टर तर तेल बिया पिकाखाली २२७ हजार हेक्टर क्षेत्र होते.

**२) पीक उत्पादन :—** लातूर जिल्ह्यामध्ये सन २००८—०९ मध्ये त`णधान्यांचे १७१ हजार मे. टन उत्पादन झाले. कडधान्ये १९६ हजार मे. टन, कापूस ५ हजार मे. टन, ऊस २३७८ हजार मे. टन तर तेलबियाचे ५४ हजार मे. टन उत्पादन झाले.

**३) पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय सेवा व दुग्ध व्यवसाय :—** शेतीबरोबरच दुग्ध व्यवसाय सुध्दा जिल्ह्यातील महत्वाचा व्यवसाय असून शासनाने दिलेल्या प्रोत्साहनामुळे जिल्ह्यातील दुग्ध उत्पादनात वाढ होत आहे. सन २००७ मध्ये लातूर जिल्ह्यात ६.२३ लाख एकूण पशुधन होते. या पशुधनाची संख्या विचारात घेता शासनाने ७ सर्व चिकित्सालये, ३० दवाखाने यांची सोय केली होती.

### ३.८.६ सहकार संस्था व सभासद :—

लातूर जिल्ह्यामध्ये मार्च २०११ मध्ये एकूण सहकारी संस्थांची संख्या ३८७५ एवढी होती. व सभासद संख्या ७ लाख ८४ हजार इतकी होती. या सहकारी संस्थांमध्ये प्राथमिक, कृषी सहकारी, पतसंस्था संख्या ५८३, सभासद संख्या ३ लाख ६० हजार होती. त्यांनी २२.५२ कोटी कर्जपुरवठा केला. बिगर शेती पतसंस्था ३९४, सहकारी पणन संस्था ११, सहकारी दुग्ध संस्था ६८०, सामाजिक सेवा संस्था १४३०, उत्पादक संस्था १४५४ इ. सहकारी संस्था होत्या.

### ३.८.७ विद्युतीकरण व विद्युत पुरवठा :—

लातूर जिल्ह्यामध्ये मार्च २०११ अखेर या वर्षात एकूण विजेचा वापर ४८२८.५७ लाख कि. वॅट तास होता. त्यामध्ये घरगुती वापर १६४९.६० लाख कि. वॅट तास, कृषी साठी २७२२.९४ लाख कि. वॅट तास तर औद्योगिकीकरणासाठी ४५६.०३ लाख कि. वॅट तास वापर झाला.

### ३.८.८ औद्योगिक स्थिती :—

लातूर  हे जिल्ह्यातील औद्योगिक केंद्र आहे. लातूर, उदगीर, अहमदपूर व चाकूर येथे कापूस कारखाने आहेत. लातूर, उदगीर, औसा येथे तेल गाळप उद्योग मोठयाप्रमाणावर चालतो. लातूर, उदगीर, औसा व मुरूड येथे हातमाग—यंत्रमाग उद्योग मोठया प्रमाणावर चालतो. लातूर, उदगीर व लामजना येथे कातडी कमविण्याचा उद्योग असून या परीसरात मोठया प्रमाणावर पादत्राणे तयार होतात. लातूर येथील औद्योगिक वसाहतीत स्टिल व पितळेची भांडी बनविण्याचे कारखाने आहेत. उदगीर येथे दुधापासून भुकटी तयार करण्याचा प्रकल्प आहे.

सन २००८—०९ मध्ये जिल्हयात नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या ९८ होती. कामगार संख्या १२९६ एवढी होती. साखर कारखाने १२ तर सूत गिरण्यांची संख्या २ एवढी होती.

### ३.८.९ वाहतूक व दळणवळण :—

जिल्ह्यात एकही राष्ट्रीय महामार्ग नाही. लातूरहून मिरजेला जाणारा व विकाराबादहून परळीला जाणारा असे दोन रूंदमापी लोहमार्ग जिल्ह्यात आहेत.

जिल्हयात १४८ कि. मी. लांबीचा रेल्वे मार्ग आहे. एकूण रस्ते लांबी ६४५८कि. मी. आहे. पोष्ट कार्यालयाची संख्या २८९ आहे.

### ३.८.१० कामगार व रोजगार :—

सन २००८—०९ या वर्षात जिल्ह्यात शासकीय कर्मचारी संख्या १०५५३ होती. जिल्हा परिषद कर्मचारी संख्या १३०२७ होती. नगर परिषद कर्मचारी संख्या १६९० होती.

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात रोजगार हमी योजना व्दारे ५.०२ लाख लोकांना रोजगार मिळाला, तर सेवायोजन केंद्रात ६५४०८ हजार लोकांनी नाव नोंदणी केली होती.

### ३.८.११ बँका :—

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात एकूण बँकांची संख्या २२५ एवढी होती. त्यामध्ये ११३ सहकारी बँक शाखा होत्या. या सर्व बँकातील ठेवी ४१७४ कोटी रू. एवढी होती.

### ३.८.१२ शैक्षणिक सुविधा — प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन :—

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या २०८७ होती. विद्यार्थी संख्या ३.९७ लाख एवढी होती. शिक्षक संख्या १४२८६ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या २८ एवढी होती.

माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांची संख्या ७५४ होती. विद्यार्थी संख्या १.८७ लाख तर शिक्षक संख्या ९१९३ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या २० एवढी होती.

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या १३३ एवढी होती. विद्यार्थी संख्या २९ हजार होती. अभियांत्रिकी महाविद्यालये ३ एवढी होती.

### ३.८.१३ वैद्यकिय सेवा :—

सन २०१०—११ मध्ये लातूर जिल्ह्यात सार्वजनिक रूग्णालयांची संख्या १४ एवढी होती. दवाखाने ३०, प्राथमिक आरोग्य केंद्र संख्या ४६ एवढी होती. दर लाख लोकसंख्येमागे खाटांची संख्या ५१ एवढी होती.

### ३.८.१४ यात्रा व पर्यटन स्थळे :—

लातूर, उदगीर, औसा, खरोसा, निलंगा, वडवळ, रेणापूर, देवणी ही लातूर जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळे आहेत.

## ३.९ उस्मानाबाद जिल्हा :—

### ३.९.१ इतिहास :—

या शहराला पूर्वी धारापूर किंवा धाराशिव म्हणून ओळखले जात होते. १९९० साली तत्कालीन निजाम पीर उस्मान अली याने स्वत:चे नाव शहराला दिले. तेंव्हापासून हे शहर उस्मानाबाद नावाने ओळखले जाऊ लागले. या जिल्ह्यातील कुंथलगिरी मधील जैन लेणी,चांभार लेणी, धाराशीव लेणी प्रचीन शिल्पकलेसाठी प्रसिध्द आहेत. तसेच परांडा, नळदुर्ग, येथील प्राचीन किल्ले आणि महाराष्ट्रातील लोकांचे दैवत श्री तुळजाभवानी देवीचे मंदीर तुळजापूर येथे आहे.

### ३.९.२ भौगोलिक परिस्थिती :—

**१) स्थान :—** हा जिल्हा मराठवाडयाच्या नैऋत्य दिशेस आणि महाराष्ट्राच्या अग्नेय भागात आहे. याच्या उत्तरेस बीड, पूर्वेस लातूर, वायव्येस अहमदनगर आणि पश्चिमेस सोलापूर हे जिल्हे असून दक्षिणेस कर्नाटक राज्य आहे.

या जिल्ह्याने राज्याच्या एकूण भौगौलीक क्षेत्राच्या जवळजवळ २.४५ टक्के क्षेत्र व्यापले आहे. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७५५० चौ. कि. मी. आहे.

**२) तालुके :—** १) उस्मानाबाद, २) कळंब, ३) उमरगा, ४) तुळजापूर, ५) परांडा, ६) भूम, ७) लोहारा, ८) वाशी, असे एकूण आठ तालुके आहेत.

वरील पैकी तालुका पुनर्रचनेच्या मार्गाने १) लोहारा, व २) वाशी हे दोन तालुके २६ जून १९९९ पासून अस्तित्वात आले आहेत.

**३) प्राकृतिक रचना** :— अनियमीत आकाराचा जिल्हा. बालाघाट पठारी प्रदेश, सीना नदीच्या खोऱ्याचा प्रदेश व भीमा नदीच्या खोऱ्याचा प्रदेश अशी जिल्ह्याची प्राकृतीक रचना आहे.

भूम, कळंब, उस्मानाबाद व उमरगा तालुक्यांचा बराचसा भाग पठारी प्रदेशात मोडतो. परांडा व भूम तालुके सीना नदीच्या खोऱ्यात अंतर्भूत होतात. जिल्ह्याचा दक्षिण भाग भीमा नदीच्या खोऱ्यात येतो.

**४) मृदा :—** जिल्ह्याच्या काही भागातील मृदा हलक्या व मध्यम हलक्या प्रतीची असून तिची ओलावा धरून ठेवण्याची क्षमता कमी आहे. अशी मृदा

अहमदपूर व उदगीर या तालूक्यात तसेच लातूर तालूक्यातील कांही भागात आढळते. डोंगर पायथ्याच्या व डोंगर उताराच्या भागात हलक्या प्रतीची रेताड मृदा आहे.

**५) हवामान :—** जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण व कोरडे आहे. पर्जन्यमान अतिशय कमी व अनियमीत आहे. पावसाचे वितरणही असमान आहे. जिल्ह्याच्या पूर्व भागात तुलनात्मक दृष्टया पर्जन्यमान साधारण बरे आहे. पश्चिम भागात ते अधिकच कमी आहे.

**६) नद्या :—** तेरणा ही जिल्ह्यातील प्रमुख नदी असून मांजरा, सीना, बोरी, बेनीतुरा, बाणगंगा, इ. नद्या आहेत.

**७) धरणे :—** रामगंगा, बाणगंगा, खंडेश्वर, चांदणी, खासापूर, कुरनूर, खंडाळा, हरणी, तुरोरी, तळापूर, सई, तेरणा, बोरी इ. धरणे आणि पाझर तलाव, कुपनलिका, बंधारे, विहीरी यांच्या व्दारे पाण्याचा पुरवठा केला जातो.

### ३.९.३ प्रशासकीय विभाग :—

उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये ८ तालुके असून, शहरांची संख्या ८ आहे. गावांची संख्या ७३५ आहे. पंचायत समित्या ८ असून ग्रामपंचायतीची संख्या ६२२ आहे. नगर पालिका संख्या ८ एवढी आहे.

### ३.९.४ लोकसंख्या व घनता :—

सन २०११ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १६.६० लाख एवढी होती. त्या पैकी ८४.३२% ग्रामीण तर १५.६८% नागरी लोकसंख्या आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी पुरुषांची संख्या ८.६४ लाख व स्त्रियांची संख्या ७.९५ लाख आहे. त्याच प्रमाणे जिल्ह्यामध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९२० एवढे आहे. महाराष्ट्रातील हेच प्रमाण ९२५ एवढे आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येच्या घनतेचा विचार केल्यास प्रतिचौरस किलोमीटर मागे २१९ एवढी घनता आहे. ती महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येच्या घनते पेक्षा कमी आहे.

**१) अनुसूचित जाती व जमातीची संख्या :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची

टक्केवारी १६.५३% होती. तर एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जमातीची लोकसंख्येची टक्केवारी १.९०% एवढी होती.

**२) कामगार संख्या :—** सन २००१ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील कामगारांची (मुख्यत: व सिमांतीक) श्रमिक संख्या ६.५३ लाख असून या कामगारांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ४३.९४% एवढे आहे. एकूण मुख्यत: कामगारांपैकी शेतकरी ४२.५२%, शेतमजूर ३५.४९%, घरगुती उद्योग, वस्तु निर्माण प्रक्रिया, सेवा व दुरूस्त्या इ. मध्ये १.९८% व इतर काम करणारे २० % व सिमांतिक काम करणारे १५% श्रमिक आहेत.

**३) साक्षरता :—** सन २०११ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरतेची टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या ७६.३३% असून यात पुरूष ८५.३१% तर स्त्रियांचे प्रमाण ६६.६७% आहे. महाराष्ट्र राज्याचे एकूण साक्षरतेचे प्रमाण ८२.९१% आहे. म्हणजेच उस्मानाबाद जिल्ह्याची साक्षरतेची टक्केवारी राज्य स्तरापेक्षा थोडी कमी आहे.

## ३.९.५ शेती :—

उस्मानाबाद जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ७४८ हजार हेक्टर आहे. त्यापैकी जंगलव्याप्त क्षेत्र ४ हजार हेक्टर म्हणजेच ०.५३% एवढे आहे. पिकाखालील निव्वळ क्षेत्र ६४० हजार हेक्टर आहे. यामध्ये १०५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचना खाली आहे. एकूण सिंचन क्षेत्राचे पिकाखालील एकूण क्षेत्राशी प्रमाण ९.१७% आहे. जिल्ह्यामध्ये पर्जन्यमान फारच कमी आहे.

**१) पीक रचना :—** जिल्ह्यामध्ये खरीप व रब्बी अशी दोन्ही पीके घेतली जातात. दोन्ही हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांमध्ये सर्वात जास्त क्षेत्र अन्नधान्य या पिकाचे असून सन २०१०—११ मध्ये अन्नधान्य पिकाखाली ६३२ हजार हेक्टर क्षेत्र होते. त्यानंतर कापूस पिकाखाली २ हजार हेक्टर क्षेत्र, ऊस पिकाखाली २५ हजार हेक्टर तर तेल बिया पिकाखाली १३२ हजार हेक्टर क्षेत्र होते.

**२) पीक उत्पादन :—** उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सन २००८—०९ मध्ये त`णधान्यांचे ३२९ हजार मे. टन उत्पादन झाले. कडधान्ये १११ हजार मे. टन,

कापूस ३ हजार मे. टन, ऊस २३५५ हजार मे. टन तर तेलबियाचे ७१ हजार मे. टन उत्पादन झाले.

**३) पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय सेवा व दुग्ध व्यवसाय :—** शेतीबरोबरच दुग्ध व्यवसाय सुध्दा जिल्ह्यातील महत्वाचा व्यवसाय असून शासनाने दिलेल्या प्रोत्साहनामुळे जिल्ह्यातील दुग्ध उत्पादनात वाढ होत आहे. सन २००७ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यात ८.११ लाख एकूण पशुधन होते. या पशुधनाची संख्या विचारात घेता शासनाने ६ सर्व चिकित्सालये, ३९ दवाखाने यांची सोय केली होती.

## ३.९.६ सहकार संस्था व सभासद :—

उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये मार्च २०११ मध्ये एकूण सहकारी संस्थांची संख्या ४३२२ एवढी होती. व सभासद संख्या ८ लाख ९ हजार इतकी होती. या सहकारी संस्थांमध्ये प्राथमिक, कृषी सहकारी, पतसंस्था संख्या ४६९, सभासद संख्या २ लाख ९२ हजार होती. त्यांनी ९९.०२ कोटी कर्जपुरवठा केला. बिगर शेती पतसंस्था ३९६, सहकारी पणन संस्था ३९, सहकारी दुग्ध संस्था १५१६, सामाजिक सेवा संस्था १३१२, उत्पादक संस्था २०९५ इ. सहकारी संस्था होत्या.

## ३.९.७ विद्युतीकरण व विद्युत पुरवठा :—

उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये मार्च २०११ अखेर या वर्षात एकूण विजेचा वापर ५३७७.१४ लाख कि. वॅट तास होता. त्यामध्ये घरगुती वापर ७२५.७९ लाख कि. वॅट तास, कृषी साठी ३९७२ लाख कि. वॅट तास तर औद्योगिककरणासाठी ६७९.३५ लाख कि. वॅट तास वापर झाला.

## ३.९.८ औद्योगिक स्थिती :—

उस्मानाबाद जिल्हा औद्योगिक दृष्टया अप्रगत गणला जातो. जिल्ह्यात उस्मानाबाद तालुक्यात ढोकी व तुळजापूर तालुक्यात तामलवाडी येथे सुत गिरणी आहे. परांडा, भूम व कळंब येथे दूध शीतकरण केंद्र आहेत. परांडा तालुक्यात चांदणी येथे मत्स्यबीज उत्पादन केंद्र आहे. उस्मानाबाद तालुक्यात

तेरणानगर व तुळजापूर तालुक्यात नळदुर्ग येथे सहकारी साखर कारखाने आहेत. जिल्ह्यातील एकमेव औद्योगिक वसाहत उस्मानाबाद शहरात आहे.

सन २००८—०९ मध्ये जिल्ह्यात नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या ३७ होती. कामगार संख्या १३९३ एवढी होती. साखर कारखाने ११ तर सूत गिरण्यांची संख्या ४ एवढी होती.

### ३.९.९ वाहतूक व दळणवळण :—

पूणे—हैद्राबाद—मच्छलीपट्टणम (सोलापूर—हैद्राबादमार्गे) हा राष्ट्रिय महामार्ग क्र.९ (नऊ) जिल्ह्याच्या दक्षिण भागातून जातो. मिरजहून कुर्डूवाडी मार्गे लातूरला जाणारा लोहमार्ग जिल्ह्यातून जातो.

जिल्ह्यात ५० कि. मी. लांबीचा रेल्वे मार्ग आहे. एकूण रस्ते लांबी ५४०८ कि. मी. आहे. पोष्ट कार्यालयाची संख्या २८३आहे.

### ३.९.१० कामगार व रोजगार :—

सन २००८—०९ या वर्षात जिल्ह्यात शासकीय कर्मचारी संख्या ७४७७ होती. जिल्हा परिषद कर्मचारी संख्या ११७३२ होती. नगर परिषद कर्मचारी संख्या १२२८ होती.

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात रोजगार हमी योजना द्वारे ७.५० लाख लोकांना रोजगार मिळाला, तर सेवायोजन केंद्रात ५२१०५ हजार लोकांनी नाव नोंदणी केली होती.

### ३.९.११ बँका :—

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात एकूण बँकांची संख्या १८२ एवढी होती. त्यामध्ये १०२ सहकारी बँक शाखा होत्या. या सर्व बँकातील ठेवी २४०३ कोटी रू. एवढी होती.

### ३.९.१२ शैक्षणिक सुविधा — प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन :—

सन २०१०—११ मध्ये जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या १२०१ होती. विद्यार्थी संख्या १.७५ लाख एवढी होती. शिक्षक संख्या ६४१४ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या २७ एवढी होती.

माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांची संख्या ४१४ होती. विद्यार्थी संख्या १.५१ लाख तर शिक्षक संख्या ४८२८ एवढी होती. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी संख्या ३१ एवढी होती.

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थानची संख्या ५७ एवढी होती. विद्यार्थी संख्या २५ हजार होती. अभियांत्रिकी महाविद्यालये २ एवढी होती.

### ३.९.१३ वैद्यकिय सेवा :—

सन २०१०—११ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यात सार्वजनिक रूग्णालयांची संख्या १० एवढी होती. दवाखाने ८, प्राथमिक आरोग्य केंद्र संख्या ४२ एवढी होती. दर लाख लोकसंख्येमागे खाटांची संख्या ६८ एवढी होती.

### ३.९.१४ यात्रा व पर्यटन स्थळे :—

उस्मानाबाद, तुळजापूर, नळदुर्ग, तेर, परांडा, अणदूर, भूम, कुंथलगिरी, येरमाळा ही उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळे आहेत.

### समारोप :—

सदर प्रकरणामध्ये मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यांचा सामाजिक व आर्थिक समालोचन सविस्तरपणे केलेले आहे. मराठवाडयामध्ये सर्व जिल्ह्यामध्ये पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असून सिंचन प्रमाण कमी आहे. वाहतूक व दळण—वळण सुविधेमध्ये रेल्वेच्या सुविधा अत्यंत कमी आहेत. औद्योगिकीकरणामध्ये औरंगाबाद शहर सोडले तर इतर भागात औद्योगिकीकरण खूपच कमी आहे. म्हणून मराठवाडा विभागाचा आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी शासनाच्या सहभागाची अत्यंत गरज आहे.

## संदर्भ


१) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०११–१२),अर्थ व सांख्यिाकी संचालनालय,नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई.

२) दृष्टीक्षेपात औरंगाबाद विभाग (२०११–१२), सहसंचालक, अर्थ व सांख्यिाकी संचालनालय,प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद.

३) क्षीरसागर व्ही. एस. (२०११), महाराष्ट्रातील जिल्हे, के. सागर पब्लिकेशन, पूणे.

४) जाधव तुकाराम, महाराष्ट्र वार्षिकी २०१२, द युनिक अकॅडमी, पूणे.

५) दास्ताने संतोष, महाराष्ट्र २००९, (२७ वी आवृत्ती), दास्ताने रामचंद्र आणि कंपनी,पुणे

६) उस्मानाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००७–०८.

७) शिंदे प्रफुल्ल, (२००१–०२),मराठवाडा डायरी संकलन व लेखन,प्रकाशन संपर्क, मुंबई–९.

८) देशमुख रा. नी.,आपला औरंगाबाद जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.

९) देशमुख रा. नी.,आपला जालना जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.

१०)देशमुख रा. नी.,आपला परभणी जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.

११) देशमुख रा. नी.,आपला हिंगोली जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.

१२)देशमुख रा. नी.,आपला बीड जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.

१३)देशमुख रा. नी.,आपला नांदेड जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.

१४)देशमुख रा. नी.,आपला लातूर जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.

१५)देशमुख रा. नी.,आपला उस्मानाबाद जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.

१६) Director of census Operation,Maharashtra of Home Affairs, Goverement of India.

१७) Dr.Sharma K.K. (2004), Intellectual's,Sandharbh Maharashtra volume – ii,Intellectual book Bureau,Bhopal.

१८) वेबसाईट :– www.mahadesh.maharashtra.gov.in

प्रकरण चौथे

# मराठवाडयाची अर्थव्यवस्था व मागासलेपणाची कारणे

४.१ प्रस्तावना
४.२ मराठवाडयाची अर्थव्यवस्था
४.२.१ मराठवाडयाचे क्षेत्रफळ व पावसाचे प्रमाण
४.२.२ लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्टये
४.२.३ मराठवाडयातील वनाखालील क्षेत्र
४.२.४ मराठवाडयात रोजगाराचे प्रमाण
४.२.५ मराठवाडयातील औद्योगिक स्थिती
४.२.६ मराठवाडयाचे क्षेत्रनिहाय उत्पन्न
४.२.७ दारिद्रयाची परिस्थिती
४.२.८ मराठवाडयातील दरडोई उपभोग खर्चाबाबतची परिस्थिती
४.२.९ मराठवाडयातील सिंचनाची स्थिती
४.२.१० मराठवाडयातील आधारभूत संरचना
४.३ मराठवाडयाचे मागासलेपणाची कारणे
४.३.१ प्रस्तावना
४.३.२ दरडोई उत्पन्न कमी
४.३.३ औद्योगिकरणाचा मंद विकास
४.३.४ अनिश्चित शेती व्यवसाय
४.३.५ शेतीवरील वाढता ताण
४.३.६ आधारभूत संरचनेचा अपुरा विकास
४.३.७ पतपुरवठयाच्या अपुऱ्या सोयी
४.३.८ सिंचन क्षेत्राचा अपुरा विकास
४.३.९ दारिद्रयाच्या प्रमाणात वाढ
४.३.१० साक्षरतेचे प्रमाण कमी
४.३.११ तंत्र शिक्षण व व्यावसायिक शिक्षणाचा अभाव
४.३.१२ दुबळया सामाजिक संस्था
४.३.१३ निम्न मानव विकास निर्देशांक
४.४ समारोप
संदर्भ

# प्रकरण चौथे

# मराठवाडयाची अर्थव्यवस्था व मागासलेपणाची कारणे

## ४.१ प्रस्तावना :—

कोणत्याही देशाच्या, राज्याच्या आणि प्रदेशाच्या विकासामध्ये त्या देशाच्या, त्या राज्याच्या, त्या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेचा सिंहाचा वाटा असतो. जर तेथील अर्थव्यवस्था ही प्रगत असेल तर त्या देशाचा, राज्याचा, प्रदेशाचा विकास झपाटयाने होतो. या विरूध्द परिस्थिती असेल तर अर्थव्यवस्था मागासलेली असेल आणि विकासामध्ये अडथळा येऊन विकास अवरूध्द होतो. त्यामुळे एखाद्या देशाच्या, राज्याचा, प्रदेशाचा अभ्यास करताना तेथील अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

या प्रकरणामध्ये मराठवाडयाच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करावयाचा आहे. ‘मराठवाडा’ हा भारत देशातील महाराष्ट्र राज्यातील एक प्रदेश आहे. मराठवाडयाच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करताना ही गोष्ट लक्षात घ्यावी लागते की, भारत जरी १९४७ साली स्वतंत्र झाला तरी, मराठवाडा स्वतंत्र होण्यासाठी १७ सप्टेंबर १९४८ साल उजाडावे लागले. कारण १९४८ पर्यंत मराठवाडयावर निजामाचे राज्य होते व मराठवाडयाच्या विकासाविषयी निजामाचा दृष्टिकोन अनुकूल नव्हता. त्यांनी मराठवाडयाच्या विकासा विषयी प्रयत्न देखील केले नाहीत. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर लगेच जून १९६० मध्ये मुंबईस झालेल्या महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदेमध्ये कै. चिंतामणराव देशमुख यांनी अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात मराठवाडयाच्या मागासलेपणाचे कारण विषद करताना असा उल्लेख केला की, ‘‘ मराठे कायमचे शत्रू म्हणून निजामाने कांही शतके मराठवाडयाची पध्दतशीर उपेक्षा केली. ज्या उपेक्षेने आलेला मागासलेपणा नव्या महाराष्ट्र राज्याने लवकरात लवकर भरून काढला पाहिजे.’’ [१]

‘‘१९६४ ला भारतीय जनगणनेचे कमिश्नर श्री अशोक मित्र यांनी ३५ निकष लावून तौलानिक अभ्यास करून बीड, परभणी, उस्मानाबाद हे जिल्हे

विकासाच्या दुसऱ्या पातळीवर असल्याचे मत व्यक्त केले आहे. म्हणजे मराठवाडा मागासलेला आहे हे सिध्द होते.''[२]

''नियाजन मंडळाने श्री पांडे यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास गट १९६८ मध्ये नेमला होता. श्री पांडे यांच्या मते त्या वेळच्या काळातील मराठवाडयातील सर्व जिल्हे मागास आहेत.''[३]

याचाच परिणाम म्हणजे मराठवाडयाची अर्थव्यवस्था ही मागासलेलीच राहिली. मात्र १९४८ नंतर भारत सरकारने वेगाने येथील अर्थव्यवस्था विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

मराठवाडयाच्या अर्थव्यवस्थेचा विचार करताना येथे असणाऱ्या अनेक बाबींची नोंद घ्यावी लागते. जसे येथील उद्योगांची संख्या मराठवाडयातील शिक्षणसंस्थांची संख्या, शिक्षणाचे स्वरूप, जमिनीची सुपीकता व उत्पादकता, सुशिक्षीत लोकांची संख्या, म्हणजे साक्षरतेचे प्रमाण, स्त्री—पुरूष प्रमाण, बाल मृत्यु दर, जन्म दर, मानव विकास पातळी, रोजगार निर्मितीचे प्रमाण, मराठवाडयाचे क्षेत्रनिहाय उत्पन्न, वनाखालील क्षेत्र, मराठवाडयाची औद्योगिक स्थिती, मराठवाडयातील दरडोई उपभोगाबाबतची परिस्थिती, मराठवाडयातील सिंचनाची स्थिती, मानव विकास पातळी, मराठवाडयातील एकूण उत्पन्नामध्ये शेती, उद्योग, सेवा यांचा वाटा किती प्रमाणात आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती, आधारभूत संरचनेचा विकास, अशा अनेक बाबींची नोंद घ्यावी लागते.

वरील सर्व बाबींचा पध्दतशीरपणे अभ्यास आपल्याला मराठवाडयाच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप लक्षात येईल. तरी देखील कुठल्याही अर्थव्यवस्थेत शेती, उद्योग व सेवा क्षेत्र हे महत्वपूर्ण ठरतात. मात्र या क्षेत्राबरोबर अलिकडच्या काळात बँकिंग क्षेत्रात सेवा व आधारभूत संरचनेचा विकास या दोन घटकाचे महत्व वाढत आहे. या प्रकरणामध्ये मराठवाडयाच्या अर्थव्यवस्थेच्या महत्वाच्या बाबींचा सविस्तरपणे विचार केला आहे. तो पुढील प्रमाणे आहे.

## ४.२ मराठवाडयाची अर्थव्यवस्था :—

### ४.२.१ मराठवाडयाचे क्षेत्रफळ व पावसाचे प्रमाण :—

महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ ३०७५८ चौ. कि. मी. आहे. त्यापैकी मराठवाडयाचे क्षेत्रफळ ६५११२ स्क्वे. मी आहे व मराठवाडयातील पावसाचे प्रमाण ५७१५ मी. मी. आहे. जे की वर्ष २००० मधील सरासरी पावसाचे प्रमाण आहे. मराठवाडयात तालुक्यांची संख्या ७८ व खेडयांची संख्या २००९ मध्ये ८५०६ एवढी होती.

### ४.२.२ लोकसंख्या शास्त्रीय वैशिष्टये :—

१) १९९१ मध्ये मराठवाडयाच्या लोकसंख्येचे एकूण महाराष्ट्राच्या लोक— संख्येशी असणारे प्रमाण १६.२२% होते. ते आता २००१ मध्ये कमी होऊन १६.११% झाले.

२) २००१ मध्ये ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण ७५.४% आहे. मात्र महाराष्ट्रात ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण ५७.६% आहे. याचा अर्थ महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडयात जास्त प्रमाणात लोकसंख्या ग्रामीण भागात राहते.

३) २००१ मध्ये स्त्री—पुरूष प्रमाण ९६६ होते. एकूण राज्याचे स्त्री — पुरूष प्रमाण ९२२ आहे. याचा अर्थ स्त्री—पुरूष प्रमाणाबाबत मराठवाडयाची परिस्थिती चांगली आहे.

४) मराठवाडयामध्ये लोकसंख्येची घनता २००१ मध्ये २४० per sq. km. आहे. महाराष्ट्राच्या एकूण सरासरीशी तुलना करता परिस्थिती चांगली आहे. कारण महाराष्ट्रामध्ये लोकसंख्येची घनता ३१४ per sq. km. आहे.

अलीकडे कांही शास्त्रज्ञांना जीवनमानाची पातळी शोधून काढण्यासाठी नवीन मानव विकास निर्देशांक आणला. यापूर्वी दरडोई उत्पन्न पातळी हा निकष वापरला जात होता. मानव विकास निर्देशांक (४) घटकाचे समिश्रण किंवा सरासरी आहे. ते (४) घटक खालील प्रमाणे :—

१) दरडोई उत्पन्न, २) साक्षरता दर, ३) शाळेत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण, ४) बालमृत्यूदर.

मानव विकास अहवाल महाराष्ट्र २००२ च्यानुसार, मानव विकासाचे सरासरी मूल्य ०.५८ आहे. यामध्ये महत्वाची गोष्ट ही आहे की, मराठवाडयातील सर्व जिल्ह्यातील HDI चे सरासरी मूल्य राज्याच्या सरासरी मूल्यापेक्षा कमी आहे. आणि त्या मध्ये जालना जिल्ह्याचे मूल्य ०.२७ HDI आहे. जे मराठवाडयात सर्वात कमी आहे. राज्यामध्ये ३३ वा क्रमांक जालना जिल्ह्याचा लागतो.

### ४.२.३ मराठवाडयातील वनाखालील क्षेत्र :—

मराठवाडयामध्ये वनाखालील क्षेत्र केवळ ३.८% आहे. एकूण क्षेत्रफळाशी मराठवाडयाच्या क्षेत्रफळाची तुलना करता हे प्रमाण फार कमी आहे. कारण भारतातील एकूण क्षेत्रफळापैकी महाराष्ट्रामध्ये १७.४% क्षेत्रफळ वनाखाली आहे. आंतरराष्ट्रीय मानकानुसार ३३% क्षेत्रफळ हे वनाखाली असणे गरजेचे आहे.

मात्र महाराष्ट्र व मराठवाडा या संदर्भात विचार करता परिस्थिती वेगळी आहे. मराठवाडयाच्या संदर्भात परिस्थिती आणखी गंभीर आहे. त्यामुळे एकंदरीत महाराष्ट्र व मराठवाडयामध्ये वनाखालील क्षेत्रात वाढ करणे गरजेचे आहे. कारण या बाबींचा परिणाम पावसाचे प्रमाण, जमिनीची उत्पादकता यासारख्या बाबींवर होत असतो.

### ४.२.४ मराठवाडयात रोजगाराचे प्रमाण :—

अर्थव्यवस्थेत रोजगाराच्या प्रमाणाची विशेष भूमिका असते. सरकार वेगवेगळया योजनामधून रोजगार निर्मिती करण्याचा प्रयत्न करते. यामुळे अर्थव्यवस्थेतील बेकारी दूर होण्यास मदत होते. तरीही रोजगार विनिमय केंद्रामध्ये ६.४२ लाख व्यक्तींनी मराठवाडयामध्ये बेरोजगार असल्याची नोंद केली आहे. औरंगाबाद मध्ये हे प्रमाण १.४४ लाख व नांदेड मध्ये १.१३ लाख आहे. ''सन १९८१ च्या आकडेवारीप्रमाणे मराठवाडयातील एकूण रोजगारापैकी ८२% रोजगार कृषी क्षेत्रात तर केवळ ७% उद्योग व ११% सेवा क्षेत्रात निर्माण झाला होता. उस्मानाबाद जिल्ह्याची स्थिती तर अधिकच विदारक वाटते. या जिल्ह्यात ८४% रोजगार कृषी क्षेत्रात, केवळ ५% उद्योग क्षेत्रात तर ११% सेवा क्षेत्रात होता. बीड जिल्हा तर चक्रवर्ती समितीनेच महाराष्ट्रातीलच नव्हे

तर भारतातील ६४ अतिमागास जिल्ह्यापैकी एक जिल्हा म्हणून घोषित केला आहे.''[४]

### ४.२.५ मराठवाडयातील औद्योगिक स्थिती :—

जिल्हावार औद्योगिक विकास घेतला तर मराठवाडयातील औरंगाबाद मध्ये एकूण औद्योगिक उत्पन्ना पैकी ४३% औद्योगिक उत्पादन होते. हिंगोली जिल्हा केवळ १३.८% औद्योगिक उत्पादन करतो. याचाच अर्थ मराठवाडयातील औरंगाबाद मध्ये केंद्रीकरण झाले आहे. व इतर जिल्हे बीड, लातूर, परभणी यामध्ये फारसे औद्योगिकरण झालेले नाही. त्यामध्ये मराठवाडयात जालना जिल्ह्याची औद्योगिक स्थिती चांगली आहे.

इतर जिल्ह्यात रोजगार पुरेशा प्रमाणावर उपलब्ध न झाल्याने औरंगाबादकडे रोजगार मिळविण्यासाठी धाव घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. यामधून उद्‌भवणाऱ्या इतर समस्या टाळण्यासाठी इतर जिल्ह्यामध्ये औद्योगिकरणाची गती ही झपाटयाने वाढविणे गरजेचे आहे.

''१९९२—९३ मध्ये महाराष्ट्रामध्ये भारतातील एकूण कारखाने १३.८%,रोजगार १४.७%,उत्पादन २१.२% तर मूल्यनिर्मिती २२.८% होती.''[५]

''१९९६—९७ मध्ये महाराष्ट्रामध्ये दर लाख लोकसंख्येमागे ४१ कारखाने होते त्यामध्ये मुंबई विभागामध्ये दर लाख लोकसंख्येमागे ६९ कारखाने तर पुणे विभागामध्ये ५५ कारखाने होते तर औरंगाबाद विभागामध्ये सर्वात कमी १५ कारखाने दर लाख लोकसंखेमागे होते.''[६]

### ४.२.६ मराठवाडयाचे क्षेत्रनिहाय उत्पन्न :—

१९९९—२००० व २०००—०१ या कालावधीसाठी मराठवाडयाचे क्षेत्रनिहाय उत्पन्न लक्षात घेतले आहे. व क्षेत्रवार जिल्हा उत्पन्नाची क्षेत्रनिहाय राज्य उत्पनाशी तुलना केली आहे.

**अ)** १९९९—२००० मध्ये मराठवाडयाचे निव्वळ जिल्हा उत्पन्न फक्त १०.३०% होते. हे राज्याच्या निव्वळ देशी उत्पादना एवढे होते. परंतु २००१—०२ मध्ये हे घसरून राज्याच्या निव्वळ देशी उत्पादनाच्या ९.९६% झाले.

**ब)** मराठवाडयाच्या एकूण उत्नामध्ये प्राथमिक क्षेत्राचा वाटा १९९९–२००० मध्ये १८.७४% होता. तो कमी होऊन २००१–०२ मध्ये १६.५९% राहीला. मात्र त्याच कालावधी मध्ये व्दितीय क्षेत्राचा वाटा वाढून ७.६२% वरून ८.९६% झाला. याच कालावधी मध्ये तृतीयक क्षेत्राचा वाटा सुधारला असल्याचे आकडेवारीवरून लक्षात येते.

**क)** या वरील आकडेवारीवरून ही बाब लक्षात येते की, मराठवाडयाच्या GDP मध्ये प्राथमिक क्षेत्राचा वाटा कमी होऊन व्दितीयक व तृतीयक क्षेत्राचा वाटा वाढत आहे. मात्र मराठवाडयाचे GDP चे महाराष्ट्राच्या GDP शी असणारे प्रमाण याच कालावधीमध्ये कमी झाले आहे. याचाच अर्थ मराठवाडयाच्या तुलनेत महाराष्ट्राच्या इतर प्रदेशांनी प्रगती केली आहे. ही बाब स्पष्ट होते.

### ४.२.७ दारिद्रयाची परिस्थिती :–

एखाद्या देशातील दारिद्रय रेषेखालील लोकांच्या किंवा कुटुंबाच्या प्रमाणावरून तेथील लोकांचा आर्थिक परिस्थितीचा एक अंदाज येतो आणि त्यावरून त्या देशातील लोकांचे राहणीमानसुध्दा कळून येण्यास मदत होते. या अनुषंगानेच मराठवाडयातील लोकांची परिस्थिती व राहणीमानाचा दर्जा जाणून घेण्याच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या प्रमाणाचे तालुकानिहाय आकडेवारी तक्ता क्र. ४.१ मध्ये दिसून येतो.

**तक्ता क्र. ४.१**

**मराठवाडा आणि महाराष्ट्रातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबे**

**(१९९७ — १९९८)**

| अ. क्र. | जिल्हा | कुटुंबांची एकूण संख्या | दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या | दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | २९३५५५ | ७६३४२ | २६.०१% |
| २ | जलना | २५६८४८ | ६९७९७ | २७.१७% |
| ३ | परभणी | ३६४८५९ | ११२४८९ | ३०.८३% |
| ४ | हिंगोली | — | — | — |
| ५ | बीड | ३६८७०७ | ९५२८२ | २५.८४% |
| ६ | नांदेड | ३७८०२० | ११०७४१ | २९.३०% |
| ७ | उस्मानाबाद | २६९०७७ | ५८०३१ | २१.५७% |
| ८ | लातूर | ३०३३२२ | ८५४०६ | २८.१६% |
| | मराठवाडा | २२३४३८८ | ६०८०८८ | २७.२१% |
| | महाराष्ट्र | ११०५३१४५ | ३८१९०१२ | ३४.४५% |
| ९ | कमाल दारिद्रय ( नंदुरबार ) | २२११३७ | १६६७९९ | ७५.४३% |
| १० | किमान दारिद्रय ( सांगली ) | ३६२८५४ | ५१३८६ | १४.१६% |

**स्त्रोत :** मानवी विकास निर्देशांक, महाराष्ट्र, २००२,पृ. १६५.

उपरोक्त तक्ता क्र. ४.१ वरून मराठवाडयातील परिस्थिती लक्षात घेतली असता १९९७—९८ मध्ये महाराष्ट्राची दारिद्रयाची जी परिस्थिती आहे त्यामध्ये महाराष्ट्रातील दारिद्रयाची सरासरी प्रमाण ३४.४५% आहे. व या तुलनेत राज्याच्या सरासरी प्रमाणपेक्षा मराठवाडयातील प्रमाण जास्त असलेले दिसून येते.

मराठवाडयामध्ये दारिद्रयाचे सर्वात जास्त प्रमाण परभणी जिल्ह्यामध्ये असून ते ३०.८३% आहे. मराठवाडयातील इतर सर्व जिल्हे या प्रमाणापेक्षा कमी आहेत. महाराष्ट्राचा विचार केला असता नंदुरबार या जिल्ह्यात दारिद्रयाचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ७५.४३% आहे. तर महाराष्ट्रात सांगली मध्ये प्रमाण सर्वात कमी म्हणजे १४.१६% इतके आहे.

दारिद्रयाचा विचार केला असता, मराठवाडयाची परिस्थिती चांगली नाही. शिवाय अनेक महत्वपूर्ण बाबींचा अभाव आहे असे दिसून येते.

### ४.२.८ मराठवाडयातील दरडोई उपभोग खर्चाबाबतची परिस्थिती :—

मराठवाडयामध्ये १९९३—९४ या कालावधीचा विचार केला असता दरडोई उपभोग खर्च मराठवाडयामध्ये विशेषतः ग्रामीण भागात २८३ रू. तर शहरी भागात ५११ रू. होता.

जर महाराष्ट्राची दरडोई उपभोग खर्चाची सरासरी लक्षात घेतली तर हे दिसून येते की, १९९३—९४ मध्ये महाराष्ट्राची दरडोई उपभोग खर्चाची सरासरी ग्रामीण भागात ३०२.९० रू. तर शहरी भागात ५३७.१९ रू. होती.

याचा अर्थ मराठवाडयाच्या तुलनेत महाराष्ट्रातील दरडोई उपभोग खर्चाचे प्रमाण जास्त आहे. याला महत्वपूर्ण कारण म्हणजे मराठवाडयातील दरडोई उत्पन्नाचे कमी प्रमाण व मराठवाडयाचे मागासलेपण होय.

### ४.२.९ मराठवाडयातील सिंचनाची स्थिती :—

सिंचन खात्याच्या अभ्यासानुसार महाराष्ट्र राज्यात एकूण अंदाजे चार हजार तीनशे (४३००) टी.एम.सी. पाण्याची उपलब्धता आहे. या (४३००) टी.एम.सी. पाण्यापैकी २६०० टी.एम.सी. पाणी वापरण्याची शक्यता अथवा मान्यता गृहीत धरली असून उर्वरित (१७००) टी.एम.सी. पाणी नेहमीच प्रवाही पारंपरिक योजनेमार्फतही शक्य नाही.

४३०० टी.एम.सी. पाणी उपलब्ध असलेल्या महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागात एकूण अंदाजे तीनशे (३००) टी.एम.सी. पाणी कागदोपत्री सिंचनासाठी उपलब्ध असून त्यात जायकवाडी धरणाच्या पाणी वापराचा शंभर (१००) टी.एम.सी. एवढा वाटा आहे. त्या २५ ते ३० टी.एम.सी. पाण्यापेक्षा अधिक पाणी उपलब्ध होऊ शकणार नाही. त्यामुळे हे धरण भविष्यात सिंचनाऐवजी नागरी पाणी पुरवठा करणाऱ्या एका मोठया भांडयात रूपांतर होईल. मराठवाडयातील सर्वच धरणाचे कालांतराने असे होईल.

परंतु वर उल्लेख केलेल्या कारणास्तव व इतर कारणास्तव मराठवाडा विभागास भविष्यात प्रत्यक्ष निम्मेच म्हणजे १५० टी. एम. सी. पाण्यापेक्षा अधिक पाणी उपलब्ध होणार नाही. मराठवाडा विभागाची लोकसंख्या व क्षेत्रफळ

राज्याच्या अनुक्रमे १६% व २८% एवढे आहे.आणि पाण्याची उपलब्धता ५% व ८% एवढी येते. पाण्याची उपलब्धताही अत्यंत गंभीर बाब आहे.

### ४.२.१० मराठवाडयातील आधारभूत संरचना :—

कोणत्याही अर्थव्यवस्थेत आधारभूत संरचना ही त्या अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये महत्वाची भूमिका पार पाडते. आज आधारभूत संरचना व बँकिंग क्षेत्र ही दोन महत्वाची क्षेत्र बनली आहेत. आर्थिक विकास हा औद्योगिक उत्पादनाच्या वाढीवर अवलंबून असतो. व ही औद्योगिक उत्पादनातील वाढ खऱ्या अर्थाने आधारभूत संरचनेच्या विकासावर अवलंबून असते. आधारभूत संरचनेमध्ये रेल्वे, रस्ते, वीज, पाणी, बँकिंग क्षेत्र इत्यादी बाबींचा समावेश होतो. मराठवाडयातील आधारभूत संरचनेची स्थिती कशी राहील याची माहिती खालील आकडेवारीवरून लक्षात येते.

**अ)** सन २००१ मध्ये मराठवाडा विभागात सुक्ष्म, लघु व मध्यम व माठे औद्योगिक उपक्रम १२२७१ तर मोठे ५३८ उपक्रम होते. त्यामध्ये अनुक्रमे १.१७ लाख व १.११ लाख कामगार काम करीत होते. त्याच वेळी महाराष्ट्रात सूक्ष्म, लघु व मध्यम औद्योगिक उपक्रम १६२९७३ तर मोठे उपक्रम ४९१५ होते. महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा विभागात ७.५% सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम होते. तर ११% मोठे उपक्रम होते. रोजगारात सूक्ष्म, लघु व मध्यम औद्योगिक उपक्रम ८.४% रोजगार होता तर मोठया औद्योगिक उपक्रमास ९.९% रोजगार होता.

**ब)** इ. स. वी. सन २००० मध्ये मराठवाडयातील एकूण उत्पादनाची किंमत ५९५७.५७ कोटी होती. तर महाराष्ट्रातल्या एकूण उत्पादनाची किंमत याचवेळी १८६७९.५० कोटी एवढी होती.

क) एकूण साखर कारखान्यांची संख्या २००१ मध्ये मराठवाडयात ३५ तर महाराष्ट्रात १२८ एवढी होती.

ड) २००१ मध्ये मराठवाडयातील सुतगिरण्यांची संख्या ३८, रेल्वे मार्गाची लांबी मराठवाडयात ८८३ कि. मी. होती. रस्त्याची लांबी मराठवाडयात

५४१३३ कि. मी. होती. तर महाराष्ट्रात २१६९४६ कि. मी. होती. याच काळात पोस्ट ऑफिसची संख्या २०५ एवढी होती.

जिल्हा पातळीवर विचार केला तर, आधारभूत संरचनेची अवस्था औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड, लातूर जिल्ह्यामध्ये मराठवाडयाच्या तुलनेत आधारभूत संरचनेचा अधिक विकास आहे. हिंगोली, उस्मानाबाद, बीड हे जिल्हे त्या तुलनेत मागास राहिलेले आहेत. हे आकडेवारीवरून लक्षात येते.

मराठवाडयात जी आधारभूत संरचना उपलब्ध आहे, ती महाराष्ट्राच्या संदर्भात जर विचार केला तर, महाराष्ट्राच्या तुलनेत आधारभूत संरचनेच्या बाबतीत मराठवाडा मागास राहिला असेच म्हणावे लागेल. कारण रेल्वे, रस्ते, वीजेच्या प्रती व्यक्ती उपभोग, पाणी यांची जी उपलब्धता महाराष्ट्रात आहे त्या तुलनेत मराठवाडयात ती कमी आहे. मराठवाडयातील मागासलेपणाच्या कारणामध्ये अतिशय प्रभावी कारण मराठवाडयातील मागास आधारभूत संरचना हे आहे. मराठवाडयाचा विकास अतिशय वेगाने करावयाचा असेल तर मराठवाडयातील आधारभूत संरचनेचा विकास करणे गरजेचे आहे. अन्यथा महाराष्ट्रातील मागास व विकसित प्रदेशातील दरी वाढत गेल्याशिवाय राहणार नाही.

## ४.३ मराठवाडयाचे मागासलेपणाची कारणे :—

### ४.३.१ प्रस्तावना :—

मराठवाडा विभाग सन १९४८ पर्यंत निजामाच्या हैद्राबाद संस्थानाचा एक भाग होता. त्यामुळे हा विभाग आर्थिक व सामाजिक दृष्टया दुर्लक्षित राहिला. सप्टेंबर १९४८ मध्ये भारत सरकारने केलेल्या पोलीस कारवाई मुळे मराठवाडा निजामाच्या जोखडातून मुक्त झाला. १९४८ ते १९५६ या ८ वर्षाच्या काळात हैद्राबाद राज्यातही मराठवाडयाच्या विकासाकडे दुर्लक्षच झाले. सन १९५६ ते १९६० या ४ वर्षात मराठवाडा द्वैभाषिक मुंबई राज्याचा एक भाग होता. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र चळवळीस यश येऊन, महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली.

तत्पूर्वी सन १९५३ साली ऐतिहासिक नागपूर करार संमत करण्यात आला. ज्यात विदर्भ व मराठवाडा विभागांना लोकसंख्येच्या प्रमाणात, सत्तेत स्थान, निधीचे वाटप व नोकऱ्यात जागा देण्याचे मान्य करण्यात आले. एवढेच नव्हे तर मराठवाडयास थोडे झुकते माप दिले जाईल, अशी घोषणा त्या काळचे मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या विधान सभेत केली. परंतु दुर्दैवाने पुढील काळात महाराष्ट्र शासनाने ' नागपूर करारारचे ' पालन न केल्याने मागास प्रदेश अधिक मागास झाले.

दि. १ मे १९६० साली संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली व पूर्वीचा हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा विभाग, महाराष्ट्र राज्यात बिनशर्त सामील झाला. पुर्वीच्या निजामाच्या राज्यात, मराठवाडयाच्यास आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगतीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे महाराष्ट्रात सामील होताना, तो एकदम मागास प्रदेश म्हणून ओळखला गेला. दुर्देवाने ४७ वर्षानंतर सुध्दा मराठवाडयावर बसलेला 'मागासलेपणाचा' शिक्का दूर झालेला नाही.

महाराष्ट्राचा आर्थिक, सामाजिक व औद्योगिक विकासात प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे. मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक या जिल्ह्यात औद्योगिकरण वेगाने झाले आहे. मराठवाडयातील आठ जिल्ह्यपैकी (औरंगाबाद) वगळता इतर सात जिल्हे औद्योगिकरणाबाबत खूपच मागासलेले आहेत. एकंदरीत मराठवाडयाच्या मागासलेपणास जे घटक कारणीभूत आहेत त्या सर्वांचा एकत्रितपणे विचार पुढील प्रमाणे करता येईल.

### ४.३.२ दरडोई उत्पन्न कमी :—

मराठवाडयाच्या मागासलेपणाचे महत्वाचे कारण म्हणजे कमी दरडोई उत्पन्न हे होय. दरडोई उत्पन्न कमी म्हणजे राहणीमानाची पातळी खालावून दारिद्रयावस्था निर्माण होऊन बचत व गुंतवणूकीचे प्रमाण कमी होऊन औद्योगिक विकास मंद होतो हे तक्ता क्र. ४.२ वरून दिसून येते.

### तक्ता क्र. ४.२

### महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ — दरडोई उत्पन्न व निर्देशांक

| वर्ष | मराठवाडा दरडोई उत्पन्न रू. | निर्देशांक | विदर्भ दरडोई उत्पन्न रू. | निर्देशांक | महाराष्ट्र राज्य दरडोई उत्पन्न रू. | निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५५—५६ | १७५ | ५०.०० | २३१ | ७९.०० | २९२ | १०० |
| १९७८—७९ | १०३४ | ६६.०० | १०८२ | ६८.९० | १५७० | १०० |
| १९८८—८९ | २०४७ | ७०.६० | २०९४ | ७२.२० | २८९९ | १०० |
| १९९०—९२ | ४७११ | ६६.०० | ५३३४ | ७५.३० | ७१०७ | १०० |
| २००१—०२ | — — | — — | — — | — — | २२७६३ | १०० |

**स्त्रोत :** Regional Disparities in Maharashtra problem and solutions – 1960-2000.

उपरोक्त तक्ता क्र. ४.२ वरून असे दिसून येते की, १९५५—५६ या काळात मराठवाडयातील दरडोई उत्पन्न इतर दोन्ही विभागाच्या तुलनेत कमी होते. राज्याच्या सरासरी दरडोई उत्पन्नाच्या तुलनेत मराठवाडयाचे दरडोई उत्पन्न ५० टक्के असल्याचे दिसून येते. १९५५—५६ ते १९९०—९२ या कालावधीत उपलब्ध आकडेवारीवरून हे स्ष्ट होते की, मराठवाडयातील लोकांचे दरडोई उत्पन्न हे महाराष्ट्र राज्याच्या सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा कमी आहे. त्यामुळे दरडोई उत्पन्न निर्देशांक राज्याच्या सरासरी पेक्षा कमी होताना दिसतो. दरडोई उत्पन्न व निर्देशांक जितका कमी असतो तेवढेच मागासलेपणाचे प्रमाण अधिक असते असे म्हणता येईल.

### ४.३.३ औद्योगिकरणाचा मंद विकास :—

औद्योगिकरणाचा मंद विकास हे मराठवाडयाच्या मागासलेपणास जबाबदार असणारे कारण आहे. औरंगाबाद वगळता मराठवाडयातील इतर सात जिल्ह्यात औद्योगिकरणाची गती मंद आहे.

जर जिल्ह्याचा औद्योगिक विकास लक्षात घेतला तर, मराठवाडयातील औरंगाबाद जिल्ह्यात एकूण औद्योगिक उत्पन्नापैकी ४३ औद्योगिक उत्पादन एकटया जिल्ह्यात होते. याचाच अर्थ बीड, परभणी, उस्मानाबाद व इतर जिल्ह्यात औद्योगिकरण झालेले नाही. त्यामध्ये मराठवाडयात जालना जिल्ह्याची औद्योगिक स्थिती चांगली आहे. याचाच परिणाम म्हणून अकार्यक्षम संयोजन, अपुरे भांडवल, उद्योजकतेचा अभाव व असहाय्यतेच्या चौकटीत अडखळलेले

समाजजीवन यासारखे घटक औद्योगिकरण वेगाने न होण्यास कारणीभूत ठरले आहेत.

### ४.३.४ अनिश्चित शेती व्यवसाय :—

मराठवाडयाच्या अर्थव्यवस्थेत शेतीस रोजगार व उत्पन्नाच्या दृष्टीने महत्वाचे स्थान आहे. मराठवाडयातील बहुतांश शेतजमीन मध्यम काळया प्रकारची आहे. मराठवाडयात बहुतांश पाऊस नैऋत्य मौसमी वाऱ्यापासून पडतो. १९९० मध्ये मराठवाडा विभागात आालिताखाली असणाऱ्या निव्वळ लागवडीखालील क्षेत्राची टक्केवारी केवळ १२.३५ होती. यावरून मराठवाडयातील शेती निसर्गावर किती अवलंबून आहे, हे लक्षात येते. मान्सूनच्या लहरीपणावरच मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे समीकरण अवलंबून असते. अनिश्चित शेती व्यवसायामुळे मराठवाडा मागासलेला आहे, असे म्हणता येते.

### ४.३.५ शेतीवरील वाढता ताण :—

औद्योगिकरणाच्या मंद विकासामुळे मराठवाडयात वाढत्या लोकसंख्येचा ताण शेती क्षेत्रावर पडत आहे. शेती क्षेत्राचे लहान होणारे सरासरी आकारमान आणि त्यातूनच बिनकिफायतशीर शेतीचे वाढते प्रमाण या बाबी उद्‌भवतात. शेतीवरील वाढत्या तणावामुळे छुपी बेकारीची समस्या निर्माण झाली आहे.

### ४.३.६ आधारभूत संरचनेचा अपुरा विकास :—

देशाच्या आर्थिक, सामाजिक व औद्योगिक विकासासाठी आधारभूत संरचना पुरेशी व कार्यक्षम असावी लागते. विकसनशील देशात वाहतूक व आधारभूत संरचनेअभावी आर्थिक विकासाची गती मंद पावते. देशात रेल्वे वाहतूक, रस्ते वाहतूक, वीज, शिक्षण, सिंचन, आरोग्य ईत्यादी गोष्टीचा समावेश आधारभूत संरचनेत होतो. अर्थव्यवस्थेचे कार्य सुलभ करणे, जलद व समतोल औद्योगिक विकास व दारिद्रयात घट घडवून आणण्यासाठी आधारभूत संरचना उपयोगी ठरते.

मराठवाडयाचा विचार करता आधारभूत संरचनेची कमतरता असल्याचे दिसून येते.सन २००० मधल्या एकूण उत्पादनाची किंमत ५९५७.५७ करोड

होती. तर महाराष्ट्रातल्या एकूण उत्पादनाची किंमत याचवेळी १८६७९५ करोड एवढी होती.

२००० मध्ये मराठवाडयात कारखान्यांची संख्या १७६३ होती, त्यावेळी महाराष्ट्रात हीच संख्या २७८३७ एवढी होती. २००१ मध्ये साखर कारखान्यांची मराठवाडयात ३५ तर महाराष्ट्रात १२८ एवढी होती.

२००१ मध्ये मराठवाडयातील सुतगिरण्यांची संख्या ३८, रेल्वे मार्गाची लांबी ८८३ कि. मी. होती. मराठवाडयात एकूण रस्त्याची लांबी ५४१३३ कि. मी. होती. तर महाराष्ट्रात याच काळात २१६९४६ कि. मी. रस्त्याची लांबी होती. जी राज्यातील इतर भागाच्या तुलनेने कमी असलेले दिसते. सिंचनाच्या बाबतीत मराठवाडयाचा अनुषेश मोठा आहे. मराठवाडयातील ३४० गाव तळी, ३६१४ पाझर तलाव, ४७ वसंत बंधारे अशी सिंचन व्यवस्था आहे. मराठवाडयातील लोकसंख्या व क्षेत्रफळ राज्याच्या अनुक्रमे १६% व २८% एवढे आहे. आणि पाण्याची उपलब्धता ५% व ८% एवढी येते. त्यामुळे पाण्याची उपलब्धता ही गंभीर बाब आहे.

महाराष्ट्राच्या तुलनेत आधारभूत संरचनेच्या बाबतीत जर विचार केला तर मराठवाडा विभाग मागास राहीला असे म्हणावे लागेल. कारण रेल्वे, रस्ते, विजेच्या प्रतीव्यक्ती उपभोग, पाण्याची उपलब्धता महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडयात ती कमी आहे. मराठवाडयाचा विकास वेगाने करावयाचा असेल तर आधारभूत संरचनेचा विकास करणे गरजेचे आहे. त्यामुळे मराठवाडयाच्या मागासलेपणाचे हे अतिशय प्रभावी कारण ठरले आहे.

### ४.३.७ पतपुरवठयाच्या अपुऱ्या सोयी :—

शेती किंवा कोणत्याही क्षेत्राच्या विकासासाठी पतपुरवठा आवश्यक असतो. पतपुरवठयाचे कमी प्रमाण असेल तर त्यामुळे अनेक अडचणी येतात.

स्थानिक व्यापाऱ्यांना, कुटीरउद्योगांना, दुर्बल घटकांना योग्य अर्थसहाय्य देऊन त्यांना उद्योगशील बनविणे हे काम वित्तीय क्षेत्रातील बँकांचे असते. प्रारंभीच्या काळात बँकांचे राष्ट्रीयकरण झाल्यानंतर मराठवाडयातील बँकांनी जनतेला अर्थसहाय उपलब्ध करून देण्यास मदत केली. मात्र एकूण बँकांच्या

शाखा, कर्जपुरवठा, ठेवी, यांचा विचार करता पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत हा वेग मंदावलेला पुढील तक्ता क्र. ४.३ वरून दिसून येतो.

**तक्ता क्र. ४.३**

**वित्तीय सेवा संस्थांची विभागवार स्थिती**

| **अ.क्र.** | **विभाग** | **लेकसंख्या** (%) | **व्यापारी बँकांच्या शाखा** (%) | **एकूण ठेवी** (%) | **ऋण पुरवठा** (%) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प. महाराष्ट्र | ३८% | ३६% | १३% | १२% |
| २ | विदर्भ | २२% | २०% | ०५% | ०३% |
| ३ | मराठवाडा | १६% | १२% | ०२% | ०२% |
| ४ | कोकण | ११% | ११% | ०५% | ०३% |

**स्त्रोत :—** जैन अशोक 'महाराष्ट्राचे शासन व राजकारण' सेठ पब्लिकेशन, पृ. क्र. २६६.

उपरोक्त आकडेवारीच्या आधारे वित्तीयसेवा क्षेत्रात प. महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा, विदर्भ व कोकण या ठिकाणी बँकेचा सेवा विस्तार अत्यल्प आहे, असे दिसते. मराठवाडयाचा विचार करता एकूण ठेवी, ऋणपुरवठा याची लोकसंख्येच्या निकषानुसार तुलना केल्यास इतर विभागाची स्थिती असमाधानकारक आहे.

कृषिप्रधान अर्थव्यवस्था असलेल्या मराठवाडयात कृषिक्षेत्रांशी निगडीत सहकारी संस्था व उद्योगधंदे पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे यशस्वीरित्या राबविले गेले, असे म्हणता येणार नाही. मराठवाडयाच्या मागासलेपणास जबाबदार घटक म्हणून अपुरा पतपुरवठा आहे, असे म्हणता येईल.

### ४.३.८ सिंचन क्षेत्राचा अपुरा विकास :—

शेतीच्या विकासासाठी सिंचनाला सर्वाधिक महत्व दिले जाते. सिंचन खात्याच्या अभ्यासानुसार, महाराष्ट्रात ४३०० टी.एम.सी. पाणी उपलब्ध आहे. त्यात मराठवाडयाच्या विकासाला ३०० टी.एम.सी. पाणी कागदोपत्री वाटयाला येते. त्यात १०० टी.एम.सी. पाणी जायकवाडी धरणाचे आहे. प्रत्यक्षात सिंचनासाठी २५ ते ३० टी.एम.सी. पाण्यापेक्षा अधिक पाणी उपलब्ध होणार नाही. भविष्यात त्याचे औरंगाबादसाठी पाणी पुरवठा करणाऱ्या भांडयात रूपांतर होईल. निम्मे १५० टी.एम.सी. पेक्षा जास्त पाणी मराठवाडयात उपलब्ध होणार नाही.

पाणलोटक्षेत्र विकास संकल्पनेअंतर्गत पाझर तलाव, कच्चे बंधारे, वसंत बंधारे, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे व पूलवजा बंधारे या सिंचन साधनाची शेती विकासात महत्वाची भूमिका राहिली आहे. पाझर तलावामुळे अवर्षणप्रणव भागातील जीवनास चांगला दिलासा मिळालेला दिसतो. इतर भागाची तुलना करता, मराठवाडयात पाझर तलाव, वसंत बंधारे, कोल्हापूर बंधारे यांचे प्रमाण विभागात कमी/अत्यल्प राहीलेले आहे. एकंदरीत यामुळे शेतीच्या विकासात अडथळे निर्माण होत आहेत.

### ४.३.९ दारिद्रयाच्या प्रमाणात वाढ :—

कमी दरडोई उत्पन्न, अर्थव्यवस्था व समाज व्यवस्थेची सरंजामी संरचना, शेतीबाबतची अनिश्चितता इत्यादी मुळे मराठवाडयात दारिद्रयाचे प्रमाण जास्त आहे. महाराष्ट्रात सरासरी प्रमाण ३४.१५% आहे. या तुलनेत महाराष्ट्र राज्याच्या सरासरी प्रमाणापेक्षा मराठवाडयातील दारिद्रयाचे प्रमाण जास्त असलेले आपणास दिसून येते.

मराठवाडयात दारिद्रयाचे सर्वात जास्त प्रमाण परभणी जिल्ह्यामध्ये असून ते ३०.८३% आहे. मराठवाडयातील इतर जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण कमी दिसते. दारिद्रयाचे प्रमाण कमी असणे हे मराठवाडयाच्या औद्योगिक व आर्थिक मागासलेपणास जबाबदार आहे. दारिद्रयाचे दुष्टचक्र भेदल्याशिवाय मराठवाडयाच्या औद्योगिक व आर्थिक विकासाची कोंडी फुटू शकणार नाही.

### ४.३.१० साक्षरतेचे प्रमाण कमी :—

२०११ च्या जनगणनेनुसार मराठवाडयातील साक्षरतेचे प्रमाण ७६.३८% होते. आर्थिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीने साक्षरतेस महत्व असते. राज्याच्या इतर भागाच्या तुलनेत मराठवाडयातील साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामुळेच दैववाद, परंपरागत दृष्टीकोन असणारा समाज मराठवाडयात मोठया प्रमाणात आढळतो.

### ४.३.११ तंत्र शिक्षण व व्यावसायिक शिक्षणाचा अभाव :—

तंत्रशिक्षण देणाऱ्या व व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था मराठवाडयात तुलनेने कमी आहेत. पदव्यूत्तर शिक्षणाची सोय औरंगाबाद व

नांदेड येथील इंजिनीअरिंग महाविद्यालयात थोडीशी आहे. पण प्रवेशासाठी असलेल्या जागा राज्यातील इतर सहा विद्यापीठांना वाटून देण्याची व्यवस्था आहे.

मराठवाडयातील संस्थांमधून शिक्षण दिल्या जात असलेल्या अनेक अभ्यासक्रमात बाहेरचेच विद्यार्थी शिक्षण व प्रशिक्षण घेत आहेत. गेली अनेक वर्षे या विचारधारेमुळे राज्यातील मागास विभागाचे खूपच नुकसान झाले आहे. उलट नव्या नव्या उद्योगांतून राज्याच्या बाहेरील प्रशिक्षित लोकांनी मोठया प्रमाणावर रोजगार पटकाविले आहेत. यातूनच मराठवाडयाची तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण व्यवसाय शिक्षणातून पिछेहाट होत गेली. यातून मराठवाडयाचा शैक्षणिक मागासलेपणा स्पष्ट होतो.

**४.३.१२ दुबळया सामाजिक संस्था :—**

मराठवाडयातील स्वयंसेवी संस्था व सहकारी संस्था दुबळया असल्यामुळे मराठवाडयाच्य वेगाने विकास होऊ शकत नाही. वास्तविक पाहता कोणत्याही प्रदेशाच्या विकासात सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या इत्यादीचा मोठा वाटा असतो. दुर्दैवाने मराठवाडयातील साखर कारखाने, सुतगिरण्या यांचे फारसे योगदान या प्रदेशाच्या विकासात दिसून येत नाही.

**४.३.१३ निम्न मानव विकास निर्देशांक :—**

अलिकडे काही अर्थशास्त्रज्ञांनी जीवनमानाची पातळी शोधून काढण्यासाठी नविन मानव विकास निर्देशांक तयार केला आहे. यात १) दरडोई उत्पन्न पातळी, २) साक्षरता दर, ३) शाळेत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण, ४) बालमृत्यू, ५) आयुर्मान इ. घटकांचा समावेश केला जातो, हे तक्ता क्र. ४.४ वरून दिसून येते.

**तक्ता क्र. ४.४**

**मराठवाडयाचा मानव विकास निर्देशांक**

| अ. क्र. | जिल्हे | मानव विकास निर्देशांक — २००० |
|---|---|---|
| १ | औरंगाबाद | ०.५७ |
| २ | जालना | ०.२७ |
| ३ | परभणी | ०.४३ |
| ४ | हिंगोली | ०.४३ |
| ५ | बीड | ०.४७ |
| ६ | नांदेड | ०.३७ |
| ७ | उस्मानाबाद | ०.३८ |
| ८ | लातूर | ०.४७ |
| | महाराष्ट्र सरासरी निर्देशांक | ०.५८ |

**स्त्रोत :—** महाराष्ट्र शासन, मानव विकास अहवाल (२००२) नियोजन विभाग.

उपरोक्त तक्ता क्र. ४.४ नुसार, महाराष्ट्राची मानव विकासाची मूल्यांची सरासरी पातळी ०.५८ आहे. यात महत्वाची बाब म्हणजे मराठवाडयातील आठही जिल्हे या पातळी खाली येतात. यावरून मराठवाडयाचे मागासलेपण दूर झाले नाही, असे म्हणता येते.

## ४.४ समारोप :—

सदर प्रकरणात मराठवाडयाच्या विविध चिकित्सक घटकांचा अभ्यास करून, मराठवाडयाच्या मागासलेपणाच्या कारणांचा शोध घेतला आहे. हे विश्लेषण करताना मराठवाडा मागास का आहे, या प्रश्नाची उत्तरे जवळपास निदर्शनास येतात.

मराठवाडयाची स्थिती इतर विभागांपेक्षा गंभीर असली तरी, त्यामध्ये सुधारणा करण्यास वाव आहे, हे विसरून चालणार नाही. परंतु यात शासनाचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे.

## संदर्भ


१) प्रा. पत्की/पाठक (जून १९९२), औद्योगिक अर्थशास्त्र पान क्र. ९२,पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

२) कोंडेवार यू.बी./डॉ. खंदारे भारत (ऑगस्ट २००९),भारतीय अर्थव्यवस्था (पृ.क्र. २०१), चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.

३) उपरोक्त (पृ. क्र. २०१).

४) डॉ. कुरूलकर र. पु. (फेब्रुवारी २००३), मराठवाडयाचा आर्थिक विकास (शोधनिबंध), अर्थमोळी (पृ. क्र. २०४), विमल प्रकाशन, नांदेड.

५) कुलकर्णी प्र. रा. (जून १९९९), भारतीय अर्थव्यवस्था, (पृ. क्र. २१), विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

६) डॉ. सोळुंके आर. एस./डॉ. सौ. महाजन एम. डी. (एप्रिल २०००), महाराष्ट्रातील औद्योगिक असमतोल विकास (शोधनिबंध), Issues in Indias Economic Development, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

७) तुपे सु. दा., मराठवाडयाचा आर्थिक विकास आणि समस्या.,साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद.

८) मानवी विकास निर्देशांक, महाराष्ट्र, २००२,पृ. १६५.

९) जैन अशोक 'महाराष्ट्राचे शासन व राजकारण' सेठ पब्लिकेशन, पृ. क्र. २६६.

१०) दृष्टिक्षेपात औरंगाबाद विभाग — २०१० — ११ ' सहसंचालक ' अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद.

११) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०११ — १२ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

१२) Datta R & Sundram K. P. M. ( 2006 ) " Indian Economy " S. Chand & Company Ltd., New Delhi, 43 th Edition.

१३) Rrgional Disparities in Maharashtra Problems and solutions ( 1960 – 2000 ) by R. P. Kurulmar, Guna Gaurav, Nyas Publications No. 24 Think Line, Nashik.

१४) Maharashtra Human Development Report – 2002, Government of Maharashtra, Mumbai.

१५) Basic Developmental statistics of the Marathwada Region ( 2003 ) by Swami Ramanand Teerth Marathwada Research Institute, Aurangabad.

१६) Aurangabad Division at a Glace 2000 – 01 Directorate of Economics & Statistics, Govt. of Maharashtra, Regional office, Aurangabad.

## प्रकरण पाचवे

# मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना, रचना व भूमिका

५.१ प्रास्ताविक
५.२ वैधानिक विकास मंडळाची स्थापना
५.३ वैधानिक विकास मंडळाची रचना
५.४ तीनही वैधानिक विकास मंडळाची कार्ये
५.५ विकास कामाच्या खर्चासाठी निधीचे वाटप
५.६ राज्यपालांकडून निर्देश
५.७ शिक्षण, प्रशिक्षण आणि सेवायोजन यासाठी सुयोग्य व्यवस्था
५.८ मराठवाडा वैधानिक विकास मंडळ
५.८.१ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे कार्यक्षेत्र व मुख्यालय
५.८.२ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे कार्य
१ क्षेत्रिय विकास पातळी निश्चित करणे
२ सर्वसाधारण विकास साधण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणे
३ योजनांशी संबंधीत खर्चाबाबत सूचना करणे
४ तांत्रिक शिक्षण व व्यवसायिक शिक्षणाच्या सोयी
५ सरकार नियंत्रित नोकऱ्यात विभागवार न्याय्य वाटप होण्याचा प्रयत्न करणे
६ कार्याचा अहवाल पाठविणे
५.८.२ कार्यालय आस्थापना
५.८.३ मंडळाच्या सर्वसाधारण बैठका
५.८.४ विषय समित्या
५.८.५ नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये वैधानिक विकास मंडळाचा सहभाग
५.८.६ औरंगाबाद येथे राज्यमंत्रीमंडळाची बैठक आयोजित करणे
५.८.७ मंडळाचे त्रैमासिक वार्तापत्र
५.८.८ कार्यालयीन ग्रंथालय
संदर्भ

# प्रकरण पाचवे

# मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना, रचना व भूमिका

## ५.१ प्रास्ताविक :—

दि. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र हे भारतीय संघ राज्यातील प्रमुख घटक राज्य आहे. महाराष्ट्राचे प्रमुख पाच प्रादेशिक विभाग पाडले गेले आहेत. त्यामध्ये कोकण, विदर्भ, मराठवाडा, प. महाराष्ट्र व मुंबई यांचा समावेश होतो. या पाचही प्रादेशिक आर्थिक विकासामध्ये प्रचंड असमतोल असल्याचे दिसून येते. हा असमतोल कमी करण्यासाठी व महाराष्ट्राचा पर्यायाने देशाचा समतोल विकास करण्यासाठी प्रादेशिक विकास मंडळाच्या स्थापनेची गरज प्रकर्षाने जाणवू लागली. तसेच महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती नंतर मराठवाडा व विदर्भाचा विशेष विकासासाठी 'नागपूर करार' करण्यात आला होता. त्यानुसार विदर्भ व मराठवाडयाला विकास निधीचा न्याय वाटा मिळत नसल्याने तेथील जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. त्यानुसार वैधानिक विकास मंडळाच्या निर्मितीची मागणी जोर धरू लागली. प्रादेशिक विकासातील असमतोल कमी करून देशाच्या सर्वांगिण विकासासाठी सरकारने राष्ट्रीय समितीची स्थापना केली. तसेच दि. २१ डिसेंबर १९५३ रोजी राज्य पुनर्रचना आयोगाची नेमणूक केली. तसेच महाराष्ट्र सरकारने मागास प्रदेशाचा अभ्यास करण्यासाठी बऱ्याच समित्यांची नेमणूक केली. त्यामध्ये चक्रवर्ती समिती, पांडे समिती, राष्ट्रीय समिती, इ. सन १९८३ मध्ये वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोला संदर्भात सत्यशोधक समितीची स्थापना केली. या समितीने महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोला संदर्भातील अकरा तरतुदी करून आपला अहवाल एप्रिल १९८४ साली राज्य सरकारला सादर केला. या समितीने आपल्या अहवालात १९८२ पर्यंतच्या अनुशेषाच्या आकडेवारीचा अभ्यास करून एकूण ३,१८६ कोटी रूपयांचा महाराष्ट्राचा अनुशेष काढला. त्याची विभाग निहाय वाटणी

पुढील प्रमाणे केली. मराठवाडा — ७५१ कोटी रू., विदर्भ — १२४६ कोटी रू, उर्वरित महाराष्ट्र ११८९ कोटी रू. आकडेवारीच्या टक्केवारीचा विचार केला असता मराठवाडयाचा अनुशेष २४%, विदर्भाचा अनुशेष ३९%, उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष ३७%, होती.

मराठी भाषिक महाराष्ट्र राज्य निर्मिती नंतर सुरूवातीच्या कांही काळात नागपूर करारातील आश्वासनाचे पालन कांही बाबतीत करण्यात आले. परंतु नंतरच्या काळात विशेषत: यशवंतराव चव्हाण केंद्रात गेल्यानंतर मराठवाडयाच्या विकासाकडे राज्यशासनाचे दुर्लक्ष होवू लागले. विशेषत: मराठवाडयातील सिंचन प्रकल्प पुरेशा निधी अभावी रखडू लागले. मराठवाडयाच्या लोकमानसात त्याच्या तीव्र प्रतिक्रीया उमटू लागल्या. त्याचा परिणाम म्हणून राज्य विधी मंडळातील सर्व लोक प्रतिनिधी तसेच ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखालील जनता विकास परिषदेने भारतीय राज्य घटनेच्या ३७१(२) मधील तरतुदी प्रमाणे मागासलेल्या मराठवाडयासाठी वैधानिक विकास मंडळाची मागणी लावून धरली. मराठवाडयातील जनतेचा तीव्र असंतोष व विधी मंडळातील लोक प्रतीनिधीची आग्रही भूमिका दोन्हींच्या रेटयामुळे राज्य विधी मंडळाने २३ जुलै १९८४ रोजी मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळे स्थापन करावीत अशी केंद्र शासनाला शिफारस करणारा ठराव पारित केला. परंतु प्रत्यक्षात ही वैधानिक विकास मंडळे स्थापन होण्यास १० वर्षाचा कालावधी लागला.

### ५.२ वैधानिक विकास मंडळाची स्थापना :—

भारतीय संविधानामध्ये नोव्हेंबर १९५६ साली अनुच्छेद ३७१(२) अंतर्भूत करण्यात आले. ज्याद्वारे राज्यपालांवर विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रा करीता वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याची ''विशेष जबाबदारी'' सोपविण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. राज्यपालांवर अशा प्रकारचा विशेषाधिकार सोपविण्याचे विधीग्राहयतेबाबत कोणत्याही शंकांचे निरसन करण्यासाठी अनुच्छेद ३७१(२) मध्ये ''संविधानामध्ये इतरत्र कांहीही असले

तरीही'' राष्ट्रपती आदेशान्वये अशी तरतुद करू शकतात. असे नमुद करण्यात आले आहे. (परिशिष्ट –१)

दि. २६ जुलै १९८४ रोजी महाराष्ट्राच्या विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने ठराव पारित करून राष्ट्रपतींना घटनेच्या अनुच्छेद ३७१(२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून विदर्भ, मराठवाडा तसेच उर्वरित महाराष्ट्रासाठी स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करण्याची विनंती केली.

त्यानंतर तब्बल १० वर्षांनी राष्ट्रपतींनी राज्य विधीमंडळाने पारित केलेला ठराव स्वीकृत करून आपला आदेश क्र. जी.एस.आर. ३१०/दि. ९ मार्च १९९४ रोजी प्रस्तुत केलेल्या आदेशाद्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांनी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे स्थापन करण्याची तसेच घटनेच्या अनुच्छेद ३७१ च्या उपकलम (२) मधील पोटकलम '**ब**' व '**क**' मध्ये विषद केलेल्या बाबीसंबंधी विशेष जबाबदारी सोपविली. हा आदेश पाच वर्षाकरिता किंवा राष्ट्रपती ठरवतील त्या दिवसापर्यंत लागू राहिल असे त्यात नमुद करण्यात आले.

राष्ट्रपतींच्या उपरोक्त आदेशाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दि. ३० एप्रिल १९९४ रोजी ''विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश १९९४'' जारी केली. या आदेशान्वये विदर्भ मराठवाडा तसेच उर्वरित महाराष्ट्रासाठी स्वतंत्र विकास मंडळाची स्थापना करण्यात आली. आदेशामध्ये विकास मंडळाची रचना, अध्यक्ष आणि सदस्यांचा पदावधी आणि विकास मंडळाची कार्ये या बाबी विस्तृत पणे नमूद करण्यात आल्या आहेत. तसेच या आदेशात राज्यपालांच्या खालील जबाबदाऱ्या व अधिकारांचे वर्णन केले आहे.

१) विकास खर्चाकरिता निधीचे वाटप करणे.

२) मंडळांना निर्देश देणे.

३) शिक्षण, प्रशिक्षण व सेवायोजन यासाठी सुयोग्य व्यवस्था करणे.

४) मंडळाच्या सुयोग्य कामकाजासाठी नियम बनविणे.

वैधानिक विकास मंडळे आदेश दि. ३० एप्रिल १९९४ च्या कलम ११ अन्वये प्रदत्त अधिकाराचा वापर करून राज्यपालांनी वैधानिक विकास मंडळाचे कार्य सुरळीतपणे पार पाडण्यासाठी नियम बनविले. हे नियम दि. ५ ऑगस्ट १९९४ रोजी राजपत्रित करण्यात आले. वैधानिक विकास मंडळाचा कार्यकाल ५ वर्षाचा असतो. वैधानिक विकास मंडळे स्थापन केल्यानंतर दि. ३० एप्रिल १९९९ रोजी वैधानिक विकास मंडळाचा पाच वर्षाचा कार्यकाल पूर्ण झाला. विकास मंडळाची मुदत संपल्यानंतर त्याचा कार्यकाल वाढविण्याकरिता भारताच्या राष्ट्रपतींनी दिनांक २९ एप्रिल १९९९ च्या आदेशान्वये पुन्हा ''महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी राज्यापालांची विशेष जबाबदारी) सुधारीत आदेश १९९९'' निर्गमीत केले. त्यानुसार राज्यातील तीनही वैधानिक विकास मंडळाचा कार्यकाल दि. ३० एप्रिल २००४ पर्यंत पुढील पाच वर्षाच्या काळासाठी वाढविण्यात आला. त्यानंतर मा. राज्यापाल महोदयांनी दिनांक १ मे २००४ चे आदेशाद्वारे वैधानिक विकास मंडळाचा कार्यकाल दि. ३० एप्रिल २००५ पर्यंत वाढवून देण्यात आला होता. दि. १० जानेवारी २००६ च्या पत्रान्वये राज्यातील तीनही वैधानिक विकास मंडळांना दि. ३० एप्रिल २०१० पर्यंत पुन्हा मुदत वाढ देण्यात आली.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग—२ खंड—३, उपखंड—१, पत्र क्र. ४१३ दि. २६ जुलै २०१० नुसार मा. राज्पालांनी राज्यातील तीनही वैधानिक विकास मंडळांना दि. ३० एप्रिल २०१५ पर्यंत मुदत वाढविण्यात आली आहे.

### ५.३ वैधानिक विकास मंडळाची रचना :—

महाराष्ट्राच्या राज्यपालांनी राज्यामध्ये सर्वप्रथम दिनांक २५ जून १९९४ रोजी वैधानिक विकास मंडळे गठीत केली. प्रत्येक विकास मंडळावर सुरूवातीस सात सदस्य घेण्यात आले. त्यामध्ये संबंधीत विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र राज्य विधीमंडळातील एक सदस्य, संबंधीत विकास मंडळाच्या कार्यक्षोतील स्थानिक प्राधीकरणामधील एक सदस्य, नियोजन, वित्त, प्रशासन, सिंचन, कृषी, शिक्षण, आरोग्य सेवा अशा क्षेत्रातील विशेष ज्ञान व

अनुभव असलेल्या तीन तज्ञ व्यक्ति यांना मंडळाचे पदसिध्द सदस्यत्व देण्यात आले. महसुल विभागातील अतिरिक्त आयुक्त दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा राज्य शासनाच्या सेवेतील अधिकाऱ्याला मंडळाचे सदस्य, सचिव म्हणून घेण्यातआले.त्यानंतर राज्यपालांचे आदेश क्र.जी.एस/एसएस/डीबी/९८/६० दिनांक २९ जानेवारी १९९८ नुसार मंडळावर नियुक्त करावयाच्या सदस्यांच्या संख्येत वाढकरण्यात आली. सध्या वैधानिक विकास मंडळाची रचना खालील प्रमाणे आहे.

**अ)** संबंधीत विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रामधील महाराष्ट्र राज्य विधान मंडळातील दोन सदस्य.

**ब)** संबंधीत विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक प्राधिकरणा मधून एक सदस्य.

**क)** खालील विषयामधील ५ तज्ञ सदस्य ज्यांना (एक) नियोजन प्रक्रिया, शासकिय वित्त व्यवस्था व लेखे या मधील विशेष ज्ञान असेल किंवा (दोन) वित्तीय व प्रशासकिय बाबीचा व्यापक अनुभव असेल किंवा (तीन) पाटबंधारे, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनीक बांधकाम, उद्योग, कृषी, शिक्षण किंवा सेवायोजन या सारख्या 'विविध' क्षेत्रातील विशेष ज्ञान असेल.

**ड)** संबंधित विकास मंडळाच्या क्षेत्रातील महसुल विभागाचे सर्व आयुक्त.

**इ)** संबंधित विकास मंडळाच्या क्षेत्रातील महसुल विभागाच्या अतिरिक्त आयुक्तांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा राज्य शासनाचा अधिकारी मंडळाचा सदस्य — सचिव असेल.

**फ)** कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ तिन्ही वैधानिक विकास मंडळाचे पदसिध्द सदस्य असतील.

राज्यपालांचे आदेश क्र.जी.एस./डी.बी.रूल्स् — १४/२०११/१५० दि. ५/०९/२०११ नुसार मा. राज्यपालांनी वैधानिक विकास मंडळाच्या रचनेत खालील प्रमाणे बदल केला आहे.

१) वैधानिक विकास मंडळाचे सदस्य व अध्यक्ष यांची निवड राज्यपाला मार्फत केली जाते.

२) तिन्ही वैधानिक विकास मंडळाचा कार्यकारी अध्यक्ष हा राज्य नियोजन मंडळाचा सेवा निवृत्त अधिकारी असावा.

३) संबंधीत विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रामधील महाराष्ट्र राज्य विधान मंडळातील एक सदस्य.

४) संबंधीत विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक प्राधिकरणामधून एक सदस्य.

५) खालील विषयामधील ५ तज्ञ सदस्य ज्यांना (एक) नियोजन प्रक्रिया, शासकिय वित्त व्यवस्था व लेखे या मधील विशेष ज्ञान असेल किंवा (दोन) वित्तीय व प्रशासकिय बाबीचा व्यापक अनुभव असेल किंवा (तीन) पाटबंधारे, सार्वजनीक आरोग्य, सार्वजनीक बांधकाम, उद्योग, कृषी, शिक्षण किंवा सेवायोजन या सारख्या 'विविध' क्षेत्रातील विशेष ज्ञान असेल.

६) संबंधित विकास मंडळाच्या क्षेत्रातील महसुल विभागाचे सर्व आयुक्त.

७) संबंधित विकास मंडळाच्या क्षेत्रातील महसुल विभागाच्या अतिरिक्त आयुक्तांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा राज्य शासनाचा अधिकारी मंडळाचा सदस्य — सचिव असेल.

वरील प्रमाणे तिन्ही वैधानिक विकास मंडळाच्या रचने मध्ये मा. राज्यपालांनी दि. ५/०९/२०११ च्या आदेशाप्रमाणे बदल केला आहे.

## ५.४ तीनही वैधानिक विकास मंडळाची कार्ये :—

मा. राज्यपालांच्या दिनांक ३० एप्रिल १९९४ च्या आदेशातील परिच्छेद ६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे वैधानिक विकास मंडळाची कार्ये पुढील प्रमाणे सांगता येतात.

१) संपूर्ण राज्यातील विकासाच्या पातळयांच्या तुलनेत योग्य निर्देशांकाच्या आधारे मंडळाच्या क्षेत्रातील विविध विकास क्षेत्रांची विकासाची सापेक्ष पातळी निश्चित करणे.

२) मंडळाच्या क्षेत्राचा सर्वांगिण विकास साधण्याच्या दृष्टीने तसेच त्या भागातील विकासाचा अनुशेष दुर करण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या विविध विकासाच्या प्रयत्नांच्या परिणामाचे मूल्यमापन करणे.

३) वार्षिक तसेच पंचवार्षिक योजनेच्या काळात विकास मंडळाच्या क्षेत्रातील विकास खर्चाच्या पातळया सुचविणे.

४) मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तयार करणे व तो महाराष्ट्र राज्य विधान मंडळापुढे सादर करण्यासाठी प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर व्यवहार्य असेल तोवर तीन महिन्यांच्या कालावधीत राज्यपालांना सादर करणे.

**५.५ विकास कामाच्या खर्चासाठी निधीचे वाटप :—**

वैधानिक विकास मंडळाच्या आदेशातील परिच्छेद ७ व ८ मध्ये ''विकास खर्चासाठी निधीचे वाटप व वार्षिक वित्तीय विवरण पत्रामध्ये निधीच्या वाटपाचा निर्देश करणे'' अशा मथळयाखाली विकास निधीच्या वितरणाच्या कार्यपध्दतीचा तपशिल देण्यात आला आहे. त्यामध्ये,

**१)** एकूण राज्याची गरज विचारात घेवून विकास मंडळाच्या क्षेत्रावरील विकास खर्चासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल समन्यायाने निधीचे वाटप व्हावे याची खातरजमा करतील.

**२)** निधीचे समन्यायाने वाटप होईल याची खातरजमा करताना राज्यपाल,

**अ)** विकास मंडळाने कोणत्याही शिफारशी केल्या असल्यास त्या विचारात घेतील आणि

**ब)** निधीच्या वाटपाच्या बाबतीत राज्यपाल त्यांना आवशक वाटेल आणि योग्य अशा कोणत्याही व्यक्तीचा किंवा व्यक्ति संघाचा सल्ला घेवू शकतील.

**३)** राज्यपालांनी निधी किंवा नियतव्यय यांच्या ठरवून दिलेल्या वाटपाचा निर्देश राज्य विधीमंडळापुढे सादर करावयाच्या वार्षिक विवरणपत्रामध्ये करण्यात येईल आणि उपरोक्त नियत व्ययाशी संबंधीत विकास कार्ये राज्य शासनाकडून पूर्ण करण्यात येतील वा पूर्ण करून घेण्यात येतील. अशाप्रकारे देण्यात आलेला निधी हा एका मंडळाच्या कार्यक्षेत्रामधून दुसऱ्या मंडळाच्या कार्यक्षेत्राकडे वळविता येणार नाही. परंतु

**अ)** एखाद्या मंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये हाती घेण्यात आलेल्या विकासाच्या बाबतीत अर्थ संकल्पिय नियम व कार्यपध्दतीला अनुरूप असे पुनर्वियोजन करता येईल.

**ब)** विकास कार्याची बंमलबजावणी करताना सध्याचे मापदंडच लागू राहतील.

**क)** विकास कार्यावर संबंधीत प्रशासकिय व तांत्रिक पर्यवेक्षण, तसेच नियंत्रण सध्या प्रमाणेच चालू राहिल.

## ५.६ राज्यपालांकडून निर्देश :—

वैधानिक विकास मंडळाच्या कामकाजाच्या संदर्भात विकास मंडळ आदेश, १९९४ मधील परिच्छेद ९ मधील तरतुदी नुसार राज्यपाल विकास मंडळाला वेळोवेळी आदेशाद्वारे निर्देश देवू शकतील.

## ५.७ शिक्षण, प्रशिक्षण आणि सेवायोजन यासाठी सुयोग्य व्यवस्था :—

वैधानिक विकास मंडळ आदेश १९९४ मधील परिच्छेद १० मध्ये शिक्षण, प्रशिक्षण व सेवायोजन यासाठी सुयोग्य व्यवस्थेची तरतूद प्रतिपादित केली आहे. ती खालील प्रमाणे, संबंध राज्याच्या गरजा साकल्ल्याने लक्षात घेवून प्रत्येक विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी पर्याप्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आणि राज्यशासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी समन्यायी व्यवस्था करण्याची राज्यपाल खातरजमा करतील आणि त्यासाठी राज्यपाल वेळोवेळी योग्य ते निर्देश देतील आणि तसे करीत असताना आवश्यक आणि योग्य वाटल्यास, राज्यपाल कोणत्याही व्यक्तिचा किंवा व्यक्तिसंघाचा त्याबाबतीत सल्ला घेवू शकतील.

## ५.८ मराठवाडा वैधानिक विकास मंडळ :—

अलिकडील काळात प्रत्येक राष्ट्र, प्रत्येक राज्य, प्रत्येक प्रदेश विकासासाठी प्रयत्न करित आहेत. अर्थव्यवस्थेचा संतुलित विकास होण्यासाठी या सर्व पातळयावर विकास होणे आवश्यक असते. मात्र या पातळयावर बऱ्याच प्रमाणत विकासामध्ये असमतोल असल्याचे आढळून येतो. कांही राज्ये व प्रदेश आर्थिक व औद्योगिक विकासामध्ये अग्रेसर आहेत. **उदाहर्णार्थ** :— तामिळ नाडू, आंध्रप्रदेश, केरळ, महाराष्ट्र तर कांही राज्ये आर्थिक व औद्योगिक विकासामध्ये मागासलेली आहेत. **उदाहर्णार्थ :—** राजस्थान, बिहार, मणिपूर इत्यादी प्रदेशा प्रदेशामध्ये देखील विकासामध्ये असमतोल असल्याचे दिसून

येते. विशेषत: महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग औद्येगिक आणि आर्थिक दृष्टया मागासलेला आहे. मात्र पश्चिम महाराष्ट्र औद्येगिक आणि आर्थिक दृष्टया प्रगत आहे. हा प्रादेशिक विकासातील असमतोल दूर करण्यासाठी विशेषत: मराठवाडयाच्या विकासासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यात आली. मंडळाने आपल्या स्थापनेपासून आजपर्यंत विविध क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान केले आहे.

**५.८.१ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे कार्यक्षेत्र व मुख्यालय :—**

वैधानिक विकास मंडळाचे कार्यक्षेत्र संपूर्ण मराठवाडा विभागासाठी असून, त्यात औरंगाबाद महसूल विभागातील औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, बीड व उस्मानाबाद जिल्ह्याचा समावेश होते. मंडळाचे मुख्यालय औरंगाबाद येथे आहे.

मंडळाचे कार्यालय जुलै १९९४ ते नाव्हेंबर १९९४ पर्यंत विभागीय आयुक्त कार्यालय इमारतीत होते. त्यानंतर औरंगाबाद येथे एका खाजगी इमारतीत डिसेंबर १९९४ ते ऑगस्ट १९९६ पर्यंत होते. आता जिल्हाधिकारी कार्यालय आवारातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत ४००० चौ. फूट एवढया प्रशस्त जागेत कायमस्वरूपी स्थलांतरीत झाले आहे.

**५.८.२ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे कार्य :—**

**१) क्षेत्रिय विकास पातळी निश्चित करणे :—** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे महत्वाचे कार्य क्षेत्रिय विकास करून त्या आधारे क्षेत्रिय विकास पातळी निश्चित करण्यात येते परंतु त्यासाठी सबंध राज्याची विकास पातळी विचारात घ्यावी लागते.

**२) सर्वसाधारण विकास साधण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणे :—** मागास भागातील निरनिराळया क्षेत्राबाबत व उपक्षेत्राबाबतची स्थिती प्रगत भागाच्या तुलनेत भिन्न असते. त्यासाठी विकास मंडळे निरनिराळया विकास कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीचा विभागातील अनुशेष कमी होण्याच्या दृष्टीने काय परिणाम होतो याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. मराठवाडा विभागाचा सर्वसाधारण विकास साधण्याच्या दृष्टीने विकास मंडळाने प्रयत्न करणे हे कार्य असते.

**३) योजनांशी संबंधीत खर्चाबाबत सूचना करणे :—** पंचवार्षिक योजना व वार्षिक योजनांवर मराठवाडा विभागात विविध क्षेत्र व उपक्षेत्राच्या संदर्भात विकास खर्चाची पातळी कशी असावी हे कार्य वैधानिक विकास मंडळाचे असते. विभागातील मागास जिल्हे व मागास तालूका आणि विविध क्षेत्रे यासंबंधीचा अभ्यास करून कशाप्रकारे विकास खर्च करण्यात यावा याविषयी वैधानिक विकास मंडळ सुचना करू शकते. अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने अशा सुचना उपयुक्त ठरतात.

**४) तांत्रिक शिक्षण व व्यवसायिक शिक्षणाच्या सोयी :—** मागास भागातील जनतेला तांत्रिक शिक्षण व व्यवसायिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध होणे आवश्यक असते. विकासाच्या दृष्टीने अशा सोयी महत्वाच्या असतात. मराठवाडयात लोकसंख्येच्या प्रमाणात तांत्रिक व व्यवसायिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी वैधानिक विकास मंडळाने प्रयत्नशिल असले पाहिजे.

**५) सरकार नियंत्रित नोकऱ्यात विभागवार न्याय्य वाटप होण्याचा प्रयत्न करणे :—** मराठवाडयात लोकसंख्येनुसार सरकार नियंत्रित नोकऱ्यात विभागवार न्याय्य वाटप कशा रितीने होईल यासाठी वैधानिक मंडळाने प्रयत्न केला पाहिजे. शासकीय नोकऱ्यातील अनुशेष दूर होण्यास त्यामुळे मदत होईल.

**६) कार्याचा अहवाल पाठविणे :—** मराठवाडा वैधानिक विकास मंडळास प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी व तीन महिन्यांच्या मुदतीत आपल्या कार्याचा अहवाल राज्यपालाकडे पाठवावा लागतो. राज्यातील विविध वैधानिक विकास मंडळाचा अहवाल राज्यपाल महाराष्ट्राच्या विधी मंडळापुढे ठेवतात.

**५.८.२ कार्यालय आस्थापना :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे कार्यालयामध्ये मंडळाचे अध्यक्षाकरीता आणि मंडळाचे सदस्य, सचिवां करीता वेगवेगळया अशा स्वतंत्र अस्थापना आहेत. मंडळाचे अध्यक्ष व सदस्य, सचिव यांचे अस्थापनेकरीता स्वतंत्र पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

**५.८.३ मंडळाच्या सर्वसाधारण बैठका :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील विविध विकासात्मक कामाच्या संबंधात सर्वसाधारण सभा दोन महिन्यातून एक या प्रमाणे वर्षातून सहा सर्वसाधारण सभा घेण्यात येतात. या सभेमध्ये सिंचन, रस्ते विकास, सामान्य आरोग्य, शिक्षण, तांत्रिक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषी, फलोद्यान, सामाजिक सेवा क्षेत्रे अशा विविध क्षेत्रातील विकासात्मक कामासंबंधी तसेच विविध विकास कामातील मराठवाडयाचा अनुशेष या बाबत चर्चा करण्यात येते. त्याबाबत कांही महत्वाचे निर्णय घेण्यात येतात.

**५.८.४ विषय समित्या :—**

राज्यपालांचे दिनांक ५ ऑगस्ट १९९४ चे आदेशातील परिच्छेद ४ (३) अन्वये, वैधानिक विकास मंडळाला त्यांच्या क्षेत्रातील विकास कामांचे संदर्भात तज्ञांचे मार्गदर्शन व सल्ला घेण्यासाठी विषय समित्या स्थापन करण्याची तरतूद आहे. त्या अनुषंगाने मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने खालील विषय समित्या स्थापन केलेल्या आहेत.

१ कृषी, पिक संवर्धन, फलोद्यान

२ सहकार, पशु संवर्धन, दुग्धव्यवसाय, कृषी — पणन, कृषी पतपुरवठा

३ ग्रामीण विकास

४ पाटबंधारे व कडा

५ उद्योग व उर्जा

६ वाहतुक, दळणवळण व गृहनिर्माण

७ सामान्य शिक्षण व तांत्रिक शिक्षण

८ आरोग्य सेवा,पाणी पुरवठा, नागरी विकास

९ समाजकल्याण, मागासवर्गीय कल्याण, महिला व बाल विकास

१० माहिती तंत्रज्ञान

११ विज्ञान व तंत्रज्ञान

**५.८.५ नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये वैधानिक विकास मंडळाचा सहभाग :—**

नियोजन प्रक्रियेमध्ये वैधानिक विकास मंडळाचा सक्रिय सहभाग असण्याबाबत राज्यपाल महोदयांनी निर्देश दिले हाते. त्यानुसार राज्यस्तरावर तसेच जिल्हास्तरावरील नियोजन प्रक्रियेमध्ये मंडळ सक्रिय सहभाग घेत आहे. राज्य नियोजन मंडळावर वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्षांना पदसिध्द सदस्य म्हणून नेमण्यात आलेले आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्षांनी राज्य नियोजन मंडळाने वेळोवेळी आयोजीत केलेल्या राज्यस्तरीय बैठकीस उपस्थित राहून नियोजन विषयक चर्चेत भाग घेत आहेत. तसेच जिल्हा नियोजन मंडळावर मंडळाचे सदस्यांना पदसिध्द सदस्य म्हणून सहभागी करून घेण्यात आले आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे सदस्यांनी त्यांना नेमून दिलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस वेळोवेळी उपस्थित राहून चर्चेत भाग घेता येतो.

**५.८.६ औरंगाबाद येथे राज्यमंत्री मंडळाची बैठक आयोजित करणे :—**

राज्याच्या इतर विभागाच्या तुलनेत मराठवाडा विभाग मागासलेला असून या विभागातील सिंचन, रस्ते विकास, शिक्षण, आरोग्य सेवा, पाणी पुरवठा इत्यादी क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी आणि विकास विषयक बाबीवर त्वरीत निर्णय घेण्यासाठी राज्यमंत्रीमंडळाची वर्षातून एकदा औरंगाबाद येथे बैठक आयोजित करावी अशी मंडळा व्दारे शासनास विनंती करण्यात आली.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची विनंती मान्य करून वर्षातून एकदा औरंगाबाद येथे राज्यमंत्री मंडळाची बैठक संपन्न होते. सदर बैठकीत मराठवाडयाच्या विकासात्मक प्रश्नावर चर्चा होवून मराठवाडयाच्या विकासासाठी विशेष निधी (पॅकेज) जाहीर केले जाते.

**५.८.७ मंडळाचे त्रैमासिक वार्तापत्र :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाद्वारे ‘गोदावरी’ हे त्रैमासिक वार्तापत्र नियमितपणे प्रसिध्द करण्यात येते. मंडळाचे कामकाज, विविध क्षेत्रातील विकास कार्यक्रम, विकास विषयक कामकाजातील फलश्रुती यांची माहिती विभागातील

लोकप्रतिनिधी व सामान्य जनतेला या त्रैमासिक पत्रिकेद्वारे देण्यात येते. वार्तापत्रामध्ये मराठवाडा विभागातील महत्वाच्या विकास विषयक बाबीवरील माहिती प्रसिध्द करण्यात येते. त्याच प्रमाणे मंडळावर सोपविलेल्या व मंडळाने शासनाकडे पाठपुरावा केलेल्या विकास विषयक कामाचा तपशिल सुध्दा त्रैमासिक वार्तापत्रामध्ये देण्यात येतो.

**५.८.८ कार्यालयीन ग्रंथालय :—**

मंडळाच्या कार्यालयामध्ये स्वतंत्र ग्रंथालय असून त्यामध्ये नियोजन व विकासा संबंधी संदर्भग्रंथ तसेच नियत कालिके ठेवयात आली आहेत. ग्रंथालयामध्ये वार्षिक योजना, वार्षिक अर्थसंकल्प, आर्थिक पाहणी, जनगणना, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, निरनिराळया शासकिय विभागांनी प्रकाशित केलेली सांख्यिकीय माहिती दर्शविणारी पुस्तके व इतर संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत. विकासासंबंधी अहवाल तयार करताना मंडळाच्या सदस्यांना ग्रंथालयाचा चांगला उपयोग होत आहे.

# संदर्भ


१) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे घटनेच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये करण्यात आलेल्या कार्यवाहीचा प्रगती अहवाल. १५ मार्च १९९७

२) मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, वर्षिक अहवाल २००५—०६ ते २००९—१०

३) विदर्भ वैधानिक विकास मंडळ, वर्षिक अहवाल १९९७—९८, (पृ.क्र.३ ते १०)

४) प्रा. डॉ. पुरोहित—खांदेवाले वसुधा,(जून २००८),भारतीय अर्थव्यवस्था (पृ.क्र.२०९ ते २१५), विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद

५) कुलकर्णी भुजंगराव (फेब्रुवारी २००७), मी,मराठवाडा आणि महाराष्ट्र (पृ.क्र.४०३ ते ४१७), प्रतिमा प्रकाशन पूणे.

६) डॉ. कुरूलकर र.पु. (१९९७), महाराष्ट्राची अर्थव्यवस्था (पृ.क्र. १६७ ते १७१),विद्या प्रकाशन नागपूर.

७) डॉ. सोळुंके आर. एस.,(१५ ऑगस्ट १९९७), महाराष्ट्राची अर्थव्यवस्था (पृ.क्र. २१६ ते २२१), कैलास पब्लिकेशन औरंगाबाद.

८) डॉ. इंगळे बी. डी.,( ऑक्टोंबर २००९), महाराष्ट्राची अर्थव्यवस्था (पृ.क्र. १९२ ते १९३), अरूणा प्रकाशन लातूर.

९) प्रा. सौ. जाधव राजश्री आप्पाराव,(१/१/२०११), महाराष्ट्राची अर्थव्यवस्था (पृ.क्र. १९७ ते २००), अरूणा प्रकाशन लातूर.

१०) डॉ. बिराजदार माधव,(जून २०१२), महाराष्ट्राची अर्थव्यवस्था (पृ.क्र. ३१० ते ३१२), विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद

११) 'दिशा विकासाची',रामकृष्ण परमहंस महाविद्यालय उस्मानाबाद 'दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र',दि. २१ व २२ जानेवारी २००६.

१२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग—२ खंड—३, उपखंड—१, पत्र क्र. ४१३ दि. २६ जुलै २०१०

१२) वेबसाईट :— www.msdb.gov.in

## प्रकरण सहावे

# मराठवाडा वैधानीक विकास मंडळाचे मराठवाडयाच्या आर्थिक विकासातील योगदान

६.१ प्रस्तावना

६.२ वैधानिक विकास मंडळांनी विकासाच्या संदर्भात केलेली कार्य

६.३ सिंचन कार्य

६.३.१ मराठवाडा कृष्णा खोरे प्रकल्प

१ माराठवाडा कृष्णा प्रकल्पामध्ये ५०% अतिरिक्त साठा निर्माण करण्यास मान्यता देणे

२ कृष्णा खोऱ्यात लवादा प्रमाणे एकूण ५९९ अ.घ.फु. पाणी वापरायची परवानगी

३ मराठवाडयास कृष्णा खोऱ्यातील जास्तीचे पाणी मिळणेबाबत

६.३.२ गोदावरी खोरे प्रकल्प

१ कोकणातील पश्चिमेकडे पाहणाऱ्या नद्यांयांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे

२ उर्ध्व वैतरणा धरणातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे

३ गोदावरी—पूर्णा—मांजरा स्थिरीकरण प्रकल्प राबविणे

४ वैनगंगा —काटेपूर्णा—पैनगंगा—पूर्णा —मांजरा—जायकवाडी उपसा सिंचन योजना

५ पूर्णा—पैनगंगा नदीवर बॅरेजेस बांधणे

६.३.३ मराठवाडयामध्ये गावपातळीवर जलसंधारण योजना राबविणे

६.३.४ लघुपाटबंधारे योजना (२५० हेक्अर पेक्षा कमी)

६.४ रस्ते विकास

६.५ प्रशासन व्यवस्था

६.५.१ नवीन महसुल विभागाची मागणी

६.५.२ अंबेजोगाई तालुक्यास जिल्ह्याचा दर्जा द्यावा

६.५.३ नवीन १५ तालुक्यासाठी पंचायत समितीची कार्यालये निर्माण करणे बाबत

६.५.४ हिंगोली जिल्ह्याचा अनुशेष भरून मिळणे बाबत

६.६ आरोग्य सेवा

६.६.१ ग्रामीण रूग्णालय/प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारत बांधकामासाठी जागेचा भेडसावणारा प्रश्न सोडविणे

६.६.२ लातूर येथे परिचारिका प्रशिक्षण केंद्रातील पदे भरण्याबाबत.

६.६.३ औरंगाबाद येथे भौतिकोपचार व व्यवसायोपचार महाविद्यालय सुरू करणे बाबत

६.६.४ औरंगाबाद येथे मनोरूग्णालयाची स्थापना

६.६.५ इतर कांही आरोग्य सुविधा

६.७ शैक्षणिक सुविधा

६.७.१ लातूर येथे स्वतंत्र तंत्रशिक्षण विद्यापीठ स्थापन करणे

६.७.२ कृषी जैव तंत्रज्ञान उच्च शिक्षण

६.७.३ इतर शैक्षणिक संविधा

६.८ उद्योग विकास

६.८.१ मराठवाडा विभागातील सर्व औद्योगिक वसाहतींना आद्योगिक नागरी वसाहती म्हणून घोषित करणे

६.८.२ महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम.सी.ई.डी.)

६.८.३ औरंगाबाद विभागातील आजारी/बंद उद्योगाची समस्या

६.८.४ इतर औद्योगीक सुविधा व समस्या

६.९ कृषी व कृषी अनुषांगीक व्यवसाय विकास

६.९.१ हरितगृहातील पुष्प व भाजीपाला उत्पादन प्रकल्प

६.९.२ मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी येथे फुड पार्क उभारणी प्रकल्प

६.९.३ कृषी विकासासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या इतर शिफारशी

६.१० सहकार विभाग

६.११ वाहतुक व दळण — वळण विभाग

६.११.१ रेल्वे सुविधा

१ मराठवाडयामधे रेल्वेची कामे

२ नवीन थेट रेल्वे गाडया सुरू करण्याबाबत

३ नांदेड येथील रेल्वेचे विभागीय कार्याला मध्यरेल्वेला जोडणे

६.११.२ विमान सुविधा

६.१२ समाज कल्याण

६.१३ मराठवाडयातील पर्यटन स्थळांचा विकास

६.१४ अनुशेष

६.१४.१ महाराष्ट्रातील विभागीय अनुशेष

६.१४.२ मराठवाडा विभागातील अनुशेष

६.१५ नियतव्यय विषेश निधी

६.१५.१ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने जिल्हानिहाय केलेल्या विशेष निधीचे वाटप

६.१६ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने वाटप केलेल्या विशेष निधी मधून जिल्हा निहाय केलेली विकास कामे

६.१६.१ औरंगाबाद जिल्हा

६.१६.२ जालना जिल्हा

६.१६.३ बीड जिल्हा

६.१६.४ परभणी जिल्हा

६.१६.५ हिंगोली जिल्हा

६.१६.६ नांदेड जिल्हा

६.१६.७ उस्मानाबाद जिल्हा

६.१६.८ लातूर जिल्हा

समारोप

संदर्भ

## प्रकरण सहावे

# मराठवाडा वैधानीक विकास मंडळाचे मराठवाडयाच्या आर्थिक विकासातील योगदान

### ६.१ प्रस्तावना :—

महाराष्ट्राचा समतोल विकासासाठी महाराष्ट्राचे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा असे विभाग करण्यात आले. विशेषत: पश्चिम महाराष्ट्र विकासाच्या सर्वच बाबतीत आघाडीवर आहे. विदर्भ ही बऱ्यापैकी विकासासाठी वाटचाल करीत आहे. मात्र मराठवाडा निजाम राजवटी नंतरही फारसा विकसित झालेला नाही. वैधानिक मंडळाकडे या विभागाच्या विकासाची जबाबदारी टाकण्यात आली आहे. मराठवाडा विभाग विविध कारणामुळे जरी मागासलेला राहीलेला असला तरी त्याचे मागासलेपण कसे दूर करता येईल या दृष्टीने सर्वच पातळयावर प्रयत्न करण्यात येत आहेत.

मराठवाडयाच्या मागासपणाची मुळ कारणे शोधुन ती दुर करून मराठवाडयाचा सर्वांगिण विकास त्वरीत घडवून आणावा ही वैधानिक विकास मंडळाची प्रमुख भूमिका आहे. सोयी सुविधांच्या बाबतीत मागास क्षेत्रे शोधून त्या बाबत ठराव, पत्रव्यहार व वार्षिक योजनेतिल तरतूदीच्या सुचना वगैरे प्रकारांनी मा. राज्यपालांकडे शिफारशी करण्यात आल्या. विकास निधीची समन्यायी वाटणी व तंत्र शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण आणि राज्याच्या अखत्यारीत नौकऱ्यामध्ये पर्याप्त संधी मिळवून देणारी समन्यायी व्यवस्था या तीन बाबींची मा. राज्यपालांची विशेष जबाबदारी असल्याने त्या संबंधी वैधानिक विकास मंडळाची भूमिका व कार्याचा तपशिल **प्रकरण पाच** मध्ये स्वतंत्र पणे दिलेले आहे. अनुशेष शोधण्यासाठी नेमलेल्या संयुक्त समितीच्या अहवालाची व शिफारशीची माहिती ही **प्रकरण दोन** मध्ये दिली आहे.

मराठवाडयाचा त्वरणीत विकास झाला पाहिजे व त्यासाठी नियोजनातून लोकसंख्याच्या प्रमाणात वाटणी मिळाली पाहिजेत आणि त्या शिवाय विकासातील **त्वरण** (Accelaration) साधण्यासाठी राज्यातील निवडक मागास

जिल्हयांना ज्यादा वाटणी मिळाली पाहिले व सर्वांना मिळून ती वार्षिक योजनेच्या १५ टक्के असावी अशी भूमिका आहे.

मागास प्रदेशाचा विकास होण्यासाठी राज्य सरकारने केवळ ज्यादा अंदाज पत्रके तरतुदीचा अवलंब केला तर प्रत्यक्षात विकासासाठी म्हणावा तसा उपयोग होत नाही असे आढळून आले आहे. त्यासाठी सर्व खात्याच्या विभागीय प्रशासनास मजबूत करणे आवश्यक आहे. या भुमिकेवरून मराठवाडयात एक ज्यादा महसुली विभाग व कांही नवे तालुके निर्माण केले पाहिजेत. त्याच बरोबर मराठवाडयाजील सर्व खात्याच्या प्रशासनाचे मजबुतीकरण करणे आवश्यक आहे.

## ६.२ वैधानिक विकास मंडळांनी विकासाच्या संदर्भात केलेली कार्य : —

मा. राज्यपाल यांच्या दि. ३० एप्रिल १९९४ च्या आदेशातील कलम ३७१ (६) नुसार विकास मंडळाची कार्ये पुढील प्रमाणे आहेत.

**अ)** संपूर्ण राज्यातील विकासाच्या पातळयांच्या तुलनेत योग्य निर्देशकांच्या आधारे मंडळाच्या क्षेत्रातील विविध क्षेत्रांसाठी विकासाची सापेक्ष पातळी निश्चित करणे.

**ब)** मंडळाच्या क्षेत्राचा सर्वांगिण विकास साधण्याच्या दृष्टिने तसेच त्या भागातील विकासाचा अनुशेष दूर करण्याच्या दृष्टिने करण्यात आलेल्या विविध विकासाच्या प्रयत्नांच्या परिणामांचे मुल्यमापन करणे.

**क)** वार्षिक तसेच पंचवार्षिक योजनेच्या काळात विकास मंडळाच्या क्षेत्रातील विकास खर्चाच्या पातळया सुचविणे.

**ड)** मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तयार करणे व तो महाराष्ट्र राज्य विधान मंडळापुढे सादर करण्यासाठी वार्षिक अहवाल तयार करणे व तो महाराष्ट्र राज्य विधान मंडळापुढे सादर करण्यासाठी प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यावर व्यवहार्य असेल तेथवर तीन महिनयांच्या कालावधीत राज्यपालांना सादर करणे.

मराठवाडा विभागाच्या विकासासाठी मराठवाडा वैधानिक विकासास सहाय्यक ठरणाऱ्या काही बाबीवर मंडळाने शासनाकडे व राज्यपाल

कार्यालयाकडे शिफारशी व पाठपुरावा केला आहे. सन २००५—०६ ते वर्ष २००९—१० या कालावधी मध्ये वैधानिक विकास मंडळाने केलेल्या कामकाजाची माहिती खालील प्रमाणे आहे.

## ६.३ सिंचन कार्य :—

### ६.३.१ मराठवाडा कृष्णा खोरे प्रकल्प :—

कृष्णा खोऱ्यातील पाण्याचा मराठवाडा विभागाचा न्याय वाटा शासनाने कृष्णा खोऱ्यातील सध्या वापरण्यात येणाऱ्या २५ अ.घ.फु. पाण्या खेरीज अतिरिक्त २५ अ.घ.फु. पाणी देण्याचे मान्य केले आहे. त्यापैकी १९ अ.घ.फु. उस्मानाबाद जिल्हयात वापरावयाच्या मराठवाडा कृष्णा खोरे प्रकल्पास दिनांक २३/०८/२००७ रोजी २३८२.०५ कोटी रूपयाची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी वैधानिक विकास मंडळांने शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला त्याला यश आले आहे. उर्वरित १९ अ.घ.फु. पाणी वापरावयाचा प्रकल्प संबंधीत यंत्रणेकडुन प्राधान्याने तयार करून घेवून त्यास शासनाने प्रशासकीय मान्यता द्यावी असे मंडळा कडून आग्रहाची विनंती करण्यात येत आहे.

**१) माराठवाडा कृष्णा प्रकल्पामध्ये ५०% अतिरिक्त साठा निर्माण करण्यास मान्यता देणे:—**

कृष्णा खोरे मंडळाने ५९९ अ.घ.फु. पाणी वापरासाठी ५०% अतिरिक्त म्हणजे ९०० अ.घ.फु. पाणी साठवण करण्याचे ठरविले त्याच धर्तीवर मराठवाडयातील ६० अ.घ.फु. पाणी वापरासाठी ९० अ.घ.फु. साठवण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. सर्व विभागात एकच न्याय लावावा ही मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची शासनाला विनंती आहे.

**२) कृष्णा खोऱ्यात लवादा प्रमाणे एकुण ५९९ अ.घ.फु. पाणी वापरायची परवानगी :—**

कृष्णा खोऱ्यात लवादा प्रमाणे एकुण ५९९ अ.घ.फु. पाणी वापरायची परवानगी आहे. कृष्णा खोऱ्यातील मराठवाडयाचे क्षेत्र अंदाजे १०% आहे. म्हणजे मराठवाडयाचा न्याय वाटा ६० अ.घ.फु. येतो. यापैकी आतापर्यंत २५

अ.घ.फु. पाण्याचे नियोजन होउन कामे पूर्णत्वास आली आहेत आणखी २५ अ.घ.फु. पाणी देण्याचा शासनाने निर्णय दिला आहे. उर्वरित अतिरिक्त २५ अ. घ.फु. पाणी मराठवाडयाला देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घ्यावा. म्हणजे मागास मराठवाडयावर अन्याय होणार नाही अशी मागणी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाला केली आहे.

**३) मराठवाडयास कृष्णा खोऱ्यातील जास्तीचे पाणी मिळणेबाबत:—**

कृष्णा खोऱ्यातील पाण्याचे पुर्णसुधारीत वाटपानुसार महाराष्ट्र राज्याला या पुर्वी दिलेल्या २५ अ.घ.फु. पाण्याव्यतिरिक्त आणखी ९० अ.घ.फु. जास्तीचे पाणी मिळण्याची शक्यता आहे. यानुसार महाराष्ट्राला कृष्णा खोऱ्यातील ६८९ अ.घ.फु. पाण्याचा वाटा मिळणार आहे. पाणी वाटपातील उपलब्ध होणाऱ्या जास्तीच्या पाण्यामध्ये मराठवाडयाला सुध्दा न्याय वाटा मिळू शकेल. तेंव्हा कृष्णा खोऱ्यातील महाराष्ट्र राज्याच्या वाटयाला येणाऱ्या अतिरिक्त पाण्यामधून १०**%** पाणी (६८९ अ.घ.फु.चे १०**%** पाणी) ६९ अ.घ.फु. पाणी मराठवाडयाला वितरीत करण्यासाठी शासनाने निर्णय घ्यावा अशी विनंती मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाला केली आहे.

**६.३.२ गोदावरी खोरे प्रकल्प :—**

वरील प्रमाणे कृष्णा खोऱ्यातील पाण्याचा प्रश्न शासनाने कांही अंशी निकाली काढला आहे. आता गोदावरी खोऱ्याचा प्रश्नही तातडीने शासनाने सोडवावा अशी विनंती मराठवाडा वैधानिक विकास मंडळ शासनाकडे सतत करीत आहे, त्यासाठी मंडळाने शासनाकडे शिफारस केलेल्या आहेत. त्या शिफारसी खालील प्रमाणे आहेत.

**१) कोकणातील पश्चिमेकडे पाहणाऱ्या नद्यांयांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे :—** पैठण धरणाचे वरच्या बाजूस ११५ ऐवजी १९६ अ.घ.फु. पाणी वापरासाठी अनियंत्रित अतिरिक्त जलाशये बांधण्यासाठी मंजूरी दिल्यामुळे मराठवाडयातील जायकवाडी धरणात ८१ अ.घ.फु. पाणी टंचाई निर्माण झाली आहे. ही टंचाई कमी करण्यासाठी कोकणातील नार, पार, दमनगंगा इ. नद्यातील जास्तीचे पाणी मराठवाडयास गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी

सविस्तर सर्वेक्षण करून ह्या प्रकल्पाला अग्रक्रमाने मंजुरी देवून कार्यान्वीत करण्याची विनंती मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे.

**२) उर्ध्व वैतरणा धरणातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे :—**

वैतरणा धरण पूर्ण भरल्यानंतर अतिरिक्त पाणी सांडव्यावरून समुद्रात वाहून जाते तेंव्हा सांडव्यात कांही सुधारणा करून वाहून जाणारे अंदाजे २ अ. घ.फु. पाणी किमान खर्चामध्ये गोदावरी खोऱ्यात वळविण्यात येईल असा निर्णय झाला आहे. परंतु स्थानिक नेत्यांच्या विरोध्दामुळे हे काम कार्यान्वीत झाले नाही तरी हे काम तातडीने पुर्ण करावे असे आदेश द्यावेत अशी विनंती मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे.

**३) गोदावरी—पूर्णा—मांजरा स्थिरीकरण प्रकल्प राबविणे :—** मांजरा, पूर्णा व निम्न गोदावरी खोऱ्यातील प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतर मराठवाडयातील धरणे पूर्ण भरत नाहीत या खोऱ्यात लागणारे अतिरिक्त पाणी लगतच्या विपूल पाण्याच्या खोऱ्यातून आणने आवश्यक आहे. त्या करिता शासनाने मांजरा —पूर्णा —निम्न गोदावरी स्थिरीकरण प्रकल्प हाती घ्यावी अशी विनंती मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे.

**४) वैनगंगा —काटेपूर्णा—पैनगंगा—पूर्णा —मांजरा—जायकवाडी उपसा सिंचन योजना :—** वरील विवेचनावरून गोदावरी खाऱ्यात आधीच कमी पाणी उपलब्ध आहे. व होते त्याही पाण्यावर अनिर्बंध धरणे बांधल्यामुळे अजून पाणी कमी झाले आहे. म्हणून कृष्णा खोऱ्यातील उपसा सिंचन योजना प्रमाणेच वैनगंगा खोऱ्यातील अतिरिक्त पाणी उपसा सिंचन योजनेद्वारे गोदावरी खोऱ्यात वळविण्याची विनंती मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे.

**५) पूर्णा—पैनगंगा नदीवर बॅरेजेस बांधणे :—** गोदावरी व मांजरा नदीवर ज्याप्रमाणे बॅरेजेस बांधण्यास मंजूरी दिली आहे व त्या प्रमाणे कामेही सुरू झाली आहेत. तशीच मंजूरी पैनगंगा व पूर्णा नदीवर बांधण्यास द्यावी व सर्व कामे प्राधाण्याने पूर्ण करावीत अशी विनंती मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे.

**६.३.३ मराठवाडयामध्ये गावपातळीवर जलसंधारण योजना राबविणे :—**

मराठवाडयातील ४०% क्षेत्र अवर्षणप्रवण आहे.त्यामुळे या भागात पावसात पडलेले जास्तीचे पाणी स्थानिकरित्या जमिनीत जिरवता आले, तर पाण्याचे दुर्मिक्ष कांही अंशी कमी होईल. मराठवाडयात अंदाजे ८५०० गावे आहेत. त्यापैकी अंदाजे ३२०० गावे अवर्षण प्रवण आहेत. त्यासाठी प्रत्येक गावाला पडणाऱ्या सर्व पावसांचे नियोजन व हिशोब ठरविण्याचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. अशी शिफारस मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे.

**६.३.४ लघुपाटबंधारे योजना (२५० हेक्अर पेक्षा कमी) :—**

मराठवाडयातील १५९ अपूर्ण ल.पा.योजना पूर्ण करण्यासाठी रू.४१.६१ कोटी निधी आवश्यक आहे. त्यासाठी विविध स्त्रोताद्वारे (नाबार्ड अंशदान हुडको कर्ज) रू.७१.८४ कोटीचे प्रस्ताव जलसंधारण मंडळाने शासनास सादर केले आहेत. त्यास तातडीने मंजूरी देवून हा निधी उपलब्ध करून द्यावा अशी शिफारस मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे.

**६.४ रस्ते विकास :—**

मराठवाडयातील रस्त्यांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. मराठवाडयाचे पर्यटनाच्या दृष्टीने असलेले महत्व औद्योगीकरणासाठी असलेली अनुकूल स्थिती विचारात घेता या विभागामध्ये उत्तम व दर्जेदार रस्त्यांची निर्मीती होणे अत्यंत गरजेचे आहे. तरी खालील कामांना प्राधान्याने निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी विनंती मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे, ती खालील प्रमाणे

१) औरंगाबाद शहर एकात्मिक रस्ते विकास योजना.

२) नांदेड शहर एकात्मिक रस्ते विकास योजना.

३) मुंबई—औरंगाबाद नागपूर महामार्ग.

४) औरंगाबाद—पैठण रस्ता रूंदीकरण.

५) जिल्हा मुख्याला चार पदरी रस्त्यांनी जोडणे.

६) औरंगाबाद—पुणे रस्ता.

७) बारमाही रस्त्यांनी गावांची जोडणी.

८) औरंगाबाद शहराबाहेरील रिंग रोड.

९) औरंगाबाद—पैठण रस्त्याचे चौपदरी करण करणे.

१०) औरंगाबाद ते येवला रस्त्याचे चौपदरी करण करणे.

११) मांजरसुंभा—लातूर महामार्गासाठी निधी मंजुर करणे.

१२) वाटूर वसमत महामार्गासाठी निधी मंजूर करणे.

१३) जिल्हा परिषदेतील अपुर्ण रस्ते पुर्ण करणे.

१४) औरंगाबाद येथे व्ही.आय.पी. साठी विश्रामगृह बांधणे.

१५) औरंगाबाद येथे उच्चस्तरीय अधिकाऱ्यांसाठी निवास स्थाने बांधणे.

१६) औंढा नागनाथ जिल्हा हिंगोली एक व्ही.आय.पी. व दोन सर्वसाधारण कक्षाचे बांधकाम करणे.

१७) जिल्हा उस्मानाबाद येथील अस्तित्वातील शासकीय विश्रामगृहाचा उर्ध्व विस्तार करणे.

१८) पैठण—शहागड रस्त्यावर नवंगाव येथे मोठया पुलाचे बांधकाम करणे.

१९) उस्मानाबाद जिल्ह्यातील सोलापूर—हैद्राबाद महामार्गावरील इटकळ ते मंगरूळ हा चौपदरी मार्ग तुळजापूरसाठी तयार करणे.

### ६.५ प्रशासन व्यवस्था :—

मराठवाडा विभागामध्ये शासनाने प्रशासकीय व्यवस्थेखाली अनेक सुविधा निर्माण केल्या आहेत. तरी सुध्दा मराठवाडयातील नागरिकांच्या प्रशासकीय सोयीसाठी खालील योजना राबविणे गरजेचे आहे. अशी शासनाकडे मंडळाकडून विनंती करण्यात येत आहे.

### ६.५.१ नवीन महसुल विभागाची मागणी :—

मराठवाडयात एकूण ८ जिल्हे आहेत. संपूर्ण मराठवाडा विभागासाठी एकच महसूल विभाग अस्तित्वात आहे. मराठवाडा विभाग मोठया प्रमाणात विस्तारला असल्यामुळे आणखी एका महसूल विभागाची आवश्यकता आहे. तेंव्हा मराठवाडयाला दोन महसूल विभागामध्ये विभागण्यात यावे. नवीन महसूल

विभागाच्या मुख्यालयाची निवड शासनाने योग्य निकष वापरून करावी अशी मंडळाद्वारे शिफारस करण्यात येते.

**६.५.२ अंबेजोगाई तालुक्यास जिल्ह्याचा दर्जा द्यावा :—**

बीड जिल्ह्यात अंबेजोगाई हे तालुक्याचे ठिकाण आहे. सध्या अंबेजोगाई येथे अप्पर जिल्हाधिकारी स्तरावरील कार्यालय कार्यरत असून अंबेजोगाई तालुक्यास जिल्ह्याचा दर्जा दिल्यास फक्त जिल्हाधिकारी स्तरावरील कार्यालय व इतर कार्यालये स्थापन करावे लागतील व यासाठी खर्च खूप कमी येईल. तेंव्हा अंबेजोगाई तालुक्यास जिल्ह्याचा दर्जा देण्याबाबत शासनास विनंती करण्यात येते.

**६.५.३ नवीन १५ तालुक्यासाठी पंचायत समितीची कार्यालये निर्माण करणे बाबत :—**

शासनाने मराठवाडयात अनेक नवे तालुके निर्माण केले आहेत. त्यापैकी १५ नव्या तालुक्यात अद्यापही पंचायत समितीची कार्यालये निर्माण केली नाहीत. विकास कामामध्ये जनतेच्या सहभागासाठी तालुका पातळीवर पंचायत समीत्यांची कार्यालये आवश्यक आहेत. तरी प्रत्येक तालुक्यात पंचायत समितीची कार्यालये निर्माण करण्याबाबत मंत्रीमंडळाने निर्णय घ्यावा अशी विनंती करण्यात येते.

**६.५.४ हिंगोली जिल्ह्याचा अनुशेष भरून मिळणे बाबत :—**

मराठवाडयातील हिंगोली जिल्हा नव्याने निर्माण झालेला आहे. पण त्याचा अनुषेश अद्याप वेगळा काढून त्यास शासनाने मान्यता दिली नाही. तरी ही मान्यता पुढील तीन महिन्यात द्यावी अशी मंत्रीमंडळास विनंती आहे, तोपर्यंत हिंगोली जिल्ह्याच्या खालील मुद्दयावर निर्णय अपेक्षित आहे.

१) सेनगाव, औंढा नागनाथ, कळमनुरी व हिंगोली तालुक्यात सिंचनाची सोय नसल्यामुळे पाणलोट विकासाची कामे हिवरे बाजार व राळेगणसिध्दी येथील विकसित झालेल्या पाणलोटाच्या धर्तीवर प्रत्येक जिल्हा परिषद गटातून दोन गावांची निवड करावी. पाणलोट विकासाकरीता एकत्रित निधी उपलब्ध करून द्यावा.

२) हिंगोली जिल्ह्यात संत नामदेवांचे जन्मस्थान नरसी बामणी, नामदेव तीर्थक्षेत्राला महाराष्ट्र व पंजाब मधून शीख भाविक मोठया प्रमाणावर येतात. या तीर्थक्षेत्रास पर्यटनाचा दर्जा देण्यात आल्यास तीर्थक्षेत्राचा विकास होऊन भाविकांना सुविधा उपलब्ध होतील.

३) हिंगोली जिल्ह्यात आदिवासी समाजाची लोकसंख्या फार मोठया प्रमाणावर असून त्यासाठी स्वतंत्र एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय हिंगोली येथे स्थापन करावे.

४) हिंगोली जिल्ह्यातील आखाडा बाळापूर येथे शासनाच्या कृषी खात्याची ४४.५० हेक्टर जमीन उपलब्ध आहे. हया जमिनीवर सोयाबीन संशोधन केंद्र मंजुर केल्यास सोयाबीनचे वाढते क्षेत्र व ह्या भागाला लागून असलेल्या विदर्भाला हे ठिकाण मध्यवर्ती ठरू शकते.

वरील प्रमाणे प्रशासकीय व्यवस्थेसाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे शिफारस केली आहे.

### ६.६ आरोग्य सेवा :—

शासनाने मराठवाडा विभागामध्ये आरोग्य सेवेखाली अनेक सुविधा निर्माण केल्या आहेत, तरी सुध्दा मराठवाडयातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिने खालील योजना राबविणे अद्यापही गरजेचे आहे. अशी मराठवाडा वैधानिक विकास मंडळामार्फत शासनास विनंती केली आहे.

### ६.६.१ ग्रामीण रूग्णालय/प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारत बांधकामासाठी जागेचा भेडसावणारा प्रश्न सोडविणे :—

अनुषेश निर्मुलनासाठी मराठवाडा विभागातील औरंगाबाद परिमंडळामध्ये १६ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ८ ग्रामीण रूग्णालयांना शासनाने मान्यता दिली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारत बांधकामासाठी आराखडयानुसार ३ एकर तर ग्रामीण रूग्णालय इमारत बांधकामासाठी ५ एकर जागेचे प्रमाण ठरविण्यात आले आहे. एवढी जागा मोफत किंवा शासनाची असलेली जागा मिळवून त्यावर इमारत बांधकाम करावे असे शासनाचे अनर्देश आहेत तेंव्हा एवढी जागा मोफत मिळणे अशक्य आहे. त्याच बरोबर काही ठिकाणी ग्रामीण

रूग्णालये व प्राथमीक आरोग्य केंद्रासाठी उपलब्ध जागा गावापासून ३ ते ५ कि.मी. दूर असते. तेथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारल्यास गावकरी व कर्मचाऱ्यांना त्रास होतो. परिणामी त्या केंद्राचा गावकऱ्यांना उपयोग होत नाही. म्हणून मोफत जागेची अट शिथिल करणे आवश्यक आहे. अशी विनंती मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे.

**६.६.२ लातूर येथे परिचारिका प्रशिक्षण केंद्रातील पदे भरण्याबाबत.:—**

लातूर येथे परिचारिका प्रशिक्षण केंद्र सुरू होऊन तीन वर्षे झाली आहेत. लातूर येथील जनरल नर्सींग मिडवायफरी स्कुलला मंजुरी प्राप्त असूनही पदे मात्र निर्माण करण्यात आली नाहीत. शासनाच्या आकृती बंधाप्रमाणे परिचारिका प्रशिक्षण केंद्रासाठी ५९ पदे निर्माण करून, त्यांना मंजुरी प्रदान करण्यात यावी. परिचारिका प्रशिक्षण केंद्रसाठी जागा उपलब्ध असून प्रशिक्षण केंद्राची इमारत आणि ८० प्रशिक्षणार्थींना निवासासाठी वस्तीगृहाची इमारत बांधणे अत्यंत गरजेचे आहे. अशी शिफारस मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे.

**६.६.३ औरंगाबाद येथे भौतिकोपचार व व्यवसायोपचार महाविद्यालय सुरू करणे बाबत:—**

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निकषानुसार वैद्यकिय महाविद्यालयाचे ठिकाणी भौतिकोपचार व व्यवसायोपचार महाविद्यालय सुरू करण्याबाबत सुचित केले आहे, त्यानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने सदर अभ्यासक्रमासाठी महाविद्यालय सुरू करणे बाबत शासनास प्रस्ताव सादर केला आहे. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी त्यांचे दिनांक २९/१२/२००४ च्या पत्राद्वारे शासनास शिफारस करून उपरोक्त महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी मागितली आहे. शासनाने सदर महाविद्यालय सुरू करण्यास मंजुरी देवून आवश्यक निधी व मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावेत अशी विनंती मराठवाडा वैधानीक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे.

### ६.६.४ औरंगाबाद येथे मनोरूग्णालयाची स्थापना :—

लातूर येथे एक मनोरूग्णालय स्थापन करण्यास शासनाने मागील वर्षी मंजुरी दिली आहे. त्याशिवाय औरंगाबाद येथे एक वेगळे मनोरूग्णालय स्थापन करणे अत्यावश्यक आहे. औरंगाबाद हे मध्यवर्ती ठिकाण असून मराठवाडयात व त्याला संलग्न असलेल्या पाच — सहा जिल्ह्यात शासकीय मनोरूग्णालय उपलब्ध नाही. त्यामुळे गरिब मनोरूग्ण उपचारांपासून वंचित राहतात. त्या दृष्टिने औरंगाबाद येथे १०० खाटांच्या मनोरूग्णालयांची स्थापना करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यास मंत्री मंडळाने मंजुरी द्यावी अशी विनंती मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे.

### ६.६.५ इतर कांही आरोग्य सुविधा :—

१) लातूर येथे आरोग्य संकुल निर्माण करणे.

२) लातूर येथे विभागीय संदर्भ सेवा रूग्णालयाची स्थापना करणे.

३) लातूर येथे मनोरूग्णालय संस्थेची स्थापना करणे.

४) औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालयास सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा दर्जा देणे व सुपर स्पेशालिटी कोर्सेस सुरू करणे.

५) औरंगाबाद येथील शासकीय महाविद्यालयाचे रूग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर सुरू करणे.

६) औरंगाबाद येथे परिचारिका पदवी महाविद्यालय सुरू करणे.

७) औरंगाबाद येथे नवजात अर्भक अतिविषेशोपचार केंद्र सुरू करणे.

८) औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्रसुती कक्षाचे आधुनिकीकरण व विस्तारीकरण करणे.

९) औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एम आर आय संयंत्र बसविणे.

१०) औरंगाबाद येथे आरोग्य संकुल निर्माण करणे.

वरील प्रमाणे मराठवाडा विभागातील आरोग्य विकास समस्या सोडविण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे शिफारस केली आहे.

## ६.७ शैक्षणिक सुविधा :—

मराठवाडा विभागामध्ये शिक्षण क्षेत्रातील खालील अपूर्ण कामे पूर्ण करणे व नवीन शैक्षणिक सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे असे मंडळाचे मत शासनास कळविण्यात आले.

### ६.७.१ लातूर येथे स्वतंत्र तंत्रशिक्षण विद्यापीठ स्थापन करणे :—

ए.आए.सी.टी.ई. यांनी देशात तंत्र शिक्षण विद्यापीठे स्थापन करावी अशा सुचना राज्यांना दिल्या आहेत. महाराष्ट्रात सध्या १७५ अभियांत्रिकी महाविद्यालये, १०० फार्मसी विद्यालये व १०० व्यवस्थापन विद्यालये कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांची संख्या अंदाजे पाच लक्ष आहे. नॅशनल नॉलेज कमिशनने २५ ते ३० महाविद्यालयाची तंत्रशिक्षण विद्यापीठे स्थापन करावीत असे सुचविले आहे. त्याप्रमाणे वास्तविक महाराष्ट्रात प्रत्येक विभागात एक तंत्रशिक्षण विद्यापीठ स्थापन करणे गरजेचे आहे. पण सुरूवातीला एकच तंत्रशिक्षण विद्यापीठ स्थापन करण्याचे ठरविल्यास ते मराठवाडयात लातूर येथे स्थापन करावे असा प्रस्ताव आहे. लातूर मध्ये राज्यात सर्वात चांगले शैक्षणिक वातावरण आहे. त्याचप्रमाणे मराठवाडा मागासलेला असल्यामुळे या भागात तंत्र शिक्षण विद्यापीठ स्थापन करणे जास्त योग्य व न्याय होईल. कोणत्याही स्थितीत मागास मराठवाडा विभागात हे विद्यापीठ व्हावे अशी विनंती मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे.

### ६.७.२ कृषी जैव तंत्रज्ञान उच्च शिक्षण :—

महाराष्ट्र शासनाने कृषी विद्यापीठाअंतर्गत खाजगी तत्वावर मराठवाडा विभागात तीन कृषी जैव तंत्रज्ञान महाविद्यालये इ.स. २००४ पासून सुरू केली. प्रत्येक महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या दर वर्षी ९६ आहे. वर्ष २००८ मध्ये सदर विद्यार्थ्याची बी.एस.सी. (कृषी जैव) तंत्रज्ञान पदवी पूर्ण होईल. तेंव्हा अशा विद्यार्थ्याची पदव्योत्तर शिक्षणासाठी एम.एस.सी. कृषि जैव तंत्रज्ञान अभ्यासक्रम खाजगी महाविद्यालयामध्येच सुरू करावेत म्हणजे तंत्र जैव तंत्रज्ञ/संशोधक तयार होतील त्यांचा मराठवाडा विकासासाठी खऱ्या अर्थाने फायदा होईल. मराठवाडा विभागात शिक्षण/संशोधन विभागासाठी बायोटेक्नॉलॉजी स्थापन व्हावेत.

औरंगाबाद व जालना येथे बायोटेक्नॉलॉजी पार्क लवकर विकसित करावेत. त्याच प्रमाणे कृषी क्षेत्रातील आधुनिक बाबींसाठी संशोधन संस्था निर्माण कराव्यात.

### ६.७.३ इतर शैक्षणिक संविधा :—

१) प्राथमिक शाळा खोल्यांचे बांधकाम व अस्तित्वात असलेल्या नादुरूस्त शाळा खोल्यांची दुरूस्ती करणे.

२) ग्रामीण भागातील शाळांमध्ये स्वच्छतागृहाची सोय करणे.

३) शिक्षकांच्या रिक्त पदाचा अनुशेष भरणे.

४) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना नवीन यंत्र सामुग्री खरेदीसाठी निधी मिळणे.

५) शासकयि औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी व प्रयोगशाळा उभारणीसाठी निधी उपलब्ध करून देणे.

६) चाकूर येथे कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय सुरू करणे.

७) औरंगाबाद येथे इंडीयन इन्स्टीटयुट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीची स्थापना करणे.

८) मराठवाडयामध्ये संगणकशास्त्र तसेच लॉ विद्यापीठाची स्थापना करणे.

९) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे लातूर येथे उपकेंद्र सुरू करणे.

१०) किनवट येथे आदिवासी लोकजीवन संशोधन संस्था स्थापन करणे.

११) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासाठी व आदिवासी मुलींचे शासकीय वस्तीगृहासाठी इमारत बांधकामासाठी सिडकोकडून जागा मिळणे.

वरील प्रमाणे मराठवाडा विभागातील शैक्षणिक सुविधा व समस्या सोडविण्यासाठी मराठवाडा वैधानीक विकास मंडळाने शासनाकडे शिफारसी केल्या आहेत.

### ६.८ उद्योग विकास :—

मराठवाडयामध्ये उद्योग स्थापन करण्यास अनुकूल वातावरण आहे. परंतु मागील कांही वर्षापासून मराठवाडयाची उद्योग क्षेत्रातील प्रगती खुंटली आहे. तेंव्हा नवीन उद्योगासाठी प्रोत्साहन देण्याकरीता व मराठवाडयातील उद्योगाच्या समस्या सोडवून औद्योगीकरणामध्ये वाढ होण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास

मंडळाने खालील योजना राबविणे गरजेचे आहे अशी विनंती शासनास केली आहे.

### ६.८.१ मराठवाडा विभागातील सर्व औद्योगिक वसाहतींना आद्योगिक नागरी वसाहती म्हणून घोषित करणे :—

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डि.सी.) व्दारे मराठवाडा विभागात अनेक ठिकाणी आद्योगिक वसाहती विकसीत केल्या आहेत. बहुतेक औद्योगिक वसाहती शहराजवळ निर्माण करण्यात आल्या व कालांतराने या वसाहती त्या शहराचा भाग बनल्या आहेत.तथापि शहर प्राधिकरणाकडून औद्योगिक वसाहती मध्ये पुरेशा प्रमाणात सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. त्यामुळे अशा औद्योगिक वसाहतीमध्ये सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी त्यांना नागरी दर्जा देणे क्रमप्राप्त ठरते. मराठवाडयातील औद्योगिक वसाहतींना स्वतंत्र औद्योगिक नागरी वसाहती म्हणून मान्यता दिल्यास त्यांना स्वत:च्या सुविधा निर्माण करणे शक्य होईल, तेंव्हा मराठवाडा विभागातील सर्व औद्योगिक वसाहतींना औद्योगिक नागरी वसाहती म्हणून घोषित करावे अशी मंडळाची मागणी आहे. सुरूवातीला प्रत्येक जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या सर्व औद्योगिक वसाहतींना नागरी वसाहती म्हणून घोषित करावे अशी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे विनंती केली आहे.

### ६.८.२ महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम.सी.ई.डी.) :—

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबादचे कार्यकारी संचालक तथा उद्योग सहसंचालक यांनी एम.सी.ई.डी. या संस्थेचे मुख्य कार्यालयातील औरंगाबाद येथे प्रशिक्षणाची तसेच जागतीकीकरणाच्या युगात उद्योजकीय प्रशिक्षण संस्थेला स्वत:चे असे मुख्यालय असावे या दृष्टिने या संस्थेची गरज आहे. सध्या संस्थेचे मुख्यालय एका आजारी बंद झालेल्या उद्योगाच्या शेड मध्ये आहे. संस्थेस पायाभूत संविधांसाठी ४ कोटी रूपये निधीची आवश्यकता आहे. तरी हा निधी मिळावा यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे विनंती केली आहे.

### ६.८.३ औरंगाबाद विभागातील आजारी/बंद उद्योगाची समस्या :—

औरंगाबाद विभागामध्ये मोठे व मध्यम उद्योग बहुतांशी औरंगाबाद शहराच्या परिसरात एकवटलेले आहेत. औरंगाबाद व्यतिरिक्त इतर जिल्ह्यामध्ये मोठया व मध्यम उद्योगांची संख्या तुलनेने फारच कमी आहे. प्राप्त माहिती नुसार औरंगाबाद विभागातील एकूण ४०२ मोठया व मध्यम उद्योगांपैकी ५० मोठे व मध्यम उद्योग बंद आहेत. या बंद उद्योगामुळे जवळ जवळ ११५०० कामगाराच्या रोजगारावर परिणाम झाला आहे. त्याच प्रमाणे मराठवाडयामध्ये एकूण ८११५ लघु उद्योगांची स्थायी स्वरूपात नोंदणी झाली आहे. बंद पडलेल्या लघुउद्योगांची संख्या ३७४० एवढी आहे. बंद पडलेल्या लघुउद्योगांमधील जवळ जवळ १६०० कामगारांना रोजगारास मुकावे लागले आहे. त्यावर तात्काळ उपाय योजना करणे आवश्यक आहे. मध्यंतरी बंद व आजारी उद्योगांच्या समस्यावर अभ्यास करण्यासाठी व त्यावर उपाय योजना सुचविण्यासाठी शासनाने एक समिती स्थापन केल्याचे समजते. समितीने त्यांचा अहवाल सुध्दा शासनास सादर केला आहे. तेंव्हा मराठवाडयाच्या हिताचे दृष्टिने समितीने सुचविलेल्या उपाय योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी अशी मंडळा द्वारे विनंती करण्यात येते. त्याच बरोंबर ज्या आजारी उद्योगाकडे अतिरिक्त जागा उपलब्ध आहे, त्यांना मोठे किरकोळ माल विक्री केंद्र/माहिती तंत्रज्ञान/जैव तंत्रज्ञान/कॉल सेंटर्स/मल्टी प्लेक्स अशा उद्योगांसाठीच जागा उपलब्ध करून देण्यास परवानगी द्यावी अशा सवरूपाची शिफारस मराठवाडा वैधानीक विकास मंडळाने शासनाकडे केली आहे.

### ६.८.४ इतर औद्योगीक सुविधा व समस्या :—

१) शेंद्रा औद्योगिक वसाहतीला विशेष आर्थिक क्षेत्र घोषित करणे.

२) शेंद्रा औद्योगिक वसाहतीमध्ये माहिती तंत्रज्ञान पार्कसाठी १०० एकर जागा राखून ठेवणे.

३) माहिती तंत्रज्ञान उद्योगातील नामवंत कंपन्यांना औरंगाबाद येथे आय. टी. केंद्र सुरू करण्यास प्रोत्साहित करणे.

४) औरंगाबाद येथे औषधी उद्योगावर व जालना येथे कृषिवर आधारित जैव तंत्रज्ञान पार्क विकसीत करणे.

५) लातूर, जालना, नांदेड व परभणी जिल्ह्यामध्ये कृषिवर आधारित उद्योगासाठी विशेष उद्योग क्षेत्र घोषित करणे.

६) मराठवाडयातील सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देणे.

७) विभागीय शासकीय मुद्रणालय इमारतीचे आधुनिकीकरण करणे.

८) मराठवाडयात बायोडीझेल, नॉन कन्व्हेंशन औजार, लहान हायड्रो प्रकल्प सुरू करण्याबाबत विचार होणे.

वरील प्रमाणे मराठवाडा विभागातील औद्योगिक सुविधा व समस्या सोडविण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे शिफारस केल्या आहेत.

## ६.९ कृषी व कृषी अनुषांगीक व्यवसाय विकास : —

'शेती' हा मराठवाडयातील प्रमुख व्यवसाय असुन, ग्रामीण भागातील बहुतांशी जनता शेतीवर अवलंबून आहे. सध्या जागतिक व्यापारी करणामुळे शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक झाले आहे. याकरिता खालील योजना राबविणे आवश्यक आहे असे मत मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे मांडले आहे.

### ६.९.१ हरितगृहातील पुष्प व भाजीपाला उत्पादन प्रकल्प :—

मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांना आधुनिक फुलशेतीचे दालन खुले करण्यासाठी मराठवाडा कृषिविद्यापीठाने मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या अर्थसहाय्याने उच्चतंत्रज्ञान पुष्प उत्पादन प्रकल्प, फळ संशोधन केंद्र, हिमायत बाग, औरंगाबाद येथे १ हेक्टर क्षेत्रावर पथदर्शक प्रात्यक्षिक प्रकल्प उभा केला आहे. प्रकल्पाचे यश पाहता मराठवाडा कृषिविद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अन्य भागात जसे परभणी, लातूर, नांदेड येथे ही पथदर्शक प्रात्यक्षिक प्रकल्प उभारण्याची आवश्यकता आहे.

मराठवाडयातील शेतकरी कष्टाळू व प्रयोगशील आहे, पण जेंव्हा जेंव्हा तो स्वत: प्रात्यक्षिक पाहतो व तंत्र समजून घेतो. तेंव्हा मराठवाडा कृषी विद्यापीठ अंतर्गत उद्यानविद्या महाविद्यालय, परभणी येथे प्रत्येकी ५ गुंठे क्षेत्राच्या दोन हरितगृहामध्ये जर्बेरा व ढोबळी मिरचीचे प्रात्यक्षिक प्रकल्प उभारण्याचे प्रस्ताव सादर करत आहेत. सदरील १० गुंठे क्षेत्रावरील जर्बेरा व ढोबळी मिरची लागवडीचा हरितगृह प्रकल्प उभारणीसाठी प्रस्तावित खर्च १५ लक्ष रूपये खर्चाचा प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी व आर्थिक सहायासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाकडून शासनास सादर केला आहे.

### ६.९.२ मराठवाडा कृषी विद्यापीठ , परभणी येथे फुड पार्क उभारणी प्रकल्प :—

महाराष्ट्र शासनाने औरंगाबाद व लातूर जिल्हयांना शेती उत्पादन निर्यात क्षेत्र ( Agricultural Exports Zones ) घोषीत केले आहे. औरंगाबाद, लातूर व बीड जिल्ह्यात केशर आंब्याचे क्षेत्र ७००० हेक्टर पर्यंत वाढले आहे. अल्फासो जातीच्या आंब्याचेही क्षेत्र वाढत आहे. भविष्यातील आंब्याचे उत्पादन विचारात घेता येथे एक Inland Container Depot चीही सुरूवात झाली आहे जे या भागातील आंब्याच्या निर्यातीसाठी अनुकूल आहे. या व्यतिरिक्त वेगवेगळया प्रकारच्या शेती उत्पादनावर आधारीत उद्योग **उदा:—** साखर उद्योग, डिस्टिलरीज, बीयर प्लँट, कॉटन जिनिंग मिल्स, पल्स पॉलिश मिल्स, दुग्ध प्रक्रीया उद्योग विविध फळ व भाजीपाल्यावर प्रक्रिया इत्यादी उद्योगांसाठी मराठवाडयात चांगला वाव आहे.

मराठवाडा हा महाराष्ट्रात शेती उत्पादनावर आधारित महत्वाचा विभाग आहे. तेंव्हा शेती उत्पादनावर आधारित उद्योगांना मराठवाडयात प्रोत्साहन दिल्यास ते महाराष्ट्रासाठी फलदायी व दिशादर्शक ठरेल. कृषी उद्योग व्यवस्थापन प्रक्रिया , विक्री व पेटंन्ट प्रशिक्षण केंद्र , हिंगोली , मराठवाडा कृषी विद्यापीठात मृद व आरोग्य संशोधन प्रकल्प सुरू करणे, पर्जन्यमापक यंत्रणा प्रत्येक जिल्ह्यात उभी करणे, मराठवाडी म्हशीचे संगोपन व संवर्धन इत्यादी

प्रकल्प सुरू करणे गरजेचे आहे. अशी विनंती मराठवाडा वैधानिक मंडळाने शासनाकडे केली आहे.

**६.९.३ कृषी विकासासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या इतर शिफारशी :—**

१) परभणी येथे कोरडवाहू संशोधन विकसीत करणे.

२) नांदेड येथे केळी संशोधन केंद्र स्थापन काणे.

३) तालुकास्तरावर संगणकीकृत कृषी माहिती केंद्र स्थापन करणे.

४) औरंगाबाद येथे फुड—पार्क केंद्र स्थापन करणे.

५) वडवळ (नागनाथ), ता. चाकूर, जि. लातूर येथे औषधी वनस्पती जतन व संशोधन केंद्र स्थापन करणे.

६) आष्टी, गेवराई व लोहा येथील शासकीय दुध शितकरण केंद्राची अपूर्ण कामे पूर्ण करणे.

७) बटेर पालन योजना राबविणे.

वरील प्रमाणे मराठवाडा विभागातील कृषि व कृषी अनुषंगिक व्यवसाय विकासातील सुविधा व समस्या सोडविण्यासाठी मराठवाडा वैधानिक मंडळाने शासनाकडे शिफारसी केल्या आहेत.

**६.१० सहकार विभाग :—**

मराठवाडयातील सहकार विभागास चालना देण्यासाठी मराठवाडा वैधानिक मंडळाने खालील विषयाबाबत विचार करण्याबाबत शासनास विनंती करण्यात आली.

१ सहकारी सूत गिरण्यांचा प्रश्न.

२ सहकारी साखर कारखाने.

**६.११ वाहतुक व दळण — वळण विभाग :—**

**६.११.१ रेल्वे सुविधा :—**

**१) मराठवाडयामध्ये रेल्वेची कामे :—** मागासलेल्या भागाचा विकास प्रामुख्याने त्या भागामध्ये रेल्वे द्वारे होणाऱ्या वाहतुकीवर अवलंबून असतो. त्यामुळे रेल्वेच्या सोयी उपलब्ध असणे ही विकासाची मुलभूत पायरी आहे.

मराठवाडयाचा विचार केल्यास या भागामध्ये १०० चौ.कि.मी. मागे रेल्वेमार्गाचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे दिसून येते. तेंव्हा राज्य शासनाने कांही नवीन रेल्वे मार्ग तयार करण्यासाठी केंद्र शासनाकडे सतत पाठ पुरावा करावा अशी मंडळाद्वारे विनंती करण्यात येते. सुचविण्यात आलेली रेल्वे मार्गाची नावे खालील प्रमाणे आहेत.

१) परळी—बीड—अहमदनगर ते कल्याण पर्यंत नवीन रेल्वे मार्ग.

२) लातूर—उस्मानाबाद मार्गे—कुर्डुवाडी रेल्वेचे ब्रॉडगेज मध्ये रूपांतर करणे. (सध्या हे काम पूर्ण झालेले आहे.)

३) मुदखेड—आदिलाबाद रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करून थेट गाडया सुरू कराव्यात.

४) मुदखेड—सिकंदराबाद रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करून थेट गाडया सुरू कराव्यात.

५) रोटेगाव पुणतांबा मार्ग लवकर मंजूर करावा.

६) परळी—बीड—अहमदनगर—माळशेज मार्ग.

७) सोलापूर—उस्मानाबाद—बीड—जालना—खामगाव—इंदौर मार्ग.

८) बोधन उदगीर मार्ग.

९) परळी—आंबेजोगाई—धर्मापूरी—घाटनांदूर मार्ग.

१०) मनमाड—मुदखेड मार्गाचे दुहेरी करण करणे.

महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री स्तरावर रेल्वे मंत्र्याची भेट घेवून तरतूद वाढवून घेण्यासाठी व सर्व प्रकल्प विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करावा अशी मंडळातर्फे विनंती करण्यात येते.

**२) नवीन थेट रेल्वे गाडया सुरू करण्याबाबत :—** मनमाड— औरंगाबाद — काचीकुडा मार्गाचे रूंदीकरण होऊनही मराठवाडयाचे मुख्यालय औरंगाबाद अद्याप भारतातील प्रमुख शहरांशी रेल्वेने जोडले गेलेले नाही. तरी खालील नवीन गाडया तातडीने पाठपुरावा करून सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे अशी शिफारस मंडळाने केली आहे.

१) औरंगाबाद—तिरूपती एक्सप्रेस दररोज करणे

२) औरंगाबाद—बेंगलोर एक्सप्रेस.

३) औरंगाबाद—नागपूर—पाटणा—कोलकता एक्सप्रेस.

४) काचीगुडा—निजामाबाद—औरंगाबाद—अहमदाबाद एक्सप्रेस.

५) नांदेड—औरंगरबरद—दिल्ली—जम्मूतावी एक्सप्रेस.

६) नांदेड—मुंबई सुपर एक्सप्रेस.

७) पूणे—नांदेड एक्सप्रेस रोज करणे. (सध्या दोन दिवस).

८) हिंगोली—मुंबई एक्सप्रेस रोज करणे.

९) नांदेड—औरंगाबाद—मुंबई सुपर एक्सप्रेस तात्काळ सुरू करणे.

१०) नांदेड—बेंगलूरू सुपर एक्सप्रेसला औरंगाबादहून तीन डबे परभणी येथे जोडणे.

**३) नांदेड येथील रेल्वेचे विभागीय कार्याला मध्यरेल्वेला जोडणे :—** नांदेड येथील नव्याने सुरू झालेले विभागीय कार्यालय दक्षिण मध्यरेल्वेशी जोडलेले आहे. तेंव्हा पासून नांदेड विभागीय कार्याला मध्यरेल्वेस जोडावे अशी मराठवाडयातील जनतेची मागणी आहे. शासनाने ह्या मागणीचा पाठपुरावा रेल्वेमंत्रालयाकडे करावी अशी पुनश्च विनंती करण्यात येते. हा विभाग मध्यरेल्वेला जोडण्याची शिफारस उच्चस्तरीय रेल्वे रिऑर्गनायझेशन समितीने केला आहे. ती अद्याप अमलात आली नाही. त्याची अंमलबजावणी करावी अशी मंडळाने शिफारस केली आहे.

### ६.११.२ विमान सुविधा :—

खाजगी विमान कंपन्यांनी मराठवाडयातील औरंगाबाद येथून हैद्राबादकडे विमान सेवा सुरू करण्याबाबत अंदाज घेतला आहे. यामध्ये सहारा व एअर डेक्कन कंपनीचा पुढाकार असल्याचे समजते. तेंव्हा हैद्राबाद—लातूर—औरंगाबाद—मुंबई या मार्गावरील विमान सेवा सुरू करण्याबाबत खाजगी कंपन्यांना गळ घालावी अशी शासनास विनंती करण्यात येते. त्यामुळे मराठवाडयातील विकासास गती मिळेल अशी अपेक्षा आहे. त्याचबरोबर पुर्वी अस्तित्वात असलेल्या दिल्ली—जयपूर—उदयपूर औरंगाबाद व दिल्ली—खजुराहो —नागपूर—औरंगाबाद—मुंबई हायवे सेवेस सुरू केल्यास पर्यटकांच्या संख्येत

एकदम वाढ होते असा अनुभव आहे. सध्याची दिल्ली—मुंबई—औरंगाबाद—सेवा पर्यटकांच्या दृष्टिने अत्यंत गैर सोयीची आहे. उलट मुंबई—गोवा—औरंगाबाद—मुंबई अशी सेवा पर्यटन विकासाच्या दृष्टिने खूपच उपयुक्त ठरू शकेल. त्याच प्रमाणे औरंगाबाद—उसमानाबाद—लातूर येथे विमानतळ आहेत. खाजगी कंपन्यामार्फत मराठवाडयातील चार जिल्हा मुख्यालयापासून नागपूर , पुणे , मुंबई व हैद्राबाद येथे नियमित विमान सेवा सुरू करण्याबाबत मंडळामार्फत शासनास विनंती करण्यात आली.

**६.१२ समाज कल्याण :—**

**१) औरंगाबाद येथे मुलींसाठी रिमांड होम सुरू करणे :—** औरंगाबाद येथे एक मुलांचे रिमांड होम कार्यरत असून मुलींसाठी एकही रिमांड होम नाही. सिडको प्रशासनाने मुलांचे रिमांड होम शेजारील जागा मुलींचे रिमांड होम बांधकामासाठी व ते सुरू करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. तथापी निधी अभावी त्याची पुढील कार्यवाही अपूर्ण आहे. तरी औरंगाबाद येथे मुलींचे रिमांड होम सुरू करण्यासाठी योग्य तो विचार व्हावा अशी शासनास विनंती करण्यात आली.

**२) मराठवाडा वैधानिक विकास मंडळामार्फत पाहणी अभ्यास प्रस्तावित करणे :—** मंडळाने किमाण एका विषयाची पाहणी अभ्यास एका उपसमिती मार्फत सन २०१०—२०११ या वर्षात प्रस्तावित करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुशंगाने मंडळाने ''समाजकल्याण या विषयाची'' निवड करून मराठवाडयातील त्या समाजाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्याबाबतची इत्यंभूत माहिती सदर पाहणी अभ्यासात करून अहवाल तयार करण्याचे ठरविले आहे.

**६.१३ मराठवाडयातील पर्यटन स्थळांचा विकास :—**

**१)** शासनाने पर्यटनास उद्योगाचा दर्जा दिला आहे. मराठवाडा विभागातील वेरूळ व अजिंठा या पर्यटन स्थळांना आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त झालेली आहे. या स्थळांचा विकास करण्याचे काम शासनाने हाती घेतले असून विकास कामे प्रगतीपथावर आहेत. मराठवाडा विभागामध्ये इतर अनेक स्थळे पर्यटनाच्या दृष्टिने महत्वाची आहेत. त्यांचा विकास करणेसुध्दा आता काळाची गरज आहे.

प्रामुख्याने पैठण (ज. औरंगाबाद), परळी–वैजनाथ व आंबेजोगाई (जि. बीड), औंढा नागनाथ (जि. हिंगोली), तुळजापूर (जि. उस्मानाबाद), माहूर (जि. नांदेड ) ईत्यादी पर्यटन स्थळांना राज्यातील व राज्याबाहेरील पर्यटकांची गर्दी जमते. त्यामुळे हया सर्व पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी नियोजनात्मक आराखडा तयार करून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती करण्यात येते. ह्या पर्यटन स्थळांचा योग्य विकास झाल्यास स्थानिक लोकांना रोजगार मिळवून देण्यासाठी त्यांचा चांगल्याप्रकारे उपयोग होऊ शकेल. अशी मंडळाची धारणा आहे.

**२)** मराठवाडयात काही क्षेत्र डोंगराळ व आदिवासी विभाग आहे. त्या ठिकाणी नैसर्गिक पर्यटनाला चांगला वाव आहे. त्याच प्रमाणे औरंगाबाद येथे जर सर्व प्रकारच्या (आयुर्वेदिक, युनानी, होमियोपॅथी, रेकी, ॲलोपॅथी, ॲक्युप्रेशर व ॲक्युपंक्चर) पध्दतीच्या जागतिक मानांकाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्यास अजिंठा/वेरूळ साठी येणारे विदेशी पर्यटक एखादा आठवडा औरंगाबाद मध्ये वास्तव्य वाढवू शकतील. अशा प्रकारच्या आरोग्य सुविधा पर्यटनाच्या दृष्टिने येथे विकसित करणे राज्याच्या हिताचे होणार आहे.

**३)** औरंगाबाद हे आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटन स्थळ म्हणून प्रसिध्द आहे. अजिंठा–वेरूळ पाहण्यासाठी बौध्द व इतर अनेक परदेशी पर्यटक येथे येताना ज्ञानेश्वर उद्यान, नाथसागर, गौताळा अभयारण्य, पितळखोरा लेण्या, अजिंठा डोंगरात पदभ्रमण व मराठवाडयातील ऐतिहासिक स्थळे आणि ग्रामीण व आदिवासी लोकजीवनाचे दर्शन ह्या गोष्टी पर्यटकांना आकर्षित करू शकतील व त्यासाठी एक ते दोन दिवस जादा मुक्कम करू शकतील. त्यासाठी ही ठिकाणे पर्यटन केंद्रे म्हणून विकसीत करणे आवश्यक आहे. मराठवाडयातील पर्यटकांची संख्या तीन वर्षात दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवून त्याप्रमाणे कार्यवाही सुरू करणे आवश्यक आहे. मराठवाडयातील प्रदूषण विरहीत शुध्द हवेचे आकर्षण परदेशी पर्यटकांना मोहित करू शकेल.

**४)** औरंगाबाद हे महाराष्ट्रातील सर्वात महत्वाचे पर्यटन केंद्र असल्यामुळे महाराष्ट्र पर्यटन विकास प्राधिकरणाचे सहव्यवस्थापकीय संचालकांचे कार्यालय

औरंगाबाद येथे असणे आवश्यक आहे. सदर कार्याला केरळ/कोकणाच्या धर्तीवर डोंगराळ/अतिमागास/आदिवासी भागात पर्यटन केंद्र विकसीत करू शकेल.

वरील शिफारसी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केली आहेत.

### ६.१४ अनुशेष :—

वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यामागे मुख्य उद्देश हा या क्षेत्रात विविध विभागाची समप्रमाणात प्रगती साधने हा आहे. मराठवाडा आणि विदर्भ हे विभाग तुलनेने मागासलेले विभाग आहेत. ही बाब सर्वच्युत आहे.

प्रादेशिक विकासातील असमतोल नाहिसा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अनेक समित्यांची स्थापना केली. (सविस्तर वर्णन प्रकरण नं. दोन मध्ये दिलेले आहे.) त्यातील महत्वाच्या दोन समित्या म्हणजे १९८३ मध्ये वि.म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समिती स्थापन करण्यात आली. या समितीने आपला अहवाल एप्रिल १९८४ मध्ये राज्य शासनाकडे सादर केला तर दुसरी समिती म्हणजे १९९४ मध्ये बी.ए. कुलकर्णी यांच्या अध्यक्षते खालील ''निर्देशांक व अनुशेष समिती'' या समितीने आपला अहवाल राज्यपालांना दि. ११/६/१९९७ रोजी सादर केला. त्या अहवालानुसार महाराष्ट्रातील विभागीय अनुशेष खालील प्रमाणे आहे.

### ६.१४.१ महाराष्ट्रातील विभागीय अनुशेष :—

महाराष्ट्रामध्ये तिन्ही विभागाचा १९८४ चा अनुशेष ३१८६.०० कोटी रू. होता तो १९९४ मध्ये १५३५५.७७ कोटी रू. तर १ एप्रिल २००० मध्ये शिल्लक अनुशेष ११९७४.०० कोटी रू. होता तो खालील प्रमाणे आहे.

## तक्ता क्र. ६.१

## महाराष्ट्रातील प्रादेशिक पातळीवरील अनुशेष

(आकडे कोटी रू. मध्ये)

| अ. क्र. | तपशिल | उर्वरित महाराष्ट्र | मराठवाडा | विदर्भ | एकूण महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | सत्यशोधन समितीचा अहवाला नुसार अनुशेष १९८४ | ११८९.०० (३७.००%) | १०५१.०० (२४.००%) | १२४६.०० (३९.००%) | ३१८६.०० (१००%) |
| २ | निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालानुसार अनुशेष १९९४ | ३७६८.०० (२४.५४%) | ४६२६.५५ (३०.५४%) | ६९६१.६२ (४५.३३%) | १५३५५.७७ (१००%) |
| ३ | दि. १ एप्रिल २००० रोजीचा शिल्लक अनुशेष | २६४८.७५ (२२.१२%) | ३५४७.०६ (२९.६२%) | ५७७८.६३ (४८.२६%) | ११९७४.४४ (१००%) |

**टीप :—** कंसातील आकडे एकूण अनुशेषांशी शेकडा प्रमाण दाखवितात.

**आधार :—** १) योजना आयोग, भारत सरकार, एप्रिल २००३.

२) मराठवाडा वैधानिक विकास मंडळ वार्षिक अहवाल २००२— ०३.

वरील तक्ता क्र. ६.१ वरून असे दिसून येते की १९८४ ते २००० या १६ वर्षाच्या कालावधीत अनुशेष निर्मुलनासाठी शासनाने वेळोवेळी विशेष आर्थिक तरतूद करूनही फक्त उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष कमी झाला तर मराठवाडा व विदर्भ विभागाचा अनुशेषामध्ये वाढ झालेली आहे.

## आलेख क्र. ६.१
## सत्यशोधन समितीचा अहवाल (१९८४) नुसार महाराष्ट्रातील प्रादेशिक पातळी वरील अनुशेष

(आकडे कोटी रू.)




**आधार :—** तक्ता क्र. ६.१ नुसार.

वरील आलेख क्र. ६.१ वरून असे दिसून येते की, सत्यशोधन समितीचा अहवाल (१९८४) नुसार महाराष्ट्रातील एकुण अनुशेष ३१८६ कोटी रू. होता.

## आलेख क्र. ६.२
## निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवाल (१९९४) नुसार अनुशेष महाराष्ट्रातील प्रादेशिक पातळी वरील अनुशेष

(आकडे कोटी रू.)




**आधार :—** तक्ता क्र. ६.१ नुसार.

वरील आलेख क्र. ६.२ वरून असे दिसून येते की, निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवाल (१९९४) नुसार अनुशेष महाराष्ट्रातील एकुण अनुशेष १५३५५.७७ कोटी रू होता.

## आलेख क्र. ६.३
## दि. १ एप्रिल २००० रोजीचा शिल्लक अनुशेष

(आकडे कोटी रू.)




**आधार :—** तक्ता क्र. ६.१ नुसार.

वरील आलेख क्र. ६.३ वरून असे दिसून येते की, दि. १ एप्रिल २००० रोजीचा महाराष्ट्रातील शिल्लक अनुशेष ११९७४.४४ कोटी रू होता.

### ६.१४.२ मराठवाडा विभागातील अनुशेष :—

मराठवाडा विभागातील अनुशेषांचा विचार करीत असता सिंचन क्षेत्रातील अनुशेष व सिंचन क्षेत्राव्यतिरीक्त अनुशेष याचा विचार करू.

**तक्ता क्र. ६.२**

**मराठवाडयातील सिंचन क्षेत्रातील वित्तीय अनुशेष**

(आकडे कोटी रू. मध्ये)

| अ. क्र. | विभाग | १एप्रिल १९९४ रोजीचा अनुशेष | १एप्रिल २००० रोजीचा अनुशेष | १एप्रिल २००२ रोजीचा अनुशेष | १एप्रिल २००७ रोजीचा अनुशेष | १एप्रिल २००८ रोजीचा अनुशेष | १एप्रिल २००९ रोजीचा अनुशेष | १एप्रिल २०१० रोजीचा अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठवाडा | २४०१.०० | २१७३.९६ | १८२१.०६ | ७२०.६५ | ४०७.७६ | १५९.२० | ००.०० |

**आधार :—** १) मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने दि. १५/३/२०१० रोजी मा. राज्यपालांना सादर केलेली संक्षिप्त टिप्पणी.

२) महाराष्ट्राचे मा. राज्यपाल यांचे दि. १० मार्च २०११ रोजीचे निर्देश.

वरील तक्ता क्र. ६.२ वरून असे दिसून येते की १ एप्रिल १९९४ रोजी मराठवाडा विभागाचा सिंचन अनुशेष २४०१.०० कोटी रू. होता तो शासनाच्या प्रयत्नामुळे दि. १ एप्रिल २०१० रोजी अनुशेष संपलेला आहे.

## तक्ता क्र.६.३

## मराठवाडयातील सिंचन क्षेत्र वगळता इतर क्षेत्रातील वित्तीय अनुशेष

(आकडे कोटी रू.)

| अ. क्र. | क्षेत्र | दि.१एप्रिल २०००चा अनुशेष | सन२०००—०१ ते०७—०८ या कालावधीतील खर्च | सन ०८—०९ या कालावधीतील खर्च | दि.१एप्रिल २००९चा अनुशेष | दि.१एप्रिल २०११ रोजीचा अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रस्ते | ४३७.५७ | ४५८.०९ | ४.५५ | — | — |
| २ | सामान्य शिक्षण | १३.३३ | ०.१२ | — | — | — |
| ३ | तंत्रशिक्षण | ७३.२३ | ४५.१७ | २८.७७ | — | — |
| ४ | सार्वजनिक आरोग्य | ४२२.७४ | ८९.१२ | ४३.१५ | २९०.४७ | २७५.०९ |
| ५ | शहरी पाणी पुरवठा | ७८.७२ | ७८.७२ | — | — | — |
| ६ | मृद संधारण | ५०.९८ | ४७.६९ | २२.३५ | — | — |
| ७ | पशुवैद्यकीय सेवा | ०.८७ | ०.६९ | ०.३३ | — | — |
| ८ | कृषी विद्युत पंप जोडणी | २९५.६६ | ३६४.४२ | ५४.२१ | — | — |
| | एकूण | १३७३.०१ | १०८४.०२ | १५३.३६ | २९०.४७ | २७५.०९ |

**आधार :—** १) मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने दि. १५/३/२०१० रोजी मा. राज्यपालांना सादर केलेली संक्षिप्त टिपण्णी.

२) महाराष्ट्राचे मा. राज्यपाल यांचे दि. १० मार्च २०११ रोजीचे निर्देश.

वरील तक्ता क्र. ६.३ वरून असे दिसून येते की, मराडवाडयातील सिंचनाव्यतिरीक्त १ एप्रिल २००० मध्ये अनुशेष १३७३.०१ कोटी रू. होता, तो १ एप्रिल २०११ मध्ये अनुशेष २७५.०९ कोटी रू. होता. तो फक्त सार्वजनिक आरोग्य विभागाचा अनुशेष राहिलेला आहे.

वरील दोन्ही तक्त्यावरून असे दिसून येते की, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या शिफारशी वरून महाराष्ट्र शासनाने मराठवाडयाच्या अनुशेष निर्मुलनासाठी भरीव तरतूद केल्यामुळे मराठवाडयाचा फक्त सार्वजनिक आरोग्य विभाग सोडून इतर क्षेत्राचा अनुशेष भरून निघाला आहे.

**६.१५ नियतव्यय विषेश निधी :—**

शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक वै.वि.म.—१००६प्र.४१७/का. १४५२दि.१६/१२/२००६ नुसार ''विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळाच्या शिफारशीनुसार घ्यावयाच्या कामांसाठी दरवर्षी १०० कोटी रू. नियतव्यय विशेष निधी म्हणून अर्थसंकल्पीत केला जात आहे. या नियतव्ययाचे वाटप तिन्ही विकास मंडळांना मा. राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार मंडळाच्या कार्यक्षेत्रातील विकासाच्या अनुशेषाच्या प्रमाणात करण्यात येत आहे. या नियतव्ययातून घ्यावयाच्या कामांबाबत मार्गदर्शक सुचना व कार्यपध्दती संदर्भाधिन शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेली आहे.

**शासन निर्णय :—**

१) विशेष निधीचे जिल्हानिहाय वितरण ठरवितांना मंडळांनी मंजूर निवतव्ययाच्या १५% निधी सामुहीक विकास योजनेअंतर्गत कामे व ५% निधी मागासलेल्या तालुक्यातील विकास कामांसाठी राखून ठेवावा व उर्वरित ८०% निधी पैकी निम्मा निधी (४०%) मंडळाच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात वाटप करावा व उर्वरित निम्मा निधी (४०%) मंडळाच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांमधील शिल्लक अनुशेषाच्या प्रमाणात वाटप करावा. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्याच्या निधीची मर्यादा मंडळांनी निर्धारित करावी.

२) मंडळांनी त्यांच्या महसूल क्षेत्रातील प्रत्येकी २ अतिमागास तालुक्याची निवड करावी.

वरीलप्रमाणे अतिमागास तालुक्यांसाठी राखून ठेवलेला ५% निधी सदर तालुक्यासाठी विकास कामासाठी खर्च करावा व पुढील ३ वर्षात ५% प्रमाणे खर्च करावा.

३) मंडळांना वाटप करण्यात आलेल्या नियतव्ययाच्या मर्यादेतच निधीची कामे मंडळांने शिफारस करावी. अपवादात्मक परिस्थितीमध्ये मंजुर नियतव्ययाच्या १०% पर्यंत अधिक कामाची शिफारस मंडळांनी करावी.

४) उपलब्ध निधीचे क्षेत्रनिहाय व जिल्हा निहाय वाटप कसे केले जाणार आहे याचा आराखडा प्रत्येक मंडळाने नियोजन विभाग व मा. राज्यपालास सादर करावा.

५) जिल्हा निहाय निधीचे वितरण निश्चित केल्यावर अनुशेषातील क्षेत्राशी संबंधीत शासनाच्या विभागांना माहिती देवून त्यांच्याकडून कामाची यादी घ्यावी.

६) नियोजन विभागाने प्रस्तावाची छाननी करून दि. ३१ आक्टोंबर पर्यंत संबंधीत प्रशासकीय विभागाला निधी उपलब्ध करून द्यावा.

७) शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी, समाजसेवी संस्था, व अन्य व्यक्तीकडून सुचविण्यात आलेले कामाचे प्रस्ताव, अर्जासोबत खर्चाचे अंदाज पत्रक व सदर काम शासनाच्या अन्य योजनेतून/निधीतून हाती घेण्यात आलेले नाही, अशा अर्थाचे संबंधीत अधिकाऱ्याचे/कार्यालयाचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर अशा कामांना निधी उपलब्ध करून द्यावा.

८) मंडळाच्या शिफारशी नुसार ज्या कामांना निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे त्या प्रादेशिक विभागांनी कामाच्या पुर्णतेचे प्रमाणपत्र व निधी संपूर्णपणे वापरण्याबाबतचे ''उपयोगिता प्रमाणपत्र'' मंडळाकडे सादर करावे.

महाराष्ट्राचे मा. राज्यपाल यांचे दि. १० मार्च २०११ रोजीचे निर्देशानुसार ''राज्यपालांनी, राज्य शासनाशी विचार विनिमय करून वित्तीय वर्ष सन २०११—१२ पासून १०० कोटी रूपयाचा विशेष निधी रद्द करण्याचे ठरविले आहे. तथापि विकास मंडळांना प्रादेशिक विकास अहवाल तयार करण्यासाठी विविध अभ्यास व सर्वेक्षण करणे व ते प्रायोजित करणे या बाबी पार पाडणे विकास मंडळांना शक्य होण्यासाठी १ कोटी रू. चे नियत वाटप नियोजन

विभागाने बाजूला काढून ठेवून त्या त्या मंडळांना त्यांच्या गरजेनुसार वाटप करावे.''

वरील प्रमाणे दरवर्षी नियतव्यय विशेष निधी १०० कोटी पैकी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या वाटयाला जवळपास २८ कोटी रू. विशेष निधी मिळतो. त्या विशेष निधीचे जिल्हानिहाय व तालुकानिहाय वाटप व विकास कामे पुढे सविस्तर दिलेले आहेत.

### ६.१५.१ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने जिल्हानिहाय केलेल्या विशेष निधीचे वाटप :—

मराठवाडा विभागामध्ये औरंगाबाद, बीड, जालना, नांदेड, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, लातूर अशा एकूण आठ जिल्ह्यांचा समावेश केला जातो. या आठही जिल्ह्याच्या विकासाची कामगिरी मराठवाडा वैधानिक विकास मंडळावर टाकण्यात आली आहे. त्यासाठी मंडळाने वरील आठही जिल्ह्यांना विकासात्मक विशेष निधी वाटप केलेला आहे. त्याचा तपशिल तक्ता क्र.६.४ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्र.६.४**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने जिल्हानिहाय केलेल्या विशेष निधीचे वाटप**

**(सन २००५—०६ ते सन २००९—१०)**

(आकडे लाख रू.)

| अ. क्र. | मराठवाडयातील जिल्हे | सन ०५—०६ | सन०६—०७ | सन ०७—०८ | सन ०८—०९ | सन०९—१० | एकूण | एकूण निधीशी% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | ६८७.८० | ५१२.१८ | ४०४.७९ | ४२६.९० | ३५६.९६ | २३८८.६३ | १८.५७% |
| २ | जालना | ४६२.८६ | ३१८.५१ | ३३०.२६ | २३८.९४ | २४३.०० | १५९३.५७ | १२.३८% |
| ३ | बीड | ३८९.४४ | ५०६.२५ | ४६७.२५ | ५०१.२८ | ३०९.८३ | २१७४.०५ | १६.९०% |
| ४ | परभणी | २२३.८८ | २११.०१ | ३११.८४ | ३१०.२५ | १९४.७१ | १२५१.६९ | ९.७३% |
| ५ | हिंगोली | १०३.७५ | ८२.५९ | २२५.८८ | २०४.०० | २०६.३४ | ८२२.५६ | ६.३९% |
| ६ | नांदेड | २६०.३९ | २४९.७९ | ४०३.९६ | २५६.०० | ३५१.२० | १५२१.३४ | ११.८२% |
| ७ | उस्मानाबाद | २७६.६९ | ३४२.४३ | २४६.०९ | २४८.५० | २००.२८ | १३१३.९९ | १०.२१% |
| ८ | लातूर | ५५४.४८ | ३५९.३४ | ३७४.३९ | २५८.३५ | २५०.३१ | १७९६.८७ | १३.९६% |
| | एकूण | २९५९.२९ | २५८२.१० | २७६४.४६ | २४४४.२२ | २११२.६३ | १२८६२.७० | १००% |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

२) म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

वरील तक्ता क्र. ६.४ वरून असे दिसून येते की, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये विशेष निधी वाटपामध्ये सर्वात जासत निधी औरंगाबाद जिल्ह्याला १८.५७% तर सर्वात कमी निधी हिंगोली जिल्ह्याला ६.३९% दिलेला आहे.

**आलेख क्र. ६.४**

**म. वै. वि. मंडळाने जिल्हानिहाय केलेल्या विशेष निधीचे वाटप**

**(सन २००५—०६ ते सन २००९—१०)**

(आकडे लाख रू.)




**आधार :—** तक्ता क्र. ६.४ नुसार.

वरील आलेख क्र. ६.४ वरून असे दिसून येते की म. वै. वि. मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये औरंगाबाद जिल्ह्याला सर्वात जास्त विशेष निधी दिला तर हिंगोली जिल्ह्याला सर्वात कमी विशेष निधी दिला आहे.

## ६.१६ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने वाटप केलेल्या विशेष निधी मधून जिल्हा निहाय केलेली विकास कामे :—

### १) औरंगाबाद जिल्हा :—

औरंगाबाद जिल्ह्यामध्ये ९ तालुके असून शहरांची संख्या ९ आहे. गावांची संख्या १३४४ आहे, पंचायत समित्या ९ असून ग्रामपंचायतींची संख्या ८५८ आहे, महानगर पालिका १ तर नगर पालिकांची संख्या ६ आहे.

**तक्ता क्र. ६.५**

**म. वै. वि. मंडळाने औरंगाबाद जिल्ह्यातील तालुक्यांना दिलेला विशेष निधी (सन २००५—०६ ते २००९—१०)**

(आकडे लाख रू.)

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | सन ०५—०६ | सन ०६—०७ | सन ०७—०८ | सन ०८—०९ | सन ०९—१० | एकूण | जिल्ह्याच्या एकूण निधीशी% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | २४१.५२ | २१०.७३ | १७१.८२ | १९४.८५ | २३४.०० | १०५२.९२ | ४४.०८% |
| २ | खुलताबाद | ४०.०० | २९.६५ | १४.६० | — | ४०.०० | १२४.२५ | ५.२०% |
| ३ | फुलंब्री | ८९.८० | ४९.९७ | २४.२७ | ८६.५५ | २२.०० | २७२.५९ | ११.४१% |
| ४ | सिल्लोड | २९.९४ | ५०.८४ | २७.०० | २८.०० | — | १३५.७८ | ५.६८% |
| ५ | पैठण | १२२.१२ | ९५.९५ | ९२.६५ | ६५.०० | ३५.९९ | ४११.७१ | १७.२३% |
| ६ | कन्नड | १९.९९ | ३०.०० | १५.०० | १०.०० | — | ७४.९९ | ३.१३% |
| ७ | वैजापूर | ४७.६२ | २६.०० | ३९.६३ | १७.५० | १०.०० | १४०.७५ | ५.८९% |
| ८ | गंगापूर | ९६.८१ | १९.०४ | १९.८२ | २५.०० | १४.९७ | १७५.६४ | ७.६५% |
| ९ | सोयगाव | — | — | — | — | — | — | — |
| | एकूण | ६८७.८० | ५१२.१८ | ४०४.७९ | ४२६.९० | ३५६.९६ | २३८८.६३ | १००% |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

वरील तक्ता क्र. ६.५ वरून असे दिसून येते की, म. वै. वि. मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधी मध्ये औरंगाबाद जिल्ह्यात सर्वात जास्त विशेष निधी औरंगाबाद तालुक्याला (४४.०८%) तर सोयगाव तालुक्याला काहीच निधी दिलेला नाही.

## आलेख क्र. ६.५

## म. वै. वि. मंडळाने औरंगाबाद जिल्ह्यातील तालुका निहाय विशेष निधीचे वाटप

## (सन २००५—०६ ते सन २००९—१०)

(आकडे लाख रू.)




**आधार :—** तक्ता क्र. ६.५ नुसार.

वरील आलेख क्र. ६.५ वरून असे दिसून येते की म. वै. वि. मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये औरंगाबाद जिल्ह्यात सर्वात जास्त विशेष निधी औरंगाबाद तालुक्याला दिला तर दिला तर सोयगाव तालुक्याला कांहीच विशेष निधी दिला नाही.

१) रस्त्याची कामे :— मौजे जांब—पाथरूड, पखरूड, जोतीबाची वाडी, मेडसिंगा — महाळंगी, रूईभर गावाअंतर्गत सिमेंट रस्ता, उस्मानाबाद मधील खेर्डा—गपाट वस्ती,राज्यमार्ग ६७—अंबेजवळगा,कनगरा—पंचमहाल,अंबेजवळगा — गडदेवधरी, देवळाली गावाअंतर्गत सिमेंट रस्ता केला.

२) सामाजिक सभागृह बांधकाम :— मौजे रूईभर, उपळा (मा.), उस्मानाबाद (श्रीनगर), खानापूर, शिंगोली, करजखेडा, वाघोली, समुद्रवाणी,घुगी,नितळी, राजुरी, पाटोदा, केशेगाव, अनसुर्डा, बामणी, सांगवी, पाडळी, तेर, वानेवाडी, विठ्ठलवाडी, दुधगाव, सारोळा, आरणी, भंडारवाडी, आळणी, धुत्ता,मेंढा, लासोना, महाळंगी, कनगरा येथे सामाजिक सभागृह बांधकाम केले.

३) उस्मानाबाद तालुक्याच्या पाणी पुरवठा योजनांवर एक ऑक्सिमॅक्स — १०० संयंत्र बसविले.

४) जिल्हा अर्थ व संचालनालय उस्मानाबाद या कार्यालयास एक संगणक व प्रिंटर दिले.

५) उस्मानाबाद जिल्हयामधील २० शासकीय अंगणवाडी केंद्राचे बांधकाम केले.

६) जिल्हा रूग्णालय उस्मानाबाद येथील कुष्ठ रूग्णालय इमारतीचे नुतनीकरण केले.

## ७.२ कळंब तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये उस्मानाबाद जिल्ह्यासाठी एकूण १३१३.९९ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये कळंब तालुक्यासाठी १२७.८० (९.७२%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.७०**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून कळंब तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | ४९.८९ | ३७.४६ | १०.०० | ५.०० | — | १०२.३५ |
| २ | ग्रामविकास | ४.९५ | — | — | — | ५.०० | ९.९५ |
| ३ | पाणी पुरवठा | — | ५.५० | १०.०० | — | — | १५.५० |
| | एकूण | ५४.८९ | ४२.९६ | २०.०० | ५.०० | ५.०० | १२७.८० |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने कळंब तालुक्यात केलेली विकास कामे :—**

१) रस्त्याची कामे :— मौजे नायगाव, इटकूर अंदोरा या गावाअंतर्गत सिमेंट रस्ता केला. मौजे अंदोरा बाभळगाव, राज्यमार्ग १६० ते लोहारा (दिवाणी), दिवाणी वस्ती, कळंब—मोहा—येडशी, कळंब—भाटसांगवी, राज्यमार्ग १६० ते हावरगाव या गावातील रस्त्याची कामे केली.

२) सामाजिक सभागृह बांधकाम :— मौजे डिकसळ, पिंपळगाव (डोळा), शिराढोण, दाभा, चोराखळी येथे सामाजिक सभागृह बांधकाम केले.

३) मौजे डिकसळ या पर्यटन स्थळास पाणी पुरवठा व्यवस्था केली.

४) कळंब तालुक्याच्या पाणी पुरवठा योजनांवर एक ऑक्सिमॅक्स—१०० संयंत्र बसविले.

### ७.३ उमरगा तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये उस्मानाबाद जिल्ह्यासाठी एकूण १३१३.९९ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये उमरगा तालुक्यासाठी ९४.३२ (७.१७%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.७१**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून उमरगा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | १४.९६ | १५.९६ | १५.०० | ७.०० | २०.०० | ७२.९२ |
| २ | ग्रामविकास | — | — | १५.९० | — | — | १५.९० |
| ३ | पाणी पुरवठा | — | ५.५० | — | — | — | ५.५० |
| | एकूण | १४.९६ | २१.४६ | ३०.९० | ७.०० | २०.०० | ९४.३२ |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने उमरगा तालुक्यात केलेली विकास कामे :—**

१) रस्त्याची कामे :— मौजे उमरगा येथील एस. टी. कॉलनी येथे सिमेंट रस्ता केला.

२) सामाजिक सभागृह बांधकाम :— मौजे उमरगा, डिग्गी, कऱ्हाळी, वागदरी, दाळींब कवठा येथे सामाजिक सभागृह बांधकाम केले.

३) उमरगा तालुक्याच्या पाणी पुरवठा योजनांवर एक ऑक्सिमॅक्स—१०० संयंत्र बसविले.

४) मौजे गुंजोटी येथे ग्रामपंचायती अंतर्गत हनुमान मंदिरास सुरक्षा भिंतीचे बांधकाम केले.

## ७.४ तुळजापूर तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये उस्मानाबाद जिल्ह्यासाठी एकूण १३१३.९९ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये तुळजापूर तालुक्यासाठी २०६.४५ (१५.७१%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.७२**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून तुळजापूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | ५१.०० | ६२.९५ | ३०.०० | २२.०० | ३५.०० | २००.९५ |
| २ | पाणी पुरवठा | — | ५.५० | — | — | — | ५.५० |
| | एकूण | ५१.०० | ६८.४५ | ३०.०० | २२.०० | ३५.०० | २०६.४५ |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने तुळजापूर तालुक्यात केलेली विकास कामे :—**

१) रस्त्याची कामे :— मौजे बोरगाव (तु.) — सिंधगाव, खडकी—खडकीतांडा, बोरनदवाडी जोड रस्ता, तामलवाडी—गंजेवाडी, वागदरी जोडरस्ता, वाणेवाडी—दारफळ, गुजनूर जोडरस्ता, हिप्परगा (ताड), परजिल्हा मार्ग ३७, राज्यमार्ग १५३—मुदगलेश्वर या गावामध्ये रस्त्याची कामे केली.

२) सामाजिक सभागृह बांधकाम :— मौजे काटी, अणदूर, तामलवाडी, काक्रंबा, तुळजापूर (माळी गल्ली), पिंपळा (खु.), बोरगाव (खु.), सिंदफळ, अपसिंगा,

माळुंब्रा, गुजनूर, खडकी तांडा, येडोळा, व्हर्टी, वडगाव (देव) या गावात सामाजिक सभागृह बांधकाम केले.

३) तुळजापूर तालुक्याच्या पाणी पुरवठा योजनांवर एक ऑक्सिमॅक्स–१०० संयंत्र बसविले.

### ७.५ परांडा तालुका :–

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५ – ०६ ते २००९ – १० या कालावधीमध्ये उस्मानाबाद जिल्ह्यासाठी एकूण १३१३.९९ लाख रू. विषेश निधी खर्च केला त्यामध्ये परांडा तालुक्यासाठी सर्वात कमी निधी १७.०० (१.२९%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.७३**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून परांडा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५–६ | ६–७ | ७–८ | ८–९ | ९–१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | १०.०० | – | – | ७.०० | – | १७.०० |
| | एकूण | १०.०० | – | – | ७.०० | – | १७.०० |

**आधार :– १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५–०६ ते २००९ – १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५–०६ ते २००९ – १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने परांडा तालुक्यात केलेली विकास कामे :–**

१) मौजे कंडारी – राज्यमार्ग १६१ या रस्त्याचे मजबुतीकरण केले.

२) मौजे परांडा येथील हिंदू स्मशानभुमीस संरक्षण भींतीचे बांधकाम केले.

### ७.६ भूम तालुका :–

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५ – ०६ ते २००९ – १० या कालावधीमध्ये उस्मानाबाद जिल्ह्यासाठी एकूण १३१३.९९ लाख रू.

विशेष निधी खर्च केला त्यामध्ये भूम तालुक्यासाठी २०३.४८ (१५.४८%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.७४**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून भूम तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | २५.०० | ८०.०० | १५.०० | २५.०० | — | १४५.०० |
| २ | ग्रामविकास | — | — | १५.०० | १०.०० | २७.९८ | ५२.९८ |
| ३ | पाणी पुरवठा | — | ५.५० | — | — | — | ५.५० |
| | एकूण | २५.०० | ८५.५० | ३०.०० | ३५.०० | २७.९८ | २०३.४८ |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने भूम तालुक्यात केलेली विकास कामे :—**

१) रस्त्याची कामे :— मौजे देवळाली—भन्साले, देवळाली—खडकलगाव, पिंपळगाव (क.)— गिरवली, डोकेवाडी—चांदवड, शेकापूर—आष्टावाडी, भूम, वांगी खुर्द — ईडा या गावातील रस्त्याचे मजबुतीकरण केले व मौजे देवळाली गावाअंतर्गत सिमेंटरस्ता केला.

२) मौजे ईट व चांदवड येथे नाली बांधकाम केले.

३) सांस्कृतिक सभागृह बांधकाम :— मौजे पाथ्रुड, चिंचोली, वालवड, गिरवली, लांजेश्वर, निरलगाव, डोकेवाडी, ईट, देवळाली येथे सांस्कृतिक सभागृह बांधकाम केले.

४) भूम तालुक्याच्या पाणी पुरवठा योजनांवर एक ऑक्सिमॅक्स—१०० संयंत्र बसविले.

५) मौजे ईट येथे ग्रामपंचायती अंतर्गत सार्वजनिक रस्त्यावर सी. एफ. एल. पथदिवे बसविले.

### ७.७ लोहारा तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५ — ०६ ते २००९ — १० या कालावधीमध्ये उस्मानाबाद जिल्ह्यासाठी एकूण १३१३.९९ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये लोहारा तालुक्यासाठी २२.१९ (१.६८%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.७५**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून लोहारा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | — | — | ५.०० | १२.०० | — | १७.०० |
| २ | पाणी पुरवठा | — | — | ५.१९ | — | — | ५.१९ |
| | एकूण | — | — | १०.१९ | १२.०० | — | २२.१९ |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०
**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने लोहारा तालुक्यात केलेली विकास कामे :—**

१) मौजे माकणी व भातगंळी येथे ग्रामपंचायती अंतर्गत सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम केले.

२) मौजे धानुरी गावाच्या पाणीपुरवठयासाठी बोअरवेल, पंपींग उपकरणे व पाईप लाईन इ. व्यवस्था केली.

### ७.८ वाशी तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये उस्मानाबाद जिल्ह्यासाठी एकूण १३१३.९९ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये वाशी तालुक्यासाठी २७०.८१ (२०.६८%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

### तक्ता क्र.७६

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून वाशी तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | ४०.५१ | १९.०० | ४५.०० | ७८.५० | ६२.३० | २४५.३१ |
| २ | ग्रामविकास | — | — | २०.०० | — | — | २०.०० |
| ३ | पाणी पुरवठा | — | ५.५० | — | — | — | ५.५० |
| | एकूण | ४०.५१ | २४.५० | ६५.०० | ७८.५० | ६२.३० | २७०.८१ |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**म. वैधानिक विकास मंडळाने वाशी तालुक्यात केलेली विकास कामे :—**

१) रस्त्याची कामे :— मौजे वाशी — तांदुळवाडी, वाशी — उंद्रेवस्ती, वाशी — रामकुंड ते राज्यमार्ग २११, वाशी गावातील रामनगर ते प्राध्यापक कॉलनी, पिंपळगाव (को.) — पारा, घोडकी — पिंपळगाव (लि.), कन्हेरी — सोबळेवाडी, धारेश्वरी बोरगाव, सारोळा — मांडवा, वाशी येथील शिवशक्ती वॉर्ड, घनेश्वरी बोरगाव ते लिंगी पिंपळगाव या गावातील रस्त्याची कामे केली.

२) सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम :— मौजे जानकापूर, सरमकुंडी, घाटपिंप्री येथे सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम केले.

३) वाशी येथे स्मशानभुमीस संरक्षण भींत, अंतर्गत रस्ते व शेड बांधकाम केले.

४) मौजे वाशी व तेरखेडा येथे व्यायामशाळेचे बांधकाम केले.

५) वाशी तालुक्याच्या पाणी पुरवठा योजनांवर एक ऑक्सिमॅक्स—१०० संयंत्र बसविले.

## **६.१६.८ लातूर जिल्हा :—**

लातूर जिल्ह्यामध्ये १० तालुके असून, शहरांची संख्या ५ आहे. गावांची संख्या ९४५ आहे, पंचायत समित्या १० असून, ग्रामपंचायतींची संख्या ७८७ आहे, तर नगर पालिकांची संख्या ५ आहे.

**तक्ता क्र. ६.७७**

**लातूर जिल्ह्यातील तालुक्यांना केलेल्या विशेष निधीचे वाटप**

(आकडे लाख रू.)

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | सन ०५—०६ | सन ०६—०७ | सन ०७—०८ | सन ०८—०९ | सन ०९—१० | एकूण | जिल्ह्याच्य ाएकूण निधीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लातूर | ११७.६६ | ६८.०० | १४५.५० | ६७.८५ | ६९.१६ | ४६८.१७ | २६.०५% |
| २ | अहमदपूर | ५०.०० | ४०.२७ | १७.०० | २५.०० | १९.७६ | १५२.०३ | ८.४६% |
| ३ | उदगीर | ९७.०० | ५५.०० | २४.८० | ९४.०० | ७.०० | २७७.८० | १५.४६% |
| ४ | निलंगा | ५४.०० | २०.५० | १०.०० | २६.०० | ५३.२५ | १६४.०२ | ९.१२% |
| ५ | औसा | ५०.८३ | ४०.०० | ७०.०० | २१.०० | २७.२८ | २०९.११ | ११.६३% |
| ६ | चाकूर | ५५.४८ | ३४.०० | २३.६७ | — | १८.७६ | १३१.९१ | ७.३४% |
| ७ | रेणापूर | ७४.५१ | १९.११ | ६८.४२ | २४.५० | ५०.८३ | २३७.३७ | १३.२१% |
| ८ | देवणी | १२.०० | २५.४६ | — | — | — | ३७.४६ | २.०८% |
| ९ | शिरूरअनंतपाळ | ३२.०० | ३५.०० | — | — | ४.०० | ७१.०० | ३.९५% |
| १० | जळकोट | ११.०० | २२.०० | १५.०० | — | — | ४८.०० | २.६७% |
| | एकूण | ५५४.४८ | ३५९.३४ | ३७४.३९ | २५८.३५ | २५०.३१ | १७९६.८७ | १००% |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

वरील तक्ता क्र.६.६८ वरून असे दिसून येते की, म. वै. वि. मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधी मध्ये लातूर जिल्ह्यात सर्वात जास्त विशेष निधी लातूर तालुक्याला (२६.०५%) तर सर्वात कमी देवणी तालुक्याला (२.०८%) निधी दिलेला आहे.

### आलेख क्र. ६.१२

### म. वै. वि. मंडळाने लातूर जिल्ह्यातील तालुका निहाय विशेष निधीचे वाटप

### (सन २००५—०६ ते सन २००९—१०)

(आकडे लाख रू.)




**आधार :—** तक्ता क्र. ६.७७ नुसार.

या विशेष निधी मधून तालुका निहाय विकास कामे खालील प्रमाणे आहेत.

वरील आलेख क्र. ६.१२ वरून असे दिसून येते की म. वै. वि. मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये लातूर जिल्ह्यात सर्वात जास्त विशेष निधी लातूर तालुक्याला दिला तर दिला तर देवणी तालुक्याला सर्वात कमी विशेष निधी दिला आहे.

या विशेष निधी मधून तालुका निहाय विकास कामे खालील प्रमाणे आहेत.

## ८.१ लातूर तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये लातूर जिल्ह्यासाठी एकूण १७९६.८७ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये लातूर तालुक्यासाठी सर्वात जास्त निधी ४६८.१७ (२६.०५%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

## तक्ता क्र.६.७८

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५–०६ ते २००९–१० या कालावधीत विशेष निधी मधून लातूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५–६ | ६–७ | ७–८ | ८–९ | ९–१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्व. बांधकाम | ९५.०८ | ५५.०० | ३५.०० | २०.०० | — | २०५.०८ |
| २ | ग्रामविकास | १०.१८ | ५.०० | ५८.०० | ४७.८५ | ६९.१६ | १९०.१९ |
| ३ | नगरविकास | ११.९५ | ८.०० | — | — | — | १९.९५ |
| ४ | महिला व बाल विकास | — | — | ५२.५० | — | — | ५२.५० |
| ५ | नियोजन | ०.४५ | — | — | — | — | ०.४५ |
| | एकूण | ११७.६६ | ६८.०० | १४५.५० | ६७.८५ | ६९.१६ | ४६८.१७ |

**आधार :– १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५–०६ ते २००९ – १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५–०६ ते २००९ – १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने लातूर तालुक्यात केलेली विकास कामे :–**

१) रस्त्याची कामे :– मौजे भातांगळी–महाळंगा, लातूर वळण रस्ता– बोरवटी, लातूर – साई रस्ता ते नवीन रेल्वेस्टेशन रस्ता, लातूर – खगलपूर, कव्हा – चांडेश्वर, लातूर रिंग रोड – हाजीपीर या गावातील रस्त्याची कामे केली. तसेच मौजे वासनगाव, चिखुर्डा, लातूर मधील मोतीनगर, कासारखेडा, भातखेडा, सारसा, ममदापूर, बोरवटी, अंकोली या गावातील सिमेंट रस्ते केले.

२) सांस्कृतिक सभागृह :– मौजे कासारखेडा, चाटा येथे सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम केले.

३) लातूर मधिल किसान बॅक कॉलनी येथे चिल्ड्रन पार्क तयार केले.

४) जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय, लातूर या कार्यालयाला संगणक व प्रिंटर दिले.

५) मौजे ढाकणी, कानडी बोरगाव, नागझरी, जेवळी, बोकड वाकडी, टाकळी, चाटा, सावरगाव, बोरी, भोयरा, मुरूड अकोला, करकट्टा, कासारखेडा, कातपूर, भिसेवाघोली येथे ग्रामपंचायती अंतर्गत पथदिवे बसविले.

## ८.२ अहमदपूर तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये लातूर जिल्ह्यासाठी एकूण १७९६.८७ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये अहमदपूर तालुक्यासाठी १५२.०३ (८.४६%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.७९**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून अहमदपूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | ३०.०० | १९.४३ | १७.०० | १०.०० | १५.०० | ९१.४३ |
| २ | ग्रामविकास | २०.०० | २०.८४ | — | १५.०० | ४.७६ | ६०.६० |
| | एकूण | ५०.०० | ४०.२७ | १७.०० | २५.०० | १९.७६ | १५२.०३ |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने अहमदपूर तालुक्यात केलेली विकास कामे :—**

१) रस्त्याची कामे :— अहमदपूर मधील राजसारथी कॉलनी, शेटकार गल्ली, सरस्वती कॉलनी, बॅक कॉलनी, काडदेव कॉलनी, अंबिका कॉलनी या भागात सिमेंट रस्ते केले तसेच मौजे चिखली, धानोरा (बु.), अंघोरी या गावाअंतर्गत सिमेंट रस्ते केले.

२) सांस्कृतिक सभागृह :— मौजे धानोरा, आटोळा, कोपरा, धानोरा (खु.), चिखली, सताळा, किनगाव या गावात येथे सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम केले.

३) मौजे कोपरा, सताळा, टाकळगाव या गावात स्वच्छतागृहाचे बांधकाम केले.

४) मौजे रोकडा, टाकळगाव या ग्रामपंचायती अंतर्गत सार्वजनिक रस्त्यावर सी. एफ. एल. पथदिवे बसविले.

## ८.३ उदगीर तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये लातूर जिल्ह्यासाठी एकूण १७९६.८७ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये उदगीर तालुक्यासाठी २७७.८०(१५.४६%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.८०**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून उदगीर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | ९७.०० | ५५.०० | १५.०० | १९.०० | ७.०० | १९३.०० |
| २ | ग्रामविकास | — | — | ९.८० | ४३.०० | — | ५२.८० |
| ३ | नगरविकास | — | — | — | ३२.०० | — | ३२.०० |
| | एकूण | ९७.०० | ५५.०० | २४.८० | ९४.०० | ७.०० | २७७.८० |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने उदगीर तालुक्यात केलेली विकास कामे :—**

१) रस्त्याची कामे :— मौजे उदगीर शहरातील नूरनगर, खैरनगर, हनुमाननगर, महादेव नगर, शिव नगर तेली सोसायटी, गणेश नगर, कृष्णा नगर, विकास नगर, समता नगर, निडेबन, मुसानगर, शीवनगर या ठिकाणी शहरा अंतर्गत सिमेंट रस्ते केले. उदगीर मधील नांदेड — बिदर रसता ते माळेवाडी, कुमठा — डिग्रस या रस्त्याची कामे केली. मौजे वाढवणा (खु.) गावाअंतर्गत सिमेंट रस्ता केला.

२) सामाजिक सभागृह :— मौजे वाढवणा (बु.), हाळी, हंडरगुळी, मादलापूर, नळगीर, उदगीर (सरस्वती कॉलनी) व मादलापूर मौजे बसवन, पिंपरी या गावात सामाजिक सभागृहाचे बांधकाम केले.

३) उदगीर नगर परिषद अंतर्गत शिवनगर व मादलापूर येथे सिमेंट नाली बांधकाम केले.

## ८.४ निलंगा तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये लातूर जिल्ह्यासाठी एकूण १७९६.८७ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये निलंगा तालुक्यासाठी १६४.०२ (९.१२%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.८१**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून निलंगा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | ५४.०० | १५.०० | — | ११.०० | १९.०० | ९९.०० |
| २ | ग्रामविकास | — | ५.५० | १०.०० | १५.०० | १४.५२ | ४५.०२ |
| ३ | नगरविकास | — | — | — | — | २०.०० | २०.०० |
| | एकूण | ५४.०० | २०.५० | १०.०० | २६.०० | ५३.५२ | १६४.०२ |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने निलंगा तालुक्यात केलेली विकास कामे**

१) रस्त्याची कामे :— मौजे गौर ते कवठा पाटी, एम १४ ते हासेगाव सरहद्द, राज्यमार्ग १६७ ते लिंबाळा, परजिल्हा मार्ग २८ ते अंबुलगा या गावात रस्त्याची कामे केली.

२) मौजे लिंबाळा, तुपडी येथे नाली बांधकाम केले.

३) सामाजिक सभागृह :— मौजे उस्तुरी, सोनयोड, शिराढोण, म्हसोबावाडी, बेडगा, दुर्गानगर या गावात सामाजिक सभसागृहाचे बांधकाम केले.

४) मौजे ताडमुंगळी येथे ग्रामपंचायती अंतर्गत चावडी बांधकाम केले.

५) मौजे नेलवाडा, उस्तुरी, अपचुंदा, अनसरवाडा, माकनी (थोट) येथे ग्रामपंचायती अंतर्गत सार्वजनीक ठिकाणी सी. एफ. एल. पथदिवे बसविले.

६) निलंगा शहराअंतर्गत सी. एफ. एल. पथदिवे बसविले.

## ८.५ औसा तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये लातूर जिल्ह्यासाठी एकूण १७९६.८७ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये औसा तालुक्यासाठी २०९.११ (११.६३%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.८२**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून औसा तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | २०.०० | ४०.०० | २०.०० | १०.०० | — | ९०.०० |
| २ | ग्रामविकास | ३०.८३ | — | — | ११.०० | २७.२८ | ६९.११ |
| ३ | नगरविकास | — | — | ५०.०० | — | — | ५०.०० |
|  | एकूण | ५०.८३ | ४०.०० | ७०.०० | २१.०० | २७.२८ | २०९.११ |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने औसा तालुक्यात केलेली विकास कामे :—**

१) रस्त्याची कामे :— मौजे औसा शहरातील विवेकानंद नगर, भीम नगर, अन्नपुर्णा नगर, गणेश नगर या भागात नाली बांधकाम केले. व वॉर्ड क्र. १ मध्ये रस्ता बांधकाम केले. तसेच मौजे हारेगाव — हसलगन, औसा ते बोरफळ या गावातील रस्त्याची कामे केली.

२) सांस्कृतिक सभागृह बांधकाम :— मौजे वांगजी, औसा ( समतानगर ), शिवली या गावात सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम केले.

३) औसा येथे मुक्तेश्वर शाळेजवळ व सिध्देश्वर शाळेजवळ बालभवनाचे बांधकाम केले.

४) औसा नगर परिषद अंतर्गत शहरातील सार्वजनिक रस्त्यावर सी. एफ. एल. पथदिवे बसविले.

५) औसा नगर परिषद अंतर्गत वॉर्ड क्र. २ मधील स्मशान भूमीस संरक्षण भींतीचे बांधकाम केले.

६) मौजे उजनी, अपचुंदा, जवळगा, हरिगाव, जावळी, लखनगाव, होळी या ग्रामपंचायती अंतर्गत सार्वजनिक रस्त्यावर पथदिवे बसविले.

## ८.६ चाकूर तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये लातूर जिल्ह्यासाठी एकूण १७९६.८७ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये चाकूर तालुक्यासाठी १३१.९१ (७.३४%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.८३**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून चाकूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | ३७.८६ | १५.०० | १५.०० | — | ९.०० | ७६.८६ |
| २ | ग्रामविकास | १७.६२ | १९.०० | ८.६७ | — | ९.७६ | ५५.०५ |
| | एकूण | ५५.४८ | ३४.०० | २३.६७ | — | १८.७६ | १३१.९१ |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने चाकूर तालुक्यात केलेली विकास कामे**

१) रस्त्याची कामे :— मौजे रोहिणा — रामवाडी जोडरस्ता या रस्त्याचे मजबुतीकरण केले. तसेच घारोळ, धरणी, वडवळ, चाकूर रेल्वे स्टेशन रोड, मोहनाळ, देंवग्रा, चाकूर एम. आय. डी. सी. रोड, वडगाव (ए.) या गावाअंतर्गत सिमेंट रस्ते केले.

२) सांस्कृतिक सभागृह बांधकाम :— मौजे शिवणखेडा, चाकूर. अंजनसोडा, सरनवाडी, गोविंदवाडी, महाळंगवाडी, हनुमंत जवळगा, नायगाव या ठिकाणी सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम केले.

३) मौजे मोहनाळ, अंजनसोडा, सरनवाडी, चाकूर एम. आय. डी. सी. रोड, महाळंगी या गावाअंतर्गत सार्वजनिक रस्त्यावर पथदिवे बसविले.

४) मौजे चाकूर गावातील सांस्कृतिक सभागृहाभोवती कंम्पाऊंड वॉलचे बांधकाम केले.

५) मौजे तिवटघाळ येथे बालभवन बांधले.

६) मौजे चाकूर एम. आय. डी. सी. येथे शौचालयाचे बांधकाम केले.

## ८.७ रेणापूर तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये लातूर जिल्ह्यासाठी एकूण १७९६.८७ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये रेणापूर तालुक्यासाठी २३७.३७ (१३.२१%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.८४**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून रेणापूर तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | ५७.५१ | १९.११ | १५.६६ | — | — | ९२.२८ |
| २ | ग्रामविकास | १७.०० | — | ५२.७६ | २४.५० | ५०.८३ | १४५.०९ |
| | एकूण | ७४.५१ | १९.११ | ६८.४२ | २४.५० | ५०.८३ | २३७.३७ |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने रेणापूर तालुक्यात केलेली विकास कामे :—**

१) रस्त्याची कामे :— मौजे सेलू — जवळगा — हारवाडी ते राज्यमार्ग १४४, सावंगी — इंदरठाणा, परजिल्हामार्ग ४ ते सांगवी सिंधगाव रसता या गावात रसत्याची कामे केली. तसेच मौजे कोष्टगाव, कामखेडा, निवाडा, पांढरी (खरोळा) या गावाअंतर्गत सिमेंट रस्ते केले.

२) सांस्कृतिक सभागृह बांधकाम :— मौजे माळेगाव, सर्व्हे नं. २, रेणापूर, बोरगाव (दर्जी), कोरेपूर, पानगाव या ठिकाणी सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम केले.

३) मौजे टाकळगाव, कारेपूर, गव्हाण, भोसा, कामखेडा, अर्जखेडा, बिटरगाव, दर्जी बोरगाव, निवाडा, कोकळगाव, चाडगाव, मुसळेवाडी वागदरी, सिंदगाव या ग्रामपंचायत अंतर्गत पथदिवे बसविले.

४) मौजे निवाडा या गावात शौचालये बांधकाम केले.

## ८.८ देवणी तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये लातूर जिल्ह्यासाठी एकूण १७९६.८७ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये देवणी तालुक्यासाठी सर्वात कमी निधी ३७.४६ (२.०८%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.८५**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून देवणी तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | ५.०० | १६.४६ | — | — | — | २१.४६ |
| २ | ग्रामविकास | ७.०० | ९.०० | — | — | — | १६.०० |
| | एकूण | १२.०० | २५.४६ | — | — | — | ३७.४६ |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल

सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने देवणी तालुक्यात केलेली विकास कामे :—**

१) रस्त्याची कामे :— मौजे होनाळी, देवणी, आचवला या गावाअंतर्गत सिमेंट रस्ते केले व बोरोळ — आंबेगाव रस्ता तयार केला.

२) मौजे देवणी या गावात शौचालयाचे बांधकाम केले.

३) मौजे हांचनाळ गावात सार्वजनिक रस्त्यावर पथदिवे बसविले.

४) मौजे आचवला येथे सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम केले.

## ८.९ शिरूर अनंतपाळ तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये लातूर जिल्ह्यासाठी एकूण १७९६.८७ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये शिरूर अनंतपाळ तालुक्यासाठी ७१.००(३.९५%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.८६**

**म. वै. विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून शिरूर अनंतपाळ तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | २५.०० | ३५.०० | — | — | — | ६०.०० |
| २ | ग्रामविकास | ७.०० | — | — | — | ४.०० | ११.०० |
| | एकूण | ३२.०० | ३५.०० | — | — | ४.०० | ७१.०० |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शिरूर अनंतपाळ तालुक्यात केलेली विकास कामे :—**

१) रस्त्याची कामे :— मौजे बिबराळ ते साकोळ, नळेगाव — उदगीर, थेरगाव ते आरी बेबनाळ या गावात रस्त्याची कामे केली तसेच मौजे हिपळगाव या गावाअंतर्गत सिमेंट रस्ता केला.

२) मौजे चांभरगा, बिबराळ, बाकली, वांजरखेडा, या गावातील ग्रामपंचायती अंतर्गत सार्वजनिक रस्त्यावर पथदिवे बसविले.

## ८.१० जळकोट तालुका :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये लातुर जिल्हयासाठी एकूण १७९६.८७ लाख रू. विशेष निधी खर्च केला त्यामध्ये जळकोट तालुक्यासाठी ४५.००(२.६७%) लाख रू. खर्च केले त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.६.८७**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत विशेष निधी मधून जळकोट तालुक्यासाठी केलेला विकास खर्च.**

(आकडे लाख रू.)

| अ.क्र. | विभागाचे नाव | ५—६ | ६—७ | ७—८ | ८—९ | ९—१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | ५.०० | — | १५.०० | — | — | २०.०० |
| २ | ग्रामविकास | ६.०० | २२.०० | — | — | — | २८.०० |
| | एकूण | ११.०० | २२.०० | १५.०० | — | — | ४८.०० |

**आधार :— १)** म. वै. वि. मंडळ वार्षिक अहवाल. सन २००५—०६ ते २००९ — १०

**२)** म. वै. वि. मंडळाच्या विशेष निधी अंतर्गत कामाचा जिल्हा निहाय तपशिल सन २००५—०६ ते २००९ — १०

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने जळकोट तालुक्यात केलेली विकास कामे**

१) रस्त्याची कामे :— मौजे जळकोट, केकत सिंदगी या गावाअंतर्गत सिमेंट रस्ते केले.

२) मौजे जळकोट येथे दोन शौचालयाचे बांधकाम केले.

३) मौजे केकत सिंदगी, तिसका, घोन्सी, जळकोट, येलरी या ग्रामपंचायती अंतर्गत सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम केले.

**सैध्दांतिक पार्श्वभूमी :—**

**१) अमर्त्य सेन :—** ''आर्थिक विकास हा फक्त आर्थिक वृध्दीवर अवलंबून नसतो. तर तो चांगल्या उंचावलेल्या जीवन पातळीवर अवलंबून असतो. त्यासाठी अर्थव्यवस्थेमध्ये रोजगाराच्या उंचावलेल्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत आणि अंधश्रध्दा व निरक्षरतेतून लोकांना मुक्त केले पाहिजे. तसेच स्वातंत्र्याचा हक्क आर्थिक विकासाशी संबंधीत आहे. हा जीवनाशी निगडीत असून जीवनातील आनंद स्वातंत्र्याशी निगडीत आहे.''[१]

डॉ. अमर्त्य सेन यांच्या आर्थिक विकासाच्या वरील व्याख्येवरून आर्थिक विकासासाठी रोजगार संधी, अंधश्रध्दा निर्मुलन, लोकांच्या राहणीमानात सुधारणा झाली पाहीजे, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडा विभागाच्या विकासासाठी सिंचन सोयी, पिण्याचे पाणी पुरवठा, गावोगावी रस्त्याची सोय, सामाजिक व सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम, आरोग्याच्या सोयी, रस्त्यावर पथदिवे बसविणे, सांडपाणी व्यवस्था इ. विकास विषयक कामे केली आहेत. या विकास विषयक कामे करीत असताना केलेल्या खर्चातून अनेक लोकांना रोजगार मिळाला. केलेल्या विकास कामामुळे शैक्षणिक सुविधेत वाढ होऊन निरक्षरता कमी होऊन अंधश्रध्दा कमी होत आहे. मंडळाने केलेल्या विकास कामामुळे लोकांचे राहणीमान उंचावण्यास मदत होत आहे. यावरून मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या आर्थक विकासात भर पडत आहे.

**२)** U.N.O. :- " Economic Development concerns not only man's materials needs but alsom the improvement of the social conditions of his life. Development is there for, not only economic growth, but plus change, social cultural and institutional as well as economic. "[२]

U.N.O. च्या आर्थिक विकासाच्या व्याख्येवरून आर्थिक विकास हा मानवाच्या भौतिक गरजांशी निगडीत असतो असे नसून त्याचे सामाजिक स्थिती सुधारणे हे त्याचे उद्दिष्ट असते म्हणून विकास म्हणजे आर्थिक वाढ नसून

त्याद्वारे मानवाचे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थिती सुधारणे आवश्यक असते.

आर्थिक विकासासाठी मानवाचे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थिती सुधारणे आवश्यक असते. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामामुळे मराठवाडा विभागातील गावागावामध्ये सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम, रस्त्याची कामे, पिण्याच्या पाण्याची सोय, सिंचन सुविधा यामुळे सामाजिक व आर्थिक विकासात भर पडत आहे.

**३) महबूब उल हक :—** ''विकासाच्या प्रक्रियेत देशातील गरीबीवर प्रत्यक्षपणे हल्ला चढवला जातो. विकासाची उद्दिष्टये ठरवताना फक्त राष्ट्रीय उत्पन्नात वाढ येवढे मर्यादित उद्दिष्ट न ठेवता कुपोषण, रोगराई, निरक्षरता, बेरोजगारी, विषमता इ. सर्व समस्या सोडविण्यासाठी विचार व कृती यामध्ये अपेक्षित असते.गरीबी नष्ट झाल्यानंतर देशाचे राष्ट्रीय उत्पन्न आपोआपच वाढत जाते.''[३]

महबुब उल हक यांच्या आर्थिक विकासाच्या वरील व्याख्येप्रमाणे आर्थिक विकासासाठी कुपोषण, रोगराई, निरक्षरता, बेरोजगारी, विषमता इ. समस्या सोडविण्यासाठी देशाने विचार व कृति करून गरीबी नष्ट केल्यानंतर देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढल्यानंतर आर्थिक विकास होतो असे मत मांडले. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडा विभागाचा आर्थिक विकास करण्यासाठी सिंचन सोयी, पिण्याचे पाणी पुरवठा, ग्रामीण विकासाच्या सोयी, सामाजिक व सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम, आरोग्याच्या सोयी, रस्त्यावर पथदिवे बसविणे, सांडपाणी व्यवस्था. शैक्षणिक सुविधा, इ. विकास विषयक कामे केली आहेत. तयार झालेल्या सोयी सुविधा मधून, शैक्षणिक सुविधामधून निरक्षरता कमी होत आहे. आरोग्याच्या सोयीमुळे रोगराई कमी होत आहे. विकास विषयक कामे करीत असताना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. झालेल्या विकास कामांमुळे सिंचन सोयीत वाढ होऊन ग्रामीण रोजगारात वाढ होत आहे. या सर्व सुविधामुळे गरीबी नष्ट होऊन राष्ट्र्य उत्पन्नात वाढ होत आहे. या विश्लेषणावरून मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या आर्थिक विकासात वाढ होत आहे.

**4) A. Maddison :-** " The rising of income levels is generally called economic growth in rich countries and in the poor ones, it called economic development."[४]

मॅडिसनच्या मते गरीब व श्रीमंत देशातील लोकांच्या उत्पन्नाचा स्तर किंवा आर्थिक स्तर उंचावणे म्हणजे सामान्यपणे आर्थिक वाढ होण्याची प्रक्रिया होय. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेली विकास कामे उदा :— रस्ता निर्मिती, सिंचन सोयी, पिण्याचे पाणी पुरवठा, ग्रामीण विकासाच्या सोयी, सामाजिक व सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम, आरोग्याच्या सोयी, रस्त्यावर पथदिवे बसविणे, सांडपाणी व्यवस्था, शैक्षणिक सुविधा, नाली बांधकाम, इ. कामामधून लोकांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला तर शेतीमध्ये केलेल्या सिंचन सोयी मुळे रोजगाराच्या कायमस्वरूपी सुविधा होऊन लोकांच्या उत्पन्नाचा स्तर वाढून आर्थिक विकास होत आहे.

**गृहितकांची तपासणी :—**

मराठवाडयाच्या सामाजिक व आर्थिक विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची भूमिका हा संशोधनाचा विषय घेत असताना खालील प्रमाणे गृहितके गृहित घेतली होती. संशोधनाअंती खालील प्रमाणे गृहितकांची तपासणी करता येईल.

**१) मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या आर्थिक विकासात मोलाची भर पडली आहे :—**

एखाद्या विभागाचा किंवा प्रदेशाचा आर्थिक विकास होण्यासाठी त्या विभागातील लोकांना रोजगार उपलब्ध झाला पाहिजे, शैक्षणिक सुविधा निर्माण झाल्या पाहिजेत, सिंचन सोयी, पायाभूत सोयी यामध्ये रस्ते, आरोग्य, सेवा, उद्योगाचा विकास, शेतीचा विकास, दळणवळण सुविधा, पर्यटन स्थळाचा विकास झाला पाहिजे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयामध्ये वरील सोयी सुविधा मध्ये वाढ होऊन आर्थिक विकासात भर पडत आहे. यावरून वरील गृहित साध्य झाले आहे.

**२) मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या सामाजिक,**

**शैक्षणिक, पायाभूत संरचनेच्या विकासात भर पडली आहे :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळ मराठवाडा विभागाचा विकास व्हावा यासाठी प्रयत्न करीत आहे. विकासमंडळाने अनुशेष निधी व विशेष निधीच्या माध्यमातून मराठवाडा विभागामध्ये गावोगावी सामाजिक व सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम केले आहे. शैक्षणिक सुविधामध्ये शासकिय दंत महाविद्यालय औरंगाबाद, पशुवैद्यकीय सर्व चिकीत्सालय औरंगाबाद, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय औरंगाबाद, येथील वेगवेगळया विभागाचे बांधकाम व नुतनीकरण केले. अनेक गावात शाळेच्या इमारतीचे बांधकाम केले. पायाभूत विकासामध्ये गावागामध्ये रस्त्याची सोय, रस्ते सिमेंटीकरण, नाली बांधकाम, ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम, रस्त्यावर पथदिवे बसविणे, पाणी पुरवठयाच्या सोयी केल्या आहेत. त्यामुळे मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या सामाजिक, शैक्षणिक, पायाभूत संरचनेच्या विकासात भर पडत आहे. यावरून वरील गृहित साध्य झाले आहे.

**३) विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या रोजगारात संधीत वाढ झाली आहे :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडा विभागाचा समतोल आर्थिक विकास व्हावा व पश्चिम महाराष्ट्रात ज्या सोयी सुविधा आहेत त्या मराठवाडयात निर्माण करून मराठवाडयाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रयत्न करीत आहे. त्यासाठी शासनाकडे विकास कामाची शिफारस करून विकास कामे करते. तसेच विशेष निधीच्या माध्यमातून २००५—०६ ते २००९—१० या पाच वर्षाच्या काहात १२८.६२ कोटी रू. विशेष निधी मिळाला. या निधीच्या सहाय्याने मराठवाडयात गावागावामध्ये रस्त्याची सोय, रस्ते सिमेंटीकरण, नाली बांधकाम, ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम, रस्त्यावर पथदिवे बसविणे, पाणी पुरवठयाच्या सोयी, सांडपाणी व्यवस्था केल्या आहेत. या कामामधून लोकांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला तर शेतीमध्ये केलेल्या सिंचन सोयी केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कायमस्वरूपी रोजगाराच्या सुविधा निर्माण होऊन लोकांच्या उत्पन्नाचा स्तर वाढून आर्थिक विकास होत आहे. त्यामुळे मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे

मराठवाडयाच्या रोजगार संधीत वाढ होत आहे. यावरून वरील गृहित साध्य झाले आहे.

**४) विकास मंडळामुळे मराठवाडयातील लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा झालेली आहे :—**

व्यक्तीच्या राहणीमानाचा दर्जा हा त्या व्यक्तीचे उत्पन्न व उपभोगावर अवलंबून असते. व्यक्तीचे उत्पन्न वाढले व त्याला आवश्यक असणाऱ्या वस्तु व सेवा उपलब्ध असतील व त्या व्यक्तीने त्या वस्तु व सेवांचा उपभोग घेतला तर त्या व्यक्तीच्या राहणीमानात सुधारणा होते. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या वेगवेगळया विकास कामामुळे लोकांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ होत आहे. त्याच बरोबर विकास मंडळाने केलेल्या विकास कामे उदा.:— गावागावामध्ये रस्त्याची सोय, रस्ते सिमेंटीकरण, नाली बांधकाम, ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम, रस्त्यावर पथदिवे बसविणे, पाणी पुरवठयाच्या सोयी, सांडपाणी व्यवस्था इ. सोयी सुविधांचा उपभोग लोक घेत असल्यामुळे मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा होत आहे. यावरून वरील गृहित साध्य झाले आहे.

**५) विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या विकासातील अनुशेष कमी झाला :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापने मागचा मुळ उद्देश हा मराठवाडयाचा अनुशेष भरून काढून मराठवाडा विभाग हा पश्चिम महाराष्ट्रासारखा विकसित व्हावा यासाठी या मंडळाची स्थापना दि. ३० एप्रिल १९९४ रोजी झाली.

महाराष्ट्रामध्ये मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्र यांचा अनुशेष सन १९८४ मध्ये ३१८६ कोटी रू., सन १९९४ मध्ये १५३५५.७७ कोटी रू. तर दि. १ एप्रिल २००० मध्ये शिल्लक अनुशेष ११९७४.०० कोटी रू. होता. त्यापैकी मराठवाडा विभागाचा अनुशेष १९८४ मध्ये १०५१.०० (२४.००%) कोटी रू., सन १९९४ मध्ये ४६२६.५५ (३०.५४%) कोटी रू.,सन २००० मध्ये ३५४७.०६ (२९.६२%) कोटी रू. अनुशेष होता.

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना झाल्यापासून अनुशेष कमी होत आहे.

मराडवाडयाचा दि. १ एप्रिल १९९४ रोजीचा सिंचन क्षेत्राचा अनुशेष २४०१.०० कोटी रू. होता तो. दि. १ एप्रिल २०१० मध्ये कांहीच शिल्लक राहिलेला नाही. तर सिंचन क्षेत्र सोडून इतर क्षेत्राचा दि. १ एप्रिल २००० चा अनुशेष १३७३.०१ कोटी रू. होता तो दि. १ एप्रिल २०११ रोजी फक्त आरोग्य क्षेत्राचा २७५.०९ कोटी रू. चा अनुशेष शिल्लक आहे.

वरील विश्लेषणावरून मराठवाडा विभागाचा दि. १ एप्रिल २००० रोजीचा शिल्लक अनुशेष ३५४७.०६ कोटी रू. होता तो दि. १ एप्रिल २०११ रोजी फक्त २७५.०९ कोटी रू. शिल्लक आहे. यावरून मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या विकासातील अनुशेष कमी होत आहे. यावरून वरील गृहित साध्य झाले आहे.

**समारोप :—**

सदर प्रकरणामध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडयाच्या विकासाविषयी सिंचन सोयी, कृषी विषयक कामे, आरोग्य सेवा, शैक्षणिक सुविधा, उद्योग व उर्जा विकास, रस्ते विकास, प्रशासन व्यवस्था, वाहतूक व दळण—वळण, सहकार विभाग, समाज कल्याण, मराठवाडयातील पर्यटन स्थळाचा विकास इ. विभागाचा विकास विषयी शासनाकडे केलेल्या शिफारशी व विनंती तसेच मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला शासनाकडून मिळणाऱ्या वार्षिक विशेष निधीचे जिल्हानिहाय व तालूकानिहाय वाटप व त्या निधीतून केलेली विकास कामे याचे सविस्तर अभ्यास केला आहे मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या आत्ता पर्यंतच्या कार्यात कांही त्रुटी असल्या तरी मंडळाचे कार्य उल्लेखनीय असे आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या विकास विषयक कार्यात किंवा प्रयत्नात राज्य सरकारच्या विविध खात्याकडून भविष्य काळात विधायक प्रतिसाद मिळत राहील अशी अपेक्षा आहे.

# संदर्भ


१) डॉ. पुरोहित वसुधा, (२०१०),आर्थिक विकास व नियोजन आणि सांख्यिकीय पध्दती, (पान क्र.२—३), विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

२) डॉ. कायंदे — पाटील गंगाधर वि., (जून २००१),भारतीय आणि जागतीक आर्थिक विकास, (पान क्र.१—३), चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.

३) डॉ. पुरोहित वसुधा, (२०१०),आर्थिक विकास व नियोजन आणि सांख्यिकीय पध्दती, (पान क्र.२—३), विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

४) Karnati Lingaiah/ T. Satyanarayana (1990), Indian Economi ( P.no.5 ),Sterling Publishers Private Ltd., New Delhi-6

५) म.वै.वि.मंडळ वार्षिक अहवाल सन सन २००५—०६.

६) म.वै.वि.मंडळ वार्षिक अहवाल सन सन २००६—०७.

७) म.वै.वि.मंडळ वार्षिक अहवाल सन सन २००७—०८.

८) म.वै.वि.मंडळ वार्षिक अहवाल सन सन २००८—०९.

९) म.वै.वि.मंडळ वार्षिक अहवाल सन सन २००९—१०.

१०) म.वै.वि.मं.च्या विशेष निधी अंतर्गत जिल्हा निहाय कामाचा तपशिल सन २००५—०६.

११) म.वै.वि.मं.च्या विशेष निधी अंतर्गत जिल्हा निहाय कामाचा तपशिल सन २००६—०७.

१२) म.वै.वि.मं.च्या विशेष निधी अंतर्गत जिल्हा निहाय कामाचा तपशिल सन २००७—०८.

१३) म.वै.वि.मं.च्या विशेष निधी अंतर्गत जिल्हा निहाय कामाचा तपशिल सन २००८—०९.

१४) म.वै.वि.मं.च्या विशेष निधी अंतर्गत जिल्हा निहाय कामाचा तपशिल सन ०९—१०.

१५) शासन निर्णय क्र. वै.वि.मं.—१००६/प्र.४१७/का.१४५२ दि. २६/१२/२००६ नियोजन विभाग मंत्रालय मुंबई—३२.

१६) मा. राज्यपाल महाराष्ट्र यांचे १ मार्च २००७ चे निर्देश.

१७) म.वै.वि.मं. ची सर्वसाधारण सभा दि. ३ ऑगस्ट २००७ ची बैठकीसाठी टिपण्णी.

१८) मा. राज्यपाल महाराष्ट्र यांचे ६ मार्च २००८ चे निर्देश.

१९) मा. राज्यपाल महाराष्ट्र यांचे २७ मे २००९ चे निर्देश.

२०) म.वै.वि.मं.औरंगाबाद तर्फे मा. मुख्यमंत्री महोदयांना सादर करावयाचे निवेदन सन—२०१०.

२१) म.वै.वि.मं.ने दि.१५/३/२०१० रोजी मा. राज्यपालांना सादर केलेले संक्षिप्त टिपण्णी.

२२) महाराष्ट्र मा. राज्यपाल यांचे दि. १० मार्च २०११ रोजीचे निर्देश.

## प्रकरण ७ वे

# मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे मराठवाडयाच्या सामाजिक विकासात योगदान

७.१ प्रस्तावना
७.२ डॉ. र. पु. कुरूलकर यांची मुलाखत
७.२.१ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना व रचना या विषयी माहिती
७.२.२ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे कार्यक्षेत्र व कामाचे स्वरूप
७.२.३ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचा कार्यकाल व मुदत वाढ
७.२.४ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचा कार्यकाल किती असावा
७.२.५ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांची निवड प्रक्रिया व कार्यकाल
७.२.६ अध्यक्षाचे कार्य व आर्थिक मोबदला
७.२.७ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे भागभांडवल व मिळणाऱ्या निधी विषयी
७.२.८ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला मिळणाऱ्या नियत व्यय विशेष निधी विषयी
७.२.९ मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या सामाजिक, शैक्षणिक व पायाभूत संरचनेच्या विकासात कशी भर पडते
७.२.१० म. वै. वि. मंडळांमुळे मराठवाडयाच्या रोजगारात कशी वाढ झाली
७.२.११ म. वै. वि. मंडळांमुळे मराठवाडयाच्या विकासातील अनुशेष किती भरून निघाला
७.२.१२ विशेष निधी अंतर्गत झालेल्या कामाच्या दर्जाविषयी
७.२.१३ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या कार्यालयातील कर्मचारीवर्गा विषयी
७.२.१४ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या विकास कामात जनतेचा सहभाग, मंडळाची पुढील ध्येय धोरणे, शासनाकडून अपेक्षा इत्यादि विषयी
७.३ उत्तर दात्यांची प्रश्नावली अनुसूची गोषवारा
७.३.१ प्रत्यक्ष लाभार्थीत्यांची प्रश्नावली अनुसूची गोषवारा
७.३.२ निवड लाभार्थ्याची सामाजिक स्थिती
७.३.३ निवड लाभार्थ्याची वयोरचना
७.३.४ निवड लाभार्थीचे कौटुंबीक आकारमान
७.३.५ निवड लाभार्थ्यांचा वैवाहिक दर्जा
७.३.६ निवड लाभार्थ्यांचे धर्मानुसार वर्गीकरण
७.३.७ निवड लाभार्थ्यांचे जातीनुसार वर्गीकरण
७.३.८ निवड लाभार्थ्यांचे भाषानुसार वर्गीकरण
७.३.९ निवड लाभार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा
७.३.१० निवड लाभार्थ्यांचे व्यवसाय नुसार वर्गीकरण
७.३.११ निवड लाभार्थ्यांना मराठवाडा वैधानिक विकास मंडळाविषयी असणारी माहिती
७.३.१२ निवड लाभार्थ्यांना मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने त्यांच्या गावात केलेल्या विकास कामाविषयी असणारी माहिती
७.३.१३ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामाविषयी निवड लाभार्थ्यांच्या कुटुंबाच्या उपयोगाविषयी माहिती
७.३.१४ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामांचा निवड गावातील लोकांच्या उपयोगाविषयी माहिती
७.३.१५ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामामुळे निवड गावातील लाभार्थ्यांच्या राहणीमीनात झालेला बदल

७.३.१६ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची इतर विकास कामा विषयी माहिती

७.३.१७ मराठवाडा वैधानिक विकास मंडळने केलेल्या विकास कामाच्या दर्जा संबंधी माहिती

७.३.१८ नमुना निवड लाभार्थ्याकडून मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या विकास कामाविषयी तक्रारी

७.३.१९ निवड लाभार्थ्याकडून मराडवाडा वैधानिक विकास मंडळाकडून असणाऱ्या अपेक्षा

७.४ सैध्दांतिक पार्श्वभूमी

७.५ गृहितकांची तपासणी

समारोप

## प्रकरण सातवे

# मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे मराठवाडाच्या सामाजिक विकासात योगदान

### ७.१ प्रस्तावना :—

मराठवाडा विभागाच्या सामाजिक व आर्थिक विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची भूमिका हे संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळ हे एखाद्या व्यक्तीसाठी वैयक्तीक लाभाची कामे करीत नसून सर्व समाजाच्या विकासासाठी आणि मराठवाडा विभागाचा समतोल विकास व्हावा. मराठवाडयातील विकासाचा अनुशेष भरून निघावा, महाराष्ट्रातील इतर विकसीत भागाप्रमाणे मराठवाडा विभागाचा विकास व्हावा यासाठी हे मंडळ मराठवाडयातील विकास कामाचे प्रस्ताव महाराष्ट्राचे राज्यपाल व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्याकडे सादर करते व शिफारस करते. या शिफारशीला मंजूरी देवून महाराष्ट्र शासन अनुशेष निर्मुलनासाठी निधी मंजूर करून संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निधी पाठविला जातो. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत संबंधीत शासनाच्या विभागाकडे किंवा खात्याकडे तो निधी पाठविला जातो. त्याच प्रमाणे मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला शासनाकडून नियत व्यय विशेष निधी जो तीनही मंडळासाठी म्हणजेच विदर्भ वैधानिक विकास मंडळ, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ यासाठी शासनाने १०० कोटी रू. वार्षिक निधी राखून ठेवलेला असून त्यापैकी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला वार्षिक सरासरी २८ कोटी रू. विशेष निधी मिळतो. या निधीमधून मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सिंचन सोयी, पिण्याचे पाणी, गावोगावी रस्त्याची सोय, सांस्कृतिक सभागृह बांधकाम, शाळा व बालवाडीचे बांधकाम, आरोग्याच्या सोयी, गावोगावी रस्त्यावर पथदिवे, सांडपाणी व्यवस्था एवढेच नव्हे तर स्मशान भूमिमध्ये सुविधा, स्मशान भूमिच्या संरक्षक भिंतीचे बांधकाम केले आहे. या सोयीचा प्रत्यक्ष लाभ घेणारे लाभार्थी, अध्यक्ष यांची प्रत्यक्ष माहिती प्राप्त करणे हे

देखील आवश्यक आहे. मराठवाडा विभागामध्ये ८ जिल्हे व ७८ तालुके आहेत. त्यासाठी यादृच्छिक नमुना पाहणी करणे आवश्यक होते म्हणून त्यासाठी ''प्रश्नावली अनुसुचीद्वारे'' लाभार्थी व्यक्तीची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व कौटुंबीक इ. माहिती संकलित करून तिचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यासाठी मराठवाडयातील आठ जिल्ह्यांमध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने विशेष निधी मधून जी विकासात्मक कामे केलेली आहेत त्यासाठी एका जिल्ह्यातील एका गावातील २५ लाभार्थी याप्रमाणे ८ जिल्ह्यातील २०० लाभार्थी यांची निवड केली. तसेच मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची कार्यपध्दती, समस्या शासनाकडून अपेक्षा यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. र. पु. कुरूलकर यांची शुक्रवार दि. १८ मे २०१२ रोजी औरंगाबाद येथे मुलाखत घेतली त्या मुलाखतीमध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळा विषयी सविस्तर चर्चा झाली.

या पाहणीत असे दिसून आले की प्रत्यक्ष लाभार्थी यांच्या मुलाखतीतून व मंडळाचे अध्यक्ष यांच्या मुलाखतीतून चांगला प्रतिसाद मिळाला. लाभार्थींनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची अधिक मुक्त पणे आपली मते व्यक्त करण्याचा प्रयत्न केला तसेच मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. र. पु. कुरूलकर यांनी मला त्यांचा अमूल्य वेळ देवून विकास मंडळाविषयी त्यांचे विविध नियत कालिकामध्ये सादर केलेले लेख दिले. या मुलाखतीमधून व प्रश्नावली अनुसुची मधून व्यक्त झालेली मते खालील प्रमाणे ......

**७.२ डॉ. र. पु. कुरूलकर यांची मुलाखत :—** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. र. पु. कुरूलकर यांची दि. १८ मे २०१२ रोजी मुलाखत घेवून त्या मुलाखतीमधून मराठवाडा वैधानिक विकास मंडळाविषयी माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला त्या मुलाखतीचा वृतांत खालील प्रमाणे.

**७.२.१ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना व रचना या विषयी माहिती :—**

भारताच्या राष्ट्रपतींनी निर्गमित केलेल्या महाराष्ट्र राज्य आदेश १९९४ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्यांचे आदेश क्र.जी.एस./जी.

/९४डी.बी./४३२ दिनांक ३० एप्रिल १९९४ अन्वये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना झाली.

या विकास मंडळाच्या रचनेमध्ये मराठवाडा विभागातील दोन आमदार, मराठवाडा स्थानिक प्राधिकरणामधून एक सदस्य, पाच तज्ञ सदस्य, महसूल विभागाचा आयुक्त, राज्य शासनाचा अधिकारी मंडळाचा सदस्य सचिव व राज्य नियोजन मंडळाचा कार्यकारी अध्यक्ष हे वैधानिक विकास मंडळाचे पदसिध्द् सदस्य आहेत. सन २००९—१० मध्ये सदस्य संख्या १४ एवढी होती. असे अध्यक्षांच्या मुलाखतीतून स्पष्ट झाले.

**७.२.२ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे कार्यक्षेत्र व कामाचे स्वरूप :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे कार्यक्षेत्रात मराठवाडयातील सर्व आठ जिल्ह्यांचा समावेश आहे. विकास मंडळाचे मुख्यालय औरंगाबाद येथे आहे. या मंडळाचे कार्याचे स्वरूप हे योग्य निर्देशांकाच्या आधारे मंडळाच्या क्षेत्रातील विविध विकास क्षेत्रासाठी विकासाची सापेक्ष पातळी निश्चित करणे, मराठवाडयाचा सर्वांगिण विकास साधणे व अनुशेष दुर करण्यासाठी शासनाकडून केलेल्या कामाचे मुल्यमापन करणे, तसेच शासनाच्या वार्षिक व पंचवार्षिक योजना काळात मराठवाडा क्षेत्रातील विकास खर्चाच्या पातळया सुचविणे आणि मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तयार करून शासनाला सादर करणे इ. कामे या विकास मंडळाकडून केली जातात. असे मुलाखतीमधून अध्यक्षांनी व्यक्त केले.

**७.२.३ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचा कार्यकाल व मुदत वाढ :—**

वैधानिक विकास मंडळाचा कार्यकाल ५ वर्षाचा आहे. दि. ३० एप्रिल १९९९ मध्ये कार्यकाल संपला होता नंतर राष्ट्रपतींनी आदेश काढून दि. ३० एप्रिल २००४ पर्यंत मुदत वाढ दिली. नंतर महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाद्वारे मंडळाचा कार्यकाल दि. ३० एप्रिल २००५ पर्यंत वाढवून देण्यात आला. त्यानंतर राज्यपालांच्या दि. १० जानेवारी २००६ च्या पत्रान्वये या मंडळाला दि. ३० एप्रिल २०१० पर्यंत मुदत वाढ मिळाली. मा. राज्यपाल

महाराष्ट्र शासन यांच्या दि. २६ जुलै २०१० च्या पत्रान्वये या मंडळाचा कार्यकाल दि.३० एप्रिल २०१५ पर्यंत वाढविला आहे.

**७.२.४ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचा कार्यकाल किती असावा :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना होऊन १८ वर्षे झालेली आहेत. या विकास मंडळाच्या प्रयत्नामुळे मराठवाडा विभागाचा विकास होत आहे. परंतु मराठवाडा विभागात नेहमीच कमी पाऊस पडतो त्यामुळे मराठवाडा विभागाला सतत दुष्काळाला सामोरे जावे लागते. त्यामुळे जलसिंचन समस्या मोठी आहे. औद्योगिकरण कमी आहे. या मंडळाने या भागाचा समतोल विकास होण्यासाठी शासनाकडे अनेक शिफारशी व विनंत्या केल्या आहेत. त्या पूर्ण होण्यासाठी कमीत कमी २० वर्षे तरी या विकास मंडळाचा कार्यकाल वाढवावा असे अध्यक्षांनी मत व्यक्त केले.

**७.२.५ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांची निवड प्रक्रिया व कार्यकाल :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांची निवड महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या मार्फत होते. अध्यक्ष व सदस्य यांचा कार्यकाल ५ वर्षाचा आहे. या कार्यकालात अध्यक्ष व सदस्य यांना पदच्यूत करण्याचा अधिकार देखील मा. राज्यपाल यांना आहे. अध्यक्ष व सदस्य यांना कार्यकाल पूर्ण होण्याअगोदर आपल्या पदाचा राजीनामा राज्यपालाकडे देता येतो.

**७.२.६ अध्यक्षाचे कार्य व आर्थिक मोबदला :—**

अध्यक्षांना मानधन स्वरूपात मोबदला मिळतो. अध्यक्षांचे स्वतंत्र असे कार्य नसून मंडळाच्या बैठकित मंजूर झालेले ठराव, मागण्याचे प्रस्ताव राज्यशासनाकडे व राज्यपाल कार्यालयाला पाठवून देण्याचे कार्य व मंडळाच्या सदस्याची बैठक घेण्याचे कार्य अध्यक्ष करीत असतो, असे मत अध्यक्षांनी व्यक्त केले.

**७.२.७ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे भागभांडवल व मिळणाऱ्या निधी विषयी :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे सवत:चे असे भागभांडवल नाही व हे मंडळ स्वत:चे भागभांडवल उभारू शकत नाही. या मंडळाला केंद्र सरकार कडून कांहीही निधी मिळत नाही. हे मंडळ मराठवाडा विभागाचा समतोल विकास व्हावा व मराठवाडयाचा अनुशेष भरून निघावा यासाठी विविध विकास विषयक कामाची शिफारस शासनाकडे व राज्यपाल कार्यालयाकडे करते. राज्यपाल राज्य सरकारकडे सदरील कामाविषयी निर्देश करते. राज्यशासन वार्षिक योजनेतून कांही निधी बाजूला ठेवून अनुशेष निर्मुलनासाठी मंडळांनी शिफारस केलेल्या कामासाठी सदरील खात्याकडे निधी दिला जातो.

**७.२.८ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला मिळणाऱ्या नियत व्यय विशेष निधी विषयी :—**

विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळाच्या शिफारशीनुसार घ्यावयाच्या कामासाठी तीनही वैधानिक विकास मंडळाला एकूण १०० कोटी रू. नियत व्यय विशेष निधी दिला जातो. त्यापैकी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या वाटयाला जवळपास २८ कोटी रू. विशेष निधी मिळतो. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला सन २००५—०६ते२००९—१० या कालावधीत एकूण १२८६२.७० लाख रू. विशेष निधी मिळाला. या विशेष निधीचे जिल्हा निहाय वाटप करताना मंडळाने मंजूर नियत व्ययाच्या १५% निधी सामुहिक विकास योजनेअंतर्गत कामे व ५% निधी मंडळाचया कार्यक्षेत्रातील दोन मागासलेल्या तालुक्यातील विकास कामासाठी राखून ठेवला जातो व उर्वरित ८०% निधी पैकी निम्मा निधी म्हणजे (४०%) मंडळाच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात व उर्वरित निम्मा निधी (४०%) मंडळाच्या कार्यक्षेत्रातील शिल्लक अनुशेषाच्या प्रमाणात वाटप केले जाते.

या विशेष निधीचे जिल्हा निहाय वाटप करताना या विशेष निधी मधून जास्तीत जास्त सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागाला जास्त निधी दिला

जातो. निधी वाटपामध्ये थोडयाफार प्रमाणात राजकारण येते कारण सत्ताधारी पक्षाचा आमदार असेल तर त्या भागातील कामांना प्राधान्य दिले जाते. मिळालेला विशेष निधी पूर्ण खर्च होतो. उलट निधी कमी पडतो. सन २०११—१२ पासून शासनाने विशेष निधी बंद केला आहे. तो चालू करावा उलट या निधीमध्ये वाढ करावी. अशी अपेक्षा व्यक्त केली.

**७.२.९ मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या सामाजिक, शैक्षणिक व पायाभूत संरचनेच्या विकासात कशी भर पडते :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या सामाजिक, शैक्षणिक व पायाभूत संरचनेच्या विकासात भर पडत आहे. म. वै. वि. मंडळाने अनुशेष निधी व विशेष निधी मधून सिंचन सोयी, शैक्षणिक सोयी, रस्त्याची सोय, इ. करून पायाभूत विकास केला आहे.

**७.२.१० म. वै. वि. मंडळांमुळे मराठवाडयाच्या रोजगारात कशी वाढ झाली :—**

म. वै. वि. मंडळाने मराठवाडा विभागाचा समतोल विकास व्हावा व मराठवाडा विभागावा अनुशेष भरून निघावा यासाठी प्रयत्न करते. म. वै. वि. मंडळाला विशेष निधीच्या माध्यमातून सन २००५—०६ ते सन २००९—१० या कालावधीत १२८.६२ कोटी रू. मिळाले. या विशेष निधी मधून व अनुशेष निधी मधून अनेक लोकांना हंगामी व कायमस्वरूपी रोजगार मिळाला आहे.

**७.२.११ म. वै. वि. मंडळांमुळे मराठवाडयाच्या विकासातील अनुशेष किती भरून निघाला :—**

म. वै. वि. मंडळाच्या स्थापनेचा मुळ उद्देश हा मराठवाडा विभागाचा अनुशेष भरून काढून मराठवाडा विभागाचा समतोल विकास करणे हा आहे. मराठवाडा विभागाचा एकूण अनुशेष सन १९८४ मध्ये १०५१.०० कोटी रू. तर दि. १ एप्रिल २००० मध्ये ३५४७.६ कोटी रू. होता. म. वै. वि. मंडळाच्या प्रयत्नामुळे व शिफारशी वरून मराठवाडा विभागाचा अनुशेष महाराष्ट्र शासनाने भरून काढला आहे. दि. १ एप्रिल २०११ रोजी फक्त सिंचन विभागाचा

अनुशेष २७५.९ कोटी रू. शिल्लक होता. तो लवकरच शासन भरून काढेल.

**७.२.१२ विशेष निधी अंतर्गत झालेल्या कामाच्या दर्जाविषयी :—**

विशेष निधीमधून मंजूर झालेल्या कामाचे टेंडर काढले जात नाही. संबंधीत खात्याकडून, खाजगी गुत्तेदाराकडून कामे करून घेतली जातात. विकास कामाच्या दर्जाची तपासणी केली जात नाही. परंतु कोणाची तक्रार आल्यास दक्षता पथकाकडून कामाच्या दर्जाची तपासणी केली जाते. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचा शिल्लक निधी इतर मंडळाकडे वळविला जात नाही. दिलेल्या संपूर्ण निधीचा वापर केला जातो. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामामुळे समाजासाठी खुप उपयोग होतो, असे अध्यक्षांनी मत व्यक्त केले.

**७.२.१३ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या कार्यालयातील कर्मचारीवर्गा विषयी :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या कार्यालयातील कर्मचारी वर्ग पुरेसा आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या कार्यालयातील कर्मचारी वर्गाला मार्गदर्शन प्रशिक्षण दिले जात नाही, असे अध्यक्षांनी मत व्यक्त केले.

**७.२.१४ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या विकास कामात जनतेचा सहभाग, मंडळाची पुढील ध्येय धोरणे, शासनाकडून अपेक्षा इत्यादि विषयी :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या विकास कामात जनतेचा सहभाग नाही किंवा सहभागाविषयी मंडळाने प्रयत्न केलेले नाहीत. या मंडळामुळे मराठवाडा विभागाच्या विकासात मोलाची भर पडत आहे. प्रादेशिक योजना तयार करणे हे मंडळाचे ध्येय धोरण आहेत. शासनाकडून विभागीय क्रिडा संकूल, कॅन्सर हॉस्पिटल, औरंगाबाद येथे मनोरूग्णालयाची स्थापना, लातूर येथे तंत्र शिक्षण विद्यापीठ स्थापन करणे इ. शासनाकडून अपेक्षा आहेत. मंडळाच्या कामकाजावर समाधानी असल्याचे मत अध्यक्षांनी व्यक्त केले.

**७.३ उत्तर दात्यांची प्रश्नावली अनुसूची गोषवारा :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाद्वारे विशेष निधी मधून जी विकास

कामे केली आहेत त्याचा प्रत्यक्ष लाभ ज्या लोकांना मिळालेला आहे यासाठी मराठवाडयातील प्रत्येक जिल्ह्यातील एका गावाचा यादृच्छिक नमुना निवड (Random Sample Method), पध्दतीने निवड करून त्या गावातील लोकांना प्रश्नावली अनुसुची द्वारे तथ्य संकलन केले आहे. मराठवाडयातील आठ जिल्ह्यामधील प्रत्येक जिल्ह्यातील ज्या गावामध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने विशेष निधी मधून विकास कामे केली आहेत अशा एका गावातील एकुण लाभार्थ्यापैकी २% नमुना निवड पध्दतीने एकुण ५९८ प्रत्यक्ष लाभार्थ्याची प्रश्नावली अनुसुचीद्वारे मते जाणून घेतली आहेत.

**तक्ता क्र. ७.१**
**उत्तर दात्याची नमुना निवड**

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | म.वै.मं.ने केलेल्या कामाचे स्वरूप | नमुना नि. गा. एकुण लाभार्थी संख्या | २% प्रमाणे निवड लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | पैठण | पाचोड | रस्त्याचे काम | ६५२८ | १३० |
| २ | जालना | जाफ्राबाद | बोरगाव बु. | ग्राम पंचायत कार्यालयाचे बांधकाम | १७४१ | ३५ |
| ३ | बीड | गेवराई | गोविंदवाडी | सिमेंट बंधारा बांधकाम | १६६५ | ३३ |
| ४ | परभणी | गंगाखेड | राणी सावरगाव | सांस्कृतिक सभागृह बांधकाम | ६७०७ | १३४ |
| ५ | हिंगोली | हिंगोली | वैजापूर | प्राथमिक शाळेस संरक्षण भिंतीचे बांधकाम | ८६५ | १७ |
| ६ | नांदेड | नायगाव | खडगाव | सार्वजनिक रस्त्यावर पथदिवे बसविले | १६२१ | ३३ |
| ७ | उस्मानाबाद | तुळजापूर | काक्रंबा | समाजिक सभागृह बांधकाम | ४३५९ | ८७ |
| ८ | लातूर | औसा | उजनी | सार्वजनिक रस्त्यावर पथदिवे बसविले | ६४३४ | १२९ |
| | एकुण | | | | २९९२० | ५९८ |

**आधार :—** सर्व्हेक्षण माहिती.

वरील तक्ता क्र. ७.१ प्रमाणे ५९८ लाभार्थी लोकांकडून प्रश्नावली अनुसुचीद्वारे मते जाणून घेवून तथ्य संकलन केले आहे.

### ७.३.१ प्रत्यक्ष लाभार्थीत्यांची प्रश्नावली अनुसूची गोषवारा :—

विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळाच्या शिफारशिनुसार घ्यावयाच्या कामासाठी तीनही मंडळासाठी दरवर्षी एकूण १०० कोटी रू. नियत व्यय विशेष निधी म्हणून अर्थसंकल्पीत केला जात आहे. यास नियतव्ययाचे वाटप तीनही विकास

मंडळांना मा. राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार मंडळाच्या कार्यक्षेत्रातील विकासाच्या अनुशेषाच्या प्रमाणात करण्यात येत आहे. या विशेष निधीतून मराठवाडा विभागाला वर्षाला सरासरी २८ कोटी रू. निधी मिळतो. सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीत मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला एकूण १२८६२.७० लाख रू. निधी प्राप्त झाला. या विशेष निधीमधून केलेल्या विकास कामाचे जिल्हा निहाय व तालुका निहाय सविस्तर विश्लेषण प्रकरण क्र. ६ मध्ये दिलेले आहे. या विशेष निधीमधून मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सिंचन सोयी, पिण्याचे पाणी, गावोगावी रस्त्याची सोय, सांस्कृतीक सभागृह बांधकाम, शाळा व बालवाडीचे बांधकाम, गावोगावी रस्त्यावर पथदिवे, सांडपाणी, ग्रांमपचायत कार्यालय बांधकाम व्यवस्था इतकेच नव्हे तर स्मशान भुमिमध्ये सुविधा, समशान भुमिच्या संरक्षक भिंतीचे बांधकाम केले आहे. या सुविधांचा प्रत्यक्ष लाभ घेणारे लाभार्थी यांना या सुविधांचा किती लाभ झाला, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाविषयी लोकांना असणारी माहिती, मंडळाकडून लोकांच्या अपेक्षा, मंडळाच्या त्रुटी जाणून घेण्यासाठी मराठवाडयातील आठ जिल्ह्यांमध्ये ज्या ज्या ठिकाणी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने विशेष निधी मधून विकास कामे केली आहेत त्यासाठी यादृच्छिक नमुना पाहणी (Random Sample Survey) पध्दतीने एका जिल्ह्यातील एका गावातील एकूण लाभार्थ्यांपैकी २% नमुना निवड पध्दतीने एकूण ५९८ प्रत्यक्ष लाभार्थ्यांची प्रश्नावली अनुसुची द्वारे मराठवाडा वैधानिक विकास मंडळाविषयी लोकांची मते जाणून घेतली. या प्रश्नावली अनुसूचीचा निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

### ७.३.२ निवड लाभार्थ्यांची सामाजिक स्थिती :—

व्यक्तीचा विकास हा फक्त आर्थिक स्थितीवरूनच दिसून येतो असे नाही तर सामाजिक स्थितीवरूनही दिसून येतो. समाजातील लोकांना मिळणाऱ्या आर्थिक घटकांमुळे समाजाची आर्थिक स्थिती निश्चित होते. परंतु सामाजिक घटकांचा देखील व्यक्तींचा सार्वांगीण विकासामध्ये महत्वाचा घटक आहे. या सामाजिक घटकामध्ये शिक्षण, वय, जात, धर्म, सामाजिक प्रतिष्ठा इ.

घटकांचासुध्दा परिणाम होत असतो. यातूनच समाजातील लोकांची सामाजिक स्थिती सुधारते.

**७.३.३ निवड लाभार्थ्यांची वयोरचना :—**

कोणत्याही क्षेत्राची उत्पादकता ही अधिक प्रमाणात वाढविण्यासाठी वयोमानाचा विचार करणे आवश्यक असते. फक्त वयावरूनच उत्पादकता वाढते असे नाही तर त्यासाठी अनेक घटक कारणीभूत ठरतात. त्यापैकी लाभार्थ्यांचे वय हा त्यातील महत्वाचा घटक आहे. निवड लाभार्थ्याचे वयानुसार तीन गटात वर्गीकरण करण्यात आले आहे. त्याचा तपशिल तक्ता क्र. ७.२ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्र. ७.२**

**निवड लाभार्थ्यांची वयोरचना**

| अ.क्र. | वयोगट | निवड लाभार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ ते १४ | १३२ | २२% |
| २ | १५ ते ६० | ४२५ | ७१% |
| ३ | ६०च्या पुढे | ४२ | ७% |
| | एकूण | ५९८ | १००% |

आधार :— सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.२ वरून असे दिसून येते की १५ ते ६० वयोगटातील लाभार्थींच्या संख्येचे प्रमाण सर्वाधिक आहे म्हणजे ७१% आहे. हा वयोगट तरूण वयोगट समजला जातो. या गटातील लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्याने उत्पादकतेच्या दृष्टिने महत्वाचे असते. या लोकसंख्येमुळे उत्पादन वाढीला चालना मिळण्यास मदत होवून आर्थिक व सामाजिक विकासास मदत होते.

**७.३.४ निवड लाभार्थीचे कौटुंबीक आकारमान :—**

कुटुंबाचा आकार हा प्रगतीला कारणीभूत ठरतो. कुटुंब आकाराने लहान व कमविणारी व्यक्ती संख्या जास्त असल्यास कुटूंबाचे उत्पन्न वाढते. त्यातून कुटुंबाची स्थिती, राहणीमान यामध्ये वाढ होत जाते म्हणून लाभार्थ्यांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी कुटुंबाचा आकार ही लक्षात घेण्यात

आला आहे. निवड लाभार्थ्याच्या कुटूंबाचा आकार तक्ता क्र. ७.३ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्र. ७.३**

**निवड लाभार्थ्याचे कुटुंबाचा आकार**

| अ.क्र. | कुटुंबाचा आकार | निवड लाभार्थ्याची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २ ते ३ व्यक्ती | १२० | २०% |
| २ | ४ ते ५ व्यक्ती | ४४३ | ७४% |
| ३ | ६ ते ७ व्यक्ती | ३५ | ०६% |
| ४ | ७ पेक्षा जास्त | ... | ०% |
| | एकूण | ५९८ | १००% |

**आधार :—** सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.३ वरून असे दिसून येते की, निवड लाभार्थ्यांचे कुटुंबाचे आकारमान अभ्यासण्यासाठी चार टप्पे पाडण्यात आले आहेत. यामध्ये २ ते ४ व्यक्ती असलेल्या लाभार्थींची संख्या १२० (२०%)आहे. ४ ते ५ व्यक्ती असलेल्या लाभार्थींची संख्या ४४३ (७४%) आहे. तर ६ ते ७ व्यक्ती असलेल्या लाभार्थींची संख्या ३५ (०.६%) आहे. ७ पेक्षा जास्त संख्या असलेल्या कुटुंबाचे संख्या एकही नाही. ४ ते ५ व्यक्तींची संख्या असणाऱ्या कुटुंबांची संख्यासर्वात जास्त म्हणजे (७४%) आहे. कुटुंबाचे आकार लहान असणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या (२०%) एवढी आहे. कुटुंबाची सदस्य संख्या जास्त असल्यास अनेक समस्यांना सामोरे जावे लागते याची जाणीव ठेवून व कुटूंब नियोजनाचे महत्व लक्षात घेवून आपल्या कुटुंबाची संख्या मर्यादित ठेवली आहे. 'छोटे कुटुंब सुखी कुटुंब' या तत्वानुसार आपल्या कुटुंबाची संख्या कमी ठेवणाऱ्या लाभार्थ्यांचे प्रमाण वाढवण्याची आवश्यकता आहे.

### ७.३.५ निवड लाभार्थ्यांचा वैवाहिक दर्जा :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या विकास कामांमुळे ज्यांना प्रत्यक्ष लाभ होत आहे अशा प्रत्यक्ष निवड लाभार्थ्याचा वैवाहिक दर्जाची विचारणा केली असता एकूण निवड लाभार्थ्यांपैकी किती लाभार्थी विवाहित व किती लाभार्थी अविवाहित आहेत याचा तपशिल पुढील तत्क्यामध्ये दिलेला आहे.

**तक्ता क्र. ७.४**

**निवड लाभार्थ्यांचा वैवाहिक दर्जा**

| अ.क्र. | तपशिल | निवड लाभार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अविवाहित | ९६ | १६% |
| २ | विवाहित | ५०२ | ८४% |
| | एकूण | ५९८ | १००% |

**आधार :—** सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.४ मध्ये दर्शविल्या प्रमाणे निवड लाभार्थ्यांपैकी ९६ (१६%) लाभार्थी हे अविवाहित तर ५०२ (८४%) लाभार्थी हे विवाहित असल्याचे दिसून आले. याचाच अर्थ ८४% लाभार्थ्यांवर कौटुबिक जबाबदारी पडलेली आहे तर १६% लाभार्थी कौटुंबिक जबाबदारी पासून दूर आहेत.

**७.३.६ निवड लाभार्थ्यांचे धर्मानुसार वर्गीकरण :—**

विविधतेत एकता असलेला देश म्हणून भारताची ओळख आहे. भारतात अनेक धर्माचे लोक राहतात. प्रत्येक धर्माच्या पध्दती, चालीरिती, रितीरिवाज वेगळे आहेत. यातून धर्माच्या श्रेष्ठतेबद्दल वाद निर्माण होतात याचा परिणाम सामाजिक ऐक्यामध्ये अडथळा निर्माण होण्यावर होत आहे. जी परिस्थिती देशाची तिच परिस्थिती मराठवाडा विभागातील लोकांची आहे. आज अनेक धर्मातील लोकांनी आपण भारतीय आहोत अशी भावना बाळगून एकत्र आले तर विविधतेतून ऐक्य निर्माण होईल यातून देशाची अखंडता साध्य होईल. अभ्यासासाठी निवडलेल्या ५९८ प्रत्यक्ष लाभार्थी हे वेगवेगळया धर्माचे आहेत. धर्मानुसार लाभार्थ्यांचे वर्गीकरण खालील तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र. ७.५**

**निवड लाभार्थ्यांचे धर्मानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | तपशिल | निवड लाभार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | ५१४ | ८६% |
| २ | मुस्लिम | ५४ | ९% |
| ३ | बौध्द | ३० | ५% |
| ४ | पारशी | ... | ... |
| ५ | ख्रिश्चन | ... | ... |
| | एकूण | ५९८ | १००% |

**आधार :—** सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.५ वरून असे दिसून येते की, निवड लाभार्थ्यापैकी ५१४ (८६%)लाभार्थी हिंदू आहेत. तर ५४ (९%)लाभार्थी हे मुस्लिम धर्माचे आहेत. बौध्द धर्माचे ३० (५%)आहेत तर पारशी व ख्रिश्चन धर्माचे एकही लाभार्थी नाही.

**७.३.७ निवड लाभार्थ्यांचे जातीनुसार वर्गीकरण :—**

प्रत्यक्ष लाभार्थ्याचे जातीनुसार वर्गीकरण करीत असताना मराठवाडा विभागातील प्रत्येक जिल्ह्यातील नमुना निवड गावातील लोकांच्या प्रश्नावली अनुसूचिद्वारे माहिति संकलित केली त्यामध्ये वेगवेगळया जातीच्या लोकांची माहिती संकलीत केली आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामाचा लाभ अनेक जातीतील लोकांना होत आहे. त्यामुळे मंडळाने केलेल्या विकास कामांमुळे सामाजिक विकासात भर पडत आहे. त्याचे वर्गीकरण खालिल प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ७.६**
**निवड लाभार्थ्यांचे जातीनुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | तपशिल | निवड लाभार्थ्याची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मराठा | २३९ | ४०% |
| २ | अनु. जा./ज. | ६० | १०% |
| ३ | मुस्लिम | ५४ | ९% |
| ४ | ब्राम्हण | १८ | ३% |
| ५ | इतर | २२७ | ३८% |
| | एकूण | ५९८ | १००% |

**आधार :—** सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.६ वरून असे दिसून येते की, प्रत्यक्ष लाभार्थ्यापैकी मराठी जातीचे २३९(४०%), अनुसूचित जातीचे ६०(१०%), मुस्लिम समाजाचे ५४ (९%), ब्राम्हण समाजाचे १८ (३%) तर इतर समाजामध्ये लिंगायत, बंजारा, वंजारी, माळी, तेली, सुतार इतर अनुसूचित जातीचे ओ.बी.सी. समावेश केला आहे. त्यांची संख्या २२७ (३८%) आहे. यावरून मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामाचा सर्व जातींना फायदा होतो.

**७.३.८ निवड लाभार्थ्यांचे भाषानुसार वर्गीकरण :—**

भारतात ज्या प्रमाणे अनेक धर्म व जाती आहेत त्याप्रमाणे अनेक भाषाही आहेत. भाषा हे आपल्या भावना व्यक्त करणारे माध्यम आहे. एक भाषा

असणारे लोक लवकर एकत्र येतात. राज्याची निर्मिती देखील भाषीय तत्वाला अनुसरून झाली आहे. बहुभाषिक लोकांमध्ये मतभेद निर्माण होवू शकतात. त्यातून एकात्मतेला तडा जाऊ शकतो. असे असले तरी विविधतेतून एकता हि महत्वाची असते. सर्व भाषिकांनी एकत्र येवून समाजाचा विकास केला तर सामाजिक विकास लवकर होईल. निवड लाभार्थ्यांचे भाषावर केलेली विभागणी तक्ता क्र. ७.७ मध्ये दर्शविली आहे. त्याचे वर्गीकरण खालिल प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ७.७**

**निवड लाभार्थ्यांचे भाषेनुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | तपशिल | निवड लाभार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मराठी | ५४४ | ९१% |
| २ | हिंदी | ३३ | ५.५% |
| ३ | उर्दू | १२ | २% |
| ४ | कन्नड | ९ | १.५% |
| | एकूण | ५९८ | १००% |

**आधार :—** सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.७ वरून असे दिसून येते की, प्रत्यक्ष लाभार्थ्यापैकी मराठी भाषिकांची संख्या सर्वात जास्त म्हणजे ५४४ (९१%) असून इतर भाषिकांची संख्या कमी आहे. जास्तीत जास्त लाभार्थी मराठी भाषिक असल्यामुळे त्यांच्यात एकी निर्माण होऊन सामाजिक विकासास सहाय्यभूत होते.

### ७.३.९ निवड लाभार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा :—

वर्तमान काळात शिक्षण या घटकाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. शिक्षणामुळे व्यक्तीची पातळी वाढते, ज्ञान प्राप्त होते, बाहेरच्या जगाशी संबंध येतो, जीवनामध्ये शिक्षणाचा अनेक दृष्टिकोनातून फायदा होतो. अमर्त्य सेन यांनी मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या तीनच मुलभूत गरजा नाहीत तर शिक्षण ही सुध्दा मुलभूत गरज आहे असे मत मांडले आहे. समाजातील लोकांचे शिक्षण झाले असेल तर उत्पादकतेत वाढ होवून सामाजिक विकासात भर पडते. निवड लाभार्थ्यांचे शैक्षणिक दर्जा नुसार केलेली विभागणी तक्ता क्र. ७.८ मध्ये दर्शविली आहे. त्याचे वर्गीकरण खालिल प्रमाणे आहे.

## तक्ता क्र. ७.८

## निवड लाभार्थ्यांचे शैक्षणिक दर्जा

| अ.क्र. | शिक्षण | निवड लाभार्थ्याची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक | ४२ | ७% |
| २ | मध्यमिक | २९३ | ४९% |
| ३ | उच्च.माध्यमिक | १४३ | २४% |
| ४ | पदवी | ७२ | १२% |
| ५ | पदव्यूत्तर | ०३ | ०.५% |
| ६ | व्यावसायिक | ३६ | ६% |
| ७ | निरक्षर | ०९ | १.५% |
| | एकूण | ५९८ | १००% |

**आधार :—** सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.८ वरून असे दिसून येते की, प्रत्यक्ष लाभार्थ्यापैकी सर्वात जास्त लाभार्थी माध्यमिक शिक्षण घेतलेले असून त्यांची संख्या २९३ (४९%) आहे. तर सर्वात कमी संख्या ०३ (०.५%) पदव्यूत्तर शिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांचे आहे.

### ७.३.१० निवड लाभार्थ्यांचे व्यवसाय नुसार वर्गीकरण :—

निवड लाभार्थ्यांपैकी प्राथमिक, द्वितीय व तृतिय क्षेत्रामध्ये वर्गीकरण करणे हे सामाजिक विकासासाठी महत्वपूर्ण घटक आहे. कारण प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांपेक्षा द्विताय व तृतिय क्षेत्रामध्ये जेवढे जास्त लोक अवलंबून असतील तेवढा देशाचा विकास होवून समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास होईल. निवड लाभार्थ्यांचे व्यवसाय नुसार केलेली विभागणी तक्ता क्र. ७.९ मध्ये दर्शविली आहे. त्याचे वर्गीकरण खालिल प्रमाणे आहे.

## तक्ता क्र. ७.९

## निवड लाभार्थ्यांचे व्यवसाय नुसार वर्गीकरण

| अ.क्र. | तपशिल | निवड लाभार्थ्याची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक क्षेत्र | ४०७ | ६८% |
| २ | द्वितीय क्षेत्र | ६६ | ११% |
| ३ | तृतिय क्षेत्र | १२५ | २१% |
| | एकूण | ५९८ | १००% |

**आधार :—** सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.९ वरून असे दिसून येते की, मराडवाडा विभागातील मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने जी विकास कामे केली आहेत ती जास्तीत जास्त ग्रामीण भागात केलेली आहेत. अजुनही प्राथमिक क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. वरील तक्त्यामध्ये ६८% लोक प्राथमिक व्यवसाय करतात तर द्वितीय क्षेत्रात ११% तर तृतीय क्षेत्रात २१% काम करतात.

वरील प्रमाणे निवड लाभार्थ्यांचे सामाजिक स्थितीची प्रश्नावली अनुसूचीद्वारे माहिती घेवून त्या माहितीचे विश्लेषण केले आहे. लाभार्थ्यांचे सामाजिक स्थितीबरोबरच मराठवाडा वैधानिक विकास मंडळा विषयी लाभार्थ्यांना असणारी माहिती, विकास मंडळाने केलेल्या कामाविषयी, त्या कामाचे लाभार्थ्यांला, त्याच्या कुटुंबाला त्या गावातील लोकांना उपयोग होतो का, त्या विकास कामांमुळे लोकांच्या राहणीमानात सुधारणा होत आहे का, विकास मंडळाविषयी असणाऱ्या अपेक्षा, तक्रारी, इ. संबंधीची माहिती प्रश्नावली अनुसूचीद्वारे संकलीत करून तिचे विश्लेषण केले आहे ते खालील प्रमाणे आहे.

### ७.३.११ निवड लाभार्थ्यांना मराठवाडा वैधानिक विकास मंडळाविषयी असणारी माहिती :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडा विभागाचा सर्वांगीण विकासासाठी अनेक विकास कामे केली आहेत. उदा.— रस्त्याची सोय, पिण्याचे पाणी पुरवठा, सिंचन सोयी, सामाजिक, सांस्कृतिक सभागृह, आरोग्याच्या सोयी, शैक्षणिक सुविधा, या सुविधा पैकी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने निवडलेल्या गावामध्ये एक किंवा त्यापेक्षा जास्त विकास कामे केली आहेत. या विकास मंडळाविषयी निवड लाभार्थ्यांना किती माहिती आहे किंवा सदरील काम कोणी केले या विषयी माहिती घेतली आहे त्याचे विश्लेषण खालील तक्ता क्र. ७.१० मध्ये केले आहे.

### तक्ता क्र. ७.१०

### निवड लाभार्थ्यांना मराठवाडा वैधानिक विकास मंडळाविषयी असणारी माहिती

| अ.क्र. | तपशिल | आहे/नाही | निवड लाभार्थ्याची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | म.वै.वि.मं.विषयी माहिती | आहे | ३९५ | ६६% |
| २ | म.वै.वि.मं.विषयी माहिती | नाही | २०३ | ३४% |
| | एकूण | | ५९८ | १००% |

आधार :— सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.१० वरून असे दिसून येते की, मराडवाडा वैधानिक विकास मंडळा विषयी ६६% लोकांना माहिती आहे तर ३४% लोकांना माहिती नाही.

## ७.३.१२ निवड लाभार्थ्यांना मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने त्यांच्या गावात केलेल्या विकास कामाविषयी असणारी माहिती :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडा विभागाचा विकास व्हावा यासाठी अनेक गावामध्ये रस्त्याच्या सोयी, सिंचन सोयी, सामाजिक सभागृह, आरोग्याच्या सोयी इ. सोयी सुविधा केल्या आहेत. एखाद्या गावामध्ये एक किंवा एका पेक्षा जास्त विकास कामे केली आहेत. निवड लाभार्थ्याच्या गावामध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने कोणती कामे केली आहेत याची माहिती लाभार्थ्यांना किती आहे हे खालील तक्ता क्र. ७.११ मध्ये दर्शविले आहे.

### तक्ता क्र. ७.११

### निवड लाभार्थ्यांना म. वै. वि. मंडळाने त्यांच्या गावात केलेल्या विकास कामाविषयी असणारी माहिती

| अ. क्र. | तपशिल | आहे/ नाही | निवड लाभार्थ्याची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | म.वै.वि.मं.च्या कामाविषयी माहिती | आहे | ४१३ | ६९% |
| २ | म.वै.वि.मं.च्या कामाविषयी माहिती | नाही | १८५ | ३१% |
| | एकूण | | ५९८ | १००% |

आधार :— सर्वेक्षण माहिती

वरील तक्ता क्र. ७.११ वरून असे दिसून येते की, मराडवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या कामाविषयी ६९% लोकांना माहिती आहे तर ३१% लोकांना मराडवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या कामाविषयी माहिती नाही.

### ७.३.१३ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामाविषयी निवड लाभार्थ्यांच्या कुटुंबाच्या उपयोगाविषयी माहिती :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडा विभागाचा अनुशेष भरून काढून सर्वांगीण विकास करण्यासाठी अनेक विकास कामे केली आहेत.या विकास कामाचा लाभार्थ्याला व लाभार्थ्यांच्या कुटुंबासाठी उपयोग होतो का याचे विश्लेषण तक्ता क्र. ७.१२ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र. ७.१२**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामाविषयी निवड लाभार्थ्यांच्या कुटूंबाच्या उपयोगाविषयी माहिती**

| अ.क्र. | तपशिल | होतो/नाही | निवडलाभार्थ्यी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | म.वै.वि.मं.कामांचा उपयोग | होतो | ४६६ | ७८% |
| २ | म.वै.वि.मं.कामांचा उपयोग | नाही | १३२ | २२% |
| | एकूण | | ५९८ | १००% |

आधार :— सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.१२ वरून असे दिसून येते की, मराडवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामाचा लाभार्थ्याला व लाभार्थ्यांच्या कुटूंबासाठी ७८% लोकांना उपयोग होतो तर २२% लोकांना उपयोग होत नाही.

### ७.३.१४ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामांचा निवड गावातील लोकांच्या उपयोगाविषयी माहिती :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडा विभागामध्ये अनेक विकासात्मक कामे केली आहेत. रस्त्याची सोय, पिण्याचे पाणी पुरवठा, सिंचन सोयी, सामाजिक, सांस्कृतिक सभागृह, आरोग्याच्या सोयी, शैक्षणिक सुविधा, इ. विकास कामाचा नमुना निवड गावातील लोकांना किती उपयोग होतो याचे विश्लेषण खालील तक्ता क्र. ७.१३ मध्ये दर्शविले आहे.

### तक्ता क्र. ७.१३

### मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामांचा निवड गावातील लोकांच्या उपयोगाविषयी माहिती

| अ.क्र. | तपशिल | होतो/नाही | निवडलाभार्थ्यी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | म.वै.वि.मं.कामांचा उपयोग | होतो | ४४३ | ७४% |
| २ | म.वै.वि.मं.कामांचा उपयोग | नाही | १५५ | २६% |
| | एकूण | | ५९८ | १००% |

आधार :— सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.१३ वरून असे दिसून येते की, मराडवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामाचा नमुना निवड गावातील जास्त लोकांना म्हणजे ७४% लोकांना उपयोग होतो तर २६% लोकांना मराडवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामाचा उपयोग होत नाही.

## ७.३.१५ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामामुळे निवड गावातील लाभार्थ्यांच्या राहणीमीनात झालेला बदल :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळ हे समाजातील लोकांच्या वैयक्तीक लाभासाठी विकास कामे करीत नसून त्या गावातील जास्तीत जास्त लोकांच्या किंवा समाजोपयोगी अशी कामे करते. उदा. — रस्त्याची सोय, पिण्याचे पाणी पुरवठा, सिंचन सोयी, सामाजिक, सांस्कृतिक सभागृह, आरोग्याच्या सोयी, शैक्षणिक सुविधा, इ. या सोयी सार्वजनिक हितासाठी केल्या आहेत. या विकास कामामुळे निवड लाभार्थ्यांच्या राहणीमीनात सुधारणा किती झाली ते खालील तक्ता क्र. ७.१४ मध्ये दर्शविले आहे.

### तक्ता क्र. ७.१४

### मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामामुळे निवड गावातील लाभार्थ्यांच्या राहणीमीनात झालेला बदल

| अ.क्र. | तपशिल | झाली/नाही | निवड लाभार्थ्यी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | म.वै.वि.मं.मुळे राहणीमीनात सुधारणा झाली | झाली | ५०२ | ८४% |
| २ | म.वै.वि.मं.मुळे राहणीमीनात सुधारणा झाली | नाही | ९६ | १६% |
| | एकूण | | ५९८ | १००% |

**आधार :—** सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.१४ वरून असे दिसून येते की, मराडवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामामुळे जास्तीत जास्त लोकांना म्हणजे ८४% लोकांना उपयोग होऊन त्यांच्या राहणीमानात सुधारणा होत आहे.

### ७.३.१६ मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची इतर विकास कामा विषयी माहिती :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडा विभागाचा अनुशेष भरून काढण्यासाठी व सर्वांगीण विकास साधण्यासाठी स्थापन झालेले आहे. या विकास मंडळाने मराठवाडयातील अनेक गावामध्ये विविध प्रकारचे विकास कामे केली आहेत. या विकास कामापैकी एखादे किंवा दुसरे विकास काम एखाद्या गावामध्ये केलेले असते. या विकास कामाव्यतिरीक्त इतर कामाविषयी निवड लाभार्थ्याना किती माहिती आहे याचे विश्लेषण खालील तक्ता क्र. ७.१५ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र. ७.१५**

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामामुळे निवड गावातील लाभार्थ्यांच्या राहणीमीनात झालेला बदल**

| अ.क्र. | तपशिल | आहे/ नाही | निवड लाभार्थ्यी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | म.वै.वि.मं. कामाविषयी माहिती | आहे | ३४७ | ५८% |
| २ | म.वै.वि.मं. कामाविषयी माहिती | नाही | २५१ | ४२% |
| | एकूण | | ५९८ | १००% |

**आधार** :— सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.१५ वरून असे दिसून येते की, मराडवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या इतर विकास कामाविषयी जास्तीत जास्त लोकांना म्हणजे ५८% लोकांना माहिती आहे. तर ४२% लोकांना मराडवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या इतर विकास कामाविषयी माहिती नाही.

### ७.३.१७ मराठवाडा वैधानिक विकास मंडळने केलेल्या विकास कामाच्या दर्जा संबंधी माहिती :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने विविध स्वयपाच्या विकास कामांमुळे लोकांच्या राहणीमानात सुधारणा होत आहे. या विकास कामाचा दर्जा कशा

स्वरूपाचा आहे याविषयी माहिती घेतली असता ती खालील तक्ता क्र. ७.१६मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ७.१६**

**म. वै. वि. मंडळने केलेल्या विकास कामाच्या दर्जा संबंधी माहिती**

| अ. क्र. | तपशिल | आहे/ नाही | निवड लाभार्थ्यी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | म.वै.वि.मं.ने केलेल्या कामाचा दर्जा चांगला | आहे | ३७१ | ६२% |
| २ | म.वै.वि.मं.ने केलेल्या कामाचा दर्जा चांगला | नाही | २२७ | ३८% |
| | एकूण | | ५९८ | १००% |

आधार :— सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.१६ वरून असे दिसून येते की, निवड लाभार्थ्या पैकी ६२% लोकांचे विकास कामाचा दर्जा चांगला आहे असे मत आहे. तर ३८% निवड लाभार्थ्याच्या मते मराडवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामाच्या दर्जा चांगला नाही असे मत आहे.

**७.३.१८ नमुना निवड लाभार्थ्याकडून मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या विकास कामाविषयी तक्रारी :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळ हे लोकांच्या वैयक्तीक लाभसाठी काम करीत नसून सार्वजनिक लोकोपयोगी विकास कामे करते. या मंडळाने जी वेगवेगळी विकास कामे केली आहेत त्या कामाविषयी लोकांच्या तक्रारी विषयी विचारणा केली असता खालील तक्ता क्र. ७.१७ नुसार माहिती मिळाली.

**तक्ता क्र. ७.१७**

**नमुना निवड लाभार्थ्याकडून म. वै. वि. मंडळाच्या विकास कामाविषयी तक्रारी**

| अ. क्र. | तपशिल | आहे/ नाही | निवड लाभार्थी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | म.वै.वि.मं.ने केलेल्या कामा विषयी तक्रार | आहे | ३५३ | ५९% |
| २ | म.वै.वि.मं.ने केलेल्या कामा विषयी तक्रार | नाही | २४५ | ४१% |
| | एकूण | | ५९८ | १००% |

**आधार :—** सर्वेक्षण माहीती

वरील तक्ता क्र. ७.१७ वरून असे दिसून येते की, मराडवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामाची देखभाल व्यवस्थित ठेवली जात नाही. असे ५९% लोकांचे मत आहे. तर ४१% लोकांच्या मंउळाविषयी क्रिारी नाहित असे निवड लाभार्थ्याच्या मत आहे.

**७.३.१९ निवड लाभार्थ्याकडून मराडवाडा वैधानिक विकास मंडळाकडून असणाऱ्या अपेक्षा :—**

मराडवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडयाचा अनुशेष भरून निघावा व पश्चिम महाराष्ट्राचा जसा विकास झाला आहे तसाच मराठवाडा विभागाचा विकास व्हावा यासाठी सिंचन सोयी, पिण्याचे पाणी पुरवठा, गावोगावी रस्त्याची सोय, सामाजिक व सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम, आरोग्याच्या सोयी, रस्त्यावर पथदिवे बसविणे, सांडपाणी व्यवस्था इ. सोयी सुविधा केल्या आहेत या सुविधापैकी एखाद्या गावात एक किंवा एकापेक्षा जास्त सुविधा केलेल्या आहेत. नमुना निवड लपाभार्थ्यांना मराडवाडा वैधानिक विकास मंडळा विषयी काय अपेक्षा आहेत याची विचारणा केली असता एकूण लाभार्थ्यापैकी जास्तीत जासत लोकांनी त्यांच्या गावात नसलेल्या सुविधा मराडवाडा वैधानिक विकास मंडळाने कराव्यात अशा सुचना केल्या आहेत. यावरून या मंडळाविषयी लोकांच्या अनेक अपेक्षा आहेत.

**७.४ सैध्दांतिक पार्श्वभूमी**

**१) डॉ. दा.धो. काचोळे :—**

डॉ. दा. धो. काचोळे यांच्या मते ''शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षितता, मुलभूत हक्कांचे स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, समता, अल्पसंख्यांकाचे हितरक्षण तसेच सामाजातील व्यक्तीचा सामाजिक जिवनस्तर उंचावण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व घटकांचा समावेश होतो. प्रामुख्याने समाजातील दारिद्रय कमी करणे व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक असते. याचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. यावरूनच समाजाचा सामाजिक विकास कितपत झाला आहे याचे ज्ञान प्राप्त होते.''[१]

डॉ. दा.धो. काचोळे यांच्या सामाजिक विकास संकल्पने प्रमाणे सामाजिक विकासासाठी शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षितता, समाजातील व्यक्तीचा सामाजिक जिवनस्तर उंचावण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व घटकांचा सामाजिक विकासात समावेश होतो. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शैक्षणिक विकासासाठी शासकिय तंत्रनिकेतन औरंगाबाद, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ विभागीय कार्यालय औरंगाबाद, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था औरंगाबाद, या शैक्षणिक संस्थांच्या इमारतीचे आधुनिकीकरण केले. अनेक गावामध्ये अंगणवाडया व शाळेच्या इमारतीचे बांधकाम, तेथिल विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा, संगणक वाटप केले.

आरोग्य सुविधा मध्ये, शासकीय दंत महाविद्यालय व रूग्णालय औरंगाबाद, पशुवैद्यकीय सर्व चिकीत्सालय खडकेश्वर औरंगाबाद, शासकीय रूग्णालय औरंगाबाद, येथे वेगवेगळया विभागाचे नुतनीकरण केले.

मराठवाडयातील अनेक शासकीय रूग्णालयामध्ये आधुनिक यंत्र सामुग्रीचे वाटप केले. विकास कामामध्ये अनेक लोकांना रोजगार मिळून लोकांचे उत्पन्न वाढून लोकांच्या आर्थिक व सामाजिक विकासात वाढ होत आहे. यावरून मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या सामाजिक विकासात भर पडत आहे.

**२) डॉ. धनागरे :—**

डॉ. धनागरे यांच्या मते ''सामाजिक विकासामध्ये दर माणशी आहार सुधारणा झाला की नाही, साक्षरतेचा व शिक्षणाचा प्रसार वयोगटनुसार आणि स्त्री—पुरूषांमध्ये कितपत झाला आहे, कौटूंबिक आरोग्य व त्यासाठीच्या सुविधामध्ये कितपत गुणात्मक सुधारणा झाली आहे, रोजगार उपलब्ध झाला की नाही, सामान्यांच्या क्रयशक्तीत वृध्दी कितपत झाली आणि एकंदरच अन्न, वस्त्र, निवारा इ. जीवनावश्यक बाबीमध्ये तळागाळातील लोकांच्या बाबतीत लक्षणीय वाढ झाली की नाही हे पाहिले जाते.''[२]

डॉ. धनागरे यांच्या सामाजिक विकास संकल्पने प्रमाणे आहार सुधारणा, शैक्षणिक सुविधा, कौटुंबिक आरोग्य, रोजगार वाढ होऊन, लोकांच्या खरेदी शक्तीत वाढ होऊन तळागाळातील लोकांच्या अन्न, वस्त्र, निवारा या जिवनावश्यक बाबीमध्ये वाढ होणे म्हणजेच सामाजिक विकास होय. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडा विभागाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शैक्षणिक सोयी सुविधामध्ये मोठया प्रमाणात वाढ केली आहे. बालवाडी, अंगणवाडी, शाळा यांच्या इमारतीचे बांधकाम केले. शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय, संगणक सुविधा निर्माण केल्या, आरोग्य सुविधा मध्ये दवाखान्याची इमारत बांधकाम, नुतनीकरण, दवाखान्यामध्ये आधुनिक यंत्रे, उपकरणे, साहित्य दिले. गावोगावी रस्त्याची सोय, पिण्याच्या पाण्याची सोय, समाज एकत्र यावा, गावातील लोकांच्या विवाह समारंभ व इतर सामाजिक कार्यासाठी गावोगावी सामाजिक सभागृहाचे बांधकाम केले. या विकास कामामध्ये अनेक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. गरीब लोकांना रोजगाार मिळाल्यामुळे त्यांची खरेदी शक्ती वाढून राहणी मानात सुधारणा होत आहे. या विश्लेषणावरून मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे सामाजिक विकासात भर पडत आहे.

**३) डॉ. दामले य.भा. :—**

डॉ. दामले य.भा. यांनी पुणे येथे १९९६ मध्ये संपन्न झालेल्या मराठी समाजशास्त्र परिषद अध्यक्षीय भाषणामध्ये ‘‘सामाजिक विकास याकरिता शिक्षण, व्यवसाय या अर्थजनाची सोय की ज्यामुळे व्यक्ती—व्यक्तींचे परावलंबीत्व पुष्कळसे कमी होते. आधुनिक तंत्रज्ञान, नागरीकरण, सामुहिक चळवळी, लोकांच्यातील जागरूकता, कायदेकानून व राज्याच्या सहकार (नविनकायदे करणे व ते निप:क्षपातीपणे अंमलात आणणे) यासर्व गोष्टीची आवश्यकता असते.’’[३]

डॉ. दामले य.भा. यांच्या वरील सामाजिक विकास संकल्पने प्रमाणे सामाजिक विकासा करीता शिक्षण, व्यवसाय, लोकांमध्ये जागरूकता, सहाकर इ. गोष्टींची आवश्यकता असते. मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे

मराठवाडा विभागामध्ये मोठया प्रमाणात शैक्षणिक सुविधा, आरोग्य सुविधा निर्माण झाल्या आहेत. सामाजिक व सांस्कृतिक सभागृहामुळे विविध समाजातील लोक एकत्र येवून सहकार चळवळी चालविल्या जात आहेत. लोकांना रोजगार मिळून त्यांचे उत्पन्न वाढून राहणीमानाचा दर्जा सुधारत आहे. लोकांच्या सामाजिक व आर्थिक विकासात वाढ होत आहे. यावरून मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे सामाजिक विकासात भर पडत आहे.

**७.५ गृहितकांची तपासणी :—**

मराठवाडयाचा सामाजिक व आर्थिक विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची भूमिका हा संशोधनाचा विषय घेत असताना खालील प्रमाणे सामाजिक विकासासंबंधी गृहिते गृहित घेतली होती. सामाजिक विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेल्या विकास कामाचा नमुना निवड उत्तर दात्याकडून मिळालेली माहिती व मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष यांची मुलाखती द्वारे गृहित घेतलेली गृहितकांची तपासणी करता येईल.

**१) मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या आर्थिक विकासात मोलाची भर पडली आहे :—**

एखाद्या विभागाचा किंवा प्रदेशाचा आर्थिक विकास होण्यासाठी त्या विभागातील लोकांना रोजगार उपलब्ध झाला पाहिजे, शैक्षणिक सुविधा निर्माण झाल्या पाहिजेत, सिंचन सोयी, पायाभूत सोयी यामध्ये रस्ते, आरोग्य, सेवा, उद्योगाचा विकास, शेतीचा विकास, दळणवळण सुविधा, पर्यटन स्थळाचा विकास झाला पाहिजे. निवड लाभार्थ्यांना मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे लाभार्थ त्यांचे कुटूंब व गावातील लोकांना विकास मंडळाने केलेल्या कामाचा उपयोग होतो का असा प्रश्न विचारला असता सरासरी ७४% ते ७८% लोकांनी उपयोग होते असे उत्तर दिले. तसेच म. वै. वि. चे अध्यक्ष यांचेही मत आहे की, मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या आर्थिक विकासात भर पडत आहे. यावरून वरील घेतलेले गृहित साध्य झाले आहे.

**२) मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या सामाजिक, शैक्षणिक, पायाभूत संरचनेच्या विकासात भर पडली आहे :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळ मराठवाडा विभागाचा सर्वागीन विकास व्हावा यासाठी प्रयत्न करीत आहे. विकासमंडळाने अनुशेष निधी व विशेष निधीच्या माध्यमातून मराठवाडा विभागामध्ये गावोगावी सामाजिक व सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम केले आहे. शैक्षणिक सुविधामध्ये गावोगी शाळेचे व अंगणवाडीचें बांधकाम व शाळेसाठी आवश्यक सायी सुविधा केले आहेत. रस्त्याची सोयी सुविधा, सिंचन सोयी या सुविधा केल्या आहेत. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष यांच्या मुलाखतीमधून त्यांनी व्यक्त केले आहे की वरील प्रकारच्या विविध विकास कामामुळे मराठवाडयाच्या सामाजिक, शैक्षणिक, पायाभूत संरचनेच्या विकासात भर पडत आहे. यावरून वरील गृहित साध्य झाले आहे.

**३) विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या रोजगारात संधीत वाढ झाली आहे :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळ मराठवाडा विभागाचा समतोल विकास व्हावा यासाठी प्रयत्न करीत आहे. मा. अध्यक्षांच्या मते मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला सन २००५—०६ ते सन २००९—१० या काळात १२८.६२ कोटी रू. विशेष निधी मिळला. या विशेष निधी मधून व अनुशेष निधी मधून जि विकास कामे झाले यातून मराठवाडयातील अनेक लोकांना कायम स्वरूपी व हंगामी स्वरूपात रोजगार मिळाला व मिळत आहे.

या निधीच्या सहाय्याने मराठवाडयात गावागामध्ये रस्त्याची सोय, रस्ते सिमेंटीकरण, नाली बांधकाम, ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम, रस्त्यावर पथदिवे बसविणे, पाणी पुरवठयाच्या सोयी, सांडपाणी व्यवस्था केल्या आहेत. या कामामधून लोकांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला तर शेतीमध्ये केलेल्या सिंचन सोयी केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कायमस्वरूपी रोजगाराच्या सुविधा निर्माण होऊन लोकांच्या उत्पन्नाचा स्तर वाढून आर्थिक विकास होत आहे. त्यामुळे मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे

मराठवाडयाच्या रोजगार संधीत वाढ होत आहे. यावरून वरील गृहित साध्य झाले आहे.

**४) विकास मंडळामुळे मराठवाडयातील लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा झालेली आहे :—**

व्यक्तीचा राहणीमानाचा दर्ता हा त्या व्यक्तीचे उत्पन्न व उपभोगावर अवलंबून असते. व्यक्तीचे उत्पन्न वाढले व त्याला आवश्यक असणाऱ्या वस्तु व सेवा उपलब्ध असतील व त्याव्यक्तीने त्या वस्तु व सेवांचा उपभोग घेतला तर त्या व्यक्तीच्या राहणीमानात सुधारणा होते. निवड लाभार्थ्यांना मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे त्यांच्या राहणीमानात सुधारणा झाली का असा प्रश्न विचारला असतासरासरी ८४% लाभार्थ्यांनी त्यांच्या राहणीमानात सुधारणा झाली असे मत व्यक्त केले. याचाच अर्थ जास्तीत जास्त लोकांचे राहणीमान सुधारत आहे. यावरून वरील गृहित साध्य झाले आहे.

**५) विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या विकासातील अनुशेष कमी झाला :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापनेमागचा मुळ उद्देश हा मराठवाडयाचा अनुशेष भरून काढून मराठवाडा विभागाचा समतोल विकास करणे हा आहे. विकास मंडळाचे अध्यक्ष यांच्या मुलाखतीवरून असे दिसून आले की मराठवाडा विभागाचा अनुशेष १९८४ मध्ये १०५१.०० कोटी रू., सन १९९४ मध्ये ४६२६.५५ कोटी रू.,सन २००० मध्ये ३५४७.०६ कोटी रू. अनुशेष होता.

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना झाल्यापासून अनुशेष कमी होत आहे.

मराडवाडयाचा दि. १ एप्रिल १९९४ रोजीचा सिंचन क्षेत्राचा अनुशेष २४०१.०० कोटी रू. होता तो. दि. १ एप्रिल २०१० मध्ये कांहीच शिल्लक राहिलेला नाही. तर सिंचन क्षेत्र सोडून इतर क्षेत्राचा दि. १ एप्रिल २००० चा अनुशेष १३७३.०१ कोटी रू. होता तो दि. १ एप्रिल २०११ रोजी फक्त आरोग्य क्षेत्राचा २७५.०९ कोटी रू. चा अनुशेष शिल्लक आहे.

वरील विश्लेषणावरून मराठवाडा विभागाचा दि. १ एप्रिल २००० रोजीचा शिल्लक अनुशेष ३५४७.०६ कोटी रू. होता तो दि. १ एप्रिल २०११ रोजी फक्त २७५.०९ कोटी रू शिल्लक आहे. यावरून मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराठवाडयाच्या विकासातील अनुशेष कमी होत आहे. यावरून वरील गृहित साध्य झाले आहे.

**समारोप :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडा विभागाचा विकास व्हावा यासाठी त्याांनी केलेले प्रयत्न, शासनाला पाठविलेल्या शिफारशी, विशेष निधी मधून केलेली विकास कामे यांचा सविस्तर अभ्यास प्रकरण क्र. ६ मध्ये केलेले आहे. परंतु या विकास कामाचा व मंडळाने मराठवाडयाच्या विकासासाठी केलेले प्रयत्न यांचा लोकांच्या राहणीमानावर काय परीणाम होत आहे, या विकास मंडळाविषयी असणारी माहिती, अपेक्षा, तक्रारी जाणून घेण्याचा प्रयत्न सदरील प्रकरणात केला आहे. विकास मंडळाचे अध्यक्ष व प्रत्यक्ष लाभार्थी यांची मुलाखत व अनुसूची द्वारे मते जाणून घेतली असता हे मंडळ मराठवाडयाच्या सर्वांगिण विकासासाठी भरपूर प्रयत्न करीत आहे. या मंडळाचा मराठवाडयाच्या विकासात मोलाचा हिस्सा आहे. तरीपण मंडळाने लोक जागृति करावी, कामाचा दर्जा चांगला ठेवावा हि अपेक्षा आहे.

## संदर्भ


१) डॉ. काचोळे दा. धो., (१० सप्टेंबर २००२), समाजशास्त्रः— संकल्पनात्मक ओळख, (पान क्र. ३४३), कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

२) डॉ. धनागरे द.ना., (२१ डिसेंबर २००५), संकल्पनाचे विश्व आणि सामाजिक वास्तव, (पान क्र. ५८), प्रतिमा प्रकाशन पुणे ५.

३) प्राचार्य कुंभार नागोराव/डॉ. आनंद अनभूले (१९९९), महाराष्ट्रातील समाजशास्त्रे चिंतन, (पान क्र. १०१), न्यु स्नेहा ऑफसेट लातूर.

४) सर्व्हेक्षण माहिती.

## प्रकरण आठवे

# निष्कर्ष व शिफारशी

### ८.१ प्रस्तावना :—

मराठवाडयाच्या मागासलेपणाची मुळ कारणे शोधून ती दूर करून मराठवाडयाचा सर्वांगिण विकास त्वरित घडवून आणावा ही वैधानिक विकास मंडळाची प्रमुख भूमिका आहे. म्हणून आर्थिक सामाजिक आणि मूलभूत सोयी सुविधांच्या बाबातीत मागास क्षेत्रे शोधून त्याबाबत ठराव करणे व वार्षिक नियोजन करुन विकास करणे यांची जबाबदारी मराठवाडा वैधानिक विकास मंडळावर टाकण्यात आली आहे.

भारतीय राज्यघटनेतील कलम ३७१(२) नुसार वैधानिक विकास मंडळ स्थापनेची तरतुद आहे. त्या खंडाचे शीर्षक विषेश तरतुदी असे आहे. विदर्भ व मराठवाडयातील जनतेस असंतोषाची दखल घेऊन महाराष्ट्राच्या विधी मंडळाने या संदर्भात दि. २३ जुलै १९८४ रोजी एक ठराव संमत केला व तो संसदेकडे शिफारशीसाठी पाठवला त्यानंतर तब्बल १० वर्षांनी मा. राष्ट्रपती यांनी आपला आदेश क्र.जी.एस.आर.३१०,दि.९ मार्च १९९४ रोजी तीन वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्याची मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांनी दि. ३० एप्रिल १९९४ रोजी विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र या प्रदेशासाठी तीन वैधानिक विकास मंडळाची स्थापना केली. या वैधानिक विकास मंडळाचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. ती मुदत १९९९ रोजी संपली होती. त्यांचा कार्यकाल वाढविण्यराकरिता भारताच्या राष्ट्रपतीने दि. २९ एप्रिल १९८४ च्या आदेशान्वये पुन्हा महाराष्ट्र राज्य (विदर्भ,मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) सुधारीत आदेश १९९९ निर्गमित केले. त्यानूसार राज्यातील तीनही वैधानिक विकास मंडळाचा कार्यकाल दि. ३० एप्रिल २००४ पर्यंत वाढविण्यात आला त्या नंतर मा. राज्यपाल महोदयांनी दिंनाक १ मे २००४ चे आदेशाद्वारे वैधानिक विकास मंडळाचा कार्यकाल दि. ३० एप्रिल २००५ पर्यंत

वाढवून देण्यात आला होता दि. १० जानेवारी २००६ चे पत्रान्वये राज्यातील तीनही वैधानिक विकास मंडळांना दि. ३० एप्रिल २०१० पर्यंत मुदत वाढ देण्यात आली. महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग २,खंड ३ उपखंड १ पत्र क्र. ४१३ दि. २६ जुलै २०१० नुसार मा. राज्यपालांनी तीनही वैधानिक विकास मंडळाचा कार्यकाल दि. ३० एप्रिल २०१५ पर्यंत वाढविण्यात आला आहे.

कलम ३७४१(२) मध्ये कल्पलेली विकास मंडळे सामान्य प्रकारची नियोजन व कार्यकारी प्रादेशिक प्राधिकरणे निश्चित नाहीत, विकास निधीचे समन्यायी वाटप, तांत्रिक शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी पर्याप्त वाटप नोकऱ्यांची पर्याप्त संधी याबाबत राज्यपालावरची विशेष जबाबदारी पार पाडणारी ही विकास मंडळे निरीक्षक यंत्रना आहेत त्या थेट राज्यपालांनाच जबाबदार आहेत.

केंद्रीय नियोजन मंडळाने राज्यातील तीनही वैधानिक विकास मंडळाच्या कार्याचा नुकताचा आढावा घेतला असून मंडळाच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. एवढेच नव्हे तर मंडळानी आपली कार्यकक्षा केवळ अनुशेष निर्मुलनापुरतीच मर्यादित न ठेवता राज्य नियोजन मंडळाच्या मार्गदर्शनाखाली 'प्रादेशिक नियोजनाचा अहवाल' तयार करावा असे म्हटले आहे त्यामुळे मंडळाच्या कार्याची व्याप्ती व त्याचे अधिकार यांची नेमकी व्याख्या करणे आवश्यक आहे.

योजना प्रक्रियेत विकास मंडळ केवळ नाममात्र राहणे योग्य नाही कार्यक्रमाचे पर्यवेक्षण व शासनाकडून वेळेवर आर्थिक निधीची उपलब्धता झाल्याशिवाय विकासाची आपली जबाबदारी मंडळ दक्षतेने पार पाडू शकणार नाही. मंडळाच्या कार्यातील अडथळे दुर झाले नाही तर मंडळ विकासाची कार्ये समर्थपणे पार पाडू शकणार नाही.

मराठवाडा विभागाच्या सामाजिक व आर्थिक विकासात वैधानिक विकास मंडळाची असलेली भूमिका यांचा सखोल अभ्यास करुन त्यांच्या कार्याचे विस्तृत विश्लेषण केल्यानंतर यातून समोर आलेले निष्कर्ष आणि त्या अनुशंगाने

सुचविलेल्या शिफारशी यांचा समावेश प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात आला आहे.

## ८.२ निष्कर्ष :—

मराठवाडा विभागाच्या विकासासाठी आतापर्यंत केलेल्या उल्लेखनीय कामाचे चिकित्सक विश्लेषण केल्यानंतर विकास मंडळाला आलेल्या अडचणी, मर्यादा, कार्यातील उणिवा या सारख्या महत्वपुर्ण पैलू संबंधी समोर आलेले निश्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

**१) मराठवाडयातील जलसंपत्तीचे नियोजन करण्यात विकास मंडळाला आलेले अपयश :—** मराठवाडयात जल संपत्तीचे नियोजन करण्याची गरज आहे. भुगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी 'पाणी आडवा—पाणी जिरवा' या सारख्या कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावयास पाहिजे. मंडळाने मृदसंधारण, जलसंधारण, मृदसर्व्हेक्षण संबंधीत यंत्रणेचे भरीव सहकार्य कशा प्रकारे मिळेल याकडे लक्ष दिले पाहिजे. पाण्याचा काटकसरीने वापर करण्याच्या बाबतीत शेतकऱ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात मंडळाला यश आलेले नाही.

**२)** कृष्णा खोऱ्यात लवादाप्रमाणे महाराष्ट्राला ५९९ अ.घ.फु. पाणी वापरायची परवानगी आहे. कृष्णा खोऱ्यातील मराठवाडयाचे क्षेत्र अंदाजे १०% आहे. म्हणजे मराठवाडयाचा न्याय वाटा ६० अ.घ.फु. येतो. यापैकी २५ अ.घ.फु. पाण्याचे नियोजन होऊन कामे पूर्णत्वास आली आहेत. उर्वरित २५ अ.घ.फु. पाण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने विशेष प्रयत्न केलेले नाहीत.

**३)** कृष्णा खोऱ्यातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला चांगले यश मिळाले परंतु गोदावरी खोऱ्याच्या बाबतीत मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला योग्य असा शासनाकडून प्रतिसाद मिळत नाही.

**४)** मराठवाडयात अंदाजे ८५०० गावे आहेत. त्यापैकी अंदाजे ३२०० गावे अवर्षण प्रवण आहेत त्यासाठी प्रत्येक गावाला पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे नियोजन करण्यास मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला यश आलेले नाही.

**५) मराठवाडयातील पायाभूत सोयीच्या विकासाकडे मंडळाने कमी लक्ष दिले :—** मराठवाडयाच्या मागासलेपणाचे एक महत्वाचे कारण म्हणजे पायाभूत सोयीची कमी उपलब्धता हे आहे. या विभागात रस्त्याचे अधिकाधिक जाळे निर्माण करण्यासाठी या मंडळाने जास्त लक्ष दिलेले नाही.

**६)** रस्ते विकास कार्यक्रमाअंतर्गत मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने औरंगाबाद जिल्ह्यातील रस्ते विकासासंबंधी जास्तीत जास्त शिफारशी शासनाकडे केलेल्या आहेत. इतर जिल्ह्यातील रस्ते विकासासंबंधी दुर्लक्ष केले आहे.

**७)** नवीन थेट रेल्वे सुरू करण्याबाबत मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने औरंगाबाद व नांदेड येथून नवीन गाडया सोडण्यासाठी शासनाने रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करावा अशी विनंती मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केली आहे. परंतु मराठवाडयातील इतर भागातून नवीन गाडया चालू करण्यासाठी शिफारस केलेली नाही.

**८) कृषी उद्योगाची स्थापना करण्यासाठी प्रयत्न अपुरे :—** मराठवाडयाच्या ग्रामीण भागातील रोजगाराचे प्रमाण वाढविण्यासाठी शेती क्षेत्रावर असणारा भार कमी करण्यासाठी कृषी उद्योगाची स्थापना करण्यात आली पाहिजे, शेतमालास योग्य भाव मिळण्याच्या दृष्टीने असे उद्योग उपयुक्त ठरतात. मराठवाडाच्या कृषी उद्योगांच्या स्थापनेसाठी योग्य वातावरण निर्माण करण्यासाठी या विकास मंडळाचे प्रयत्न अपुरे पडत आहेत.

**९) शेती पुरक व्यवसायांना चालना देण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे प्रयत्न अपुरे :—** कुक्कुट पालन, वराह पालन, दुग्ध व्यवसाय, रेशीम उद्योग इ. सारख्या कृषी क्षेत्रास पूरक व्यवसायांना चालना देण्याची जबाबदारी वैधानिक विकास मंडळाने स्वीकारली पाहिजे. मागास विभागात उत्पन्न व रोजगाराची पातळी उंचावण्यासयाठी पूरक व्यवसायांना अत्यंत महत्व आहे. परंतु या शेती पूरक व्यवसायांना चालना देण्यासाठी विकास मंडळाने विशेष प्रयत्न केलेले नाहित.

**१०)** मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांना आधुनिक फुलशेतीचे दालन खुले करण्यासाठी मराठवाडा कृषी विद्यापीठाने मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या

अर्थसहाय्याने उच्च तंत्रज्ञान, पुष्प उत्पादन प्रकल्प, फळ संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे सुरू केले आहे. व अशेच प्रकल्प परभणी, लातूर, नांदेड येथे सुरू करावेत अशी मागणी मंडळाने केली आहे. परंतु इतर जिल्ह्याचा अशा प्रकल्पासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची मागणी नाही.

**११) मराठवाडयातील औद्योगिकरणास गती देण्यास विकास मंडळाला कमी यश मिळाले :—** महाराष्ट्रात औद्योगिकीकरणाबाबतीत कमालीचा असमतोल निर्माण झाला आहे. मराठवाडयासारख्या मागास भागात औद्योगिकरणास गती देण्याच्या दृष्टीने पायाभूत सोयी, वित्तीय सोयीची उपलब्धता, तांत्रिक मनुष्यबळ या बरोबरच उद्योजकता वाढविण्यासाठी अधिक प्रयत्नाची गरज आहे. साधन सामुग्रीचा योग्य वापर ज्या उद्योगात करता येणे शक्य आहे अशा उद्योगाचे सर्वेक्षण करून मराठवाडयात अधिकाधिक उद्योगाची उभारणी कशा रीतीने करता येईल यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला कमी यश मिळाले आहे.

**१२)** औरंगाबाद विभागातील आजारी/बंद उद्योगाची समस्या सोडविण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे शिफारस केलेली असताना अद्याप पर्यंत समस्या सुटलेली नाही.

**१३)** औद्योगिक समस्ये बाबत मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने औरंगाबाद येथील समस्या सोडविण्याबाबत शिफारस केली तर इतर जिल्ह्याकडे दुर्लक्ष केले आहे.

**१४) मराठवाडयात तांत्रिक व व्यावसायीक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यात विकास मंडळाला अपयश :—** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या कार्याच्या संदर्भात तांत्रिक व व्यावसायीक शिक्षणाच्या योग्य सोयी उपलब्ध करून देणे हे महत्वाचे कार्य आहे. सध्याच्या स्पर्धेच्या युगात खुल्या अर्थव्यवस्थेच्या चौकटीत तांत्रिक व व्यावसायीक शिक्षणास अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. मराठवाडयात लोकसंख्येच्या प्रमाणात अशा सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मंडळाला पाहिजे त्या प्रमाणात यश मिळालेले नाही.

**१५)** लातूर येथे स्वतंत्र तंत्र शिक्षण विद्यापीठ करण्याची मागणी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केलेली आहे. लातूर येथे अगोदरच

मोठया प्रमाणात शैक्षणिक सुविधा झालेल्या आहेत,त्यातच भर पडेल. मंडळाने इतर जिल्ह्याचा विचार केलेला नाही.

**१६)** आरोग्य सुविधेसाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने जास्तीत जास्त सुविधांसाठी औरंगाबाद व लातूर जिल्ह्यांचा विचार केलेला आहे इतर जिल्ह्याकडे दुर्लक्ष केलेले आहे.

**१७)** मराठवाडा विभागात एकच महसूल विभाग अस्तित्वात आहे. मराठवाडयाला दोन महसूल विभागामध्ये विभागण्याची शिफारस मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केलेली आहे. परंतु त्या मागणीला अद्याप पर्यंत यश आलेले नाही.

**१८)** मराठवाडयातील नवीन १५ तालुक्यासाठी पंचायत समितीची कार्यालये निर्माण करण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे विनंती केलेली आहे. अद्याप पर्यंत त्या मागणीला यश आलेले नाही.

**१९)** पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडयातील तीर्थक्षेत्राशी संबंधीत पर्यटन स्थळांचा विकास करण्याची शिफारस शासनाकडे केलेली आहे. इतर क्षेत्राच्या विकासासंबंधी दुर्लक्ष केलेले आहे.

**२०) सार्वजनिक आरोग्य विभागाचा अनुशेष भरून काढण्यात मंडळाला आलेले अपयश :—** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यामागे मुख्य उद्देश हा मराठवाडा विभागाचा अनुशेष निर्मुलन करणे हा आहे. सन १९९४ ते २०११ पर्यंत सर्व विभागाचा अनुशेष भरून निघाला आहे. परंतु सार्वजनिक विभागाचा अनुशेष दि. १ मार्च २०११ अखेर २७५.०९ कोटी रू. शिल्लक आहे. हा अनुशेष भरून काढण्यात विकास मंडळाला अपयश आले आहे.

**२१) मराठवाडयातील योजनाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकडे मंडळाचे दुर्लक्ष :—** मराठवाडा विभागात ज्या पंचवार्षिक योजना व वार्षिक योजना राबविण्यात येतात त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी आवश्यक असते. विकासाचा लाभ समाजातील सर्वसामान्य घटकांना मिळाला पाहिजे. शासनाच्या विविध कार्यक्रमाची अंमलबजावणी योग्य रीतीने होते किंवा नाही याकडे

मंडळाने लक्ष देणे गरजेचे आहे. योजना राबविण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीस गळत्या असणार नाहीत याकडे मंडळाचे बारकाईने लक्ष असले पाहिजे. पण या बाबीकडे मंडळाचे दुर्लक्ष झालेले दिसून येते.

**२२)** महाराष्ट्र राज्याच्या वार्षिक योजनेतून तीनही वैधानिक विकास मंडळासाठी १०० कोटी रु राखीव निधी आहे. त्यात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या वाटयाला अल्पसा २८ कोटी रु. निधी येतो. त्यामुळे मंडळ विकास कार्यक्रम पार पाडण्यासाठी असमर्थ ठरत आहे.

**२३) जिल्हा निहाय्य विशेष निधी वाटपात विषमता :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या निधी वाटपात फारच विषमता दिसते. सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला राज्य शासनाकडून नियतव्यय विशेषनिधी एकूण १२८६२.७० लाख रू. निधी मिळाला. या विशेष निधी मधून औरंगाबाद सारख्या विकसित जिल्ह्याला सर्वात जास्त निधी २३८८.६३ लाख रू. एकूण निधीच्या १८.५७% मंजूर झाला. तर हिंगोली सारख्या मागास जिल्ह्याला सर्वात कमी निधी म्हणजे ८२२.५६ लाख रु. एकूण निधीच्या ६.३९% निधी मंजूर झाला. यावरून जिल्हा निहाय्य विशेष निधी वाटपामध्ये फारच विषमता दिसते.

**२४) औरंगाबाद जिल्ह्यातील तालुका निहाय्य विशेष निधी वाटपामधे विषमता :—** औरंगाबाद जिल्ह्याला सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये म. वै. वि. मंडळाकडून एकूण विशेष निधी २३८८.८८ लाख रू. मिळाला. त्यापैकी औरंगाबाद तालुक्याला सर्वात जास्त १०५२.९२ लाख रू. एकूण निधीच्या ४४.०८% मिळाला. तर सोयगाव सारख्या मागास तालुक्याला कांहीच विशेष निधी मिळालेला नाही.

**२५) जालना जिल्ह्यातील तालुका निहाय्य विशेष निधी वाटपामधे विषमता :—** जालना जिल्ह्याला सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये म. वै.वि. मंडळाकडून एकूण विशेष निधी १५९३.९७ लाख रू. मिळाला. त्यापैकी भोकरदन तालुक्याला सर्वात जास्त ३७६.०७ लाख रू. एकूण निधीच्या २३.५९% मिळाला. तर सर्वात कमी निधी घनसावंगी

तालुक्याला ९७.४० लाख रू. एकूण निधीच्या ६.११% दिला आहे. यावरून तालुका निहाय विशेष निधी वाटपामध्ये फारच विषमता दिसते.

**२६) बीड जिल्ह्यातील तालुका निहाय्य विशेष निधी वाटपामधे विषमता :—**

बीड जिल्ह्याला सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये म. वै. वि. मंडळाकडून एकूण विशेष निधी २१७४.०५ लाख रू. मिळाला. त्यापैकी अंबेजोगाई तालुक्याला सर्वात जास्त ५७४.८७ लाख रू. एकूण निधीच्या २६.४४% मिळाला. तर सर्वात कमी निधी पाटोदा तालुक्याला ४८.१४ लाख रू. एकूण निधीच्या २.२१% दिला आहे. यावरून तालुका निहाय विशेष निधी वाटपामध्ये फारच विषमता दिसते.

**२७) परभणी जिल्ह्यातील तालुका निहाय्य विशेष निधी वाटपामधे विषमता :—** परभणी जिल्ह्याला सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये म. वै.वि. मंडळाकडून एकूण विशेष निधी १२५१.६९ लाख रू. मिळाला. त्यापैकी परभणी तालुक्याला सर्वात जास्त २४९.४५ लाख रू. एकूण निधीच्या १९.९२% मिळाला. तर सर्वात कमी निधी पालम तालुक्याला १६.०० लाख रू. एकूण निधीच्या १.२७% दिला आहे. यावरून तालुका निहाय विशेष निधी वाटपामध्ये फारच विषमता दिसते.

**२८) हिंगोली जिल्ह्यातील तालुका निहाय्य विशेष निधी वाटपामधे विषमता :—** हिंगोली जिल्ह्याला सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये म. वै.वि. मंडळाकडून एकूण विशेष निधी ८२२.५६ लाख रू. मिळाला. त्यापैकी सेनगाव तालुक्याला सर्वात जास्त ३६०.४० लाख रू. एकूण निधीच्या ४३.८१% मिळाला. तर सर्वात कमी निधी औंढा—नागनाथ तालुक्याला २९.६० लाख रू. एकूण निधीच्या ३.५९% दिला आहे. यावरून तालुका निहाय विशेष निधी वाटपामध्ये फारच विषमता दिसते.

**२९) नांदेड जिल्ह्यातील तालुका निहाय्य विशेष निधी वाटपामधे विषमता :—** नांदेड जिल्ह्याला सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये म. वै. वि. मंडळाकडून एकूण विशेष निधी १५२१.३४ लाख रू. मिळाला. त्यापैकी नांदेड तालुक्याला सर्वात जास्त ४०१.०२ लाख रू.

एकूण निधीच्या २६.३५% मिळाला. तर सर्वात कमी निधी हिमायतनगर तालुक्याला १३.०० लाख रू. एकूण निधीच्या ०.८५% दिला आहे. यावरून तालुका निहाय विशेष निधी वाटपामध्ये फारच विषमता दिसते.

**३०) उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुका निहाय्य विशेष निधी वाटपामधे विषमता :—** उस्मानाबाद जिल्ह्याला सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये म. वै.वि. मंडळाकडून एकूण विशेष निधी १३१३.९९ लाख रू. मिळाला. त्यापैकी उस्मानाबाद तालुक्याला सर्वात जास्त ३७१.९४ लाख रू. एकूण निधीच्या २८.३०% मिळाला. तर सर्वात कमी निधी परांडा तालुक्याला १७.०० लाख रू. एकूण निधीच्या १.२९% दिला आहे. यावरून तालुका निहाय विशेष निधी वाटपामध्ये फारच विषमता दिसते.

**३१) लातूर जिल्ह्यातील तालुका निहाय्य विशेष निधी वाटपामधे विषमता :—** लातूर जिल्ह्याला सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये म. वै.वि. मंडळाकडून एकूण विशेष निधी १७९६.८७ लाख रू. मिळाला. त्यापैकी लातूर तालुक्याला सर्वात जास्त ४६८.१७ लाख रू. एकूण निधीच्या २६.०५% मिळाला. तर सर्वात कमी निधी देवणी तालुक्याला ३७.४० लाख रू. एकूण निधीच्या २.०८% दिला आहे. यावरून तालुका निहाय विशेष निधी वाटपामध्ये फारच विषमता दिसते.

**३२) विशेष निधी वाटपात ठराविकच विभागाला प्राधान्य :—** मराठवाडा विभागाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी मंडळाने खालील दहा विभाग पाडले आहेत, सार्वजनिक बांधकाम, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, नगर विकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, सामान्य प्रशासन विभाग, सामाजिक न्याय, सामाजिक कार्य व क्रिडा विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महसूल विभाग, कृषी व पशु— दुग्ध—मत्स विभाग, नियोजन विभाग, इ. या विभागा पैकी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, नगर विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग या विभागावरच जास्त लक्ष केंद्रित केले असून इतर विभागाकडे कमी लक्ष किंवा कमी खर्च केलेला आहे तो खालील प्रमाणे,

**३३)** सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधी मध्ये औरंगाबाद जिल्ह्यासाठी एकूण २३८८.६३ लाख रू. विशेष निधी मिळाला. या निधी पैकी सर्वात जास्त निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला १४१५.२६ लाख रू. (५९.२४%) मिळाला. तर सर्वात कमी निधी नियोजन विभागाला ६.७२ लाख रू. (०.२८%) मिळाला.

**३४)** सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधी मध्ये जालना जिल्ह्यासाठी एकूण १५९३.५७ लाख रू. विशेष निधी मिळाला. या निधी पैकी सर्वात जास्त निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला ११०८.६० लाख रू. (६९.५६%) मिळाला. तर सर्वात कमी निधी नियोजन विभागाला ०.४५ लाख रू.(०.०२%) मिळाला.

**३४)** सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधी मध्ये बीड जिल्ह्यासाठी एकूण २१७४.०५ लाख रू. विशेष निधी मिळाला. या निधी पैकी सर्वात जास्त निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला ९६१.९४ लाख रू. (४४.२४%) मिळाला. तर सर्वात कमी निधी नियोजन विभागाला ०.४५ लाख रू.(०.०२%) मिळाला.

**३६)** सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधी मध्ये परभणी जिल्ह्यासाठी एकूण १२५१.६९ लाख रू. विशेष निधी मिळाला. या निधी पैकी सर्वात जास्त निधी ग्राम विकास विभागाला ४२८.०० लाख रू. (३४.१९%) मिळाला. तर सर्वात कमी निधी नियोजन विभागाला ०.४५ लाख रू. (०.०३%) मिळाला.

**३७)** सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधी मध्ये हिंगोली जिल्ह्यासाठी एकूण ८२२.५६ लाख रू. विशेष निधी मिळाला. या निधी पैकी सर्वात जास्त निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला ५०३.३६ लाख रू. (६१.१९%) मिळाला. तर सर्वात कमी निधी नियोजन विभागाला ०.४५ लाख रू. (०.०५%) मिळाला.

**३८)** सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधी मध्ये नांदेड जिल्ह्यासाठी एकूण १५२१.३४ लाख रू. विशेष निधी मिळाला. या निधी पैकी सर्वात जास्त

निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला ७२८.४७ लाख रू. (४७.८८%) मिळाला. तर सर्वात कमी निधी नियोजन विभागाला ०.४५ लाख रू. (०.०२%) मिळाला.

**३९)** सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधी मध्ये उसमानाबाद जिल्ह्यासाठी एकूण १३१३.९९ लाख रू. विशेष निधी मिळाला. या निधी पैकी सर्वात जास्त निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला १०९१.५२ लाख रू. (८३.०६%) मिळाला. तर सर्वात कमी निधी नियोजन विभागाला ०.४५ लाख रू. (०.०३%) मिळाला.

**४०)** सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधी मध्ये लातूर जिल्ह्यासाठी एकूण १७९६.८७ लाख रू. विशेष निधी मिळाला. या निधी पैकी सर्वात जास्त निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला ९४९.११ लाख रू. (५२.८२%) मिळाला. तर सर्वात कमी निधी नियोजन विभागाला ०.४५ लाख रू.(०.०२%) मिळाला.

वरील प्रमाणे विशेष निधी वाटपामध्ये सर्वात जास्त निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला असून इतर विभागाकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते.

**४१)** मराठवाडा विकासात वैधानिक विकास मंडळाकडून मराठवाडयातील जिल्ह्यातील तालुक्याना जो निधी मिळाला त्या निधीचा वापर तालुक्यातील काही ठराविकच गावाच्या विकासासाठी खर्च केलेला आहे. संपुर्ण तालुक्याच्या विकासाकडे दुर्लक्ष केले आहे.

**४२)** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे कार्यक्षेत्र मर्यादित दिसुन येते. अर्ज करणे, विनंती करणे, पाठपुरवठा करणे या पलीकडे मंडळाला कोणतेही घटनात्मक अधिकार नाहीत.

**४३)** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या विशेष निधीचे वाटप करताना दुर्लक्षीत व रेंगाळलेल्या प्रकल्पाचा प्राधान्याने विचार केला नाही.

**४४)** मराठवाडयाच्या विकासात वैधानिक विकास मंडळाची स्थापना झाल्यानंतर वर्षांच्या शेवटी अविभाज्य नियतव्यायाचा मोठा हिस्सा विकसीत अशा उर्वरीत महाराष्ट्राकडे वळविण्यात येतो. ही बाब चिंतनीय आहे.

**४५)** मा. अध्यक्षांचे कार्यालयातील कर्मचारी वर्ग व सदस्य सचिव यांच्या कार्यालयातील कर्मचारी वर्ग यांचा विचार करता शासनाने विविध पदांना मंजूरी दिली असतानाही ती रिक्त ठेवण्यात आली, यामुळे मनुष्यबळ अपूरे दिसते.

**४६)** केंद्रीय योजना आयोगाच्या नियोजन व मुल्यमापन समितीने प्रादेशिक विकास योजना या वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून राज्य शासनाच्या नियोजन मंडळाकडे मान्यतेसाठी घेवून जाणे सुचविले आहे. याची अद्याप अमंलबजावणी झालेली दिसत नाही.

**४७)** मराठवाडाच्या विकासात वैधानिक विकास मंडळाने राबविलेल्या विविध क्षेत्रातील विकास कार्यक्रम, विकास विषयक कामातील फलश्रुती यांची माहिती लोक प्रतिनिधींना व सामान्य जनतेला वेळोवेळी उपलब्ध होताना दिसून येत नाही.

**४८)** शासनाच्या विकास कामाचे मुल्यमापन करणे इथपर्यंतच मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची भूमिका मर्यादित असलेली दिसते.

**४९)** मराठवाडा वैधानिक विकास मंडळ विभागीय विकासाची संकल्पना मांडताना जनतेचा सहभाग महत्वाचा मानताना दिसत नाही.

**५०)** मराठवाडा वैधानिक विकास मंडळावर मागास जिल्ह्यातील प्रतिनिधींना समप्रमाणात सदस्यत्व देण्यात आलेले दिसत नाही.

## ८.३ शिफारशी :—

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास केल्यानंतर मराठवाडयाच्या विकासातील मागासलेपणा जेवढा कमी व्हावयास पाहिजे होता. तेवढा झालेला नाही. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते ०९—१० या पाच वर्षाच्या कालावधीत मराठवाडयाचा विकास होण्यासाठी वेगवेगळया विभागावर विशेष निधी १२८६२.७० लाख रु. विशेष निधी खर्च केले त्यामुळे त्या विभागाला जास्त निधी दिला. **उदा :—** सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग व नगर विकास विभाग या विभागाचा विकास झाला. परंतु बाकीच्या विभागाला अत्यंत कमी निधी मिळाल्यामुळे त्या विभागाचा किंवा सर्वांगिण विकास पाहिजे तेवढया प्रमाणात

झालेला नाही. तेंव्हा मराठवाडा विभागाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी आणि मराठवाडयाच्या विकास प्रक्रियेला वेग देण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला विविध पातळीवर उपाययोजना आणि धोरणांचा अवलंब करणे आवश्यक आहे. या दृष्टीकोणातुन काही शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्या खालील प्रमाणे.

**१)** राज्याच्या वार्षिक योजनेतून तीनही वैधानिक विकास मंडळासाठी १०० कोटी रु. इतका राखीव निधी आहे. त्यात मराठवाडा वैधानिक विकास मंडळासाठी २८ कोटी रु. इतका राखीव निधी आहे. वैधानिक विकास मंडळाची स्थापना सन १९९४ साली झाली तेंव्हापासून या निधीत कोणतीही वाढ केलेली नाही. तसेच मा. राज्यपालांनी सन २०१०—११ या आर्थिक वर्षापासून हा विशेष निधी बंद केला आहे तो चालू करून विकास निधीत चालू किंमतीनुसार वाढ होणे गरजेचे आहे.

**२)** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या विशेष निधी वाटपात फारच विषमता दिसते. औरंगाबादसारख्या विकसित जिल्ह्याला पाच वर्षांच्या कालावधीत एकूण निधिच्या १८.५७% निधी दिला. तर हिंगोलीसारख्या मागास जिल्ह्यासाठी ६. ३९% सर्वात कमी निधी दिला. या मुळे वैधानिक विकास मंडळाचा मुळ उद्देशच बाजूला राहतो. मागास विभागाचा विकास व्हावा, विकासाचा अनुषेश भरुन निघावा या उद्दीष्टासाठी विकास मंडळाची स्थापना केलेली आहे. मागास जिल्ह्यांचा विकास होण्यासाठी त्यांना विकसित जिल्ह्यांपेक्षा जास्त निधी द्यावा, त्यामुळे त्या जिल्ह्यांचा विकास होवून या मंडळाचा मुळ उद्देश साध्य होईल.

**३) मराठवाडयातील जलसंपत्तीचे नियोजन करण्यासाठी विकास मंडळाने प्रयत्न करावेत :—** मराठवाडयात जल संपत्तीचे नियोजन करण्याची गरज आहे. भुगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी 'पाणी आडवा—पाणी जिरवा' या सारख्या कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावयास पाहिजे. मंडळाने मृदसंधारण, जलसंधारण, मृदसर्व्हेक्षण संबंधीत यंत्रणेचे भरीव सहकार्य कशा प्रकारे मिळेल याकडे लक्ष दिले पाहिजे. पाण्याचा काटकसरीने वापर करण्याच्या

बाबतीत शेतकऱ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यासाठी या विकास मंडळाने प्रयत्न करावेत.

**४)** कृष्णा खोऱ्यात लवादाप्रमाणे महाराष्ट्राला ५९९ अ.घ.फु. पाणी वापरायची परवानगी आहे. कृष्णा खोऱ्यातील मराठवाडयाचे क्षेत्र अंदाजे १०% आहे. म्हणजे मराठवाडयाचा न्याय वाटा ६० अ.घ.फु. येतो. यापैकी २५ अ.घ.फु. पाण्याचे नियोजन होऊन कामे पुर्णत्वास आली आहेत. उर्वरित २५ अ.घ.फु. पाण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने विशेष प्रयत्न करावेत.

**५)** कृष्णा खोऱ्यातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला चांगले यश मिळाले परंतु गोदावरी खोऱ्याच्या बाबतीत मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला योग्य असा शासनाकडून प्रतिसाद मिळवण्यासाठी मंडळाने प्रयत्न करावेत.

**६)** मराठवाडयात अंदाजे ८५०० गावे आहेत. त्यापैकी अंदाजे ३२०० गावे अवर्षण प्रवण आहेत त्यासाठी प्रत्येक गावाला पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे नियोजन करण्यास मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने प्रयत्न करावेत.

**७) मराठवाडयातील पायाभूत सोयीच्या विकासाकडे मंडळाने विशेष लक्ष द्यावे:—** मराठवाडयाच्या मागासलेपणाचे एक महत्वाचे कारण म्हणजे पायाभूत सोयीची कमी उपलब्धता हे आहे. या विभागात रस्त्याचे अधिकाधिक जाळे निर्माण करण्यासाठी या मंडळाने जास्तीत जास्त लक्ष द्यावे.

**८)** रस्ते विकास कार्यक्रमाअंतर्गत मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने औरंगाबाद जिल्ह्यातील रस्ते विकासासंबंधी जास्तीत जास्त शिफारशी शासनाकडे केलेल्या आहेत. त्याच प्रमाणे इतर जिल्ह्यातील रस्ते विकासासंबंधी शासनाकडे शिफारशी कराव्यात.

**९)** नवीन थेट रेल्वे सुरू करण्याबाबत मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने औरंगाबाद व नांदेड या शहरा प्रमाणेच इतर शहरातुन नवीन गाडया सोडण्यासाठी शासना कडे शिफारस करावी.

**१०) कृषी उद्योगाची स्थापना करण्यासाठी प्रयत्न करावेत :—** मराठवाडयाच्या ग्रामीण भागातील रोजगाराचे प्रमाण वाढविण्यासाठी शेती क्षेत्रावर असणारा भार

कमी करण्यासाठी कृषी उद्योगाची स्थापना करण्यात आली पाहिजे, शेतमालास योग्य भाव मिळण्याच्या दृष्टीने असे उद्योग उपयुक्त ठरतात. मराठवाडाच्या कृषी उद्योगांच्या स्थापनेसाठी योग्य वातावरण निर्माण करण्यासाठी या विकास मंडळाने विशेष प्रयत्न करावेत.

**११) शेती पुरक व्यवसायांना चालना देण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने प्रयत्न करावेत :—** कुक्कुट पालन, वराह पालन, दुग्ध व्यवसाय, रेशीम उद्योग इ. सारख्या कृषी क्षेत्रास पूरक व्यवसायांना चालना देण्याची जबाबदारी वैधानिक विकास मंडळाने स्वीकारली पाहिजे. यासाठी शेती पूरक व्यवसायांना चालना देण्यासाठी विकास मंडळाने विशेष प्रयत्न केले पाहिजेत.

**१२)** मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांना आधुनिक फुलशेतीचे दालन खुले करण्यासाठी मराठवाडा कृषी विद्यापीठाने मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या अर्थसहाय्याने उच्च तंत्रज्ञान, पुष्पउत्पादन प्रकल्प, फळ संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे सुरू केले आहे. व असाच प्रकल्प मराठवाडयातील सर्व जिल्ह्यात सुरू करण्याची मागणी या मंडळाने शासनाकडे करावी.

**१३) मराठवाडयातील औद्योगिकरणास गती देण्यास विकास मंडळाने विशेष प्रयत्न करावेत :—** महाराष्ट्रात औद्योगिकीकरणाबाबतीत कमालीचा असमतोल निर्माण झाला आहे. मराठवाडयासारख्या मागास भागात औद्योगिकरणास गती देण्याच्या दृष्टीने पायाभूत सोयी, वित्तीय सोयीची उपलब्धता, तांत्रिक मनुष्यबळ या बरोबरच उद्योजकता वाढविण्यासाठी अधिक प्रयत्नाची गरज आहे. साधन सामुग्रीचा योग्य वापर ज्या उद्योगात करता येणे शक्य आहे अशा उद्योगाचे सर्वेक्षण करून मराठवाडयात अधिकाधिक उद्योगाची उभारणी कशा रीतीने करता येईल यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने विशेष प्रयत्न करावेत.

**१४)** औद्योगिक समस्ये बाबत मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने औरंगाबाद येथील समस्या सोडविण्याबाबत शिफारस केली त्याच प्रमाणे मराठवाडयातील सर्व जिल्ह्यांच्या औद्योगिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा.

**१५) मराठवाडयात तांत्रिक व व्यावसायीक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी विकास मंडळाने प्रयत्न करावेत :—** मराठवाडा वैधानिक विकास

मंडळाच्या कार्याच्या संदर्भात तांत्रिक व व्यावसायीक शिक्षणाच्या योग्य सोयी उपलब्ध करून देणे हे महत्वाचे कार्य आहे. सध्याच्या स्पर्धेच्या युगात खुल्या अर्थव्यवस्थेच्या चौकटीत तांत्रिक व व्यावसायीक शिक्षणास अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. मराठवाडयात लोकसंख्येच्या प्रमाणात अशा सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मंडळाने प्रयत्न करावेत.

**१६)** लातूर येथे स्वतंत्र तंत्र शिक्षण विद्यापीठ करण्याची मागणी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केलेली आहे. लातूर येथे अगोदरच मोठया प्रमाणात शैक्षणिक सुविधा झालेल्या आहेत, त्यातच भर पडेल. मंडळाने इतर मराठवाडयातील मागास जिल्ह्याचा विचार करावा.

**१७)** आरोग्य सुविधेसाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने जास्तीत जास्त सुविधांसाठी औरंगाबाद व लातूर जिल्ह्यांचा विचार केलेला आहे इतर जिल्ह्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. तर मराठवाडयातील सर्व जिल्ह्यांचा विचार करावा.

**१८)** मराठवाडा विभागात एकच महसूल विभाग अस्तित्वात आहे. मराठवाडयाला दोन महसूल विभागामध्ये विभागण्याची शिफारस मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे केलेली आहे. परंतु त्या मागणीला अद्याप पर्यंत यश आलेले नाही. तरी या मागणीसाठी शासनाकडे मंडळाने प्रयत्न करावेत.

**१९)** मराठवाडयातील नवीन १५ तालुक्यासाठी पंचायत समितीची कार्यालये निर्माण करण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने शासनाकडे विनंती केलेली आहे. अद्याप पर्यंत त्या मागणीला यश आलेले नाही. तरी या मागणीचा मंडळाने शासनाकडे पाठपुरावा करावा.

**२०)** पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडयातील तीर्थक्षेत्राशी संबंधीत पर्यटन स्थळांचा विकास करण्याची शिफारस शासनाकडे केलेली आहे. इतर क्षेत्राच्या विकासासंबंधी मंडळाने शासनाकडे प्रयत्न करावेत.

**२१) सार्वजनिक आरोग्य विभागाचा अनुशेष भरून काढवा :—** सन १९९४ ते २०११ पर्यंत सर्व विभागाचा अनुशेष भरून निघाला आहे. परंतु सार्वजनिक विभागाचा अनुशेष मार्च २०११ अखेर २७५.०९ कोटी रू. शिल्लक आहे. हा अनुशेष भरून काढण्याचा विकास मंडळाने प्रयत्न करावा.

**२२) मराठवाडयातील योजनाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकडे मंडळाने लक्ष द्यावे :—** मराठवाडा विभागात ज्या पंचवार्षिक योजना व वार्षिक योजना राबविण्यात येतात त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी आवश्यक असते. विकासाचा लाभ समाजातील सर्वसामान्य घटकांना मिळाला पाहिजे. शासनाच्या विविध कार्यक्रमाची अंमलबजावणी योग्य रीतीने होते किंवा नाही याकडे मंडळाने लक्ष देणे गरजेचे आहे. योजना राबविण्यासयाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीस गळत्या असणार नाहीत याकडे मंडळाचे बारकाईने लक्ष द्यावे.

**२३) जिल्हा निहाय्य विशेष निधी वाटपातील विषमता कमी करावी :—**

सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला राज्य शासनाकडून नियतव्यय विशेष निधी एकूण १२८६२.७० लाख रू. निधी मिळाला. या विशेष निधी मधून औरंगाबाद सारख्या विकसित जिल्ह्याला सर्वात जास्त निधी १८.५७% मंजूर झाला. तर हिंगोली सारख्या मागास जिल्ह्याला सर्वात कमी निधी एकूण निधीच्या ६.३९% निधी मंजूर झाला. यावरून जिल्हा निहाय्य विशेष निधी वाटपामध्ये फारच विषमता दिसते. तरी मंडळाने मागास जिल्ह्यांना जास्त निधी द्यावा म्हणजेच मंडळाची उद्दिष्टये साध्य होतील.

**२४) मराठवाडयातील प्रत्येक जिल्ह्यातील तालुका निहाय्य विशेषनिधी वाटपातील विषमता कमी करावी :—** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये प्रत्येक जिल्ह्याला जो विशेष निधी दिला आहे त्यामध्ये तालुका निहाय निधी वाटपात खुपच विषमता दिसून येते. औरंगाबाद सारख्या विकसित तालुक्याला त्या जिल्ह्यातील एकूण निधी पैकी सर्वात जास्त १०५२.९२ लाख रू. एकूण निधीच्या ४४.०८% मिळाला. तर सोयगाव तालुक्याला कांहीच विशेष निधी मिळालेला नाही. यावरून निधी

वाटपात खुपच विषमता दिसून येते. मराठवाडयाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी मागास तालुक्यांना जास्त निधी देवून तेथील विकास केला तर मंडळाचे उद्दिष्ट साध्य होईल.

**२५) विशेष निधी वाटपामध्ये विकास मंडळाने सर्वच विभागांना प्राधान्य द्यावे :—** मराठवाडा विभागाचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी मंडळाने खालील दहा विभाग पाडले आहेत, सार्वजनिक बांधकाम, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, नगर विकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, सामान्य प्रशासन विभाग, सामाजिक न्याय विभाग, सामाजिक कार्य व क्रिडा विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महसूल विभाग, कृषी व पशु—दुग्ध—मत्स विभाग, नियोजन विभाग, इ. या विभागापैकी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, नगर विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग या विभागावरच जास्त लक्ष केंद्रित केले असून इतर विभागाकडे कमी लक्ष किंवा कमी खर्च केलेला आहे तरी मराठवाडयाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने वरील दहा विभागावर समान खर्च करण्याचा प्रयत्न करावा.

**२६)** वैधानिक विकास मंडळाकडून मराठवाडयातील जिल्ह्यातील तालुक्यांना जो निधी मिळाला त्या निधीचा वापर तालुक्यातील कांही ठराविकच गावाच्या विकासासाठी खर्च केलेला आहे. संपुर्ण तालुक्याच्या विकासाकडे दुर्लक्ष केलेले आहे. तरी विकास मंडळाने लक्ष देऊन ज्या गावाचा विकास झालेला नाही, रस्त्याची सोय नाही, पाणीपुरवठयाची सोय नाही, शैक्षणिक, आरोग्याच्या सोयी नाहीत, अशा गावाकडे जास्त लक्ष देऊन मागास गावातील ज्या भागामध्ये वरील सुविधा नाहित, त्या भागाकडे जास्त लक्ष देऊन त्या ठिकाणी सुविधा पुरवाव्यात तरच वैधानिक विकास मंडळ स्थापनेचा उद्देष पूर्ण होईल.

**२७)** केंद्रिय योजना आयोगाच्या नियोजन व मुल्यमापन समितीने वैधानिक विकास मंडळाची कार्यक्षमता वाढवून प्रादेशिक योजना राज्यशासनाकडे

मान्यतेसाठी जाणे सुचविले आहे. या केंद्रिय योजना आयोगाच्या शिफारशी त्वरीत अंमलबजावणी व्हावी.

**२८)** शासनाने विभागीय अनुशेष दुर करण्यासाठी केलेली तरतुद व प्रत्यक्ष खर्च यातील तफावत फार मोठी नसावी. यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने अनुशेष निर्मुलनाच्या खर्चास अग्रक्रम देण्यासंबंधी विशेष लक्ष द्यावे.

**२९)** अविभाज्य नियतव्यय हा वर्षाच्या शेवटी तिनही प्रादेशिक विभागामध्ये वितरीत करण्यात येतो. त्यापैकी मोठा हिस्सा उर्वरित महाराष्ट्राकडे वळविण्यात येतो. मागील काही वर्षामध्ये अविभाज्य नियतव्ययाचा मुद्दा हा चिंतनीय विषय झाला आहे. त्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने ही बाब राज्यपाल महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावी.

**३०)** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने राबविलेल्या विविध क्षेत्रातील विकास विषयक कार्यक्रम विकास कामातील फलश्रुती यांची माहिती लोकप्रतिनिधींना व सामान्य जनतेला वेळोवेळी उपलब्ध करून द्यावी.

**३१)** मराठवाडा वैधानिक विकास मंडळावर मागास जिल्ह्यातील प्रतिनिधींना पर्याप्त प्रमाणात सदस्यत्व देण्यात यावे.

**३२)** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे विशेष निधीचे वाटप करताना दुर्लक्षित व रेंगाळलेल्या प्रकल्पाचा प्राध्यन्याने विचार केला पाहिजे.

**३३)** मराठवाडयातील आठही जिल्हे अनुशेषाचे असताना औरंगाबाद येथे एकच महसुली विभाग दिसून येतो. उस्मानाबाद जिल्ह्यात आणखी एक महसुली विभाग स्थापन करून प्रशासनाची शक्ती वाढून अंमलबजावणीत आलेली मरगळ व ढिलेपणा दूर होईल.

**३४)** मा. अध्यक्ष व सदस्यसचिव यांच्या कार्यालयातील कर्मचारी वर्गातील विविध रिक्त पदांना त्वरीत मंजूरी द्यावी. त्यामुळे मंडळाचे मनुष्यबळ वाढेल व कामकाजात सुसूत्रता येईल.

**३५)** शासकीय नोकऱ्यात मराठवाडयास राज्य कॅडरमधील १६% व विभाग कॅडरमध्ये ८०% प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी नोकऱ्यामधील विभागीय प्रतिनिधीत्वाचा अनुशेष निघेल तो चालू नोकरभरतीतील अनुशेष असलेल्या

विभागाचे प्रतिनिधीत्व वाढवून पाच ते सहा वर्षात भरून काढावा यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मा. राज्यपाल महोदयांचे लक्ष वेधावे.

**३६)** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या कामात सरकारचे सहकार्य आवश्यक आहे. या नावाखाली मंडळाच्या रचनेत राजकीय भुमिकेतून वाढता हस्तक्षेप केला जात आहे. तो त्वरीत दुर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

**३७)** मराठवाडयातील प्रत्येक जिल्ह्यात विचारवंत, विद्वान, अभ्यासक व तळमळीच्या कार्यकर्त्यांनी जिल्हा विकास मंडळ किंवा विकास विचार मंच अशा संस्था स्थापन कराव्यात. त्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळातील अधिकाऱ्यांनी, तज्ञ सदस्यांनी मार्गदर्शन करावे.

**३८)** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने मराठवाडयातील तिनही विद्यापीठाच्या सहकार्याने चर्चासत्रे व परिसंवाद घ्यावेत. शासकीय धोरणांचे विश्लेषण व मूल्यमापन करून सुधारणा सुचवाव्यात. थोडक्यात मराठवाडयाच्या विकासाच्या सर्व पैलूवर अभ्यास व संशोधन करावे.

**समारोप :—**

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना होऊन सध्या १८ वर्षे पूर्ण झाली आहेत. या काळात मंडळाने मराठवाडयाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. उदा. अनुशेष भरून काढण्यासाठी जो निधी मिळतो त्याच्या साह्याने विकास कामे करणे, राज्य सरकारच्या नोकऱ्यांतील अनुशेष शोधण्याचे काम मंडळाने केले आहे. मा. राज्यपालांना भेटून विभागाच्या अडचणी योग्य पद्धतीने मांडण्याचे काम मंडळाने यशस्वीपणे केले आहे.

केंद्रिय नियोजन मंडळाने राज्यातील तीनही वैधानिक मंडळाच्या कार्याचा नुकताच आढावा घेतला असून मंडळाच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. एवढेच नव्हे तर मंडळाने आपली कार्यकक्षा केवळ अनुशेष निर्मुलनापुरतीच मर्यादित न ठेवता राज्य नियोजन मंडळाच्या मार्गदर्शनाखाली 'प्रादेशिक नियोजनाचा अहवाल' तयार करावा असेही म्हटले आहे. म्हणजेच मंडळाने केलेल्या आजपर्यंतच्या विकास कार्याची पोचपावती मिळाली असे म्हणावे लागेल.

मराठवाडयाच्या विकासात मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे महत्वाचे योगदान आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळची स्थापनाच मुळीच महाराष्ट्रातील अनुशेष निर्मुलन करून समतोल प्रादेशिक विकास व्हावा यासाठी निर्मिती झाली आहे. महाराष्ट्रातील एकूण अनुशेषापैकी मराठवाडा विभागाचा अनुशेष सन १९८४ ते २००० पर्यंत जवळपास २४% ते ३०% पर्यंत होता. दि. १एप्रिल २००० मध्ये महाराष्ट्रातील एकूण अनुशेष ११९७४.४४ कोटी रू. होता. त्यात मराठवाडायाच हिस्सा ३५४७.०६ कोटी रू. (२९.६२%) होता. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या पाठपुराव्यामुळे हा अनुशेष दि. १ एप्रिल २०११ पर्यंत फक्त सार्वजनिक आरोग्य विभागाचा २७५.०९ कोटी रू. अनुशेष सोडला तर बाकीच्या विभागाचा अनुशेष भरून निघाला आहे. तसेच मराठवाडा विभागाला सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधीमध्ये 'नियतव्यय विशेष निधी' मधून एकूण १२८६२.७० लाख रू. विशेष निधी मिळाला. या निधी मधून मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सिंचन सोयी, पिण्याचे पाणी, गावोगावी रस्त्याची सोय, सामाजिक व सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम, आरोग्याच्या सोयी, गावोगावी रस्त्यावर पथदिवे, सांडपाणी व्यवस्था इ. सोयी सुविधा केल्या आहेत. त्यामुळे त्या त्या गावाचा विकास होत आहे. अशाच प्रकारचा प्रयत्न मंडळाने मागासलेल्या गावाचा, गावातील मगासलेल्या भागाचा, ज्या भागाकडे दुर्लक्ष झाले किंवा जाणून बुजून दुर्लक्ष केले गेले अशा भागाचा शोध घेवून त्या भागाचा विकास करावा हि अपेक्षा.

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाकडून विभागीय विकासाची संकल्पना मांडत असताना जनतेचा सहभाग अत्यंत महत्वाचा किंबहुना मराठवाडा वैधानिक विकास मंडळ काय विकास करते, या पेक्षाही ज्यांच्या करीता हा विकास करावयाचा आहे त्यांची विकसीत मानसिकता निर्माण होणे हे महत्वाचे आहे. यासाठी मंडळाकडून यशस्वी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

उपरोक्त सादर केलेल्या या प्रकरणातील शिफारशीसंबंधी गंभीरपणे विचार करावा जेणे करून मंडळावर सोपविलेल्या घटनात्मक जबाबदारीचे पालन मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला करणे शक्य होईल व प्रस्तावित उद्दीष्टये

सफल करण्याबाबत तसेच मराठवाडा विभागातील जनतेच्या कल्याणाच्या दृष्टीने भरीव कार्य होईल अशी अपेक्षा आहे.

# समाप्त

# संदर्भ ग्रंथसूची

## अ — मराठी ग्रंथ


१) पत्की/साबळे, (१९९१), विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर.

२) कदम विश्वास, (ऑगस्ट २०१०),आर्थिक विकास व नियोजन, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

३) पुरोहित वसुधा, (२०१०),आर्थिक विकास व नियोजन आणि सांख्यिकीय पध्दती, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

४) कायंदे — पाटील गंगाधर वि., (जून २००१),भारतीय आणि जागतीक आर्थिक विकास, चैतन्य पब्लिकेशन्स , नाशिक.

५) झामरे जी. एन. , (जुलै २०१०),भारतीय आर्थव्यवस्था विकास व पर्यावर्णात्मक अर्थशास्त्र, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर.

६) इंगळे बी. डी. (२०१०),विकास व पर्यावर्णीय अर्थशास्त्र, अरूणा प्रकाशन, लातूर.

७) फडणविस मृणालिनी, (जुलै १९९८), विकासाचे अर्थशास्त्र व सिध्दांत, विद्या प्रकाशन, नागपूर.

८) जाधवर आर. डी./ गिते टी. जी./आघाव आर. जी./ खुरूद बी. एस. (जुलै२००६),भारतीय आणि जागतीक आर्थिक विकास, अथर्व प्रकाशन,पुणे.

९) रायखेलकर/ दामजी, (जून २०११),औद्योगिक अर्थशास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

१०) डोळे ना. य. (१९९७), उदारीकरण :— नवे आर्थिक धोरण, विद्या प्रकाशन नागपूर.

११) पाटील जे. एफ. (डिसेंबर २००७),वृध्दी व विकासाचे अर्थशास्त्र,फडके प्रकाशन कोल्हापूर.

१२) देशपांडे श्री. आ. (१९८७), भारतीय नियोजन आणि आर्थिक विकास, विद्या प्रकाशन नागपूर.

१३) घाटोळे रा. ना. (२००३),समाजशास्त्रीय संशोधन,तत्वे व पध्दती, श्री मंगेश प्रकाशन नागपूर.

१४) भांडारकर पु ल. (१९८७), समाजिक संशोधन पध्दती,महाराष्ट्र विद्यापीठ,ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर.

१५) पाटील वा. मा. (२०१०), संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.

१६) काचोळे दा धो. (जुलै २००५),समाजशास्त्रीय संशोधन पध्दती, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

१७) राखीकर यशवंत/ गोडबोले वि. ज./ जॉन्सन बोर्जेस (२००८), डायमंड अर्थकोश, डायमंड पब्लिकेशन,पूणे.

१८) इंगळे बी. डी. (फेब्रुवारी २०११), आर्थिक विचारांचा इतिहास, अरूणा प्रकाशन लातूर.

१९) रायखेलकर/दामजी (जून २०११), आर्थिक विचारांचा इतिहास, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

२०) कुलकर्णी भुजंगराव (फेब्रुवारी २००७),मी, मराठवाडा आणि महाराष्ट्र,प्रतिमा प्रकाशन, पुणे—३०.
२१) गर्गे स. मा., (१४ जुलै १९९५), मराठवाडयाचा विकास दिशा आणि गती,मंदार ट्रेडर्स,पुणे—११.
२२) कुरूलकर र. पु.(१९९७),महाराष्ट्राची अर्थव्यवस्था,विद्या प्रकाशन नागपूर.
२३) क्षीरसागर व्ही. एस. (२०११), महाराष्ट्रातील जिल्हे, के. सागर पब्लिकेशन, पूणे.
२४) जाधव तुकाराम, महाराष्ट्र वार्षिकी २०१२, द युनिक अकॅडमी, पूणे.
२५) दास्ताने संतोष, महाराष्ट्र २००९, (२७ वी आवृत्ती), दास्ताने रामचंद्र आणि कंपनी,पुणे२६
२७) शिंदे प्रफुल्ल, (२००१—०२),मराठवाडा डायरी संकलन व लेखन,प्रकाशन संपर्क, मुंबई—९.
२८) देशमुख रा. नी.,आपला औरंगाबाद जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.
२९) देशमुख रा. नी.,आपला जालना जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.
३०) देशमुख रा. नी.,आपला परभणी जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.
३१) देशमुख रा. नी.,आपला हिंगोली जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.
३२) देशमुख रा. नी.,आपला बीड जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.
३३) देशमुख रा. नी.,आपला नांदेड जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.
३४) देशमुख रा. नी.,आपला लातूर जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.
३५) देशमुख रा. नी.,आपला उस्मानाबाद जिल्हा आवृत्ती २०१२,कल्पना प्रकाशन, नांदेड.
३६) पत्की/पाठक (जून १९९२), औद्योगिक अर्थशास्त्र,पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
३७) कोंडेवार यू.बी./खंदारे भारत (ऑगस्ट २००९),भारतीय अर्थव्यवस्था,चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
३८) कुलकर्णी प्र. रा. (जून १९९९), भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.
३९) तुपे सु. दा., मराठवाडयाचा आर्थिक विकास आणि समस्या.,साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद.
४०) जैन अशोक 'महाराष्ट्राचे शासन व राजकारण' सेठ पब्लिकेशन,
४१) पुरोहित—खांदेवाले वसुधा,(जून २००८),भारतीय अर्थव्यवस्था,विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद
४२) सोळुंके आर. एस.,(१५ ऑगस्ट १९९७),महाराष्ट्राची अर्थव्यवस्था,कैलास पब्लिकेशन औरंगाबाद.
४३) इंगळे बी. डी.,( ऑक्टोंबर २००९), महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, अरूणा प्रकाशन लातूर.
४४) जाधव राजश्री आप्पाराव,(१/१/२०११), महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, अरूणा प्रकाशन लातूर.
४५) बिराजदार माधव,(जून २०१२), महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.
४६) प्रा. वाखरडे सोनाली, (३ जानेवारी २०११), मूलभूत सामाजिक संस्था, अरूणा प्रकाशन लातूर.

४७) डॉ. काचोळे दा. धो., (१० सप्टेंबर २००२), समाजशास्त्र:— संकल्पनात्मक ओळख, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
४८) डॉ. धनागरे द.ना., (२१ डिसेंबर २००५), संकल्पनाचे विश्व आणि सामाजिक वास्तव, प्रतिमा प्रकाशन पुणे ५.
४९) प्राचार्य कुंभार नागोराव/डॉ. आनंद अनभूले (१९९९), महाराष्ट्रातील समाजशास्त्रे चिंतन, न्यु स्नेहा ऑफसेट लातूर.
५०) डॉ. माने माणिक, (जुलै २००४), सुबोध समाजशास्त्र, विद्या प्रकाशन नागपूर.
५१) डॉ. भोईटे/डॉ. बोबडे (जुलै १९९६), सामाजिक संस्था, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.
५२) प्रा. सौ. शिंदे लिला/डॉ. शिंदे पंडित, (जुन २००३), समाजशास्त्राची रूपरेषा, श्री विद्या प्रकाशन, पुणे ३०.
५३) डॉ. मनवर डी. एस. (२००३), समाजशास्त्र परिचय, अरूणा प्रकाशन लातूर.

## ब — इंग्रजी ग्रंथ

१) Jhingan M.L. ,( 1981 ),The Economics of Development & Planning,Vikas Publishing House Pvt. Ltd., New Delhi.
२) Meier Gevald M. & Baldwin Robert E., ( 1970 ), Economics Development – Theory, History,Policy, Asia Publishing House, Bombay.
३) Karnati Lingaiah/ T. Satyanarayana (1990), Indian Economi, Sterling Publishers Private Ltd., New Delhi-6
४) Jhon W. Vest (1963),Research in Education, Prentis Hall of India.
५) Kothari C. R. (1989), Research Methdology,Wiley Estern Ltd, New Delhi.
६) Borse M.H. (2004),Research Methdology, hree Niwas Publications, Jaipur.
७) Kurulkar R.P., Regional Disparitias in Maharashtra – Problams & solutions (1960-2000),Guna-Gaurav Nyas publications No-24 Think –Line,Nashik.
८) Basic Developmental statistics of the Marathwada Region ( 2003 ) by Swami Ramanand Teerth Marathwada Research Institute, Aurangabad.
९) Sharma K.K. (2004), Intellectual's,Sandharbh Maharashtra volume – ii,Intellectual book Bureau,Bhopal.
१०) Datta R & Sundram K. P. M. ( 2006 ) " Indian Economy " S. Chand & Company Ltd., New Delhi, 43 th Edition.

## क — शासकीय प्रकाशने/अहवाल

१) शासन निर्णय क्र. अनुशेष २००९/पृ.क्र. ४०५/का.१४१६ दि. ३१ मे २०११,नियोजन विभाग महाराष्ट्र शासन.
२) राज्य सार्वजनिक उपक्रमाचे कार्य (१९९६—९७),महाराष्ट्र शासन,राज्य सार्वजनिक

उपक्रम केंद्र, वित्त विभाग (१९९८)

३) भारताचे नियंत्रक महालेखापरीक्षक यांचा अहवाल,( दिनांक ३१ मार्च १९९५ रोजी संपणाऱ्या वर्षाचा ),क्र. २ (वाणिज्यिक),महाराष्ट्र शासन

४) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०११—१२),अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

५) उस्मानाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००७—०८.

६) मानवी विकास निर्देशांक, महाराष्ट्र, २००२

७) दृष्टिक्षेपात औरंगाबाद विभाग — २०१०—११ 'सहसंचालक' अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद.

८) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे घटनेच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये करण्यात आलेल्या कार्यवाहीचा प्रगती अहवाल. १५ मार्च १९९७

९) मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, वर्षिक अहवाल २००५—०६

१०) मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, वर्षिक अहवाल २००६—०७

११) मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, वर्षिक अहवाल २००७—०८

१२) मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, वर्षिक अहवाल २००८—०९

१३) मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, वर्षिक अहवाल २००९—१०

१४) विदर्भ वैधानिक विकास मंडळ, वर्षिक अहवाल १९९७—९८,

१५) महाराष्ट्र शासन राजपत्र,असाधारण भाग आठ,राज्यपालांचे आदेश क्र.जी.एस./डी.बी. रूल्स् —१४/२०११/१५०दि. ५/०९/२०११.

१६) म. वै. वि. मं. च्या विशेष निधी अंतर्गत जिल्हा निहाय कामाचा तपशिल सन २००५—०६.

१७) म. वै. वि. मं. च्या विशेष निधी अंतर्गत जिल्हा निहाय कामाचा तपशिल सन २००६—०७.

१८) म. वै. वि. मं. च्या विशेष निधी अंतर्गत जिल्हा निहाय कामाचा तपशिल सन २००७—०८.

१९) म. वै. वि. मं. च्या विशेष निधी अंतर्गत जिल्हा निहाय कामाचा तपशिल सन २००८—०९.

२०) म. वै. वि. मं. च्या विशेष निधी अंतर्गत जिल्हा निहाय कामाचा तपशिल सन २००९—१०.

२१) शासन निर्णय क्र. वै.वि.मं.—१००६/प्र.४१७/का.१४५२ दि. २६/१२/२००६ नियोजन विभाग मंत्रालय मुंबई—३२.

२२) मा. राज्यपाल, महाराष्ट्र यांचे १ मार्च २००७ चे निर्देश.

२३) म.वै.वि.मं. ची सर्वसाधारण सभा दि. ३ ऑगस्ट २००७ ची बैठकीसाठी टिपण्णी.

२४) मा. राज्यपाल, महाराष्ट्र यांचे ६ मार्च २००८ चे निर्देश.

२५) मा. राज्यपाल, महाराष्ट्र यांचे २७ मे २००९ चे निर्देश.

२६) म.वै.वि.मं.औरंगाबाद तर्फे मा. मुख्यमंत्री महोदयांना सादर करावयाचे निवेदन सन—२०१०.

२७) म.वै.वि.मं.ने दि.१५/३/२०१० रोजी मा. राज्यपालांना सादर केलेले संक्षिप्त टिपण्णी.

२८) मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ४१३ दि. २६ जुलै २०१०.

२९) Hand book of statistics on Indian Economy, 2003-04.

३०) Public Enterprise Survy, Government of India, 2003-04 .
३१) Dr.Radhakrishna R.(2007),Report of the Expert Group on Agriculture Indebtendness,Ministry of Finance,New Delhi.
३२) Regional planning A case study of Marathawada region, Gokhale in institute of Politics of Economics,1975,Pune.
३३) "Report of the Fact Fidding committee on Regional Imbalance in Maharashtra state." Planning Department, Government of Maharashtra Mumbai,April 1984.
३४) Report of the Indicators & Backlog committee on Relatives Levels of Develpoment, Backlog & Removel of Regional Imbalance,(1997)
३५) Director of census Operation,Maharashtra of Home Affairs, Goverement of India.
३६) Maharashtra Human Development Report – 2002, Government of Maharashtra, Mumbai.
३७) Aurangabad Division at a Glace 2000 – 01 Directorate of Economics & Statistics, Govt. of Maharashtra, Regional office, Aurangabad.

## ड — शोध निबंध

१) कुरूलकर र. पु.(फेब्रुवारी २००३),मराठवाडयाचा आर्थिक विकास, शोध निबंध,'अर्थमोळी' विमल प्रकाशन नांदेड.
२) कुलकर्णी भुजंगराव, (२४ जुलै २०१०),मराठवाडयाचा विकासाचा विचार सर्वांनी गांभीर्याने करा—संशोधन लेख, सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र, ज्ञानेश प्रकाशन, औरंगाबाद,
३) दिशा विकासाची,रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद,'दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र दि. २१ व २२ जानेवारी २००६,विषय—''असमतोल आणि आर्थिक विकास व प्रादेशिक वैधानिक विकास मंडळाची भूमिका''.
४) डॉ. सोळुंके आर. एस./डॉ. सौ. महाजन एम. डी. (एप्रिल २०००), महाराष्ट्रातील औद्योगिक असमतोल विकास (शोधनिबंध), Issues in Indias Economic Development, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
५) Suryanarayana M.H. (2009),Intra-State Economics Disparities; Karnataka & Maharashtra,Economic & Political Weekly, June-27,Mumbai.
६) Dr. Kurulkar,Research paper - The Problem of Regional Disparities in Maharashtra State and the role of the Regional Development Boards, Journal of Indian School of Political Economy. ( Jan.- Dec. 2009 )

## इ — वेबसाईट्स

१) www.spardhamantra.com
२) www.mahades.maharashtra.gov.in
३) www.msdb.gov.in

## परिशिष्ठ — १

# टिळक महराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# मराठवाडयाच्या सामाजिक व आर्थिक विकासात मराठवाडा वैधानिक मंडळाची भूमिका


**संशोधक**
प्रा. पोळ कार्तिक वज्रपाल
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

**मार्गदर्शक**
प्राचार्य डॉ. सुर्यवंशी ए. बी.
अधिष्ठाता, वाणिज्य विभाग,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.


---

### मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष यांची मुलाखत अनुसुची

**अ) वैयक्तीक माहिती :—**

१) नाव :— ..........................................................................

२) गाव :— .................. तालुका :— ................ जिल्हा :— ............

३) वय :— ................... लिंग :— .................... (पु./स्त्री)

४) धर्म :— ...................... जात :— ...................

५) शिक्षण :— ....................................................

६) मातृभाषा :— .................................................

७) वैवाहिक स्थिती :— ....................................... (विवाहित/अविविहीत)

८) मुख्य व्यवसाय :— .......................................

**ब) मराठवाडा वैधानिक विकास मंडळा विषयी माहिती :—**

१) म. वै. वि. मंडळाची स्थापना केंव्हा झाली ?

२) म. वै. वि. मंडळाची रचना कशी आहे ?

३) म. वै. वि. मंडळाचे कार्यक्षेत्र किती जिल्ह्यासाठी आहे ?

४) म. वै. वि. मंडळाच्या कार्याचे स्वरूप काय आहे ?

५) अध्यक्ष व सदस्य यांची निवड कोणत्या पध्दतीने होते ?
**अ)** निवडणूक पध्दतीने, **ब)** मा. राज्यपाल मार्फत, **क)** मा. मुख्यमंत्री मार्फत.

६) म. वै. वि. मंडळाची सदस्य संख्या किती आहे ?

७) म. वै. वि. मंडळाचा कार्यकाल वाढविला आहे का ? हो / नाही.
असल्यास किती वेळा कालावधी वाढविला आहे ?

८) म. वै. वि. मं. आणखीन किती कालावधी वाढवावा अशी अपेक्षा आहे ?

९ ) तुमच्या अध्यक्ष पदाचा कार्यकाल किती वर्षाचा आहे ?

१०) म. वै. वि. मंडळाच्या अध्यक्षांची कार्ये कोणती आहेत ?

११) अध्यक्ष व सदस्य यांचा कार्यकाल पुर्ण होण्या अगोदर राजीनामा देता येतो का ? हो / नाही.

देता येत असल्यास कोणाकडे ?

१२) अध्यक्ष व सदस्य यांना पदच्युत केले जाते का ? असल्यास कोण पदच्युत करते ?

१३) अध्यक्ष पदासाठी मोबदला मिळतो का असल्यास कोणत्या स्वरूपात मिळतो ?

१४) म. वै. वि. मंडळाचे सवत:चे असे भाग भांडवल आहे का ?

१५) म. वै. वि. मंडळ स्वत:चा निधी निर्माण करते का ? असल्यास कोणत्या मार्गाने ?

१६) केंद्र सरकारकडून कांहि निधी मिळतो का ? हो / नाही.

१७) म. वै. वि. मंडळाला राज्य शासनाकडून किती विशेष निधी मिळतो ?

१८) सन २००५—०६ ते २००९—१० या कालावधी मध्ये विकास मंडळाला शासनाकडून किती विशेष निधी मिळाला ?

१९) म. वै. वि. मंडळाला मिळालेल्या विशेष निधीचे वाटप जिल्हा निहाय कोणत्या पध्दतीने केले जाते ?

२०) राज्यशासनाकडून मिळालेल्या विशेष निधी मधून एखाद्या विभागाला विशेष प्राधान्य दिले जाते का ? कोणत्या विभागाला प्राधान्य दिले जाते ?

२१) म. वै. वि. मंडळामुळे मराठवाडयाच्या सामाजिक, शैक्षणिक व पायाभूत संरचनेच्या विकासात भर पडली का ? पडली असेल तर कशी ?

२२) म. वै. वि. मंडळामुळे मराठवाडयाच्या रोजगार संधीत वाढ झाली आहे का ? असेल तर कशा प्रकारे ?

२३) म. वै. वि. मंडळामुळे मराठवाडयाच्या विकासातील अनुशेष कमी झाला का ? किती कमी झाला ?

२४) राज्यशासनाने दिलेल्या विशेष निधीचा पूर्णपणे खर्च होतो का ? हो / नाही .

२५) विशेष निधी अंतर्गत जी विकास कामे होतात त्या कामाची निविधा ( टेंडर) काढली जाते का ? हो / नाही.

२६) विशेष निधी मधून केलेल्या कामाच्या दर्जाची तपासणी होते का ? हो / नाही.

२७) विशेष निधी मधून केलेल्या कामाच्या दर्जाची तपासणी होत असल्यास कोण करते ?

२८) म. वै. वि. मंडळामार्फत केलेल्या विकास कामाचा समाजासाठी उपयोग होतो का ? हो / नाही.

२९) वैधानिक विकास मंडह स्थापने पासून राज्यशासनाने तीनही वैधानिक विकास मंडळासाठी नियतव्यय विशेष निधी १०० कोटी रू. ठेवलेला आहे तो पुरेसा आहे का ? हो / नाही.

३०) सन २०११—१२ पासून राज्यशासनाने विशेष निधी बंद केला आहे त्यास आपण सहमत आहात का ? हो / नाही.

३१) जिल्हा निहाय किंवा तालुका निहाय विशेष निधी वाअप करताना राजकीय हसतक्षेप होतो का ? हो / नाही.

३२) राज्यशासनाकडे पाठविलेले विकास कामाचे सर्व प्रस्ताव मंजूर होतात

का ?                                हो / नाही.

३३) मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या कार्यालयीन कामकाजासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग आहे का ?     हो / नाही.

३४) मराठवाडा वैधानिक विकास मंडळातील कर्मचाऱ्यांना कामाचे मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले जाते का ?     हो / नाही.

३५) मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या विकास कामात जनतेचा सहभाग दिसून येतो का ?     हो / नाही.

३६) सहभाग नसल्यास मंडळाने जनतेच्या सहभागासाठी कांही प्रयत्न केले आहेत का ?     हो / नाही.

३७) मराठवाडा वैधानिक विकास मंडळामुळे मराइवाडयाच्या विकासात भर पडत आहे का ?     हो / नाही.

३८) मंडळाचे पुढील काळातील ध्येयधोरणे काय आहेत ?

३९) शासनाकडून या विकास मंडळाच्या काय अपेक्षा आहेत ?

४०) मराठवाडयाचा विकास व्हावा यासाठी शासनाकडून आणखीन कोणत्या सुविधांची आवश्यकता आहे ?

४१) मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या कामकाजावर आपण समाधानी आहात काय ?     हो / नाही.

मुलाखतदाराची स्वाक्षरी

संशोधक
प्रा. पोळ कार्तिक वज्रपाल

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. सुर्यवंशी ए. बी.

## परिशिष्ठ — २

# टिळक महराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# मराठवाडयाच्या सामाजिक व आर्थिक विकासात मराठवाडा वैधानिक मंडळाची भूमिका

**संशोधक**
प्रा. पोळ कार्तिक वज्रपाल
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

**मार्गदर्शक**
प्राचार्य डॉ. सुर्यवंशी ए. बी.
अधिष्ठाता, वाणिज्य विभाग,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

---

**मराठवाडा वैधानिक विकास मंडळामार्फत झालेल्या विकास कामामुळे ज्यांना प्रत्यक्ष लाभ झाला अशा लाभार्थी लोकांना प्रश्नावली अनुसूची**

**अ) वैयक्तीक माहिती :—**

१) नाव :— ..........................................................................................
२) गाव :— .................. तालुका :— ................ जिल्हा :— ............
३) वय :— ................... लिंग :— .................... (पु./स्त्री)
४) धर्म :— ...................... जात :— ...................
५) शिक्षण :— ...................................................
६) मातृभाषा :— ................................................
७) वैवाहिक स्थिती :— ....................................... (विवाहित/अविविहीत)
८) मुख्य व्यवसाय :— .......................................

**ब) मराठवाडा वैधानिक विकास मंडळा विषयी माहिती :—**

१) म. वै. वि. मंडळाविषयी आपणांस कांही माहिती आहे का ? हो / नाही.
२) तुमच्या गावात म. वै. वि. मंडळामार्फत काही विकास कामे केली आहेत का ? हो /नाही.
३) म. वै. वि. मंडळाने विकास निधी खर्च केला असल्यास कोणत्या कामासाठी खर्च केला ?
   १) रस्ता,२) सामाजिक सभागृह,३) शिक्षण,४) आरोग्य,५) पाणी पुरवठा.

४) म. वै. वि. मं. केलेल्या कामाचा तुमच्या कुटुंबासाठी उपयोग होतो का ? हो /नाही.
५) म. वै. वि. मंडळाने केलेल्या कामाचा तुमच्या गावातील लोकांना उपयोग होत आहे का ? हो /नाही.
६) म. वै. वि. मंडळामुळे तुमच्या राहणीमानात सुधारणा झाली का ? हो /नाही.

७) म. वै. वि. मंडळामुळे तुमच्या गावातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा झाली आहे का ?     हो  / नाही.

८) म. वै. वि. मंडळाच्या इतर विकास कामे माहित आहेत काय ?  हो  / नाही.

९) म. वै. वि. मंडळाने केलेल्या कामाचा दर्जा चांगला आहे का ?  हो  / नाही.

१०) म. वै. वि. मंडळाने केलेल्या कामाची व्यवस्थित देखरेख होते का ? हो  / नाही.

११) तुमचे गाव सुधारणीसाठी म. वै. वि. मं. कडून कांही अपेक्षा आहेत का ? हो  / नाही.

१२) मंडळाकडून अपेक्षा असल्यास कोणत्या अपेक्षा आहेत ?     हो  / नाही.

१३) म. वै. वि. मंडळाच्या कामाविषयी कांही तक्रार आहे का ?    हो  / नाही.

उत्तरदात्याची स्वाक्षरी

संशोधक
प्रा. पोळ कार्तिक वज्रपाल

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. सुर्यवंशी ए. बी.

# मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेली विकास कामे

१) सांस्कृतिक सभागृह तुळजापूर (खु.), ता. तुळजापूर.



२) पाचोड ते कल्याण नगर रस्ता, ता. पैठण.



३) सांस्कृतिक सभागृह काक्रंबा, ता. तुळजापूर.



१) मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष श्री र.पु. कुरूलकर यांची मुलाखत घेताना संशोधक प्रा. कार्तिक पोळ.



२) मौजे काक्रंबा, ता. तुळजापूर येथील नमुना निवड लाभार्थ्यांची प्रश्नावली अनुसुची द्वारे मते जानून घेताना संशोधक प्रा. कार्तिक पोळ.

